म. ग्रं. सं. ठाणे

विषय कादंबरी.

लेखक

सन १८९९

संग्रहालय क्रमांक २८ / १८७८

पुस्तकाचे नांव (भाग १ला)

# सन्मार्गबोधक स्त्रीचरित्र.

## भाग १ ला.

हें पुस्तक

**नारायण रामचंद्र सोहनी**

यांनीं

तयार करून

**मुंबईत**


आपल्या

जगदीश्वर छापखान्यांत छापिलें.

**आवृत्ति १ ली.**

ज्येष्ठ शुद्ध ५ शके १७९९

सन १८७७




त्येक
म उ-
क
सुर
ची
आ
दिव
आहे
यांचें परा
स्थितीत

केलें, हेंच सत्य आहे. स्वस्त्री पासून कामशांति, प्रेमपूर्वक सेवा,
आणि सार्थकता हीं प्राप्त होतात ह्मणून व्यभिचार न करितां पुर
पासून आणि स्त्रियांनीं स्वपती पासून आनंद मानणें योग्य आहे
कित्येक अविचारी मनुष्यें तारुण्यांत आल्यावर कामाचे आ
क्षणिक सुखाकरितां व्यभिचार करितात. त्यामुळें त्यांस चोरी, चर
अनेक दुर्गुण लागून शेवटीं तीं सर्वस्वी नाश पावतात, असें अनुभ
ह्मणून याविषयीं बोधपर असें हें पुस्तक रचिलें आहे. तरी याच
करणें वाचकांकडे आहे.

या पुस्तकांत व्यभिचारास अनुसरलेलीं दोन पात्रें कल्पून त्यां
चारापासून वाईट परिणाम झालेल्या आणि पातिव्रत्यापासून चांगर
म झालेल्या गोष्टी समयानुसार सांगून त्यांचीं मनें त्या दुष्कर्मापासून
असें तात्पर्य आहे.

यांतील भाषा सरळ असून यांत ऋतु, नगर, बागबगी
दिकांचें वर्णन फारसें केलें नाहीं. कारण तसें केल्यानें साधारण
स त्याचा कंटाळा येतो. हें पुस्तक आह्मी प्रथमच रचिलें आहे
यांत जे दोष आढळतील ते विद्वज्जनांनीं परोपकारार्थ आह्मांस
त्यास त्यांचे आह्मी आभार मानूं.

पुस्त

# सन्मार्ग बोधक स्त्रीचरित्र.

भाग १ ला.

पूर्वी पुणे शहरांत दामोदरशेट नांवाचा एक व्यापारी राहत होता. तो वडिलोपार्जित जवाहिराचा व्यापार चालवून प्रामाणिक पणानें वर्तत असे. त्याची स्त्री सरस्वती नामक होती. ती सर्वकाळ पतिसेवेंत तत्पर असे; त्यामुळें दामोदरशेटीची तिजवर अत्यंत प्रीति होती. उभयतांस तारुण्य दशेंत सर्व सुखांचा लाभ होता; परंतु वृद्धापकाळ होत आला असतां ही पुत्र नाहीं म्हणून त्यांस कांहीं सुचेनासें झालें होतें; त्यामुळें व्यापाराकडे ही दामोदरशेटीचें लक्ष्य लागत नसे. म्हणून त्यानें आपले चुलतबंधूचा मुलगा दत्तक घेतला. त्याचें नांव रत्नाकर असें होतें. तो वयानें लहान होता त्यामुळें त्याचे लालन पालनांत उभयतांचा वेळ आनंदानें जाऊं लागला व तेणें करून व्यापार धंद्याकडे दामोदरशेटीचें चित्त लागूं लागलें. रत्नाकर आठ वर्षांचा झाला तेव्हां बापानें त्यास शाळेंत घालून आपल्या व्यवहारापुरती विद्या शिकविण्याचा क्रम ठेविला. रत्नाकराचें बारावे वर्षी आपल्या बरोबरीच्या कृष्णशेट नामक सावकाराच्या कन्येशीं लग्न केलें. तिचें नांव राधा असें होतें. रत्नाकर मोठा झाल्यावर व्यापार धंदा चालवूं लागला. त्यामुळें मातापितरांस आनंद होऊन त्यांनीं आपला उत्तरकाळ ईश्वरभजनाकडे लावण्याचा क्रम ठेविला. रत्नाकराची स्त्री अत्यंत गुणवान् असून ती तारुण्य दशेंत आल्यावर उभयतांची प्रीति जडली. रत्नाकर कांहीं वेळ दुकानांत बसून विक्री करीत असे; आणि कांहीं वेळ शहरांत मोठमोठे ठिकाणीं विक्री करितां फिरत असे. एके दिवशीं रत्नाकर फिरत असतां एका स्त्रीनें त्यास नादीं लाविलें.

त्याच शहरांत राजारामशेट सावकाराची कन्या सत्यभामा [illegible] होती. तिचें लग्न झाल्यावर कांहीं दिवसांनीं तिचा नवरा व्यापारा करितां म्हणून आपल्या बापा बरोबर कानपुरास गेला होता; त्यामुळें आणि ती बा[illegible] लाडकी अ-

सत्यामुळें माहेरींच असे. कानपुरास त्यांचा व्यापार वाढन चालल्यामुळें चार पांच वर्षें इकडे त्यांचें येणें झालें नाहीं. सत्यभामा तारुण्याचे भरांत आल्यावर तिला पतिविरह सहन होईनासा झाला. रात्रंदिवस नानाप्रकारचे विचार मनांत येऊन तिचें मन दुःखाग्नीनें पोळत होतें. रात्रीं निद्रेमध्यें नानाप्रकारचीं स्वप्नें पडूं लागलीं. त्यामुळें तिला अगदींच चैन पडेनासें झालें; परंतु लज्जेमुळें आपलें दुःख सहन करीत असे. तिनें नित्य प्रातःकाळीं उठून तुळशीची पूजा व प्रदक्षिणा आणि नानाप्रकारचीं सत्कृत्यें करण्यांत वेळ घालवावा. तरीही आठवण झाली म्हणजे तिला चैन पडेना. एके दिवशीं दोनप्रहरीं भोजन झाल्यावर आपल्या खोलीमध्यें पान सुपारी खात बसली असतां पतीचें स्मरण होऊन कामज्वरानें पीडित झाली आणि भ्रमिष्टासारिखी होऊन कांहीं सुचेनासें झालें; इतक्यांत किंचित् विचार करून आपल्या बिछान्यावर निजली आणि मनांत म्हणते हे प्रारब्धा, कायरे गतिही! माझ्या भ्रताराच्या किंवा बापाच्या घरीं कांहीं न्यून आहे काय? खाणें, पिणें, वस्त्र, पात्र, डागडागिने इत्यादि सर्व प्रकारचें ऐश्वर्य भोगावयास आहे. आपल्या हातानें काडीमात्र कामही करावयास नको. माझ्यासेवे करितां दासदासी सर्व काळ हातजोडून तयार आहेत. कोणत्या ही सुखाचा मला तोटा नाहीं. परंतु कायकरावें? माझ्या तारुण्य दशेंत भ्रताराचा आणिमाझा वियोग करून कामबाणांच्या तीक्ष्ण अग्रानें तूं मला दुःखदेत आहेस. असा मजवर कोप करण्याचें कारण तरी काय? आणि माझी अशी छळणूक करून तुलातरी काय मिळणार? इतक्यांतच त्यामाझ्या अवस्थे पेक्षां जरी मला मरण येतें, तरीबरें. असें बोलून दुःखानें उच्छ्वास टाकून [illegible]ी असतां कांहीं वेळ निद्रा लागली. नंतर जागृत होऊन पाहतें तों स[illegible] ळचा चार सहा घटका दिवस राहिला. इतक्यांत तिचे दारावरून नानां[illegible] [illegible]चे वाद्यां सहित लग्नाचाथाट चालला होता, म्हणून पाह-

ण्या करितां कांहीं वेळ खिडकींत उभी राहिली आणि पाहते तों सर्व रस्ता वऱ्हाडी मंडळीनें भरून चालला आहे. तसाच वायकांचाही थाट चालला आहे. सर्व लोक आपआपल्या खिडक्यांतून व दरवाज्यांतून मौज पाहण्यास उभे राहिले आहेत. या प्रमाणें पाहत असतां सत्यभामेचा वेळ कांहींसा आनंदांत गेला. नंतर वऱ्हाडी लोकांचा थाट गेला, तरी तो राजमार्ग असल्यामुळें रस्त्यांत सर्व काळ जाणाऱ्या येणाऱ्या मनुष्यांची दाटीच असे. म्हणून ती तशीच पाहत राहिली, तों सायंकाळ झाला तेव्हां दिसतनाहींसें झालें म्हणून घरांत आली आणि मनांत विचार केला कीं, आपला वेळ जाण्यास हें बरें साधन आहे. म्हणून ती रोज आपलें नित्यकर्म आटोपल्यावर खिडकींत येऊन बसत असे.

एके दिवशीं रत्नाकर त्या मार्गानें बाजारांत जात असतां सत्यभामेचे खिडकी समोरच पाय निसरून पडला. आपणांस कोणीं पाहिलें कीं काय, म्हणून चोहोंकडे पाहत आहे, तों त्याची दृष्टि खिडकी कडे गेली. इतक्यांत सत्यभामा किंचित् हंसली, म्हणून रत्नाकर ही हंसला. परंतु त्याला फार लज्जा वाटली आणि पुढें चालता झाला. सत्यभामा भरज्वानींत आली असून तिला पुरुषाचा स्पर्शही नव्हता. त्यामुळें निरंतर कामाचें तरंगांत होती. तथापि ती सुशील असल्यामुळें तिचें चित्त परपुरुषाकडे वळलें नव्हतें. परंतु दुर्दैवानें त्या रत्नाकराचें नानाप्रकारच्या वस्त्रालंकारांनीं मंडित असें सुंदर स्वरूप व तारुण्य पाहून सत्यभामेचे आंगावर रोमांच उभे राहिले. आणि काममोहित होऊन तो पुन्हा केव्हां दृष्टीस पडेल आणि आपणांस कसा प्राप्त होईल या विचारांत निमग्न होऊन देहभान नाहींसें झालें, आणि तो पुन्हा दृष्टीस पडावा म्हणून खिडकींत बसून एकसारिखी रस्त्याकडे पाहत राहिली. परंतु रत्नाकर तिचे दृष्टीस पडला नाहीं, म्हणून तिला चैन पडेनासें झालें. ती रात्र चिंतावस्थेंतच तिनें घालविली. दुसरे दिवशीं

प्रातःकाळ होतांच रत्नाकराकडे चित्त गुंतल्यामुळें ती आपलें नित्यकर्म थोडेंसें करून खिडकींत उभी राहिली. इतक्यांत रत्नाकर नित्याप्रमाणें हातांत मोत्यांचा बटवा घेऊन मार्गानें जात असतां तिचे दृष्टीस पडला. तो दृष्टी आड होई पर्यंत एकसारिखी त्याचे काम वेधक रूपाकडे पाहत राहिली. तो दिसेनासा झाल्यावर एकाएकीं तिला मूर्च्छा येऊन धाडकन् खोलींत पडली, इतक्यांत तिची दासी सखू जवळ होती, तिनें डोळ्यांस पाणी लावून आणि वारा घालून सावधकेली आणि म्हणाली, बाई साहेब, आपण रस्त्याकडे पाहत असतां एकाएकीं अशी अवस्था होण्याचें कारण काय?

**सत्यभामा**- सखू, तुला काय सांगूं. एकाएकीं माझ्या दुर्दैवानें मला लोटून दिलें. इतक्यांत तूं जवळ होतीस म्हणून बरें झालें, नाहींतर खचीत माझे प्राण गेले असते; पण वांचून तरी काय उपयोग आहे. अशा अवस्थेंत दुःख भोगावें त्यापेक्षां मरण तरी बरें.

**सखू**- बाईसाहेब, तुह्मी काय ह्मणतां हें मी अद्यापि समजलें नाहीं.

**सत्य०** - अगे, माझ्यानें बोलवत नाहीं आणि ज्याचे हातून आपलें दुःख दूर होईल त्याला सांगितलें तर उपयोग.

**सखू**- आपणांस इतकें दुःख तरी कशाचें आहे? माझे हातून दूर होण्यासारिखें असेल, तर मी आपणां करितां पाहिजे तशी मेहनत करीन.

**सत्य०** - असें जर ह्मणतेस, तर मीं तुला सांगावें खरें. परंतु थोडीशी लज्जा वाटते. अगे, जर तुजकडून अभय असेल आणि खरोखरच जर माझे सांगण्या प्रमाणेंच ऐकशील, तर मजवर उपकार केल्या सारिखे होऊन मी तुझें कल्याण करीन.

**सखू**- माझें भय तें कशाचें? मी गरीब आपली दासी आहें. जें आपण काम सांगाल, तें मला केलेंच पाहिजे. आपण निर्भय पणानें सांगा म्हणजे झालें.

**सत्य०** — बरें तर ऐक.अगे, मला हें तारुण्य दुःख देत आहे. यांतजें सुख असावें तें मला नाहीं. त्यामुळें सर्व काळ मला चैन पडत नाहीं. कानपुराहून आज सुमारें सहा महिन्यांत पत्रही नाहीं. त्यामुळें माझें मन अगदीं चंचळ होऊन गेलें आहे. कोणत्या वेळीं माझी काय अवस्था होईल हें कळत नाहीं.

**सखू**— बाई, तुह्मी ह्मणतां हें खरेंच आहे; पण विवेक करून कसे तरी दिवेस काढिले पाहिजेत. मला माझे तारुण्यांत याचा अनुभव आला आहे. परंतु आमचें काय; आम्हांस चारी दिशा मोकळ्या आहेत. ह्मणून मीं आपले मनोरथ पाहिजे तशा रीतीनें पूर्ण करून घेतले. पण तुमचें तसें नाहींना. तुह्मी थोरांच्या मुली. तुम्हांस अब्रूनें वागलें पाहिजे. ह्मणून कसेतरी दिवस लोटावे. कानपुराहून पत्र आलें नाहीं ह्मणतां, यावरून ते लवकरच येणार असतील ह्मणून पत्र पाठविलें नसेल, असें वाटतें. परंतु आपला काय उपाय आहे; ईश्वर ठेवील तसें राहिलें पाहिजे.

**सत्य०** - अगे, त्या असल्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी मला रुचत नाहींत. याविषयीं तुला अनुभव आहेच.तर आतां मीं काय करावें हें सांग ह्मणजे झालें.

दासीनें मनांत विचार केला कीं, ही कामानें पीडित झालेली असतां कोणी पुरुष मनासारिखा हिनें रस्त्यांत पाहिला असेल, त्यामुळें मूर्च्छना येऊन ही पडली असावी. परंतु लज्जे मुळें सांगत नाहीं. त्यापक्षीं आपण हें सर्व जाणल्या सारिखें दाखवून पाहूं. असें मनांत आणून सत्य भामेस ह्मणाली.

**सखू**— बाईसाहेब, आपली अशी अवस्था कां झाली, हें मीं समजलें; पण आकाशचे चंद्राची इच्छा करून कायतो आपणास मिळणार आहे. उगाच आशा धरून काय उपयोग.

**सत्य०** - अगे, तूं माझे मनांतलें खचीत समजलीस. प्रयत्न केल्यावर चंद्र

देखील त्रास होईल, मग मनुष्याची कथा काय. आणि तुझ्या सारिखी चतुर दासी मज जवळ असून मीं असे हाल भोगावे हें तुला कसें बरें वाटतें.

**सखू**– बाई साहेब, आपणांस मी मघाशींच सांगितलें आहे कीं, हें आपल्या योग्य नाहीं. पती वांचून दुसऱ्या पुरुषांशीं रत झालेल्या स्त्रिया थोडक्याच काळांत सर्वस्वी नाश पावून प्राणांसही मुकतात; अथवा पोटा साठीं आमच्या सारिख्या दासी होऊन दुसऱ्याची सेवा करितात, असेमीं बरेच अनुभव पाहिले. यासाठीं आपण ही वाईट इच्छा सोडून विवेकानें दिवस काढावे हें बरें आहे.

**सत्य०**– तूं म्हणतेस ते सर्व खरें आहे; पण कामाचा वेग मला सहन होत नाहीं. म्हणून तूं कितीही बोललीस तरी तें माझ्या उपयोगी नाहीं. माझे प्रारब्धीं काय होणें असेल तें होईल. परंतु मनांत आलेली गोष्ट नघडेल तर लवकरच माझे प्राण जातील. या करितां आपण युक्तीनें काम करूं, म्हणजे झालें.

**सखू**– बरें आहे. मी आपल्या मर्जीबाहेर नाहीं. पण उतावळी न करितां जें करणें तें युक्तीनें करावें. परंतु आपणांस कोणत्या पुरुषाचे योगानें मूर्च्छा आली, हें मला सांगाल तर बरें होईल.

**सत्य०** – बरें आहे. ज्यानें माझे पंचप्राण आपणाकडे ओढून घेतले, त्याचा उदय झाल्यावर मी तुला दाखवीन. मग मात्र तुझे चातुर्याचा उपयोग कर म्हणजे झालें.

असें बोलून ती रस्त्याकडेच पाहत राहिली. परंतु सायं काळपर्यंत रत्नाकर दृष्टीस पडला नाहीं. त्यामुळें ती रात्र दुःखांतच गेली. दुसरे दिवशीं खिडकींत उभी राहून रत्नाकराची वाट पाहत होती, इतक्यांत नित्याप्रमाणें मार्गानें जात असतां तो तिच्या दृष्टीस पडला. तों सखू जवळच होती तिला

तिनें दारवविला आणि ह्मणाली, पहा जर याची माझी भेट करून देशील, तरमी तुझे उपकार जन्मभर विसरणार नाहीं. असें ह्मणतांच बरें आहे ह्मणून लागलीच सखू खालीं उतरून त्याची चौकशी करण्याकरितां त्याचे मागून जाऊं लागली. परंतु तो बाजारांत गेल्यामुळें कोणाचा कोण आहे आणि कोठें राहतो, हें कांहींच समजलें नाहीं. ह्मणून परत येऊन सत्यभामेस म्हणाली. बाईसाहेब, मी त्यास चांगला पाहून ठेविला आहे. आणि तो मोतीं विकणारा व्यापारी आहे, त्यामुळें आपलें काम खचीत होईल. तुम्हीं कांहीं चिंता करूं नका. मी एक दोन दिवसांतच त्याची भेट करून देईन.

असें दासीचें भाषण ऐकून सत्यभामेस जरासा धीर येऊन आनंद वाटला; त्यामुळें तो दिवस बराच गेला. दुसरे दिवशीं नित्याप्रमाणें रत्नाकर मार्गानें जाऊं लागला, त्यास पाहून सत्यभामेनें दासीस सांगितलें कीं, तो पहा मार्गानें जात आहे. त्यास मोत्यें घेण्याचे निमित्तानें वर बोलावून आण ह्मणजे झालें. दासीनें तें ऐकून तसेंच केलें. रस्त्यांत जाऊन त्यास ह्मणते.

**सखू** - शेटजी, तुह्मांजवळ मोत्यें विकावयाचीं आहेत काय?

**रत्नाकर** - होय, आहेत. कोणांस पाहिजेत?

**सखू** - आमचे धनिनीस घ्यावयाचीं आहेत. ह्मणूनतुम्हांस वर बोलावीत आहेत.

**रत्ना॰** - खचीत घेणें असतील तर येतों, उगाच येत नाहीं.

**सखू** - घेणें आहेत ह्मणूनच वर बोलावितें. उगाच माल पाहिल्याशिवाये खरेदी होईल काय? तुह्मी वर चला, तुमचा सर्व माल त्यांस दाखवा, मग जीं त्यांचे मनांस येतील तीं घेतील.

असें दासीचें भाषण ऐकून रत्नाकर वर गेला आणि पाहतो तों तेथें दुसरें कोणी नसून एक सुंदर स्त्री मात्र बसलेली आहे असें पाहून ह्मणाला.

**रत्ना०**- मोत्यें कोणास घ्यावयाचीं आहेत ?

**सत्य०**- या शेटजी, इतके उतावीळ कां झालांत. क्षणभर बसा. तुह्मांजवळ काय काय माल आहे तो पाहूंतर खरा.

**रत्ना०** - तुम्हांस किती मोत्यें घ्यावयाचीं आहेत ?

**सत्य०** - आह्मांस पुष्कळ घ्यावयाचीं आहेत. पण तुह्मी सोय करून घालतर.

रत्नाकर खालीं बसला आणि आपल्याजवळचा वाटवा उघडून त्यांतील सर्व जातीचे मोत्यांचे घोंस निरनिराळ्या नमुन्यांचे बांधलेले होते,ते दाखवूं लागला. त्यावेळीं ती अगदींच त्याचे नजीक जाऊन बसली आणि पाहूं लागली, त्यामुळें अगदीं वेड्या सारिखी होऊन तिचें सर्वांग काम कंपानें थरथरूं लागलें. पण एका एकीं धीर होईना, ह्मणून उगीच राहिली, आणि ह्मणाली, शेटजी, तुह्मांजवळ तर मोत्यें चांगलीं चांगलीं आहेत. पण माझा बाप यावेळीं घरांत नाहीं. तो असता तरमी आतांच घेतलीं असतीं. आतां तुह्मी जाऊन उद्यां सायंकाळीं तीन वाजतां या, ह्मणजे माझा बाप त्या वेळीं घरीं भेटेल. रत्नाकर ह्मणाला, बरें तर, मीं आतां जातों. पण उद्यां खचीत घ्यालना ? नाहींतर उगाच माझ्या मालाची चोळाचोळ होते. असें बोलून सर्व मोत्यें आपल्या वाटव्यांत घालून जाऊं लागला. सत्यभामेस त्याचे जाण्यामुळें फारच कठीण वाटलें, ह्मणून आणखीं कांहीं वेळ तरी त्याच्याशीं भाषण करीत असावें. असें मनांत आणून त्यास ह्मणाली शेटजी, तुह्मीं रोज किती मोत्यें विकतां ? आणि तुह्मांस काय फायदा मिळतो ? रत्नाकर ह्मणाला, त्याचा काय नेम आहे, एखादे दिवशीं पांचशेंचीं खपतात, एखादे दिवशीं पन्नासांचीं खपतात, आणि एखादे दिवशीं मुळींच खपत नाहींत. असा धंदा आहे. यांत फायदा विशेष नाहीं; पण आमच्या वडिलोपार्जित धंदा ह्मणून आह्मीं तोच करितों. सत्यभामा ह्मणाली, मग तुह्मी एवढी जाण्याची घाई कशाला करितां ? बसाना जरासे. इतक्यांत माझा बाप आलातर बरेंच होईल. असें बोलून आणखीं कां

हीं वेळ बसण्याकरितां आग्रह करूं लागली. परंतु तेथें कोणीच पुरुष नसल्या मुळें तो न बसतां उठून चालता झाला. सत्यभामा ह्मणाली, पण उद्यां विसरूं नका हो. असें बोलून उगीच राहिली. आणि रत्नाकर खालीं उतरून गेला. त्यामुळें तिला अगदींच वेड लागल्या सारिखें झालें. पुन्हा खिडकींत येऊन तो रस्त्यांत दिसत नाहींसा होई पर्यंत पाहत राहिली आणि तो गेल्यावर दासीस म्हणाली, सखू, काय ग करावें. मेली ही लज्जा फार वाईट, मधाशीं जवळ असतां मी कोणत्या आनंदांत होतें, आणि आतां पहा कशी अवस्था झाली ती. पण उद्यां खचीतच येईल त्यावेळीं मात्र लज्जा धरून उपयोगीं नाहीं. सखू म्हणाली, होय. असें तर खरेंच. धैर्य करावें मग काय होईल, तें होवो. तुमच्या सारिख्या रूपवान् स्त्रियांचें वचन मोडून कोणीही पुरुष जाईल असें मला वाटत नाहीं. असें दासीचें भाषण ऐकून सत्यभामा स्वस्थ राहिली.

दुसरे दिवशीं रत्नाकर त्याच मार्गानें जात असतां, वर जाण्याचें विसरला. परंतु ती खिडकींत उभी राहून वाट पाहतच होती. त्यास पाहिल्याबरोबर दासीकडून वर बोलाविलें. रत्नाकर वर आल्यावर ह्मणाला.

**रत्ना०** – कसें काय, आजतरी शेटजी घरांत आहेत काय?

**सत्य०** – घरांत नाहींत, पण आतां लवकरच येतील तुम्ही जरा बसा म्हणजे झालें.

**रत्ना०** – आम्हांस फार वेळ बसतां उपयोग नाहीं. एखादें गिऱ्हाईक केव्हां लागतें याचा नेम नसतो.

**सत्य०** – येथें तरी विक्री साठींच बसावयाचें आहे. बरें, काल जीं मोठीं मोत्यें तुम्हीं दाखविलींत, त्या जातीचे दहा दाण्यांची किंमत सुमारें काय पडेल बरें?

**रत्ना०** – त्याचा भाव वजनावर असतो, पण तो एकेक दाणा सुमारें १२५ रुपयांचा होईल. वजनानें कांहीं कमजास्ती ही होईल.

**सत्य०** - आपणांस तेच घ्यावयाचे आहेत, पण पैसे आतांच द्यावे लागतील कीं काय?

**रत्ना०** - आतांच द्यावे हें तर खरेंच. पण तुम्हीं मोठे लोक आहां. माल तुमचे खात्रीस आला, म्हणजे चार दोन दिवशीं दिलेत तरी चालेल. मात्र चोपडीवर शेटजींनीं सही करून द्यावी म्हणजे झालें. पण हें ही मी माझ्या बापास विचारून करीन.

**सत्य०** - हां, घरीं तुमचे वडील आहेत काय? आणखीं तुमचीं घरीं कोणकोण माणसें आहेत बरें?

**रत्ना०** - आईबाप आहेत, आणि माझी बायको आहे. एकूण चारच माणसें आम्हीं घरचीं आहोंत. बाकी कांहीं चाकर लोक आहेत.

**सत्य०** - तुमची बायको केवढी मोठी आहे.?

**रत्ना०** - सुमारें अठरा वर्षांची आहे.

**सत्य०** - तुम्हांस अझून कांहीं मूल झालें नाहीं, त्यावरून तुमची आणि बायकोची प्रीति नसेलसें वाटतें.

**रत्ना०** - ( जरासा लाजल्या सारिखा होऊन ) हें काय विचारितां, संतति होणें हें परमेश्वराचे हातीं आहे. आणि प्रीति ही काय आपण नीट, तर सर्व कांहीं नीट असतें. आणि चांगलीं मनुष्यें मिळणें, हें ही दैवा शिवाय होत नाहीं.

**सत्य०** - होय, असें तर खरेंच आहे. तुमची बायको दैववान् आहे, असें मला खचीत वाटतें. नाहींतर पहा माझे हे दिवस कसे आले आहेत; आणि यजमान बाहेर व्यापारास गेले आहेत. यावरून आमचें दैवच असें असेल काय? परमेश्वरानें स्त्री पुरुषांचा जोडा निर्माण केला आहे, त्यांत वेळचे वेळीं ज्या ज्या सुखाचे लाभ व्हावयाचे ते माझे हतभागिणीचे कपाळीं नाहींत, पण काय करूं? तुम्हांला कसें वाटतें?

**रत्ना०** – करावयाचें काय. परमेश्वर ठेवील तसें रहावें.

**सत्य०** – रहावें खरें, पण ह्या तारुण्यांत मन आवरणें फार कठिण आहे. आपण कितीही विवेक केला, तरी आंगातला काम उगाच बसूं देत नाहीं. मला वाटतें, अशांत मरण जरी येईल, तरी ह्या अशा राहण्याहून बरें.

**रत्ना०** – छे, छे, असें बोलूं नका. कांहीं दिवस धीर धरा म्हणजे तुमचे यजमान येतील. त्यांजला तुमची काळजी नसेलच काय?

**सत्य०** – माझी काळजी असती, तर असें कां झालें असतें. पुरुषांची जात निर्दय असते. आणि त्यांस दुसरे अनेक उपाय आहेत. तसे आम्हांस करण्यास कठिण वाटतें. पण आतां तर मला अगदींच वेड्यासारिखें झालें आहे. आणि तुम्हीं वर आल्या पासून तर मला केवळ रत्नाचा लाभ झाला, असें वाटलें आहे. कां, तुम्हांला कसें वाटतें?

इतकें बोलून उगीच राहिली. रत्नाकर तिचें सुंदर रूप, आणि मोहकारक भाषण, यांचे योगानें मोहित होऊन मनांत समजला कीं, मला मोत्यें घेण्याचे निमित्तानें हिणें वर बोलाविलें खरें, पण हिचा मतलब निराळाच दिसतो. केवळ मला त्याच कारणानें बोलावून आतां त्या गोष्टी युक्तीनें काढिल्या आहेत. आतां आपण जर थोडेसे तिकडे वळल्या सारिखें दाखविलें, तर आपणांस ही प्राप्त होणार आहे. मग आपलें तरी काय जातें. पण येथें आपली ओळख नाहीं आणि स्त्रियांचें मन पक्कें समजत नाहीं; या करितां तिकडूनच काय होतें तें पहावें, म्हणजे झालें. असा विचार करून, कांहींच उत्तर न देतां उगीच राहिला. असें पाहून सत्यभामा म्हणाली.

**सत्य०** – शेटजी, कां तुमचे मनांत कसें काय आलें आहे? विचारांत कां पडलां? येथें तिसरें कोणी नाहीं. ही दासी माझ्याच मताची आहे. तुम्ही भिऊं नका. तुम्हांजवळ जोखम आहे त्याची काळजी नको. आम्हांस त्याची गरज नाहीं. आतां फार काय सांगूं तुम्हांस त्याचा अनुभव येईल.

**रत्ना०**- तुम्ही काय बोलतां हें मी समजलों. पण आतां मला जाऊं द्या. उद्यां पुन्हा याच वेळीं येईन, मग काय तें ऐकेन.

**सत्य०**- शेटजी, यावेळीं तुमच्यानें जाववेल काय? अहो असा लाभ झाल्यावर पुरुष विचारवंत असला, तरी त्याच्यानें टाकून कधींही जाववणार नाहीं. आणि तुम्ही जातों म्हणतां, यावरून मला मोठें आश्चर्य वाटतें.

रत्नाकरास ही ते शब्द लागले. परंतु परकी ठिकाणीं धीर होणें फार कठिण आणि त्याला असा प्रसंग कधीं ही आलेला नसल्यामुळें तो भिऊन गेला. पण स्त्रीचा नाद फार अनावर आहे. एक वेळ गोष्ट मनांत आली, म्हणजे कसाही विचारी असला तरी तो भुलून जातो, तसें रत्नाकरास झालें. इतक्यांत सत्यभामेनें दासीस बाहेर जाऊन दार बंद करून घेण्यास सुचविलें. त्याप्रमाणें दासीनें केलें. रत्नाकर मनांत समजला कीं, हिणें आतांच असें केलें, यावरून येथें कांहीं भीति नाहीं, असें खचीत वाटतें. तर आपण तरी कां हट्ट धरावा. असें मनांत आलें, इतक्यांत तिणें त्याचे गळ्यास मिठी मारिली, आणि आनंदानें तीं प्रेमाचीं भाषणें करीत आहेत, इतक्यांत सत्यभामेचा बाप घरीं येत आहे, असें पाहिल्यामुळें दासी धांवत वर आली, आणि दरवाजा उघडून त्यांस तिनें कळविलें. त्यामुळें त्यांचे आनंदांत बिघड झाला. रत्नाकर अगदीं घाबरून गेला, आणि आतां काय करावें, कोणीकडे पळावें, हें त्यास कांहीं सुचेनासें झालें. असें पाहून सत्यभामा म्हणाली, तुम्ही भिऊं नका. कांहीं न बोलतां वाटवा हातांत घेऊन उगीच बसा, म्हणजे झालें. रत्नाकरानें तसेंच केलें, इतक्यांत राजाराम शेट दिवाण खान्यांत येऊन पोहोंचले. आणि सत्यभामेस म्हणाले, हे कां आले आहेत. सत्यभामा म्हणाली, हे मोतीवाले आहेत. त्यांजपासून मला तुम्हीं मोत्यें घेऊन दिलीं पाहिजेत.

**राजारामशेट** – मोत्यांची आतांच काय घाई लागली आहे. केव्हांतरी घेऊं म्हणजे झालें

**सत्य०**- आतां घरीं चालून आलेलीं सोडून मग कधीं घेणार? आतांच कां घ्याना?

असें भाषण ऐकून शेटजींनीं त्याजकडून वाटवा उघडवून मोत्यें पाहिलीं

परंतु दर दामांत फेरसा वाटल्या वरून त्यांनीं घेतलीं नाहींत, आणि आम्हीं बाजारांतून आणूं असें सांगितलें. रत्नाकरास तेथें कांहींच लाभ न होतां, उगाच वेड्या सारिखें परत जावें लागलें आणि सत्यभामाही मनांत अगदीं खिन्न झाली. परंतु रत्नाकराचा तिला सर्व काळ ध्यास लागून राहिला. रत्नाकराची ही अवस्था तशीच झाली. दुसरे दिवशीं रत्नाकर त्याचमार्गानें त्याच वेळीं पुन्हा जाऊं लागला. त्यानें वरती खिडकीकडे पाहिलें. तिची त्याची दृष्टादृष्टि झाली, आणि उभयतांस आनंद झाला. पण राजारामशेटीस कांहीं ज्वराची बाधा झाल्यामुळें त्यानीं दुकानांत जाणें बंद केलें. तें त्या दोघांचे आनंदाचा विघड होण्याचें कारण झालें.

रत्नाकर नित्य त्या मार्गानें जाऊन तिजकडे पाहत असे. आणि ती, रत्नाकराची वेळ झाली म्हणजे खिडकींत येऊन बसत असे. याप्रमाणें कित्येक दिवस लोटले, तरी राजारामशेटींची प्रकृति नीट होईना. आणि त्यांसही कांहीं उपाय सुचेना. मात्र दोघांस ही एकमेकांच्या नादानें झुरणी लागली.

एके दिवशीं रत्नाकरास रस्त्यांत पाहून दासीस त्याजकडे पाठवून कळविलें कीं, मी तुझ्यासाठीं अन्न पाणी देखील सोडिलें आहे. पण शेटजीस ताप येऊन ते घरांत असल्यामुळें माझा उपाय चालत नाहीं. या करितां तुम्हीं कांहीं तरी उपाय योजा. व मला सुचला तर मी ही करितें. आतां उशीर लावूं नका. असें दासीनें सांगतांच रत्नाकर बोलला कीं, माझीही तशीच अवस्था झाली आहे. परंतु उपाय चालत नाहीं. या करितां आतां आपल्या मित्रा जवळ ही गोष्ट सांगून उपायाची तजवीज करितों. तुम्हीं कांहीं काळजी करूं नये, असें सांगून दासीस परत पाठविलें आणि चालता झाला.

दुसरे दिवशीं त्यानें विचार केला कीं, आपणांस युक्ति सांगेल असा मित्र चिंतामणीशिवाय कोणी दिसत नाहीं, तर त्याजपाशीं जावें, म्हणजे तो सर्व युक्ति सांगून आपला कार्य भाग करून देईल. असा विचार करून लागलाच

तो चिंतामणीचे घरीं गेला.

चिंतामणि हा जातीचा ब्राह्मण असून सर्वकाळ विद्याभ्यास करून आपला काळ घालवित असे. आणि त्याचा बाप मोठ्या हुद्यावर असल्यामुळें त्यास सर्व लोक मानीत असत. पण हा लहान पणींचा रत्नाकराचा अत्यंत जीवलग मित्र होता. त्याचें घर रत्नाकराचे घरापासून बरेंच दूर होतें. पण ते एका शाळेंत पूर्वी शिकत असत, त्यामुळें दोघांची मैत्री होती. रत्नाकर त्याचे घरीं आल्यावर चिंतामणि त्यास म्हणाला.

**चिंतामणि**- रत्नाकरा, आज फार दिवसांनीं कोणीकडे वाट चुकलास ? तुला यावेंसें कसें वाटलें ?

**रत्ना०** - धंद्यामुळें बनत नाहीं, परंतु आतां जरासा वेळ मिळाला म्हणून आलों.

**चिंता०** - बरें, भेटलास त्यामुळें मला फार आनंद झाला; परंतु थोड्या दिवसां पूर्वीं मीं तुला पाहिलें होतें, त्यापेक्षां हल्लीं अगदीं वाळल्या सारिखा दिसतोस, याचें कारण काय बरें ?

**रत्ना०** - कारण तर कांहीं दिसत नाहीं आणि मला ही सुकलों असें वाटत नाहीं, मग तुला काय वाटलें कोण जाणे.

**चिंता०** - बरें, तुला कांहीं रोग किंवा काळजी तर नाहींना ? मलातर असें खचीत वाटतें.

**रत्ना०** - रोग कांहीं नाहीं आणि शिरावर वडील आहेत, तों मला कांहीं काळजी ही नाहीं.

**चिंता०** - तूं कांहीं बोलून रंजविलेंस, तरी तसें नव्हे. कांहीं तरी तुला काळजी आहे.

**रत्ना०** - खरें, काळजी विचारितोस त्यापक्षीं सांगतों. पण जराशी सांगावयास लाज वाटते.

**चिंता०** - मित्राजवळ लाज धरूं नये, काय असेल तें उघड बोलावें म्हणजे त्याचा उपयोग होतो.

रत्ना० - असें म्हणतोस, तर सांगतों ऐक. मी बाजारांत मोत्यें विकावयास जात असतां एके दिवशीं शनिवार पेठेंत एका वाण्याची कन्या आहे तिनें मला वर बोलावून हळू हळू माझें मन वळवून घेतलें; ह्यामुळें माझे मनास तिचा ध्यास लागला आहे. आणि तिचीही अवस्था तशीच झाली आहे. जर माझीतिची गांठ पडेल, तरच मी वांचेन; नाहींतर असाच झुरणीस लागून मरेन. यासाठीं तुझ्या जवळ आलों आहें. तुझ्याशिवाय मनांतील गोष्ट सांगण्या सारिखा दुसरा कोणी नाहीं आणि उगाच एखाद्याजवळ बोलून फजिती मात्र होईल. त्या पक्षीं विचारानें जें करणें तें करावें; ह्मणून तुझ्या जवळ आलों आहें, तरआतां लवकर याचा उपाय सांग.

चिंतामणीनें मनांत विचार केला कीं, हा आपला लहान पणींचा मित्र असून आणि याची घराकडील सर्व व्यवस्था नीट असून, पर स्त्रीचे नादास लागून हा मरणार आहे, त्या पक्षीं त्यास कांहीं बोध करून याचें मन फिरवावें.

चिंता० - रत्नाकरा, त्या जगांत सृष्टि कर्त्यानें स्त्री ही मोह कारक वस्तूनिर्माण केली आहे. ही इतकी अनिवार आहेकीं, एक वेळ तिचे नेत्र कटाक्षबाण पुरुषास लागले, म्हणजे सुज्ञ असला, तरी तो वेड्या सारिखा होऊन जातो. फार काय सांगूं; महान् तपस्वी जरी झाले, तरीत्यांस ही स्त्रियांनीं वेधून पाडिलें आहे. शुका सारिखे जितेंद्रिय पुरुषां पुढें मात्र त्यांचें कांहीं चाललें नाहीं. परंतु तसे पुरुष या जगांत मिळणें कठीण. बहुतेक त्यांचे स्वाधीन होणारेच आहेत. मगतुझी कथा काय. तुला तिचा ध्यास लागून तुझी अशी दशा झाली, ही गोष्ट खरी आहे.आतां तुझे मनांतला भाव मला समजला ह्मणून बरें झालें. पण मी तुला असें विचारितों कीं, तुझी लग्नाची स्त्री आहे, तिचे गुण कसे काय आहेत?

रत्ना० - तिचे गुण फार चांगले आहेत. ती केवळ माझ्या मनास आनंद

देणारी आहे आणि नीतीनें वागत आहे.

चिंता॰ - बरें, जर ती अशी आहे, तर तुला विषय सुखाचा लाभ पूर्ण पणें असेलच. मग परस्त्रीचे ठिकाणीं कांहीं अधिक आहे, असें नाहीं. जें तिकडे तेंच इकडे. मात्र परस्त्रीचे योगानें नरकाचें साधन आहे. याजकरितां तुझे मनांतला नाद सोड आणि सन्मार्गानें चाल. म्हणजे त्यापासून तुला सर्व लाभ होतील.

रत्ना॰ - मित्रा, तूं ह्मणतोस हें खरें; पण मन आवरत नाहीं. या साठीं तिचा एक वेळ लाभ घडला ह्मणजे मग मी तिचें नांव देखील काढणार नाहीं.

चिंता॰ - अरे, हा विषय असा आहे कीं, एकदां का त्याची गोडी लागली म्हणजे तो कधींच सुटणार नाहीं. ह्यासाठीं प्रथमच तिकडे आपलें मन वळूं देऊं नये.

रत्ना॰ - बरें, कदाचित् मी मनास विवेक केला, तर तिकडे तिची तरी काय अवस्था झाली असेल बरें. यासाठीं त्वां एवढें काम केलेंच पाहिजे.

चिंता॰ - रत्नाकरा, तूं तिची काळजी वाहतोस त्यावरून तुला काय म्हणावें? अरे, जी तुला बरोबर घेऊन बुडविण्यास पाहत आहे, तिचा त्याग करून आपला प्राण वांचीव म्हणजे झालें. नाहीं तर खचीतच बुडशील आणि ती ही बुडेल. परंतु तिला कर्मा सारिखीं फळें मिळतील. त्यांत तुझें काय गेलें?

रत्ना॰ - चिंतामणी, मी तुझ्या जवळ विचारितों काय आणि तूं अशा परमार्थाच्या गोष्टी सांगतोस, त्या मला कशा आवडतील? जर तुझ्यानें माझें काम होत नसेल, तर नाहीं म्हण. म्हणजे मी तुज सारखा दुसरा मित्र आहे त्याजकडे जाईन.

चिंता॰ - रत्नाकरा, तूं तरी बराच दिसतोस. अरे, हीच का मैत्री. जरासें बोललों, तों लागलाच कजेलीवर आलास. अरे, मी असें

कां बोललों, हें तुला समजलें नाहीं. अरे, तुला तरी तिचा ध्यास कितपत लागला आहे, हें मला पक्केपणें समजून घेतलें पाहिजे. ह्मणून मी तुला इतका वेळ बोध करून पाहिलें, पण आतां माझी पक्की खात्री झाली कीं, तुला तिची प्राप्ति झाल्यावांचून चैन पडणार नाहीं. असेच कांहीं दिवस गेले, तर कदाचित् वांचणार ही नाहींस.

**रत्ना०** - एकून तूं माझें मन पाहत होतास. अरे, मित्र ह्मणवितोस आणि मन का पहावें लागतें. उगाच असली गोष्ट दुसऱ्या जवळ कोणी बोलेल?

**चिंता०** - रत्नाकरा, आतां ज्यापक्षीं तुला तिचा ध्यास लागला आहे, त्या पक्षीं मी तुला ती मिळण्या सारिखी तजवीज करितों; परंतु घाई करूं नको. "उतावळीनें केलेलें काम कच्चें होतें,, हें तुला माहितच असेल. जें करणें तें सर्वकाळ चालेल असें केलें पाहिजे. त्याज करितां तूं उद्यां संध्याकाळीं चारवाजल्यावर मजकडे ये. मग आपण दोयेही तिकडे जाऊं. ह्मणजे तजवीज करण्यास ठीक पडेल. जा तूं आतां घरीं आणि स्वस्थ रहा.

रत्नाकर घरीं गेल्यावर चिंतामणीनें विचार केला कीं, प्रथम त्यास त्या रस्त्यानें जाण्याचा बंद करावा. ह्मणजे नित्य भेटीनें अधिक जें वेड लागणार तें चुकेल. युक्तीनें कांहीं गोष्टी सांगून तिचें रूप भयंकर भासवून दिलें, ह्मणजे हा नाद सुटेल.

इकडे सत्यभामेनें विचार केला कीं, रत्नाकरानें आज मित्राकडे जाऊन कांहीतरी विचार केला असेल. तर आपण सायंकाळीं खिडकींत बसून रहावें ह्मणजे कांहीं तरी कळेल. ह्मणून ती वाट पाहत बसली होती. परंतु रत्नाकर दृष्टीस पडला नाहीं; ह्मणून दासीस ह्मणाली, अगे, आज रत्नाकर कोठें दिसत नाहीं. या साठीं तूं तिकडे जाऊन युक्तीनें कोणास न कळतां त्याची गांठ घेऊन ये. ह्मणजे कायतें समजेल. असें बोलून दासीस

त्याजकडे पाठविलें, ती त्याचे घराचा युक्तीनें शोध करण्यास जात आहे, तों रत्नाकर चिंतामणीचे घराहून आपले घरीं येत असतां, दोघांची गांठ रस्त्यांतच पडली. दासी ह्मणाली, कसें काय आज त्या रस्त्यानें देखील येणें झालें नाहीं. रत्नाकर ह्मणाला, अगे, मी तुला काल सांगितलें होतें कीं, मित्राचे युक्तीनें काम करितों ह्मणून. त्याप्रमाणें त्याचे घरीं गेलों होतों. त्यास सर्व हकीकत कळविली आहे. आतां त्याचे युक्तीनें चालावयाचें ह्मणजे आपलें कार्य होईल. उगाच घाई करून उपयोगी नाहीं. तुला तिनें पाठविलें असेल. दासी ह्मणाली, होय, बाईसाहेबांनींच पाठविलें. पण आतां उपाय लवकरच करावा. तुमच्यासाठीं त्यांची अगदी दुर्दशा झाली आहे, इकडे लक्ष्य असूंद्या. नाहींतर, आपले असेच दिवस घालवाल तर त्यांची मल्ल धडगत दिसत नाहीं. रत्नाकर ह्मणाला, तें मी समजतों, पण तुला सांगितलें असेंच जाऊन सांग ह्मणजे झालें. माझ्यानें जितका उपाय होईल, तितका मी करीन आणि तिच्यानें होईल तितका तिला ही करावयास सांग. दासी ह्मणाली, बरें तर मी जातें. पण तुह्मी रोज त्या मार्गानें तरी जाण्याचें सोडूं नका. तुह्मांस पाहिल्या वांचून त्यांस चैन पडत नाहीं. रत्नाकर ह्मणाला, सध्या मी मित्राचे आज्ञेंत आहें. जर त्यानें पाठविलें, तर येईन; कारण त्याचे घरीं नित्य मला गेलें पाहिजे. पण तूंच नित्य ह्या मार्गानें त्याच वेळीं येत जा, म्हणजे तुझी माझी गांठ पडेल. मग एक मेकांची हकीकत एक मेकांस कळत जाईल. दासी ह्मणाली, बरें, मी जातें. असें बोलून त्याचे घराचा पत्ता विचारून घेऊन दासी परत निघून गेली आणि झालेलें सर्व भाषण सत्यभामेस कळविलें.

दुसरे दिवशीं रत्नाकर चिंतामणीचे घरीं आला त्यास पाहून चिंतामणि ह्मणाला, अरे, तुला आजपर्यंत मजकडे येण्यास बनत नसे आणि आतां रे कसें बनतें? एकून शाबास त्या स्त्रीची. तुझी माझी वारंवार भेट तिच्या-

योगानें तरी यडूं लागली. बरें, असो. आतां आपण चला जाऊं. असें बोलून चिंतामणी आपला नित्याचा पोषाख करून रत्नाकरास बरोबर घेऊन निघाला. दोघेही सत्यभामेच्या दारावरून रस्त्यांतून जाऊं लागले, तों ती खिडकींतून पाहतच होती. तिजकडे पाहून रत्नाकरानें चिंतामणीस हळूच दाखविली. तिची त्यांची एक दृष्टि होतांच तिनें हास्य मुख केलें. नंतर दुःखमुद्रा दाखविली. इतकें पाहून दोघे ही घरीं परत येऊं लागले. चिंतामणीनें तिला पाहिलें आणि मनांत ह्मणाला कीं, ही मोठ्याची कन्या असून असें करणें हिला योग्य नाहीं. पण तारुण्याचे भरांत आल्यामुळें तिला काम सहन होईनासा झाला असेल, ह्मणूनच हिची अशी अवस्था झाली असावी. पण अशा दुराचरणामुळें ही दुसऱ्याचा आणि आपला नाश करून घेईल यांत संशय नाहीं, रत्नाकर मजकडे आला ह्मणूनच बरें झालें, नाहींतर हिच्या नादानें मरणास पात्र झाला असता. असा विचार करून रत्नाकरास ह्मणाला, अरे, हीतर तुला प्राप्त होणें कठिण दिसते कारण ही गरिबाची दिसत नाहीं, मोठ्याची दिसते, पण ही कोणाची कोण आहेहें तुला माहीत आहे काय?

रत्ना० – हें मला माहीत नाहीं. पण तिचा बाप व्यापारी आहे, असें समजलें आहे आणि तिचानवरा परगावीं गेलेला आहे हें मी तिच्या तोंडून ऐकिलें आहे. पण कायकरूं. तिचा बाप घरीं आजारी पडून राहिला आहे. त्यामुळें माझा आणि तिचा कांहींच उपाय चालत नाहीं. ह्मणून आतां. कांहीं तरी युक्ति सांग ह्मणजे झालें. ती देखील माझे सारिखीच वेडी झाली आहे. अरे, तुला अद्यापि असा प्रसंग आला नाहीं, ह्मणून तूं मला बोधाच्या गोष्टी सांगत होतास. परंतु आतां तिला पाहिल्यावर तुला देखील कांहीं वाटलें असेल.

चिंता० – अरे, वाटून काय उपयोग? आकाशांतील चंद्र आपणांस

मिळावा अशी इच्छा केली ह्मणून कायतो मिळणार आहे? पण तूं गड्या दैववान् आहेस खरा, असें मला वाटतें. तुझ्याहून तिचें रूप अति सुंदर आहे. तुजपेक्षां दुसरे देखणे पुरुष ह्या शहरांत नसतील काय? पण तुजवरच तिची प्रीति बसली. त्यावरून मात्र थोडेसें आश्चर्य वाटतें. मग काय असेल तें असो. आतां मीं तिचें घर पाहिलें आहे. मी त्याच तजविजीस लागतों. तूं माझ्या आज्ञेशिवाय मात्र त्या रस्त्यानें येऊं नको ह्मणजे आपला सर्व कार्यभाग होईल. नाहींतर एखादे माझे केलेले बेत फुकट जातील, असें मात्र करूं नको हो.

**रत्ना०** – मी आतां तुझ्या आज्ञेशिवाय कांहींच करावयाचा नाहीं. तूं मात्र आळसाखालीं दिवस घालवूं नको ह्मणजे झालें.

**चिंता०** – अरे, हें उगाच घाईचें काम नव्हे, ह्मणून तुला मघांच मीं सांगितलें आहे.

असें बोलत बोलत ते परत गेले. चिंतामणी ह्मणाला, आतां संध्याकाळ झाला आहे; तूं घरीं जा. पण उद्यां येहो, विसरूं नको. असें बोलल्यावर रत्नाकर घरीं गेला. सत्यभामेनें त्यादिवशीं दोघांस रस्त्यावर पाहिलें होतें, ह्मणून जराशी आशा लागली. दुसरे दिवशीं रत्नाकर जरासा उशीरां आला पाहून चिंतामणि त्यास ह्मणाला, अरे, मी मघाच तिकडे जाऊन आलों पण ती कोठें दृष्टीस पडली नाहीं. आणि कोणी लोक त्यांचे घरीं जातयेत असलेले पाहिले. मला असें वाटलें कीं, तिचा बाप आजारी आहे, त्याची प्रकृति फारच बिघडली असेल. ह्मणून लोक त्याचे समाचारास जातअसतील. पण गड्या, असें ही होईल तर बरें आहे कीं, एकदां तेवढी ह्मातान्याची अडचण आहे, ती संपली ह्मणजे आपणांस कोणाची भीति राहिली नाहीं. कां रत्नाकरा, तुला कसें वाटतें?

**रत्ना०** –होय, तूं ह्मणतोस हें खरें. गड्या तेवढीच मोठी अडचण-

आहे. जर परमेश्वरानें आमचें गाऱ्हाणें ऐकिलें, तर बरें होईल. पण तें आमच्या नशिबीं कोठून ?

**चिंता०** - छे छे, रत्नाकरा, अशी बुद्धि देखील नको. तो विचाराअसला तर आपलें काय गेलें? अरे, जो कुटुंबांत वडील असतो, तो खुशाल असला, तर सर्व कुटुंब चालतें. त्याचे आधारावर सर्व कांहीं करितां येतें. आणि तो मेला तर संसार आंगावर पडतो. मग त्या दुःखास पारावार नाहीं. यासाठीं तो सुखी असावा. आपणांस का य, अनेक युक्ति आहेत. तिचें मन आपल्यावर आहे, मग कशाही युक्तीनें आपलें कार्य साधेल.

**रत्ना०** - बरें, त्या गोष्टी नकोत. परंतु आतां पुढें काय उपाय योजिला आहेस, तो सांग. तर खरा. नाहीं तर आपले असेच दिवस घालविशील म्हणजे झालें.

**चिंता०** - अरे, स्वस्थपणानें आणि विचारानें जें काम करावें तें पक्कें होतें. पण तूं आतां घरीं जा. आणि उद्यां लवकरच ये म्हणजे झालें.

रत्नाकर आपले घरीं निघून जात आहे, तों दासी मार्गात भेटली. तिला त्यानें विचारिलें कीं, शेटजींची आतां प्रकृति कशी आहे? दासी म्हणाली, आतां कांहींशी बरी आहे. पण तुमचे कडची कशी काय व्यवस्था आहे? रत्नाकर म्हणाला, अद्यापि कांहींच तजवीज झाली नाहीं. परंतु आतां लवकरच करणार आहें. असें सांगून तिला परत पाठविलें.

दासीनें परत येऊन सत्यभामेस सांगितलें कीं, अद्यापि कांहींच तजवीज झाली नाहीं, तें ऐकून सत्यभामा म्हणाली.

**सत्य०** - अगे, काय सांगूं एकेक दिवस मला युगा सारिखा जात आहे. तूं आलीस म्हणजे मी आशेनें असतें कीं, आज कांहीं तरी आनंदाचें वर्तमान कळेल पण तें मेलें माझे कपाळीं कोठचें ? पहा,

इतक्यांतच ह्यातान्यास रोग आला आणि घरांत बसला. हा नीट असता तर आपणांस कांहींच काळजी नव्हती. पण काय गं करावें? आतां तू तरी कांहीं युक्ति सांग.

**दासी**- बाईसाहेब, आमच्या युक्ति तुमच्या उपयोगीं नाहींत. आह्मी दासी ह्मणजे हलकीं मनुष्यें. आह्मीं तुमची चाकरीच जन्मभर करावी आणि तुह्मी सांगाल तेवढें काम करावें. आमची अक्कल ती काय हलक्याची बुद्धि हलकीच असते. ती तुमच्या उपयोगीं नाहीं.

**सत्य०**- अगे, तूं जर असें ह्मणतेस, तर आतां काय असेंच झुरून झुरून मरावें? अगे दासी, काय सांगूं. माझी सखी यमुना जर या वेळीं येथें असती, तर तिनें कांहीं तरी युक्ति सांगितली असती. तिची माझी मैत्री किती आहे, हें तुला माहीतच आहे. पहा मागें माझे पायास पुळी झाली होती, त्या वेळीं तिनें नित्य येऊन उपाय करीत असावें आणि माझा वेळही घालवावा. तिच्यायोगानें मला तें दुःख फारसें वाटलें नाहीं. शेवटीं तिनेंच उपाय करून करून मला बरी केली. तिचे उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं. अगे, ती जर इतक्यांत माहेरीं येईल, तर बरें होईल.

**दासी**-बाईसाहेब, ती सासरीं गेली होती खरी, पण तिजसारखीच मी आज पाहिलीशी वाटते. मला वाटतें कीं, ती आजच आली असावी.

**सत्य०**- वाहवा! मग बरेंच झालें. तर गडे, असें कर. आतांच लवकर जा आणि तिला सांग कीं, सत्यभामा तुझी वाट पाहत आहे. आतांच येऊन जाशील, तर बरें होईल. असें सांगून तिला घेऊन ये ह्मणजे झालें.

ही यमुना सत्यभामेचे शेजारचेच एका ब्राह्मण गृहस्थाची कन्या होती. ती फारच चतुर, दूरदृष्टि आणि सुशील असून केवळ पतिव्रता होती. दोघींचीं घरें शेजारीं असल्यामुळें लहानपणापासून दोघींची मैत्री असे. यमुनेचा

स्वभाव चांगला असल्यामुळें तिला सर्व मुली आपल्याहून शहाणी असें मानीत असत. यमुना सत्यभामेपेक्षां वयानें ही मोठी होती.

दासी लागलीच यमुनेच्या घरीं आली. त्यादिवशीं यमुना घरीं आली-च होती. पण तिचें सासरें फार लांब असल्यामुळें रस्त्यांत तिचे फार हाल झा-ले. ह्मणून त्यादिवशीं कोठेंच गेली नव्हती. दासीस पाहून यमुना ह्मणाली. अगे सरवू, सत्यभामा खुशाल आहेना? मी आतांच येणार होतें, प-ण संध्याकाळ झाली ह्मणून आलें नाहीं. उद्यां सकाळींच येईन. दासी ह्मणाली, सत्यभामाबाई खुशाल आहेत. त्यांनीं तुह्मांस बोलाविलें आहे. मु-द्दाम मी यासाठींच आलें आहे. यमुना ह्मणाली, सकाळींच येईन ह्मणून सांग. अगे, सत्यभामेस भेटल्या वांचून मला चैन पडावयाचें नाहीं. जा तूं मी खचीतच येईन.

दासीनें परत येऊन सत्यभामेस सांगितल्यावर तिला जो आनंद झाला तो हृदयांत मावेना. एकदां केव्हां यमुना भेटले असें तिला झालें. दुसरे दिवशीं प्रातःकाळींच यमुना सत्यभामेचे घरीं आली. दोघींनीं एक मेकींच्या मानेंत मान घालून प्रेमाश्रु आणिले.

**सत्य०** - यमुने, तूं काल आलीस हें मला कळलें नव्हतें. परंतु मीं सहज तुझी आठवण काढिली, इतक्यांत आपली दासी ह्मणाली कीं, यमुने सारखी मीं पाहिलीशी वाटतें. ह्मणून तुजकडे पाठविली, तों तूं खरीच आलेली ऐकिल्यावरून मला क्षणभर देखील धीर धरवेनासा झाला. पण मेली रात्र पडली ह्मणून. बाई कसें काय आहे, तुझ्या सासरची सर्व खुशाल आहेतना?

**यमुना** - सासरचीं सर्व खुशाल आहेत. मला आणखी थोडे दिवस इकडे पाठविण्याचा घरचा विचार नव्हता. पण माझे बापानें श्रीरामाचे उत्साहा करितां मला मागारी पाठविला. एकतर घरांतून परतविला

मग दुसराच आला तेव्हां पाठविणें झालें.

**सत्य०** – तूं कायबाई, तुला आतां इकडची आठवण तरी कशाला येईल? उगाच घरच्यांनीं मागारी परतला असें ह्मणतेस, पण तुझ्या मनांत कोठें इकडे यावयाचें असेल. बाई, असेंच आहे कीं, लहानपणीं माहेरचें सुख आणि त्यावयांत तिकडचें सुख आहे. गडे, तूं दैववान् खरी हो. नाहींतर माझे पहा मेले काय हाल होत आहेत ते.

**यमुना** – हाल काय बरें होत आहेत ते सांग. सर्व खुशाल आहेत ना?

**सत्य०** – सर्वती कोण. माझा बापतर आज बरेच दिवस तापानें पडला आहे, तो आतां कांहींसा बरा आहे. आणखी मी खुशाल आहें. पण यमुने, माझ्या खुशालीची गोष्ट कशाला विचारितेस; ती सांगतां उपयोग नाहीं.

**यमु०** – अगे, असें कां बरें? मलातर बाई भय वाटलें. तुझे यजमान कानपुरास गेले आहेत त्यांजकडून पत्र कधीं आलें होतें बरें?

**सत्य०** – तें काय सांगूं. आलीकडे फार दिवसांत पत्र आलें नाहीं.

**यमु०** – अगे, व्यापारा करितां गेले आहेत. कोठें खेडया पाड्यांत असले तर डांक चालत नसेल, ह्मणून पत्र येत नाहीं. अथवा ते लवकरच येणार असतील. आतां जावयाचेंच आहे, पत्र कशाला पाहिजे, असें ह्मणून ह्मणून दिवस गेले असतील. काळजी करून काय उपयोग? ईश्वर ठेवील तसें रहावें लागतें.

**सत्य०** – बरें बाई, काय ह्मणशील तें खरें. मीतर वाट पाहून कंटाळलें. आतां कितीतरी काळजी करावी. ह्मणून कांहींच बोलत नाहीं.

**यमु०** – अगे, पण तुझ्या तोंडावर अगदीं तेज नाहींसें झालें आहे. मी गेलें तेव्हां तूं कशी होतीस आणि आतां तुझ्याकडे पाहवत देखील नाहीं. असें बरें इतकें काय तुला दुःख आहे? मला वाटतें; तुला कांहींतरी दुखणें आलें होतें. कां सत्यभामे, बोलत कां नाहींस?

सत्य० – बोलावें काय, मला दुखणें नाहीं आणि कांहीं नाहीं. दुखणें येऊन जरी मेलें असतें, तरी बरें झालें असतें.

यमु० – अगे, इतकी आपल्या जिवास कां कंटाळलीस बरें? नवऱ्याचा कागद आला नाहीं हीचना काळजी? असें तुझ्या नवऱ्या सारिखे काय थोडे लोक व्यापारा करितां गेलेले असतात? ह्मणून त्यांच्या बायकांनीं तुझ्या सारिखें जिवावर उदार व्हावें काय? छे छे, वेडी आहेस. असें बोलूं देखील नको. मी तुला सांगतें, ते खचीत लवकर येतील. आणखी आमचे जोशीबुवा आहेत. त्यांजकडे उद्यां जाईन आणि प्रश्न विचारीन ह्मणजे कायतें कळेल. तूं कांहीं काळजी करूं नको गडे तुझ्या तोंडांतलीं अक्षरें ऐकून माझें पोटांत धस्स झालें.

सत्यभामेस रत्नाकराचे नादानें झुरणी लागली होती आणि रात्रं दिवस चैन नव्हतें. हें यमुनेला माहीत कोठून? पण तिनें अनेक तऱ्हेनें समजूत केली, तरी तिच्या मनाची शांतीच होईना. ह्मणून यमुना चतुर असल्यामुळें तिनें विचार केला कीं, हिला दुसरी कांहीं तरी चिंता असेल असें खचीत वाटतें. तर विचारल्यावर कळेल ह्मणून बोलूं लागली.

यमु० – सत्यभामे, मीं तुझी अनेक प्रकारें समजूत केली; पण तें तूं कांहींच मानिलें नाहींस, यावरून तुला कांहीं तरी दुसरीच चिंता लागली आहे, असें मला वाटतें. तर निष्कपटपणानें सांग. माझे जवळ कोणती ही गोष्ट तूं चोरून ठेवणार नाहींस, हें मला माहीत आहे. आणि मला सांगितल्यावर माझ्यानें उपाय होण्या सारिखा असेल तो मी करीन. आतां लवकर कायतें सांग, ह्मणजे झालें.

सत्य० – यमुने, तूं माझी जिवलग आहेस. आणि विचारितेस तरमी सांगण्यास भीत नाहीं. पण गडे जराशी लाज वाटते.

यमु० – अगे, माझ्या जवळ लाज आंताच कोठून आली. आजपर्यंत

कशीही गोष्ट असली तरी तूं मला सांगत होतीस आणि आ तांच कां संकोच धरितेस. छि: असें करूं नको. काय असे ल तें उघड सांग.

**सत्य०** – अगे, उघड सांगण्या सारिखी गोष्ट नाहीं. ऐकिल्यावर तूं म ला मूर्ख ह्मणशील, पण कायकरूं. माझा अगदीं निरुपाय झाला आ हे जळो हें तारुण्य, आलें नसतें तरी बरें. पण आतां हे पापी डो के दुःख देतात. मी तरी काय करावें; एकदां डोळ्यांनी जें पाहिलें तें मनांतून जातच नाहीं. अगे, हातांत आलेलें फळ तोंडीत असतां ज से नदींत पडून वाहत जावें, तसें झालें आहे. कधीं त्याची गांठ पडेल कोणजाणे. पुष्कळ उपाय करावयास पाहत होतें, पण माझें दैवच उलटें आहे, ह्मणून कांहींच घडत नाहीं. काल तुझी आठवण केली कीं, आतां आपलें दुःख यमुने वांचून दूर करणार मला कोणीच दिसत नाहीं. तर आतां तूंच त्याचा विचार कर आणि तेवढें फळ मला साध्य होण्याचा उपाय सांग. नाहीं तर मी मरेन यां त संशय नाहीं.

**यमु०** – तूं काय बोलतीस, हें मीं चांगलें समजलें नाहीं. उघडपणा नें सांगशील तर समजेन.

**सत्य०** – यमुने, तूं सर्व समजली आहेस. आतां माझे तोंडानेंच आ णखी कशास बोलवितेस. एकदां त्याची भेट करून दे. मी असलें काम तुला सांगूं नये, पण तुझ्या वांचून दुसरी कोणी विश्वासू दिसत ना हीं आणि कळवळ्या वांचून कांहीं काम होत नाहीं. तुझी मजवर प्रीति असून तूं मनावर घेशील, तर करशील, अशी माझी पक्की खात्री आ हे. आतां यांत मजकडून कांहीं अपराध घडला असेल, तर क्षमा कर. परंतु सांगितलेलें एवढें ऐक, ह्मणजे झालें.

**यमु०** - तूं ह्मणतेस हें मी आतां थोडेंसें समजलें. पण तें फळ किती लांब गेलें आहे हें तुला माहीत आहे काय?

**सत्य०** - त्याच शहरांत आहे आणि कधीं कधीं आमचे दारावरून तें जात असतें. पण हातीं येत नाहीं.

**यमु०** - आतां मी तुझे बोलण्याचा मतलब समजलें. पण मला आतां उशीर झाला आहे, ह्मणून घरीं जाऊन त्याचा विचार करितें आणि संध्याकाळीं पुन्हा येईन, तेव्हां तुला त्याची तजवीज सांगेन. तूं कां हीं काळजी करूं नको. तुला जें दुःख तें मलाच आहे, असें स मज आणि स्वस्थ रहा.

**सत्य०** - बरें तर जा. पण संध्याकाळीं लवकरच येहो. मी वाट पाहत असेन.

असें दोघींचें भाषण होऊन यमुना आपले घरीं गेली. यमुने ज वळ ही गोष्ट सांगितल्यामुळें सत्यभामेचे मनास जरासा धीर आला. यमुना आपले घरीं जाऊन विचार करूं लागली कीं, सत्यभामा व्यभिचाराचे व्यस नांत पडून सर्वस्वाचा नाश करून घेण्यास पाहत आहे. हिची आज पर्यं त अशी चर्या नव्हती. पण फार दिवस तिची आणि पतीची भेट नाहीं. त्या मुळें तिला त्या अनावर कामानें अंध केलें आहे. ती तर लहान अज्ञा नच आहे. मोठ मोठ्या जाणत्या स्त्रियांच्या हातून देखील अशीं कर्मे घडलेलीं आहेत, यावरून सत्यभामेस तरी कां दोष द्यावा. पण आतां तिनें मजपाशीं बुद्धि विचारिली आहे. त्यापक्षीं तिच्या हातून दुराच रण घडूं देऊं नये. तिला मात्र तिच्या मना सारिखेंच बोलत असावें व युक्तीनें बोध करून वळवावें, ह्मणजे ती हळू हळू स्थितीवर येई ल. या वांचून दुसरा उपाय नाहीं.

इकडे रत्नाकर नित्याप्रमाणें चिंतामणीचे घरीं आल्यावर दोघेही एकांतीं बसले.

**रत्ना०** - कां चिंतामणी, आजतरी कांहीं युक्ती सुचली आहे कीं नाहीं. ?

**चिंता०** - अरे, तजवीज सुचेल तर काय झालें. पण आज जरासें माझ्या जिवास बरेपणा नाहीं, त्यामुळें मला कांहीं सुचत नाहींसें झालेंआहे.

**रत्ना०** - चिंतामणी, तूं अद्यापि कांहीं युक्ती काढिली नाहींस, परंतु पहा माझाएक एक दिवस युगा सारिखा जात असतो; येथें आलों ह्मणजे कायतें चित्त जरासें स्वस्थ असतें. घरीं व्यापार धंदा कांहींच सुचत नाहीं. दुकानावरविक्री करितां बसलों ह्मणजे सर्व काळ त्याच चिंतनांत असावें, गिऱ्हाईक आलें गेलें तरी त्याची मला पर्वा नाहींशी झाली आहे आणि बाहेर फिरावयास जावें, तर अगदींच पाय घेत नाहींत, अशी माझी अवस्था झाली आहे. आणि तूंतर दिवस घालवितोस. आतां लवकरच कांहीं तरी युक्ति सांगशील, तर बरें आहे.

**चिंता०** - अरे, तूं ह्मणतोस, हें सर्व खरें आहे. ज्या ज्या वस्तूचा ध्यास लागतो, ती ती वस्तू प्रयत्नानें साध्य होते, परंतु मागल्या स्थितींत अंतर पडतें; अशी सर्व जगाची रीत आहे. मनुष्यमात्रास कांहीं तरी नाद असल्यावांचून त्याचा काळ जात नाहीं. पहा कीं, कोणी मनुष्य सुखाचा पूर्ण भोग घेत असून कांहीं काम धंदा न करितां सुखोपभोगांतच काळ घालवितो, त्यास रोग प्राप्त होतो आणि तो लवकरच मरतो. तसाच कोणी एखादा असाही आहे कीं, सर्व सुखाचा उपभोग जरी आहे, तरी त्यास आणखी नवीन कांहीं तरी भोग भोगावे, अशी इच्छा असते. भोगीत असलेल्या विषयांत त्यास सुख वाटत नाहीं. ह्मणून तो आणखी जास्ती मिळविण्याचा प्रयत्न करितो. सारांश, एकाहून एक अधिक विषयेच्छा वाढत जातात. कधींच विषयांची तृप्ति होत नाहीं. तशीच एखाद्याची लग्नाची स्त्री अत्यंत रूपवान् आणि सुगुणांनीं युक्त अशी असते. तिच्या

शीं विषयाचा उपभोग बहुत दिवस झाला ह्मणजे त्यास तिचा वीट येऊन आणखी दुसरीची इच्छा करितो. मगती दुसरी जरी रूपानें साधारण असली, तरी आवडते. कारण त्याचे मनांत कांहीं तरी नवीन भोग असावा अशी इच्छा असते, ती तो पूर्ण करून घेतो. पुढें तिचाही वीट आला ह्मणजे तिसरीची इच्छा करितो. असेंच मनाचे इच्छेचे धर्म आहेत. त्यांत कांहीं मनुष्याचा अपराध आहे असें नाहीं. किती ही विवेकी असला, तरी त्याला त्याचें मन आवरत नाहीं. आणि सर्व विषयांत स्त्रीहा विषय अनिवार आहे. कित्येक लोक स्त्रीविषयाचे इच्छेनें सर्व द्रव्य घालवून प्राणांसही मुकले आहेत. आणि रत्नाकरा, तूं ह्मणतोस कीं, मला धंदा सुचत नाहीं, पण मला असें वाटतें कीं, तुला पर स्त्रीची इच्छा उत्पन्न झालेली असून तूं अद्यापि आपला धंदा आणि लौकिक संभाळून राहिला आहेस, त्यावरून तुझी शाबास आहे; नाहींतर पहा, आपल्याच शहरांत एक जव्हेऱ्याचा मुलगा आहे, तो आपलें द्रव्य दुष्कर्मांत घालवून प्राणासही मुकत होता. तो तुला ऐकून माहीत असेलच.

**रत्ना०** — अरे, माझ्या ध्यानांत नाहीं, पण या गोष्टीस किती वर्षें झालीं असावीं बरें?

**चिंता०** — सुमारें सात आठ वर्षें झालीं. त्यावेळीं तूं लहान होतास. ती गोष्ट तुझ्या ध्यानांत नसेलच. पण मला माहीत आहे.

**रत्ना०** — त्याची गोष्ट कशी काय झाली, ती मला सांग बरें.

असें त्याचें भाषण ऐकून चिंतामणी गोष्ट सांगूं लागला.

त्याच शहरांत बुधवार पेठेंत कृष्णदास नांवाचा जव्हेरी राहत असे. त्याचा धंदा हिरे, मोत्यें, पोंवळीं इत्यादि विकण्याचा होता. त्याला एकच मुलगा रामदास नांवाचा होता, तो फारच चतुर आणि व्यापारांत ही हुशार

झाला. ह्मणून बापानें सर्व दुकानदारी त्याचे स्वाधीन केली आणि आपण वृद्ध झाल्यामुळें घरीं स्वस्थ राहून ईश्वर भजनांत काळ घालवूं लागला. रामदास बापासारिखा धंदा चालवून नांवलौकिकास चढला. आणि बापाहून जास्त धंदा करण्याचा ही त्यानें प्रयत्न चालविला होता; तो असा कीं, लग्नसराईचे दिवसांत बाहेर गांवीं माल विकण्यास तो फिरूं लागला. त्यामुळें त्यास त्यांत नफा ज्यास्त होत असे.

एके दिवशीं लग्नसराईंत रामदास सातारा शहरांत मोत्यें विकण्याकरितां गेला. त्या शहरांत तो कधींच गेला नव्हता, ह्मणून आतां आपण कोणाकडे उतरावें याचा विचार करूं लागला, तों कांहींच सुचेना, ह्मणून प्रथम एका देवळाजवळचे धर्मशाळेंत उतरून स्वयंपाक करून भोजन केलें. बरोबर भाड्याचें घोडें होतें त्याजबद्दल भाडेकऱ्यास पैसे देऊन घालविलें आणि क्षणभर विश्रांति घेतल्यानंतर आपला माल घेऊन शहरांत जाण्यास तयार झाला. इतक्यांत एक वृद्ध बाई देवदर्शनास आली होती, तिला त्यानें विचारिलें.

**रामदास** – बाई तुह्मी कोठें राहतां आणि तुमचीं कोण कोण घरीं आहेत ?

**बाई** – मी हेदाजवळ राहतें. माझें आणखी कोणी नाहीं. पण तुह्मीं कोठून आलां?

**राम॰** – आह्मी मोतीवाले आहों. गांवांत फिरून माल विकावा ह्मणून आलों आहों. आह्मांस रहावयास कोठें चांगली विश्वासाची जागा मिळेल तर बरें होईल.

**बाई** – तुह्मांस जागा पाहिजेतर मी देतें, पण थोडेंसें भाडें द्यावें लागेल आणि जागा स्वच्छ राखून चांगल्या रीतीनें रहाल तर, चला मज बरोबर.

**राम॰** – भाडें काय बरें घ्याल ?

**बाई** – तुह्मांस किती दिवस रहावयाचें आहे ?

**राम॰** – आह्मी महिनाभर राहूं आणि चांगला व्यापार चालला तर ज्यास्ती दिवस राहूं.

**बाई** - जर महिन्याची कबुलायत केलीन, तर एक रुपया पडेल. नाहीं तर रोज एक आणा पडेल. पण अशी जागा तुह्मांस कोठें मिळणार नाहीं बरें.

**राम०** - बरें बाई, तुह्मी ह्मणतां हें मला कबूल आहे. चलातर मी तुमचे बरोबर येतों.

असें दोघांचें भाषण होऊन रामदास त्या बाईबरोबर गेला. तिनें आपल्या घरांतील अर्धा भाग त्याचे स्वाधीन केला, त्यांत तो राहिला. त्याचे जाग्यास पुढें रस्त्याकडे एक दार होतें आणि मागें विहीरीकडे एक दार होतें. त्याचे पलीकडचे घरांत रामशेट सोनार ह्मणून आपल्या सर्व कुटुंबा सुद्धां राहत असे. रामदासास मनासारिखी जागा मिळाल्यामुळें मोठा आनंद झाला. त्यानें आपले बिऱ्हाडाची सर्व व्यवस्था केली आणि रात्रीं स्वस्थ निजला. दुसरे दिवसापासून तो शहरांत फिरूं लागला त्याचे मालाची चांगली विक्री होऊं लागली आणि नफाही पुष्कळ मिळूं लागला त्यामुळें त्यास फारच आनंद झाला.

असे सुमारें पंधरा दिवस लोटले. एके दिवशीं त्यास एकाएकीं ज्वर येऊन त्याची प्रकृति फारच बिघडली. त्यामुळें तो घाबरून गेला. जवळ दुसरें कोणी मनुष्य नव्हतें. परंतु ती बाई फार दयाळू असे, ह्मणून तिनें त्याचा समाचार घेऊन वैद्य आणून औषध देवविलें आणि त्याचे पथ्यपाण्याचा सर्व बंदोबस्त राखिला; त्यामुळें आठ दिवसांनीं ताप जाऊन तो हुशार झाला. बाईनें चाकरी केली त्यामुळें त्यास असें वाटलें कीं मी परदेशस्थ असतां हिनें आई सारिखी माझी चाकरी केली त्यापक्षीं ही बाई फार चांगली आहे. आपणांवर हिचे फार उपकार झाले आहेत. ह्मणून हिला कांहीं तरी दिलें पाहिजे. असें समजून त्यानें बाईस एक चांगलें लुगडें घेऊन दिलें, तें फार आग्रह केल्यामुळें तिनें घेतलें. पुढें **रामदास** तिला आई सारिखी मानून तिच्या मतानें वागूं लागला.

एके दिवशीं ती बाई बाहेर गांवीं आपले मुलीचे भेटीस जाऊं लागली, त्या वेळीं रामदासास ह्मणाली, शेटजी, मी आतां आपले मुलीचे भेटीस फार लांब जात आहें. मला परत येण्यास सुमारें दोन महिने लागतील. तों पर्यंत तुह्मी येथें रहालसें मला वाटत नाहीं. कदाचित् राहिल्यास बरें आहे, नाहींतर तुह्मी जातेवेळीं बिऱ्हाडाची किल्ली शेजारचे सोनाराचे घरीं देऊन ठेवा. माझे भाड्याचे पैसे होतील तेही त्याज पाशींच द्या. पण तुह्मी आपल्या ह्यातची एक चिट्ठी लिहून तींत तुह्मी कधीं गेलेत आणि किती पैसे दिले, हेंही लिहून त्याचे स्वाधीन करा, ह्मणजे मी आल्यावर त्याज पासून तुमच्या चिट्ठी प्रमाणें पैसे घेईन. मी तर आतां जातें, पण तुह्मी आपल्या प्रकृतीस चांगले जपून रहा बरें. नाहीं तर आतां येथें मी देखील नाहीं. संभाळून वागा ह्मणजे झालें. असें बोलून ती बाई सोनाराचे घरीं गेली आणि त्याजला ही सांगितलें कीं, मी जात आहें. रामदास शेटजी जातील त्यावेळीं भाड्याचे पैसे आणि किल्ली तुह्मां जवळ देतील ती घेऊन ठेवा आणखी ते चिट्ठी देतील तीही घेऊन ठेवा. मी आल्यावर तुह्मांकडून घेईन. माझे घराची किल्ली मी नेत आहें, देखरेख असूंद्या आणि रामदास विचारा प्रवासी आहे. त्याजवरही जराशी दृष्टि ठेवा. मी आतां जातें, दोन महिन्यांनीं येईन. असें सांगून ती बाई निघून गेली. रामदासाचा व्यापार चांगला चालूं लागल्यामुळें तो बरेच दिवस तेथें राहिला होता. त्या सोनाराची सून राधा नांवाची होती. तिचा नवरा व्यसनी असल्यामुळें ती व्यभिचार करीत असे; परंतु तिचें कृत्य कोणास कळलें नव्हतें. तिचा यार शेजारचे घरांतलाच सिताराम नांवाचा कांसार होता. परंतु तो दरिद्री होता. आणि हिचे मनांत घरांतून जावयाचें होतें, परंतु द्रव्य नाहीं ह्मणून ती विचारांत होती. एका विहिरीवरच सोनाराची आणि रामदासाची वहिवाट होती, ह्मणून राधेनें तो विहिरीवर आला ह्मणजे हळू हळू त्याच्याशीं बोलावें, कांहीं

थट्टा मस्करीचीं भाषणें करावीं, असें करण्याचा बरेच दिवस क्रम चेविला. त्यामुळें रामदासाचेंही मन तिजकडे वेधलें. रत्नाकरा, असे पहाकीं, स्त्रियांचे सपाट्यांतून कोणीही टिकला नाहीं. अरे, लोहपिष्ट खाऊन तपश्चर्या करणारे त्यांचीही गडबड झाली, मग त्या रामदासाची कथा काय. ती केव्हां प्राप्त होईल असें रामदासास झालें आणि निर्भीडपणानें तिची थट्टा करूं लागला. परंतु घरांत पुष्कळ मनुष्यें असल्यामुळें आणि तिचा निराळाच मतलब असल्यामुळें तशी संधी ती येऊं देत नसे. रामदासास अगदीं तिचें वेड लागलें. त्यामुळें गांवांत फिरावयास जाण्याचाही आळस होऊं लागला. कधीं कधीं जावें आणि कधीं कधीं घरांतच राहून वारंवार तिचें मुख पहावें असे होऊं लागलें. राधेनें विचार केला कीं, हा वरोचना दीं लागला आहे. त्याअर्थी त्याज पासून हळू हळू द्रव्य मिळविण्याची युक्ति करावी असें मनांत आणून एके दिवशीं त्यास म्हणाली. शेटजी, माझा तर तुमचेवर जीव लागला आहे. पण घरांतल्या मनुष्यांपुढें अगदीं उपाय नाहीं आणि मी तर सासरवासी आहें. जरकां घरांत जरा संशय आलातर तुम्हांस आणि मलाही जिवाची आशा नको. यासाठीं विचारानें काम केलें पाहिजे. तुम्हांसही तसेंच झालें असेल, पण आपण आतां कांहींतरी युक्ति करूं. या कामांत प्रथम थोडेसे पैसे खर्च करावे लागतील, त्याचें कारण मग तुम्हांस सांगेन, परंतु अगोदर दहा रुपये तरी पाहिजेत. रामदास म्हणाला, दहा सोडून पंचवीस पाहिजेत तरी देतो, पण लवकरच होईल अशी युक्तिकर. राधा म्हणाली, युक्तीसाठींच तर मागतें, पण तुम्हांस माझा विश्वास आहेना? नाहींतर उगाच मी त्याभानगडींत पडत नाहीं. रामदास म्हणाला, तुझा विश्वास नाहीं असें मी बोलेन तरी? तुझे साठीं हा जीव देखील खर्च करीन. मग पैशाची कथा काय? ती म्हणाली बरें तर, दहा रुपये कागदांत गुंडाळून हळूच या समोरच्या काळ्या दगडा खालीं ठेवून जा, म्हणजे मी घेईन. पण कोणी

मनुष्य नाहीं असें पाहून फरा. रामदासानें तसें केलें. तिनें हळूच येऊन ते रुपये घेतले. नित्य रात्रीं सर्व निजलीं म्हणजे ती हळूच कांसाराचे घरीं जात असे. तिचा नवरा गांवांत एके वेश्येसीं रत होता. त्यामुळें तिला रात्रींफारसें भय नव्हतें. परंतु घरांतील दुसऱ्या माणसांचे भीतीमुळें तिनें घरांतला चाकर रामा नांवाचा होता ता वश करून टेविला होता. तो बिचारा गरीब असे. त्यास ही ती कधीं कधीं थोडे पैसे देई आणि घरांत जेवण वाढण्याचें काम हिजकडे होतें म्हणून रामास जेवणही चांगलें वाढीत असे. त्यामुळें तिच्या कृत्यास तो सहाय झाला होता आणि कोणाशीं बोलला नाहीं. राधेनें ते रुपये रात्रीं यारास नेऊन दिले आणि सर्व हकीकत सांगितली. रामदासास तर अगदीं वेड लागलें आणि थोडे पैसे ही गेले. परंतु तो तिचें कृत्य समजला नाहीं. दुसरे दिवशीं ती ह्मणाली, शेटजी, लवकरच तजवीज होईल. ते रुपये एका मनुष्यास दिले आहेत. त्याचे योगानें आपलें काम सिद्धीस जाईल. तुम्ही स्वस्थ रहा. मला त्याची काळजी आहे, असें बोलून तिनें त्याची समजूत केली रात्रीं सर्व मनुष्यें निजल्यावर आपले गड्यास बोलली कीं, आतां तिकडे जाण्याचे अगोदर एक मौज करावयाची आहे. ती अशी कीं, शेजारचा रामदास माझे नादीं लागला आहे, पण मी काय त्यास मिळणार. परंतु कांहीं तरी त्याची समजूत करून येणार आहे. यासाठीं मी त्याचे घरांत जाऊन बसल्यावर थोडक्याच वेळानें तूं त्याजकडे तंबाकू मागण्याचे निमित्तानें ये, म्हणजे आपलें कार्य होईल. (रामा केव्हां केव्हां तंबाकू ओढण्यास त्याजकडे जात असे.) असें सांगून लागलीच त्याचे दरवाज्याशीं जाऊन संकेत खुणा केली. तो बिचारा वाटच पाहत होता. त्यानें लागलेंच दार उघडून तिला आंत घेतलें. परंतु एकाएकी नवीन स्त्री असल्यामुळें अंगास हात लावावयास त्यास धैर्य होईना. तिनें आंत जाऊन हळू हळू कांहीं तरी गोष्टी चालविल्या. इतक्यांत संकेला

प्रमाणें रामानें हाक मारिली, ती ऐकून तिनें घाबरल्या सारिखें केलें, म्हणून रामदासानें प्रथम त्यास जबाब दिला कीं, तंबाकू मजकडे शिलक नाहीं. रामा म्हणाला, मी तुमचे घरांत मधाशीं ठेविला आहे. पुन्हा रामदास म्हणाला, आतां माझ्यानें उठवत नाहीं, तूं जा, ओरडूं नको. परंतु तो जाईना. मोठ मोठ्यानें हाका मारूं लागला. त्यामुळें रामदासही घाबरला. राधा दरवाज्याच्या आड राहिली आणि दारउघडिलें. रामा आंत आल्यावरती हळूच बाहेर गेली. रामाही तंबाकू ओढून निघून गेला. नंतर ती आपल्या याराच्या घरीं गेली

रामदास अगदीं हिरमुसल्या सारिखा झाला. पण काय करितो, दुसऱ्याची स्त्री म्हणजे विषाची वल्ली होय. त्यामुळें उगाच राहिला. दुसरे दिवशीं विहिरीवर असतां तीही आपली दुःखमुद्रा दाखवून म्हणाली, मेला द्वाड त्याच वेळीं आला कसा कोण जाणे. पण वर्षाचे तीनशें साठ दिवस आहेत; तुम्ही स्वस्थ रहा. संधी मिळेल तेव्हां मी येईन. असें बोलून चालून बरेच दिवस घालविले. एके दिवशीं आणखी पैसे काढण्याची युक्ति करून रामदासास म्हणाली, मीं एक युक्ति काढिली आहे, पण तुमचे मनास आली तर घडेल. रामदास म्हणाला, काय आहे सांग बरें. राधा म्हणाली, माझी मैत्रीण येथून जवळच राहत असते, तिचें स्वतःचें घर नाहीं. दुसऱ्याचे घरांत राहते. तिची माझी अत्यंत मैत्री आहे. एखादे वेळीं असल्या देखील कृत्यास ती मदत करील असें आहे. आज मी तिजकडे जाऊन विचारिलें, तेव्हां ती म्हणाली कीं, येथें कांहीं घडणार नाहीं, पण मी एक घर खरेदी घेत आहें, तें घेतल्यावर तुमचें ऐकेन. परंतु सध्या मजपाशीं पैसे नाहींत, याकरितां मी माझे भावाकडे आणावयास जात आहें, मिळाले तर घर घेईन. नाहींतर माझा उपाय नाहीं. इतकें ती बोलली, यामुळें मी निराश झालें; पण पुन्हा मनांत विचार आला कीं, शेटजीं पासून पैसे

देवविले तर आपलें कार्य होईल. मी तिला होय ह्मटलें, पण तुमच्या म नास येईल तर उपयोग. रामदास म्हणाला, रुपये किती लागतील? राधा म्हणाली, रुपये दोनशें पाहिजेत, तर काम होतें, नाहींतर सध्या आपलें कार्य साधायास दुसरी जागा नाहीं. रामदास म्हणाला, उद्यां विचार करून सांगेन.

रामदासानें विचार केलाकीं, पहिल्यानें दहा रुपये दिले ते व्यर्थ गेले. आणखी दोनशें द्यावे, तर काय होतें कोण जाणे. पण ही सासरवाशीण आहे. हिला पैशाची गरज नाहीं केवळ मजकरितांच ही इतक्या युक्ति करीत आहे. त्यापक्षीं अशा स्त्रीचा आपणांस लाभ करून घेतलाच पाहिजे आणि तशांत ती कर्ज मागत आहे. मग आपण दिलेतरी कांहीं चिंता नाहीं. ती परत देईलच असा विचार करून त्यानें रुपये देण्याचा निश्चय केला.

दुसरे दिवशीं तिनें विचारिलें तेव्हां बोलिलाकीं, मी रुपये देतों, पण ते आपणांस कधीं परत मिळतील.? राधा म्हणाली, आपलें काम झाल्यावर थोडक्याच दिवसांनीं ती आपल्या भावाकडून रुपये आणीलच. मग तुमचे मिळतील. तुम्ही त्यांची काळजी करूनका. रामदास म्हणाला, बरें तर, केव्हां पाहिजेत.? राधा म्हणाली, आज रात्रीं मी तिचे घरीं जाणार आहें, या करितां आजच मिळाले पाहिजेत पण आतां असें कराकीं, रात्रीं त्याच दगडाखालीं जराशी माती उकरून तींत पिशवी पुरून ठेवा, म्हणजे झालें. रामदासानें तसें केलें. त्यास असें झालें होतेंकीं, कशातरी रीतीनें ही आपणांस मिळावी. म्हणून तिचें खतही लिहून घेण्यास त्याला भीड वाटली

इतकें ऐकून रत्नाकर म्हणाला.

**रत्ना०**- चिंतामणी, पहा माझीही अशीच अवस्था झाली आहे; पण आतां तूं काय करशील तें खरें.

**चिंता०**- अरे, पहाकीं, रामदासानें आपला सर्व धंदा सोडिला आणि केवळ

तिच्याच नादास लागून जवळचे पैसेही घालविले. तसें अद्यापि तुला झालें नाहीं. तूं अजून धंदा करीत आहेस आणि पैसेहीं खर्च केले नाहींस. यावरून तूं धन्य आहेस. रत्नाकरा, आपण आज फार वेळ गोष्टी सांगत बसलों; परंतु गोष्टीच्या नादांत माझे जिवास अमळसा आराम या टला. आतां जा, संध्याकाळ झाला.

**रत्ना०** - वाहवा! अशी मौजेची गोष्ट टाकून मला जावेंसें वाटेल काय? पुढें रामदासास ती कशी प्राप्त झाली, हें सांगत र खरें. मग मी जाईन

**चिंता०** - अरे, पुढचें ऐकून तुला काय उपयोग? आपली गोष्ट निराळी आणि ती निराळी आहे.

**रत्ना०** - कशीही असो, पण ऐकिल्यावांचून माझ्यानें जाववत नाहीं.

असें ऐकून चिंतामणी ह्मणाला, बरें तर सांगतों ऐक. रामदासास चैन पडत नाहींसें झालें, ह्मणून त्यानें रुपयेही दिले, त्यामुळें त्यास आशा लागली कीं, आतां तरी आपला मनोरथ सिद्धीस जाईल. इकडे त्या स्त्रीनें ते रुपये आपल्या जारास नेऊन दिले आणि झालेली हकीकत सांगितली. नंतर दोघांनीं मिळून त्याचें सर्व द्रव्य हरविण्याची मसलत केली आणि राधा घरीं परत आली. दुसरे दिवशीं रामदास ह्मणाला, कसें काय घर विकत घेतलें कीं नाहीं? राधा ह्मणाली, आज बयाणा दिला आहे. चार पांच दिवशीं घर स्वाधीन झालें ह्मणजे ती घरांत राहण्यास जाईल. मग आपलें कार्य साधेल. मी त्या उपायांत आहेंच. तुह्मी अगदीं स्वस्थ असा.

आणखी चार पांच दिवस तसेच गेले. ते दिवस रामदासास वर्षा सारिखे वाटले, नंतर रामदासानें विचारिलें कीं, आतां तरी घरांत रहावयास गेली कीं नाहीं? राधा ह्मणाली, आजच गेली आहे. आपलें काम उद्यां होईल. मी आतांच तिकडे जाऊन आलें आणि उद्यांचा वराय केला आहे. तें ऐकून रामदासास आनंद वाटला. दुसरे दिवशीं रात्रीं तिनें आपले गड्यास

सांगून ठेविलें कीं, आजमी आणि रामदास बाहेर जाणार आहों, त्यावेळीं तूं आमचे मागोमाग गुप्त राहून बरींच लांब गेल्यावर आम्हांस रस्त्यांत गांठून ओळखून बोलकीं, राधाबाई तुह्मी एवढ्यारात्रीं कोठें जातां? आणि हा तुम्हांबरोबर कोण आहे? बरें कांहीं चिंता नाहीं. मीं तुमचें कृत्य जाणिलें आहे. पण हें तुम्हांस योग्य नाहीं. मी घरांत जाऊन शेटजींस सांगतों. असें तूं बोल. म्हणजे मी तुझ्या बरोबर परत येईन आणि तुला कांहीं पैसे देववीन. जाते वेळीं मी तुला सूचना करीनच.

इकडे रामदास वाट पाहतच होता. रात्रीं सुमारें अकरा वाजतां सर्व मनुष्यें निजल्यावर ही रामदासाचे दाराशीं गेली, तेव्हांतो आंत बोलावूं लागला. म्हणून बोलली कीं, छे छे, येथें उपयोग नाहीं. तो रामा गडी इतक्यांतच येईल आणि एखादी फजीती होईल. तर तिकडे माझे मैत्रिणीचे घरीं लवकर जाऊं म्हणजे झालें. असें रामदासास सांगतांच तो आपले दरवाज्यास कुलूप लावून तिच्या मागोमाग निघाला. इतक्यांत रामाही यांचे मागून हळू हळू गेला. दोघेंही बरींच दूर गेल्यावर एका एकीं रामानें गांठून घेतलें आणि त्यांस ओळखूनसंकेता प्रमाणें केलें. त्यामुळें राधेनें घाबरल्या सारिखें दाखविलें आणि घरीं परत निघाली रामदासतर खराच घाबरला. आणि राधेची विनंती करूं लागला कीं, कसेंही करून त्यागड्याची मर्जी संपादावी. नाहींतर फजीती होऊन कार्यनाशही होईल. त्यापेक्षां त्याला कांहीं तरी देऊं म्हणजे आतांच आपलें काम होईल. राधा म्हणाली, तो मेला द्वाड आहे, त्यामुळें त्याचें भयवाटतें. तो माझें ऐकणार नाहीं, पण आपण घरीं गेल्यावर त्याची विनवणी करून पाहीन. आतां येथें वाटेंत उभेंराहून उपयोग नाहीं, असें बोलून तिघेंही परत आलीं.

रामदासास रामाचें भय वाटलें होतें, त्यामुळें आणि तिच्यामनांत आणखीं पैसे काढावयाचे होते, म्हणून रामदासा जवळून आणखी पंचवीस

रुपये घेऊन, रामास देतें. असें त्यास सांगितलें. त्यांतील पांच रुपये रामास देऊन शिवाय जारास दिले. दुसऱ्या दिवशीं तिनें आणि जारानें मिळून असा विचार केला कीं, रामदासास बाहेर गांवीं घेऊन पळून जावयाची मसलत सांगावी, म्हणजे तो तसें करील. मग आपण त्यास वाटेंत फसवूं. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं राधा रामदासास म्हणाली कीं, शेटजी, काय करूं, तुमच्या करितां मी फार प्रयत्न करितें, तरी आपला कार्य भाग होत नाहीं. म्हणून आतां आपण पक्कीच युक्ति करूं म्हणजे तुम्ही आम्ही जन्मभर आनंदांत राहूं. रामदास म्हणाला, ती कशी काय युक्ति आहे? राधा म्हणाली आपण कोणास न कळतां परदेशीं निघून जाऊं, म्हणजे कोणाचें भयही नाहीं. नंतर तुम्हीं मला ठेवाल तशी मी राहीन. मला पोटभर अन्न आणि वस्त्र तुम्ही दिलें म्हणजे पुरे. आजपर्यंत माझ्या नवऱ्यानें मला फार त्रास दिला आहे आणि आपण वेश्येकडे पडून असतो. त्याला माझी गरज नाहीं आणि मी गेल्याबद्दल तो माझी चौकशी देखील करणार नाहीं. तर आतां हेंच मला बरें दिसतें. रामदासानें विचार केला कीं, आपण तर परदेशीं फिरणारे आहों, येथेंच राहून काय करावयाचें आहे, पण घर घेण्यास दिलेले रुपये घेतले पाहिजेत, म्हणून राधेस म्हणाला, मी तुला नेण्यास कबूल आहें, पण बाईस दिलेले रुपये कसे येतील? राधा म्हणाली, त्या रुपयांची काळजी तुम्हांस नको. येथून गेल्यावर तिला आपण पत्र पाठवूं म्हणजे ती पैसे पोंचते करून देईल. ती अशी लबाड नाहीं आणि माझा घात करणार नाहीं. हें पक्कें समजा. रामदास म्हणाला, बरें तर आतां कधीं जावयाचें? राधा म्हणाली, आज शनिवार आहे, आजपासून चार दिवशीं म्हणजे बुधवारीं पहांटेस आपण निघून जाऊं, म्हणजे झालें. रामदासानें नें कबूल केलें आणि आपली सर्व तयारी करूं लागला. भाड्याचे पैसे आणि चिटी त्यानें सोनाराचे स्वाधीन केली आणि मी घरीं जातों असें सांगितलें.

राधेनें आपले यारास सांगून त्यालाबरोबर घेऊन जाण्याची बुधवारची तयारी केली आणि मध्यरात्र उलटल्यावर संकेता प्रमाणें तिनें रामदासास खुणा केली आणि दोघेंही निघाली. मागें सोनाराचे घरीं बोभाट झालाच असेल, पण ती हकीकत मला कळली नाहीं. तीं दोघें निघून गेल्यावर तिचा यार बरोबर आलेला पाहून रामदास म्हणाला, हा कोण मागून येत आहे बरें? राधा म्हणाली, तो कोणी वाटसरू असेल. माझे ओळखीचा नाहीं. इतक्यांत तो जवळच आल्यावरून त्यास म्हणाली, तुम्ही कोण हो? कोठें जातां? यार म्हणाला, मी वाटसरू आहें. रात्रीं येथें वस्तीस उतरलों होतों. आतां दुसरे गांवीं जाणें आहे. चांदणी रात्र आहे म्हणून जशीं तुम्हीं जातां, तसाच मीही जातों. असें त्याचें भाषण ऐकून रामदास निर्भय झाला. पुढें गेल्यावर गांव सरून मोकळा रस्ता लागला, तेव्हां रात्र बरीच शिल्लक असल्यामुळें उजाडे पर्यंत तीं चार कोस जमीन चाललीं आणि एका खेडेगांवाजवळ आलीं तों तेथें कोणाचीच ओळख नसल्यामुळें त्यांस अगदीं निर्भय वाटलें. परंतु अद्यापि तो तिसरा मनुष्य बरोबर असल्यामुळें रामदासास संशय आला, म्हणून त्यानें त्यास विचारिलें कीं, तुम्हीं कोठें जातां? यार म्हणाला, मला लांब जाणें आहे, पण तुम्हीं कोठें जातां? इतक्यांत राधा म्हणाली, आम्ही मुंबईस जातों. यार म्हणाला, मग बरेंच आहे, मला देखील मुंबईसच जावयाचें आहे. तुमची आमची बरीच सोबत झाली. हें भाषण ऐकून रामदासास त्याचें भय वाटलें नाहीं. तशींच तीं तिघेंही बरोबर निघालीं. वाटेनें जातांना रामदास जलदीनें चालत असे आणि राधा हळू हळू चालत असे. त्यामुळें त्यास कोणताही बेत करण्यास नीट पडे. अशीं तीं तिघें सुमारें दहा कोस पर्यंत पायांनीं चालत गेलीं, इतक्यांत वाटेंत एके बाजूस एक विहीर दृष्टीस पडली. राधा म्हणाली, शेटजी, मला फार क्षुधा लागली आहे, म्हणून आपण या विहीरी जवळ उतरून जेवण करूं. रामदासास तें नीट वाटलें.

आणि तेथें उतरून त्यांनी सर्व तयारी केली आणि जेवण करून जेवलीं. तिनस्थान राधेनें आणि यारानें असा विचार केला कीं, त्याविहीरींत पाणी वरेंच दिसतें, रामदासास आंत लोटून देऊं म्हणजे आपलें काम झालें. असा बेत करून कांहीं वेळानें राधा येऊन त्या विहीरीचे कांठीं बसली आणि म्हणाली, शेटजी, जरा इकडे या, कांहीं बोलावयाचें आहे. तों रामदास विश्राम धरून तेथें बसला. नंतर राधेनें कांहीं गोष्टी काढिल्या त्यांचे विचारांत तो असतां यारानें एकाएकीं येऊन त्यास विहीरींत ढकलून दिलें. रामदासास पोहतां येत होतें म्हणून तो बुडला नाहीं. गचकळ्या खातां खातां विहीरींत हात धरून रहावया सारिखा दगड मिळाल्यामुळें त्यास धरून राहिला.

इकडे राधा आणि यार दोघेंही आपला बेत सिद्धीस गेलासें समजून आनंद पावलीं. आणि रामदासाचा सर्व ऐवज घेऊन पुढें निघून गेलीं त्यांचा पुढें मुळीच पत्ता लागला नाहीं. रामदास दुसरे दिवसा पर्यंत विहीरींतच जीव रक्षून होता. तेथें त्यास पूर्ण पश्चात्ताप झाला आणि आडमार्गाची विहीर असल्याकारणानें तिकडे कोणी न आल्यामुळें मरणोन्मुख झाला. पण दोन प्रहरीं दुसरे वाटसरू जेवण करण्यास तेथें आले त्यांचा शब्द ऐकून रामदासानें हाक मारिली. वाटसरांनीं त्यास पाहिल्यावर त्यानें सांगितलें कीं, बाबानो, मी विहीरींत काल पासून पडलों आहें. आधीं कृपाकरून मला वर काढा म्हणजे मी आपली सर्व हकीकत सांगेन आणि तुमचे उपकार जन्म भर विसरणार नाहीं. असें म्हणतांच त्या वाटसरांनीं जवळची दोरी आंत सोडिली तीस धरून तो वर येत असतां दोरी तुटून पुन्हा आंत पडल्यावर त्या वाटसरांनीं पागोट्यास बळकट पीळ घालून तें आंत सोडिलें आणि हळूच रामदासास वर काढिलें. बाहेर आल्यावर तो म्हणाला, मला चोरांनीं विहीरींत ढकलून दिलें आणि माझा सर्व माल नेला. आतां मी निराधार पडलों आहें. परंतु जर मला तुम्ही माझे घरीं पोहोंचवाल, तर तुम्हांस मी

शंभर रुपये देईन. तें ऐकून त्या वाटसरांस दया आली ह्मणून त्यांनीं आपले जवळचीं वस्त्रें त्यास दिलीं आणि घरीं आणून पोहोचविलें.

रामदासानें वचनाप्रमाणें वाटसरांस शंभर रुपये दिले. नंतर सरकारांत जाऊन कळविलें येथील कोतवालानें सातार्‍याचे कोतवालास कळवून चौकशीं करविली. परंतु तीं दोघेंही मिळालीं नाहींत. रामा गडी त्यांस मिळाफी ह्मता, त्याला धरून आणविलें आणि त्याला विचारिल्यावरून त्यानें खरी हकीकत सांगितली. त्याला कायद्या प्रमाणें शिक्षाकरून दोघांसही धरण्याविशीं जाहिरनामे लाविले; परंतु अद्यापि तीं सापडलीं नाहींत. रामदासास मात्र पक्की आठवण राहिली.

**चिंता०** - रत्नाकरा, आपलें तसें होणार नाहीं; कारण जें करणें तें विचारानें करीत आहों एकाएकीं रामदासा सारखा अविचार केला,तर मग फसायाला उशीर नको.

**रत्ना०** - आपण किती विचारी आहों बरें. मला तसें कर्तव्य असतें तर मी अद्यापि उगीच राहिलों नसतों. पण काय मूर्खपणा करावयाचा आहे. अरे, राधेसारिखी आम्हांस ती मारणार नाहीं. आणि तिचा तसा मत लवही नाहीं. पण अविचार केला तर जगांत हंसें होईल. यासाठीं तुझ्याजवळ आलों.तर आतां काय युक्ति करतोस बरें ?

**चिंता०** - अरे, आपणांस तिच्या घरीं जाऊन तर उपयोग नाहीं. १ कोठेंतरी निराळीच जागा पाहून तिला तेथें बोलाविलें पाहिजे. यासाठीं एक जागा माझे ध्यानांत आली आहे, पण उद्यां पाहूं. आतां संध्याकाळ झाली आहे. तूं घरीं जा. उद्यां लवकरच ये.

असें चिंतामणीचें भाषण ऐकून रत्नाकर आपले घरीं जाण्यास निघाला, परंतु ऐकिल्या गोष्टीचा विचार करीत चालला आहे, इतक्यांत दासी मार्गांत भेटली आणि म्हणाली, कसें काय ? रत्नाकर म्हणाला, मला

तर तिकडे येण्यास बनत नाहीं. आणि तिला आपले घरीं बोलवावें तर तेंही घडत नाहीं. या साठीं एकीकडे जागा पहावयाचा विचार केला आहे. ज्यां कायनें खचीन समजेल. असें त्यानें सांगितल्यावर दासी परत गेली आणि सत्यभामेस कळविलें इतक्यांत यमुना सकाळचे करारा प्रमाणें आली असे पाहून सत्यभामेस आनंद झाला.

**सत्य०** - यमुने, तूं आलीस म्हणजे माझे मनास आनंद होतो. आतां हें काम सांगितलें म्हणूनच नव्हे, पण पहिल्यापासून तुझी माझी किती प्रीति होती बरें? एक दिवस न भेटलीस, तर तो दिवस वर्षा सारिखा भासावयाचा. आणि आतां तर तुझ्या हातूनच माझे प्राण वांचणार आहेत, मग किती आनंद होईल बरें ?

**यमु०** - अगे, ज्याठिकाणीं खरें प्रेम असतें, त्या ठिकाणीं सर्व गोष्टी आहेत. परंतु सध्या तुझें प्रेम मैत्रिणी कडे नाहीं. दुसरी कडेच जडलें आहे.

**सत्य०** - असें बोलूं देखील नको. किती झालें म्हणून तुला विसरेन काय? बुडत असतां जसें हात देऊन वर काढावें तसें तूं करीत आहेस. तुझे उपकार जर मी विसरलें, तर परमेश्वराची केवढी अपराधी होईन बरें.

**यमु०** - परमेश्वराजवळ अपराधी होशील असें तुला वाटतें काय ?

**सत्य०** - होय, खराच अपराध केला, तर परमेश्वर शिक्षा करीलच.

**यमु०** - सत्यभामे, विचार करून बोल, नाहींतर उगाच फसशील. अगे तुजवर मी उपकार केले हें परमेश्वरास कसें कळेल बरें ?

**सत्य०** - अगे, तो सर्व जगांत भरलेला आहे, त्यास सर्व ज्ञान आहे म्हणून समजतें.

**यमु०** - बरें, आपण कोणास नकळून कांहीं तरी गोष्ट केली तर काय होतें?

**सत्य०** - ती देखील तो पाहतो आणि त्या प्रमाणें शासन करितो.

**यमु०**- असें नसेल. जर परमेश्वर शासन करितो, तरमग लोक भिऊ-
न कां वागत नाहींत. ?

**सत्य०**- ज्यांस परमेश्वराचे स्थितीचें ज्ञान नाहीं, ते भीत नाहींत. प-
ण आपणांस ज्ञान असून मग त्यास कसें विसरावें ?

**यमु०**- पहा, सत्यभामे, विचार करून बोल, नाहींतर पुन्हा उलटें पो-
लशील.

**सत्य०**- यांत उलटें कांहीं नाहीं. पण गडे, तूं इतकें खोंचून विचारितेस
याचें कारण काय बरें ?

**यमु०**- कारण दुसरें काय असणार. पण मला इतकें माहीत आहे कीं,
ज्यास कळत नसतें त्याचे हातून जर अपराध झाला तर परमेश्व-
र शिक्षा करीत नाहीं. आणि कळून जर अपराध करील तर त्यास
मोठें शासन करितो. यासाठीं तूं असा विचार कर कीं, तुला सर्व
कळत असून सध्याच डोळे झांकीत आहेस.

**सत्य०**- आतां मी समजलें, पण गडे काय करूं. तेथें माझा उपाय चा-
लत नाहीं. किती ही मन आवरलें तरी पुनः पुनः तेंच दिसतें. याचा
अपराध मजकडे नाहीं. परमेश्वरानें हा दुष्ट काम कां उत्पन्न केला
बरें? हा मुळींच नसता, तर असें कां झालें असतें. ?

**यमु०**- आतां तूं असें म्हणतेस तर माझा उपाय नाहीं परंतु थोडेथो-
डें मन आवरलें तर बळतें.

**सत्य०**- छे छे, माझें मन आवरत नाहीं. आतां त्या गोष्टी मला सांगूं न-
को. त्याची आठवण झाली म्हणजे मला कांहीं सुचत नाहींसें होतें.
बरें आतां पुढें काय विचार केला आहेस. ?

**यमु०**- तुझ्या मनास संतोष होईल तसें मला कर्तव्य आहे. तर प्रथम मी
तुला असें विचारितें कीं, त्याचें तुजवर प्रेम किती आहे, हें मला सांग बरें.

**सत्य०** - यमुने, असल्या गोष्टी मला विचारूनकाय करावयाचें आहे.? कांहीं तरी उपाय कर म्हणजे झालें.

**यमु०** - उपायतर करतेंच, पण प्रेम विचारलें, याचें कारण काय म्हणशील तर तुला याविषयीं एक गोष्ट सांगते ऐक.

पूर्वी सोलापूर शहरांत शंकरराव या नांवाचा एक कारकून राहत होता. त्यास असा छंद होता कीं, कोणी जरा रूपानें चांगली स्त्री पाहिली, म्हणजे तिजवर पाप दृष्टि ठेवावी, ती मिळण्याचा प्रयत्न करावा, कोणाची थट्टा मस्करी करीत असावें असें करीत असे. एके दिवशीं धोंडभट या नांवाचा ब्राम्हण आपल्या कुटुंबा सह शेजारीच नवीन राहण्यास आला होता. त्याची स्त्री सावित्री या नांवाची रूपानें अति सुंदर होती. तिला पाहून शंकर रावाचें सर्व लक्ष्य तिजकडे लागलें, पण तिजशीं एक शब्दही बोलण्याचा कधीं प्रसंगच येईना. म्हणून त्यानें मनांत विचार केला कीं,ही स्त्री सुंदर असून आपणांस लभ्य होत नाहीं, आणि खरोखर पाहिलें तर हिचा नवरा केवळ एखाद्या हेलकऱ्या सारिखा दिसतो तो तिला मन पासून आवडत नसेलच; त्यापेक्षां आपल्या सारिख्या फक्कडाशीं गांठ पडली, तर ती सहज वश होईल. पण काय करूं. आसपास मनुष्यें असतात आणि ती फारशी बाहेरही दिसत नाहीं. एक वेळ तिचें लक्ष्य लागलें, तर मग आपलें काम होईल, हें खचीत आहे. असो, वर्षाचे दिवस तीनशें साठ आहेत. कधीं तरी तसा प्रसंग आणीन, तरच मी फक्कड नांवाचा शंकर राव होईन. अशी प्रतिज्ञा मनांत करून राहिला. सावित्री संभावितांची कन्या होती, परंतु तिचा नवरा गरीब अवस्थेंत असून रूपानेंही साधारण होता, म्हणून तो तिचे मनास आवडत नसे. त्यामुळे तिचेही मनांत कांहीं कुकल्पना येत असत परंतु ती थोडीशी विचारवंत असल्यामुळे एकाएकीं त्या कृत्यास अनुसरली नव्हती आणि तशा वर्तणुकेच्या मनुष्याचा शेजारही

तिला कधींच मिळाला नव्हता.

शंकररावानें तर प्रतिज्ञाच केली होती, म्हणून त्यानें तिच्या नवऱ्याशीं मैत्री करण्याचा घाट घातला. तो असाकीं, एके दिवशीं धोंडभटजीस कांहीं निमित्तानें आपले घरीं भोजनास बोलाविलें आणि वरीच दक्षिणा दिली. त्यामुळें त्यांस शंकरराव चांगला मनुष्य आहे असें वाटलें. घरीं गेल्यावर बायको जवळ त्यांनीं त्याची स्तुति केली. ती म्हणाली, एखादा पुरुष असाच उदार असतो; पण अशाशीं स्नेह ठेवाल तर आपलें बरें होईल. तेव्हांपासून धोंडभटजींनीं त्याशीं स्नेह ठेविला. पुन्हा एके दिवशीं शंकररावानें त्या उभयतांस भोजनास बोलाविलें, म्हणून सावित्रीचेंही येणें झालें. त्या दिवशीं शंकररावाचें सर्व लक्ष्य तिजकडे लागलें होतें. व त्यानें आपल्या मना प्रमाणें तिच्याशीं बहुत शब्द बोलण्याचा प्रसंग आणिला. त्यांत आपणांशीं बोलण्यास ही लज्जा धरिते किंवा निर्भीड आहे ही परीक्षा केली. त्यावरून खचीत समजला कीं, हिचें चित्त मजकडे लागलें. आतां आपण हळू हळू उपाय करूं, असें मनांत आणून त्यानें भटजीस दक्षिणा दिली आणि सावित्रीचे हातांत एक उंची चोळी दिली. त्यावेळीं तिच्या हातास हात लागल्यामुळें आनंद झाला. नंतर त्यांस निरोप दिला, तेव्हां भटजी त्याची स्तुति करून घरीं गेले.

दुसरे दिवशीं धोंडभटजी घरांत नाहींत अशी संधि पाहून शंकरराव त्यांचे घरीं आला आणि धोंडभटजी कोठें आहेत म्हणून विचारिलें.

**सावित्री**- या, बसा, ते यजमानाकडे गेले आहेत. इतक्यांतच येतील.

**शंकरराव**- लवकरच येतील तर बसतों, नाहींतर जातों.

**सावि०** - आतांच येतील, पण कांहीं काम आहे का ?

**शंक०** - कामाशिवाय कोण येतो. आम्हांस क्षणभर देखील चाकरीमुळें फुरसत नाहीं. आज किती दिवस तुमचे घरीं क्षणभर यावयास पाहतों. आज वेळ सांपडला म्हणून आलों.

**सावि०** - बरें आहे. तुमच्या सारख्या सद्गृहस्थांनीं जर आमचा समाचार घेतला

नाहींतर कसें चालेल.

**शंक०** - वाहवा आमचे सारिखे किती पडले आहेत. आम्ही हे काय. याहून एखादे वेळीं तुमच्या सारिखीं रत्नें आमचे घरीं आलीं तर आमचें प्रारब्ध.

**सावि०** - छे छे, असें बोलूं नका बरें. आम्ही गरीब माणसें, तुम्ही थोर लोक, तुमचे आश्रयानें आम्ही असलों, तरच आमचा निर्वाह होणार आहे.

**शंक०** - बरें सगळ्या गोष्टी खऱ्या, पण भटजी अद्यापि येत नाहींत. आतां मी जातों.

**सावि०** - इतका वेळ बसलेत, तसेच जरा बसा म्हणजे गांठ पडेल.

**शंक०** - बसण्यास कांहीं चिंता नाहीं. (इकडे तिकडे कोणी नाहींसें पाहून) पण उगाच एखाद्याचे मनांत भलतेंच येईल. यासाठीं तुम्ही आम्ही दोघेंच बोलत बसून उपयोगी नाहीं.

**सावि०** - लोकांचे मनांत भलतेंच काय येणार, कोणी कामाशिवाय कोणाकडे जातनसतात आणि तुम्ही बसलांतर लोकांचें तरी काय गेलें ?

**शंक०** - हें तर खरेंच, पण अगोदरच माझें नांव पडलें आहे म्हणून भितों.

सावित्रीनें शंकररावाचे बोलण्यावरून जाणलें कीं, हा गृहस्थ खचीत चैनी दिसतो. सहज रीतीनें त्याची आपली ओळख झाली आहे आणि नवऱ्याचे मनांतही याविषयीं संशय येणार नाहीं; आतां आपले कांहीं मनोरथ सिद्धीस जातीलसें वाटतें. असें मनांत आणून म्हणाली, तुमचे मनांतला भाव मी समजलें. माझें ही मन तसेंच झालें आहे, पण लोकापवादाचें भय बाळगावें लागतें, यामुळें कांहीं चालत नाहीं. शंकरराव म्हणाला, अँः लोकाचें भय कशाचें आम्ही तसे आडाणी नाहीं. हुशारीनें वागलें म्हणजे झालें.

असें बोलत आहेत, इतक्यांत भटजी बाहेरून आले. दोघांचाही नमस्कार झाला. शंकरराव आपल्या घरीं आल्यामुळें भटजीस आनंद वाटला. त्यास पान सुपारी दिली. आणि कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी केल्या. शंकररावाचे मनांत आलें कीं, आपण अगोदर आलों होतों त्याचें कारण दाखविलें पाहिजे; नाहींतर एखादा संशय येईल. म्हणून बोलला. भटजी, मी तुमचे अगोदर जरासा आलों आणि चौकशी केली तों तुम्ही बाहेर गेलेले ऐकिलें, म्हणून जात होतों, इतक्यांत तुम्ही आलांत. बरें झालें. परवांचे दिवशीं आम्हांकडे कांहीं देवकार्य आहे, याकरितां आपण मेहूण यावें. पण आमचे घरांत कोणी बायका मनुष्यें नाहींत, हें आपणांस माहीतच आहे. जरा लवकर पाठवा म्हणजे पाहिजे तशी व्यवस्था करून घेतील. भटजी म्हणाले बरें आहे. तुमची बरीच आम्हांवर कृपा आहेसें आतां दिसतें. शंकरराव म्हणाला, अहो, आपण त्या जगांत राहून दुसरें काय करावयाचें आहे. १ जें द्रव्य सत्कारणीं लागेल तेंच उपयोगीं आहे, नाहींतर फुकट इकडे तिकडे खर्च केलातर तो काय उपयोगीं. आतां उशीर झाला आहे, मी जातों. परवां विसरूं नका हो. असें बोलून निघून गेला.

शंकररावास आपलें काम साधलें असें वाटून आनंद झाला. सावित्रीसही शंकरराया विषयीं उत्सुकता उत्पन्न झाली, त्यामुळें परस्पर विषय प्रीति जडली. तिसरे दिवशीं बोलाविल्या प्रमाणें भटजींनीं पहिल्यानें प्रातःकाळींच सावित्रीस स्वयंपाक करण्याकरितां पुढें पाठविलें. सावित्री आली असें पाहून शंकररावास मोठा आनंद झाला. घरांतील बहुतेक काम त्यानें आपल्या ब्राम्हणाकडूनच करविलें. आणि इकडे तिकडे तिचे बरोबर गोष्टी बोलत राहिला. उगाच निमित्त मात्र स्वयंपाकाचें केलें होतें. भटजी आल्यावर सर्वांचें भोजन झालें. दक्षिणा देऊन भटजीची रवानगी ही केली. सावित्री नवऱ्यास म्हणाली मी घरांतलें काम आटपून येतें. तुम्हीं

पुढें जावें. असें बोलून मागें राहिली. शंकररावाचा घरांतला ब्राम्हण त्यास वश होताच, त्यामुळे त्यावेळींच त्यांनीं आपले मनोरथ सिद्धीस नेले. उभयतांची प्रीति फारच जडली. पुढें दोघांनीही उत्कंठे मुळें संधी साधून एकमेकां कडे जात येत असावें असें चालविलें. बहुत दिवस त्यांचा तो क्रम चालला होता. तितक्या दिवसांत सावित्रीनें त्याजपासून बरेंच द्रव्य संपादन केलें सावित्रीस असें वाटलें कीं, आज पर्यंत आपण हालांनी दिवस काढिले; पण आतां परमेश्वरानें आपणांस आनंदाचे दिवस दाखविले आहेत. असें ती मूर्ख स्त्री मानीत होती. कांहीं दिवसांनीं शेजारीं पाजारीं बहुतेकांस तें कृत्य माहीत होऊन बराच बोभाट झाला. परंतु भटजीस मात्र कळलें नव्हतें.

इतक्यांत असें झालें कीं, शंकरराव एके दिवशीं सायंकाळीं बाहेर फिरावयास गेला असतां बाज़ारांत एक नवीन वेश्या आढळली तिजकडे वर पाहूं लागल्या वरून तिनें खुणा केली, त्यामुळें शंकरराव वर गेला आणि पान सुपारीचा वगैरे थाट झाल्यावर तो तिच्या नादीं लागला. ती वेश्या रूपानें सुंदर असून वयानें ही तरुणच होती. त्यामुळें शंकररावास नित्य तिजकडे जावेंसें वाटूं लागलें. तशांत पुरुषांस नादीं लावण्याचें चातुर्य त्यांचे आंगीं असतेंच. त्याप्रमाणें होऊन सावित्रीची त्यास आठवणही पडेनाशी झाली. त्या वेश्येनें शंकररावा पासून हळू हळू थोडयाच दिवसांत द्रव्य काढण्याची मसलत केली. व हा तिच्या पूर्ण नादीं लागला होता त्यामुळें जें जें तिनें मागावें तें तें त्यानें द्यावें, याप्रमाणें होऊन त्याचे जवळ अगदीं द्रव्य नाहींसें झालें.

इकडे सावित्रीस त्याची भेट बरेच दिवस न झाल्यामुळें अगदीं चैन पडत नाहींसें झालें. एखादे वेळीं गांठ पडून विचारिलें, तर त्यानें सांगावें कीं, काय करावें, माझे जिवास समाधान नाहींसें झालें आहे. असे कांहीं दिवस गेले, परंतु शंकररावाजवळ द्रव्य नाहींसें झालें असून वेश्येचे मागण्या प्रमाणें तर द्यावें लागे म्हणून त्यानें सावित्री पासून द्रव्य हिरून घ्यावें असा विचार केला.

एके दिवशीं भटजी घरांत नसतां तो सावित्री कडे जाऊन बसला. तिनें प्रकृतीचेंमान विचारिल्यावर त्यानें सांगितलें कीं, मला दुसरा कांहीं रोग नाहीं; पण चिंतारोग लागला आहे. त्यामुळें कांहीं सुचत नाहींसें झालें ह्मणून तुझाही विसर पडला. सावित्रीस तें ऐकून फार वाईट वाटलें आणि ह्मणाली, पहा, परमेश्वरानें आनंदाचे दिवस दाखविले होते, पण मेलें कर्म आड येतें. बरें, आपणांस कोणती चिंता आहे.? शंकरराव ह्मणाला, तुला सांगून काय उपयोग? ती तुझ्यानें दूर होण्यासारिखी नाहीं. सावित्री ह्मणाली, सांगा तर खरी, मग पाहूं. शंकरराव ह्मणाला, दुसरें कांहीं नाहीं, मी एकाचे कांहीं रुपये देणें आहेत तो अगदीं माझी अब्रू काढण्यास तयार झाला आहे. इतक्यांत त्याचे रुपये नदिले तर चाकरीची देखील पंचाईत होईल. मग फजीतीस पारावार नाहीं, अशी वेळ आली आहे. सावित्री ह्मणाली, बरें, पण इतकेंचना आज पर्यंत त्या करितांच इकडे येणें देखील सोडिलें होतें. पूर्वींच मला सांगितलें असतें तर बरें झालें असतें. असो, आतां तुम्हीं कांहीं चिंता करूं नका. मी त्यासाठीं आपला जीव्हीं खर्च करीन आणि तुम्हांस काळजींतून दूर करीन. पण रुपये तरी किती पाहिजेत तें सांगा ह्मणजे देतें. शंकरराव म्हणाला, दोनशें रुपये आतांच पाहिजेत. माझे लवकरच एका कडून यावयाचे आहेत, ते आल्यावर तुला देईन. सावित्रीनें तें ऐकिल्यावर विचार केला कीं, त्याजपासूनच आपणांस दीडशें रुपये मिळाले आहेत आणखी पन्नास रुपये पाहिजेत, तर वेळ निभावते. यासाठीं आपल्या गळ्यांतली बारा पुतळ्यांची माळ होती ती दिली तर घरांतही कळणार नाहीं; कारण ती सांठ्याची आहे. असा विचार करून तिनें लागलेच दीडशें रुपये आणि माळ त्याचे स्वाधीन करून ह्मणाली, हे घ्या. आणि आपलें काम करा पण चिंताग्रस्त राहूं नका. मला अगदीं चैन पडत नाहींसें झालें आहे आतां तरी नीट झालेंना? पण आतां मला विसरूं

नकाहो. नाहींतर ठकवा ह्मणजे झालें. शंकरराव ह्मणाला वाः, असें ह्मई लतरी? तुझ्या साठीं किती उपाय केले, तेव्हां गांठ पडली आणि आज तर खरोखर तूं माझी अब्रू संभाळलीस, त्यापक्षीं तुज सारिखी स्त्री कोणीच नसेल. बरें, मी जातों, उद्यां येईन, असें बोलून निघून गेला. त्यांतील कांहीं रुपये त्यानें वेश्येस दिले आणि तिकडेसच नादांत गुंतल्यामुळें त्यास पुनः सावित्रीची आठवण नाहींशी झाली. सावित्रीनें विचार केला कीं, हा अद्यापि येत नाहीं, त्यापक्षीं ठकविलेंसें वाटतें. बरेच दिवस गेल्यावर तिनें एके दिवशीं मुद्दाम त्याजकडे जाऊन विचारिलें कीं, रुपये आले असतील तर माझे मला द्यावे आणि पुतळ्यांची माळ ही द्यावी. मी भोळे पणानें दिली पण आपण मला फसवितांसें वाटतें. द्रव्य गेलें तर जाऊ, पण भेट देखील घडणें कठीण झालें आहे. तर काय विचार आहे तो सांगावा. असें ती तोंडून बोलतांच शंकरराव म्हणाला. माझे जवळ काय म्हणून पैसे मागतेस? मी तुला दिले ते परत घेतले. यांत तुझें काय गेलें? आतां उगाच नादीं लागशी लतर फजीती करून घेशील. त्यापेक्षां मुकाट्यानें आपले घरीं जा म्हणजे झालें.

हे त्याचे शब्द ऐकून अगदीं खिन्न होऊन घरीं आली आणि आपल्या कर्मास बोल लावून स्वस्थ राहिली. परंतु थोड्याच दिवसांत तिनें सर्व कृत्य नवऱ्यास कळून त्यानें तिचा त्याग केला. त्यामुळें तिची फजीती होऊन तोंड दाखविण्यासही जागा नाहीं असें झालें. ह्मणून परगांवीं जाऊन भिक्षा मागून निर्वाह करूं लागली. पुढें तिची काय अवस्था झाली, तें समजलें नाहीं.

**यमु०**— सत्यभामे, पहा, सावित्रीस शंकररावाचा नाद लागला, त्यावेळीं त्याचा स्वभाव कसा होता, या विषयीं तिनें विचार केला नाहीं. केवळ काम मोहित पणानें पाप कर्मास प्रवृत्त होऊन सर्वस्वास मुकली. याकरितां तुला सांगतें कीं, अगोदर व्यभिचार कर्म करणें हें मोठें पाप होय. ज्या स्त्रिया त्यापासून सुख मानीत असतील त्या मानोत, परंतु

त्या पापा बद्दल दुःख भोगल्या वांचून कधीं राहणार नाहींत. बरें कदाचित पुढील दुःखास न भितां व्यभिचार करितात तरज्या सुखा करितां व्यभिचार करावयाचा तें तरी बहुत दिवस प्राप्त होईल किंवा नाहीं याचा विचार करावा नंतर त्यास अनुसरावें. विचारा वांचून कोणती ही गोष्ट केली तर तिचा चमत्कारिक परिणाम होतो, म्हणून रत्नाकराचें प्रेम तुजवर किती आहे हें मी तुला विचारिलें.

**सत्य०** - यमुने, तूं म्हणतेस हें सर्व खरें आहे आणि आतां सांगितल्या गोष्टीवरून मी ही समजलें कीं, कित्येक पुरुष असे घातकी असतील. परंतु रत्नाकर तसा नव्हे. कां म्हणशील तर ऐक. जो दरिद्र दशेंत असून व्यभिचारी असतो, त्यास प्रिय स्त्रीचा ही घात करण्याची बुद्धि होते घात करण्यास कारण द्रव्या वांचून मला दुसरें कांहीं दिसत नाहीं. रत्नाकर श्रीमान आहे. म्हणून माझा घात कदापि तो करणार नाहीं.

**यमु०** - सत्यभामे, पुरुष द्रव्या करितांच केवळ घात करितात असें नाहीं. पहा, आतां सांगितल्या गोष्टीवरून समजली नाहींस? अगे, शंकररावास दुसरी वेश्या आवडली, त्यामुळें दरिद्री होऊन त्यानें सावित्रीचा त्याग केला. नाहींतर नुसत्या द्रव्या करितांच तसें झालें नसतें. कां खरें कीं नाहीं? तूंच विचार कर म्हणजे झालें.

**सत्य०** - बरें बाई, पुन्हा मजवरच आणिलेंस. पण तूं जरी किती ही सांगितलेंस तरी मी कबूल करणार नाहीं. रत्नाकराची ती भरज्वानी आणि सुंदर स्वरूप पाहून मला अगदीं चैन पडत नाहींसें झालें आहे. यावरून परमेश्वरानेंच त्याची माझी गांठ पडणें हा योग जमविला असेल असें वाटतें

**यमु०** - सत्यभामे, तूं तर कामानें अगदीं अंध झाली आहेस. त्यामुळें मीं सांगितलेल्या हिताच्या गोष्टी तुला आवडत नाहींत; पण अनुभव

आल्यावर माझ्या गोष्टीची आठवण येईल. मी परमेश्वराजवळ इतकेंच मागतें कीं, तुझीतशी दशा न व्हावी आणि दोघींचीं मैत्री सदोदित असावी.

**सत्य०** - एकूण तुझे मनांत मीं असेंच तळमळून मरावेंना ?

**यमु०** - अगे, मी असें म्हणत नाहीं आणि मी सांगितलें म्हणून काय तूं ऐकणार आहेस ? कदाचित् तूं ऐकशील, पण तुझ्या आंगांत संचारलेला जो दुष्ट मदन तो तुला ओढून नेईल.

**सत्य०** - होय बाई हेंच खरें. मी कांहीं करीत नाहीं दुष्ट मदनाचेंचहें सर्व कृत्य आहे. यांत माझा काय अपराध: तर आतां एक वेळ तरी प्रियकराची व माझी गांठ पडेल असें कर. त्या मेल्या कामाचें शांतवन झाल्यावर मी तुझें ऐकेन.

**यमु०** - बरें तर, आतां संध्याकाळ झाली आहे, मी घरीं जाऊन रात्रीं विचार करून उद्यां तुला कांहीं तरी युक्ति सांगेन. पण उतावीळ होऊं नको हो.

असें बोलून यमुना घरीं गेली. दुसरे दिवशीं सायंकाळीं सत्यभामेचे घरीं यावयाची ती आली नाहीं म्हणून कांहीं वेळ तिनें वाट पाहिली. नंतर अद्यापि कां येत नाहीं म्हणून सखूस तिचे शोधास पाठविलें. सखू जाऊन पाहते तों यमुना कडकडीत ज्वर येऊन पडली आहे, वैद्य येत जात आहेत, असें पाहिल्यामुळें तशीच घरीं जाऊन तिनें सत्यभामेस कळवितांच ती आपल्या बापाच्या आज्ञेनें दासीस बरोबर घेऊन यमुनेचे घरीं गेली एक मेकीस पाहतांच दोघींसही गहिंवर आला. सत्यभामेनें तिची अवस्था पाहिल्यावर त्या ज्वरांतून यमुना वांचत नाहीं, असें तिला वाटलें, म्हणून परमेश्वरा जवळ तिच्या आरोग्या विषयीं प्रार्थना करूं लागली. इतक्यांत यमुना म्हणाली, सत्यभामे, तूं माझी जिवलग मैत्रीण मला अंतरनेस असें वाटतें आणि मी आजारी पडल्यामुळें तुझ्या मनांतली इच्छा

पूर्ण होणें कठीण दिसतें; परंतु माझें शेवटचें सांगणें इतकेंच आहे कीं, मी वांचलें तर तुझें काम होईलच. कदाचित् मला विपरीत झालें, तर जें करणें तें विचारानें करीत जा म्हणजे झालें.

असें यमुनेचें भाषण ऐकून सत्यभामा म्हणाली, यमुने, मला तुज पेक्षां कांहीं अधिक नाहीं. तूं लवकर बरी हो म्हणजे मला सर्व मिळालें.

**यमु०**- अगे, जें सर्व घडणें तें परमेश्वराधीन आहे. तो जसें ठेवील तसें रहावें लागतें. त्याची मर्जीच तशी झाली असली तर कोण जाणे. पण मी आजारी आहे तों पर्यंत माझा समाचार घेतजा म्हणजे झालें

**सत्य०**-हें काय विचारावें? मला तुझ्याशिवाय क्षणभर देखील राहवणार नाहीं आणि तूं आजारी पडल्यावर मला चैन पडेल काय?

**यमु०**-हें तर खरेंच आहे. आतां माझ्यानें बोलवत नाहीं. तूं आतां घरीं जा, नाहींतर तुझा बाप रागें भरेल.

असें यमुनेचें भाषण ऐकून सत्यभामा कांहीं वेळ तेथें बसली आणि तिचा निरोप घेऊन घरीं आली.

इकडे रत्नाकर चिंतामणीचे घरीं नित्या प्रमाणें आला आणि म्हणतो.

**रत्ना०**-चिंतामणी, कसें काय आजतरी कांहीं युक्ति सुचली कीं नाहीं.?

**चिंता०**-तूं अगदींच उतावळा झाला आहेस. त्यामुळें मला देखील कांहीं सुचत नाहीं. अरे, हें काम उगाच नव्हे. उतावळी केली तर एखादी फजीती होईल. त्यासाठीं धीर धर म्हणजे कोणास नकळतां निर्भय पणानें तुझे मनोरथ सिद्धीस जातील.

**रत्ना०** - आतां माझ्यानें तर अगदीं धीर धरवत नाहीं. पहा, ती सखू दासी काल्च भेटली होती. तिनें विचारल्यावरून उद्यां कायतो बेत सांगेन असें मीं तिला सांगितलें आहे, म्हणून तिला आज आशा लागली असेल आणि इकडे तर कांहींच बेत नाहीं, त्यामुळें ती तरी काय म्हणेल.

आमच्या बोलण्याचा विश्वास नाहींसा झाला म्हणजे मग तिची प्राप्ति होणें ही कठीण दिसतें. त्यासाठीं कांहीं तरी युक्ति काढून आज तरी तिला कळविलें पाहिजे.

**चिंता०** - तिला आमचें बोलणें खोटें वाटणार नाहीं. दुर्घट कृत्य साधण्या करितां अनेक युक्ति कराव्या लागतात, त्यांत सर्व विचार उपयोगी प डतात असें नाहीं, हें तो जाणतच असेल. पण तुला मी एक गोष्ट विचारितों त्याचा राग तर नाहींना येणार.?

**रत्ना०** - राग कशाचा. कांय बोलतोस तें बोल पाहूं.

**चिंता०** - अरे, तूं मजकडे आलास आणि मी तुझें काम करितों म्हणून सांगितलें, त्याप्रमाणें मी करणारच. परंतु कदाचित् माझ्यानें होत नाहीं असें मीं सांगितलें असतें, तर तूं कोणाकडे गेला असतास.?

**रत्ना०** - वाहवा! हेंच कां बोलणें तें? अरे, तुझ्या ठिकाणीं माझा पूर्ण विश्वा स आहे म्हणून तुज जवळ आलों. इतकें असून तूं कबूल केलें नसतें- स, तर तुला मी त्रास दिला नसता. मग माझ्यानें जसा उपाय करवता, तसा केला असता. अथवा दुसरे एक दोन तुज सारिखेच माझे मित्र आहेत त्यांजकडे गेलों असतों.

**चिंता०** - ते मित्र कोण बरें?

**रत्ना०** - एक आपल्या वर्गांतील सदाशिव तुला माहीत आहेच आणि दु सरा तो कमळाकर जोशी याचा मुलगा नारायण हे दोघे ही म- चांगले मित्र आहेत. लहान पणा पासून आम्ही एके ठिकाणीं खेळ- लों आणि शिकलों. हल्लीं ही केव्हां केव्हां ते माझे घरीं मुद्दाम येत असतात. त्यांस कांहीं एखादा चमत्कार पहावयास जाणें असलें तर ते मज वांचून जात नाहींत आणि कोणत्या ही प्रसंगीं धीटपण वागून आपल्यावर बाजू न येऊं देतां निभावून येण्या सारिखेआं,

अशी माझी पक्की खात्री झाली आहे.

**चिंता०** - हेच कां तुझे पूर्ण मित्र ते ? मी त्यांस ओळखतों. वाहवा! बरीच तुला परमेश्वरानें इकडे यावयाची बुद्धि दिली; नाहींतर फुकट त्यांचे बुद्धीनें फसला असतास. रत्नाकरा, तुला काय सांगू. मतलबी आणि खेळगडी पुष्कळ असतात, परंतु ज्याचे संगतीनें आपलें कल्याण होईल आणि सद्गुण लागतील असा मित्र मिळणें फार कठीण आहे. यावरून तुला एक गोष्ट सांगावी असें माझे मनांत आहे पण तुला वाटेल कीं, हा अशा गोष्टी सांगून मात्र दिवस घालवितो. त्यासाठीं तुझी ऐकण्याची मर्जी असली तर सांगतों.

**रत्ना०** - अरे तूं जी गोष्ट सांगशील, ती ऐकून माझा कांहीं तरी फायदाच होईल. आणि कांहीं करमणूक होऊन माझा वेळ गेला, तर चित्तास जरासा तिकडचा विसर तरी पडेल. यासाठीं सांग पाहूं काय गोष्ट सांगतोस ती.

असें त्याचें भाषण ऐकून चिंतामणी सांगतो. पूर्वी कोल्हापुर शहरांत सूर्याजीपंत ह्मणून एक श्रीमान् गृहस्थ राहत होता, त्यास दोन पुत्र होते. एकाचें नांव विद्याधर आणि दुसऱ्याचें नांव प्रद्युम्न असें होतें. दोघांसही बापानें विद्याभ्यास करविण्या करितां गुरूचे स्वाधीन केलें. विद्याधर सर्वकाळ अभ्यासाकडे लक्ष्य लावून गुरुजी सांगतील त्याप्रमाणें वागत असे, ह्मणून लवकरच विद्वान् झाला. आणि प्रद्युम्न गुरुजींचें नऐकतां उनाड मुलांच्या संगतीनें वेळ व्यर्थ ..., ह्मणून तसाच राहिला.

सूर्याजीपंतानें आपल्या बरोबरीचे श्रीमंतांच्या कन्या पाहून त्यांची लग्नें केलीं. पुढें कांहीं दिवसांनीं सूर्याजीपंतास कांहीं रोग होऊन तो मरणोन्मुख झा... ह्मणून त्यानें आपले पुत्रांस जवळ बोलावून सांगितलें कीं, मुलांनो मी ...तां वांचेन असें दिसत नाहीं. माझ्या मागें तुम्ही दोघे एकमतें वागून आप... ...ंदा आणि लौकिक जसा आहे, तसाच राखाल तर पुढें तुम्हांस सुख

ही होईल. याकरितां प्रामाणिकपणानें वागत जा. कोणाच्या द्रव्याचा अपहार करूं नका. आपल्या जवळ बहुत द्रव्य आहे, याजवर खऱ्या रीतीनें धंदा करून जें सुख आहे तें अपहाराचे द्रव्यांत नाहीं. तसेंच तुम्ही आतां मोठे झालां. तुमच्या स्त्रियाही सुशील आणि कुलीन आहेत. त्यांचे योगानें तुमचा सर्व संसार चांगला चालेल. यासाठीं कधीं ही त्यांचा छळ करूं नका. कोणाशीं असत्य बोलूं नका. निर्दय पणानें वागूं नका. दुसऱ्यावर संकट असेल तर त्यास द्रव्यानें अथवा शरीरानें जितकी मदत होईल, तितकी करीत जा. परोपकारीं खर्च केलेलें द्रव्य कधीं ही व्यर्थ जाणार नाहीं. दुष्ट पुरुष अथवा दुष्ट स्त्रिया त्यांची बुद्धि ऐकूं नका आणि जे अविद्वान् असतील त्यांची मैत्री करूं नका. केली असतां आपला अपमान होतो. आपल्याहून विद्वान् असतील त्यांची संगत धरिली असतां त्यापासून ज्ञान प्राप्त होऊन सद्गुण लागतात. अरे, तुम्ही आतां तारुण्यांत आलां, यासाठीं सांगतों कीं, पुरुषाचे नाशास कारणें अनेक आहेत; त्यांत परस्त्रीचा नाद हें मुख्य कारण आहे. यासाठीं भिऊन वागा. एक वेळ तुम्हांस नाद लागला, तर तो सर्वस्वाचा नाश करील. म्हणून तसें न करितां आपल्या स्त्रियांवर प्रीति ठेवा. आणि परोपकार बुद्धीनें वागा म्हणजे तुमचें कल्याण होईल. सांगितलेल्या गोष्टी चांगल्या लक्ष्यांत ठेवा म्हणजे झालें.

असें बोलून त्यानें आपलें सर्व द्रव्य आणि देणें घेणें याचा हिशेब उघड पणानें त्यांस सांगून सर्व किल्ल्या विद्याधराचे स्वाधीन केल्या आणि बोलला कीं, विद्याधरा, तूं वडील पुत्र आहेस म्हणून किल्ल्या तुझे हातांत दिल्या. पण तुम्ही दोघेही मला सारखेच आहां बरें. असें बोलून कांहीं वेळ उगाच राहिला. इतक्यांत कफ वायूचे योगानें कंठ दाटून आला. पुढें बोलवेनासें झालें म्हणून जवळ वैद्यबुवा बसले होते. त्यांनीं मात्रा दिली परंतु कांहींच उपाय न चालतां त्रिदोष होऊन सूर्याजीपंत कैलासवासी झाले.

सूर्याजीपंताची स्त्री पूर्वींच मरण पावली होती त्यामुळें प्रपंचांत त्याचा

चांगला परिणाम घडला. बापाचें उत्तर कार्य आटोपल्यावर आपल्या जुन्या चाकरांस संभाळून दोघांनीही पूर्वी प्रमाणेंच धंदा चालविला. विद्याधर विद्वान् आणि सद्गुणी होता, त्यामुळें त्यानें आपले बापाचे आज्ञे प्रमाणेंच वर्तणूक चालविली. परंतु प्रद्युम्न अविद्वान् असल्यामुळें बापाचा उपदेश मनांत नठेवितां वाईट बुद्धीचे लोकांशीं मैत्री करूं लागला. त्यांस आपले सोबती बरोबर घेऊन ख्याली खुशाली करावी आणि कोठें जाणें झालें, तर तो त्यांस बरोबर घेऊन जात असे.

एके दिवशीं प्रद्युम्न व्यापाराचे कामा करितां बरोबर कांहीं द्रव्य घेऊन मलकापुरास जाण्यास निघाला तेव्हां त्यानें आपला एक हरि नांवाचा जिवलग मित्र बरोबर घेतला. दोघेही शहरांत जाऊन पोहोंचल्यावर उतरण्याचा विचार करूं लागले.

**प्रद्युम्न**- आपण प्रथमच या गांवीं आलों. येथें कोणाशीं आपली ओळख नाहीं. तर आपण आतां पहिल्यानें कोठें उतरावें बरें. ?

**हरि** - आपल्या जवळ द्रव्य आहे. याकरितां आपण कोणाचे ही घरीं उतरूं नये. स्वतांकरीतां भाड्याचें घर घेऊन तेथें उतरूं. मग आपल्यास ज्या वस्तू पाहिजेत त्या भाड्यानें अथवा विकत आणूं म्हणजे झालें.

**प्रद्यु०**- असें उपयोगी नाहीं. आपण व्यापारी आहों. उगाच खर्च ज्यास्त करूं नये. युक्तीनें काम केलें पाहिजे.

**हरि** - अरे, तूं म्हणतोस तें खरें. पण परदेशांत आलें म्हणजे पैशाकडे पाहून उपयोगीं नाहीं. आपला जीव रक्षण केला पाहिजे. येथें कोणत्याहीगोष्टीचे हाल करूं नयेत आणि तुला प्रवासाचा अनुभव नाहीं, म्हणून मी सांगेन तें ऐकत जा. म्हणजे तुला सुख होऊन सर्व काम होईल.

**प्रद्यु०** - तुला बरोबर आणिला त्याचें कारण हेंच आहे. तुझ्याच -

बुद्धीनें वागावयाचें; पण कोणतीही गोष्ट विचार करून केली पाहिजे.

**हरि** - प्रद्युम्ना, तुझे मनांत कोठें उतरावयाचें आहे तें सांग.

**प्रद्यु०** - माझे मनांत एखाद्या चांगल्या व्यापाऱ्याकडे उतरावें म्हणजे तो आपली सर्व सुश्रूषा ठेवील. आणि आपण त्याचे मता प्रमाणें चाललों म्हणजे आपला व्यापार ही नीट होईल.

**हरि** - हें माझे मनास येत नाहीं, कां म्हणशील तर आपण त्याचे घरीं उतरलों म्हणजे त्याचे कायद्यांत वागावें लागेल आणि आपण दुसऱ्याचे घरीं उगाच ओशाळपणानें रहावें हें नीट नाहीं. आपणास भलतेच वेळीं कामा करितां जावें लागलें, तर तें घडणार नाहीं. अरे स्वतंत्रपणांत जशी मौज आहे तशी परतंत्रपणांत नाहीं. म्हणून मीं सांगितलें हेंच बरें आहे.

**प्रद्यु०** - बरें तर. तूं म्हणतोस तसेंच करूं.

असा विचार करून ते गांवांत पुढें जाऊं लागले. इतक्यांत एक गृहस्थ भेटला, त्यास विचारूं लागले कीं, महाराज आम्हांस एक भाड्याचें घर पाहिजे. कोठें बरें सापडेल? तो गृहस्थ म्हणाला, त्या गांवीं भाड्याचें घर मिळत नाहीं. पण कोणी तरी द्रव्याच्या आशेनें आपल्या घराचा थोडासा भाग रिकामा करून तुम्हांस देईल तर. तुह्मी आतां असें करा कीं, येथून पुढें जवळच विठोबाचें मोठें देवळ आहे, त्याच्या समोरच हिरवा रंग लावलेलें मजल्याचें घर आहे, तेथें विचारा. बहुत करून ती जागा तुह्मांस मिळेल. असें सांगून तो गृहस्थ चालता झाला. त्याचे सांगण्या प्रमाणें दोघेही त्या घराजवळ आले आणि रस्त्यांतून पाहिलें तों त्यांचे मनास ती जागा आवडली; म्हणून त्यांनीं दरवाज्यांत जाऊन, घरांत कोण आहे हो; म्हणून मोठ्यानें विचारिलें. तों एक सुमारें वीस वर्षांचे वयाची स्त्री पुढें येऊन बोलूं लागली. तिचें नांव मथुरा असें होतें.

मथुरा- तुम्हीं कोठील कोण आहां आणि कोणास विचारिलां ?

हरि- आम्ही परगांवचे व्यापारी गृहस्थ आहों. आम्हांस राहण्यास कांहीं दिवस जागा भाड्यानें पाहिजे आहे. एक गृहस्थ मार्गांत भेटला, त्यानें येथें जागा मिळेल असें सांगितल्यावरून आलों आहों, तर कसें काय तें सांगा.

मथु०- येथें भाडयानें देण्या सारिखी जागा नाहीं. पण तुम्ही चांगले गृहस्थ दिसतां म्हणून तुम्हांस जागा मिळेल असें वाटतें. जरासे बसा ह्याचटईवर. माझ्या सासूबाई बाहेर गेल्या आहेत त्या आल्या म्हणजे तुम्हांस जबाब मिळेल.

असें तिचें भाषण ऐकून दोघेही चटईवर बसले आणि ती स्त्री घरांत गेली. इतक्यांत मित्र प्रद्युम्नास म्हणतो, अरे, येथें चांगलीं मनुष्यें आहेत. जर परमेश्वर कृपेनें हीच जागा मिळेल तर बरें होईल असें बोलत आहेत इतक्यांत सासू बाहेरून आली आणि म्हणते.

सासू- तुम्ही कोठचे कोण आहां आणि कां आलांत ?

हरि- आम्हीं बाहेर गांवचे व्यापारी आहों. येथें व्यापाराकरितां कांहीं दिवस राहणें आहे. जर तुम्हीं आपल्या घरांत आम्हांस जागा द्याल, तर फारच बरें होईल. आम्हीं तुमचे उपकार विसरणार नाहीं.

सासू- तुम्हीं रहावयास जागा मागतां खरी, पण आम्हीं घरांत दोघीजणीच असतों. आमचे घरांत कोणी पुरुष नाहींत. सर्व बाहेर धंद्यावर गेलेले आहेत, यामुळें आमच्यानें तुम्हांस रहा म्हणवत नाहीं.

हरि- बाई, आम्हीं लबाड लुच्चे मनुष्य नाहीं. संभावित व्यापारी आहों. घरांत कोणी पुरुष नसले तरी आम्हीं तुमचे मुलां प्रमाणेंच आहों, असें समजून राहण्यास जागा द्याल, तर फारच उपकार होतील. आणि तुमचाही कांहीं फायदाच होईल.

**सासू** - बरें तर, तुम्हीं मुलां प्रमाणेंच म्हणतां, त्यापक्षीं जागा देतें, (असें बोलून त्यांस माळ्यावरची जागा दाखवून म्हणाली.) यांत तुम्हीं निर्वाह करावा. पण दरमाहा भाडें काय द्याल तें बोला. भाडें ठरलें म्हणजे आम्हीं आमचें सामान खालीं नेऊन ठेवूं.

**हरि** - बाई, भाडें काय विचारितां? आम्हीं तुमचे मर्जी बाहेर नाहीं. जाते वेळीं तुम्हांस खुषी करून जाऊं. आम्हांस फार दिवस रहावयाचें नाहीं. सुमारें दोन महिने राहूं आणि तुम्हीं आम्हांस मुलां प्रमाणें समजलां त्या पक्षीं आम्हीही मातोश्रीच्याच नात्यानें तुम्हांजवळ वागून तुमचे मनाप्रमाणें देऊं म्हणजे झालें. ठराव करण्यांत काय अधिक आहे? पाहिजे तर बापडा ठराव करा.

इतकें भाषण होत आहे, तों सून खालीं होती तीही वर येऊन जिन्यांत उभी राहून ऐकत होती. तिला पाहून हरि सासूबाईस म्हणाला, तुम्ही काय घेणार तेंच प्रथम सांगा पाहूं.

**सासू** - तुम्ही आम्हांस दरमहा चार रुपये द्यावे म्हणजे झालें.

**हरि** - चार रुपयेचना, अँ: अहो तुम्हीं ठराव करितां म्हणून, नाहीं तर आम्ही तुम्हांस खुष करून जाणार आहों.

**सासू** - अहो, सगळ्या गोष्टी खऱ्या. पण ठराव असला, म्हणजे पुढें मागें कोणाचें बोलणें नाहीं. हिशेबानें चोख असावें तें बरें.

**हरि** - बरें बाई, तुम्हीं म्हणतां तसेंच करूं.

**सासू** - बरें तर आम्हीं आपलें सामान आतां खालीं नेऊन ठेवितों. तुम्हीं सुखरूप वागा. तुम्हांस जाण्यायेण्यास जिन्याचा दरवाजा उघडून देतें म्हणजे झालें.

असें बोलून तिनें आपलें सर्व सामान खालीं नेऊन ठेविलें आणि जिना मोकळा करून दिला. दोघेही तेथें राहिले. पण आतां भांडीं पाहिजेत

त्यांचा विचार काय करावा म्हणून चिंता करीत आहेत. इतक्यांत हरि म्हणाला, आपण आतां क्षुधेनें पीडित आहों. अगोदर बाईजवळचीं भांडीं घेऊन स्वयंपाक करूं म्हणजे झालें. असा विचार करून त्यांनीं बाईजवळून भांडीं आणून स्वतः बाजारांतून सर्व सामान आणून स्वयंपाक करून भोजन केलें. सर्व काम आटो पल्यावर बाहेर फिरावयास जाण्यास निघाले. प्रद्युम्नानें आपलें सर्व द्रव्य कमरेस बांधिलें आणि बाहेर गेला. बाजारांत गेल्यावर त्यास अनेक जिनसा आढळल्या, त्यांचे दरदाम विचारितां ते आपल्या व्यापारास पुरवत नाहींत, असें वाटल्यावर ते तसेच परत आले. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं त्यांनीं भांडीं आणि सर्व सामान विकत आणून बाईचीं भांडीं परत दिलीं. याप्रमाणें बिऱ्हाडाची सर्व व्यवस्था केली.

प्रद्युम्न व्यापाराच्या उद्देशानें आला होता. परंतु त्यास पुरवण्याजोगा जिन्नस कांहींच आढळेना, म्हणून कांहीं खरेदी न करितां नित्य तसाच माघारा येत असे. असे कित्येक दिवस लोटले. त्यामुळें त्यास चैन पडेनासें झालें आणि तो सर्व काळ चिंताग्रस्त असे. मित्र खुशालचेंडू होता. त्यास त्याचें कांहींच दुःख नव्हतें. इकडे तिकडे फिरावें, मनास वाटेल तसें वागावें. असें तो करूं लागला, आणि थोडक्यांच दिवसांत त्यानें घरांतील बाईचे सुनेशीं थट्टा मस्करीचें भाषण करण्याचा पाठ ठेविला.

एके दिवशीं तिची सासू कांहीं कामाकरितां परगांवीं गेली होती, अशा संधींत तो प्रद्युम्ना बरोबर बाजारांत न जातां डोकें दुखण्याचें निमित्त करून बिऱ्हाडींच राहिला आणि आतां संधी बरी आहे, असें पाहून सुनेशीं भाषण करूं लागला.

**हरि**- कायहो, आज सासुबाई कोठें गेल्या ?

**मधु०**- सासूबाई येथून दोन कोशांवर करवंडी म्हणून गांव आहे, तेथें कांहीं कामास गेल्या आहेत. त्या उद्यां घरीं येतील.

हरि - आजतर नाहींना येत. मग आपलेंच राज्य आहे.

मथु० - आज कसच्या येतात. पण आज तुम्हीं बाहेर कां गेला नाहीं. ?

हरि - मी सहज गेलों नाहीं. पण आज काय संधी आली असेलती अ-सो. रोज तुम्हांला त्या सासूबाईचा धाक असतो. आम्हांस तुमचे जवळ एक शब्दही बोलण्यास भय वाटतें. आज तें भय अगदीं नाहीं. आणि आमचे सोबती जरासे चमत्कारिक आहेत, तेही घरांत नाहींत अशी संधी आज फार दिवसांनीं आली आहे. तर आतां आपली कशीकाय मर्जी आहे.

ती मनांत समजली आणि तिलाही तसेंच कर्तव्य होतें, पण पहिल्यानें एकाएकीं, कबूल होऊंनये असें मनांत आणून त्यास म्हणाली.

मथु० - मर्जी कशाची आणि तुम्हीं काय म्हणतां, हें मी कांहींच समजलें नाहीं. तुमचा कांहींसा निराळाच भाव दिसत आहे. पणमी तशी नाहीं हो. उगाच कोणाचें मन ओळखल्या शिवाय असें बोलूंनये. तुम्हांस पाहिजे, तर बाजार मोकळा आहे, तेथें जाऊन कां मरांना. खबरदार पुन्हा अशी गोष्ट बोलाल तर, माझे कामीं पडणार नाहीं.

असें तिचें भाषण ऐकून हरि हिरमुसल्या सारखा झाला आणि कांहींच नबोलतां उगाच वर निघूनगेला.

रत्नाकरा, ज्या स्त्रिया व्यभिचारिणी असतात, त्या प्रथम असाच निःस्पृहपणा दाखवितात. परंतु मनांतला मतलब निराळाच असतो. प्रद्युम्नाचे मित्रास तिच्या शब्दांचें भय वाटून तो फार खिन्न झाला. सायंकाळीं प्रद्युम्न घरीं आला, त्यानें त्यास विचारिलें, आज तूं चिंताक्रांत कां दिसतोस. ? हरि म्हणाला, माझें डोकें फार दुखत होतें, त्यामुळें असें झालें आहे, पण आतां बरें आहे. असें बोलून त्याची समजूत केली. नंतर रात्रीं भोजन झाल्यावर ते कांहीं गोष्टी सांगत बसले होते. मथुरेनें विचार केलाकीं, आपण हरीस

शब्दांनीं ताडन केल्यामुळें तो खिन्न होऊन खालीं देखील आला नाहीं. या करितां आपण वर जाऊन पहावें. असें मनांत आणून वर गेली आणि ह्म णाली, आज सासूबाई घरांत नाहींत, यामुळें मला भय वाटतें, म्हणून वर आलें. पण आतां तुम्हां दोघांतून कोणी तरी एक जण माझे सोबती क रितां खालीं निजावयास याल, तर बरें होईल. असें बोलून हरीस डोळ्यानें खुणाविलें, त्यावरून तो समजला. नंतर दोघांनीं विचार केला. त्यांत हरीचे मनाचा कल दिसल्या वरून प्रद्युम्नानें त्यासच खालीं निजावयास पाठविलें.

हरि खालीं आल्यावर कांहीं वेळ तिनें त्याच्याशीं गोष्टी सांगून वेळ घा लविला. नंतर हळूच दुपारची गोष्ट काढिली आणि बोलल्या बद्दलचा राग ध रूं नये म्हणून विनंती केली, त्यावरून तो म्हणाला स्त्रियांचें मन कोणाच्यानें ओळखवत नाहीं, वत्या कोणत्या वेळीं काय बोलतील आणि काय करतील याचा नेम नाहीं. असें त्याचें भाषण ऐकून मथुरा ह्मणाली, पुरुष देखील असे असतात कीं, एखादे वेळीं मनांत लहर आली, म्हणजे मात्र आपण दुसऱ्या चे अंकित होऊन विश्वास देऊन कार्य भाग करून घेतात आणि काम झा लें, ह्मणजे तिकडे ढुंकून देखील पाहत नाहींत. याकरितां जें करणें तें विचारानें केलें पाहिजे. हरि ह्मणाला, बरें, आतां जें झालें तें झालें. पुढें काय कर्तव्य आहे.? मथुरा म्हणाली, परमेश्वरानें आज तुम्हांस असें रत्न प्राप्त होण्याचा योग आणिला आहे, त्याचा उपभोग घ्या म्हणजे झालें.

असें बोलून, गळीं पडली. नंतर अवघी रात्र उभयतांनीं यथेच्छ - क्रीडा केली. दुसरे दिवशीं ही सासू आली नाहीं. त्यामुळें तीही रात्र त्यांनीं आनंदांत घालविली. परंतु त्यांचें तें कृत्य प्रद्युम्न साधा गृहस्थ असल्यामु- ळें त्याचे लक्ष्यांत आलें नाहीं.

तिसरे दिवशीं सासू घरीं आली. नंतर जेव्हां जेव्हां संधी साधे ते- व्हां तेव्हां त्या उभयतांचा समागम घडत असे. असे कांहीं दिवस लोटले.

एक मेकांवर अत्यंत प्रीति जडली, त्यामुळें एकमेकांस पाहिल्यावांचून घटकाभर देखील चैन पडेनासें झालें.

एके दिवशीं असा प्रसंग घडला कीं, मथुरेनें शेजारणीचे दहा रुपये उसनें घेतले होते, ती आपले सासरीं जाऊं लागली, त्यावेळीं मागावयास आली आणि हिचेजवळतर एक पैसाही नव्हता. तेव्हां हिनें विचार केला कीं, आपण हरीपाशीं मागितले असतां खचीत मिळतील म्हणून त्याची एकांतीं गांठ घेऊन त्याज पाशीं दहा रुपये मागितल्यावरून त्यानें देतों असें सांगितलें; परंतु त्याचे जवळ ही नसल्यामुळें तो चिंताक्रांत झाला. आणि मनांत ह्मणाला कीं, आपण हिला रुपये न दिले, तर आजपर्यंत जोडलेली मैत्री फुकट जाईल आणि आपली ही फजीती होईल. त्यापक्षीं कसेंही करून दिलेच पाहिजेत. प्रद्युम्नाजवळ मागावे, तरत्यास सांगण्या सारिखें योग्य कारण कांहीं नाहीं. म्हणून मागून ही उपयोग नाहीं त्या अर्थी त्याचे खिशांतून नकळत घेऊन द्यावे, म्हणजे झालें. मग काय होईल तें होवो. असा निश्चय करून त्यानें त्याच रात्रीं प्रद्युम्नाचे खिशांतले दहा रुपये चोरून घेतले आणि हळूच मथुरेचे स्वाधीन केले. ते घेऊन तिनें आपल्या मैत्रिणीस दिले. दुसरे दिवशीं प्रद्युम्नानें खिशांतले रुपये मोजले, त्यावेळीं दहा रुपये कमी आल्या वरून त्यानें हरीस विचारिलें. तेव्हां तो ह्मणाला कीं, येथें दोघांवाचून तिसरें तर कोणी आलें नाहीं. त्यापक्षीं बाजारांतच कोणी काढून घेतले असावे. असें त्याचें भाषण ऐकून प्रद्युम्नानें ही नसंच मानिलें आणि पुढें सावधपणानें वागूं लागला.

पुढें कांहीं दिवस गेल्यावर मथुरेनें विचार केला कीं, हे दोघे ही श्रीमान आहेत आणि आपण गरीब आहों याकरितां यांजपासून कांहीं द्रव्य युक्तीनें मागून घ्यावें. असें मनांत आणून एके दिवशीं हरीस ह्मणाली, अहो, तुमची माझी बरेच दिवस संगत घडली. तुह्मी श्रीमान् आणि मी

गरीब, पोटभर अन्नही मिळणें कठीण अशा अवस्थेंत आहें, हें तुह्मांस बरें वाटतें काय? हरि ह्मणाला, हें तर खरेंच आहे कीं, जसा आमचा जीव तसाच तुझा जीव आहे. दोघांसही सारखेंच सुख असावें. पण आम्ही परदेशीं आलों आहों, या करितां कोणतीही गोष्ट मला सत्तेनें करवत नाहीं आणि सध्या मजजवळ पैसेही नाहींत. प्रद्युम्न माझा भागीदार आहे, त्याजपाशीं पैसे आहेत, परंतु तो फारच चिकू आहे. एक कवडी खर्च करणें झालीतर त्यास कठीण वाटतें. यासाठीं मी घरीं जाऊन आल्यावर तुला संतुष्ट करीन. असें त्याचें भाषण ऐकून ती मनांत समजली कीं, हा भागीदार ह्मणवितो आणि त्या पाशीं द्रव्यतर मुळींच नाहीं, त्यापक्षीं हा उगाच कोणीतरी खुशालचेंडू मित्र असेल. आणि त्या दिवशीं यानें जे रुपये मला दिले, ते प्रद्युम्नाचे खिशांतले चोरीस गेलेले तेच असतील, यांत संशय नाहीं. तर असल्या भिकारी पुरुषाची संगत काय उपयोगी? म्हणून आतां प्रद्युम्नास वश केलें पाहिजे. त्यास त्याचें साह्य असलें, तर तो लवकरच साध्य होईल. असें मनांत आणून ती पुन्हा हरीस ह्मणाली, अहो, तुम्हां जवळतर द्रव्य नाहीं ह्मणतां, यासाठीं प्रद्युम्नाचीव माझी मैत्री होईल असें करालतर, त्याजपासून मी द्रव्य प्राप्त करून आपलें दरिद्र घालवीन. यासाठीं तुह्मी मदत केली पाहिजे, हरि ह्मणाला, बरें आहे. मजकडून नानाहीं. पण तो मोठा चिकट आणि निर्व्यसनी आहे, ह्मणून तो साध्य होणें फार कठीण आहे. ती ह्मणाली, अहो, त्या जगांत स्त्रीच्या नेत्र कटाक्षाचे झपाट्यांत सांपडणार नाहीं असा पुरुषच मिळणार नाहीं. मग त्याची कथा काय? थोडा अवकाश मात्र लागेल. हरि म्हणाला, बरें तर, मी त्यास नादीं लावितों आणि तूंही थोडी थोडी तजवीज करीतजा.

असा त्यांचा बेत झाल्यानंतर एके दिवशीं त्या गांवीं एक तमाशा आला होता, त्याची बातमी हरीस कळल्यावरून त्यानें विचार केला कीं, आज बहुत

दिवस आपणांस तमाशा पहावयास मिळाला नाहीं. त्याअर्थी आज प्रद्युम्नासही बरोबर घेऊन जावें. म्हणून म्हणाला, कां प्रद्युम्ना, आज एक उंचा तमाशा आला आहे, रात्रीं बाजारांत जामदाराचे मंडपांत व्हावयाचा आहे.आपण रात्रीं पाहण्यास जाऊं. प्रद्युम्न म्हणाला, जावयाचें खरें,पण आपण परगांवीं आलों आहों. याठिकाणीं जरा विचारानें वागलें पाहिजे. तमाशांत फारकरून लुच्चे लोक येत असतात, त्यामुळें तेथें तंटे मारामाऱ्या होत असतात. म्हणून आपण न जावें हें बरें. हरि म्हणाला, आपण एकीकडे उभे राहून पाहूं म्हणजे झालें. कदाचित् तंट्याचा प्रसंग आलाच, तर आपण कमी आहों कीं काय? माझा स्वभाव तुला माहीतच आहे. त्या लुच्च्या लंफग्यांनीं आपलें काय करावयाचें आहे? अँः तूं अगदीं भिऊनकोहरीचा आग्रह पाहून प्रद्युम्नानें होय म्हटलें. ते रात्रीं नऊ वाजतां जामदाराचे मंडपांत तमाशा पहावयास गेले, तों अगोदरच तमाशा सुरू झाला होता. त्यामुळें लोकांची गर्दी होऊन त्यांस जागा मिळेनाशी झाली. म्हणून ते एका भिंताडाचे वळचणीस दोघेही उभे राहिले. तमाशा चांगला होता, त्यामुळें दोघांचेंही चित्त अगदीं गढून गेलें. आपण अडचणीचे जाग्यांत उभे आहों, हें भान देखील राहिलें नाहीं. शेवटीं पहांटे चार वाजतां तमाशा आटोपल्यावर घरीं आले. नंतर झोंप लागे पर्यंत त्या तमाशांतील चांगल्या चांगल्या लावण्या, पोऱ्याचे हाव भाव आणि सोंगाच्या नकला इत्यादिकांची एकमेकांशीं त्यांनीं तारीफ केली. जागरण झाल्यामुळें सकाळीं दहा वाजत पर्यंत झोंप घेतली. नंतर जागृत होऊन नित्यकर्म आटोपल्यावरही रात्रीचा तमाशा त्यांचे मनांत वारंवार येऊं लागला. इतक्यांत पुन्हा त्या दिवशींही तमाशा असल्याची बातमी लागल्यावरून त्या रात्रींही पहावयास गेले., त्यानंतर ज्याज्या वेळीं तमाशा असे,त्यात्यावेळीं ते पहावयास जात असत. प्रद्युम्नास घर सोडून बरेच

दिवस झाले होते, त्यामुळें आणि तमाशांतील पोऱ्याचे हावभाव पाहून व लावण्या ऐकून त्याचें चित्त थोडेसें काम मोहित झालें. हें हरीनें जाणिलें आणि ह्मणाला, प्रद्युम्ना, तमाशा गांवांतून गेल्यामुळें आपणांस अगदीं चैन पडत नाहींसें झालें आहे. रात्रीं झोंप देखील येत नाहीं. तुला कसें वाटतें? प्रद्युम्न ह्मणाला, माझा ही वेळ जात नाहीं. आपला व्यापार तर अद्यापि कांहींच साधत नाहीं. याकरितां आतां किती दिवस वाट पहावी? एक वेळ घरीं जाऊन येऊं. मित्र ह्मणाला, अरे, आपण व्यापाराकरितां आलों असून वेड्यासारखे रिकाम्या हातानें परत घरीं गेलों, तर लोक तरी काय ह्मण तील? आणखी थोडे दिवस राहून पाहूं. इतक्यांत कांहीं तरी सोयीचा माल मिळेल तर तो घेऊन जाऊं. प्रद्युम्नानें मित्राचें भाषण ऐकून आणखी थोडे दिवस राहण्याचा बेत केला. परंतु घराकडची आठवण झाल्यामुळें तर त्यास अगदींच चैन पडेनासें झालें.

मित्रानें विचार केला कीं, त्यास आतां बरेंच वेड लागलें आहे. तर इतक्या संधींत आपला मतलब साधावा ह्मणजे झालें. त्याकरितां त्यानें युक्तीनें त्याच दिवशीं संधी साधून मथुरेस सुचविलें कीं, प्रद्युम्नास मीं बराच तयार केला आहे. इतक्यांत तुजकडून थोडासा प्रयत्न झाला, तर आपलें सर्व कार्य होईल. असें भाषण ऐकून त्या वेळेपासून तिनें हळूहळू प्रद्युम्नाचे समोर उभें रहावें, त्याजकडे पाहून हंसावें, जवळ कोणी नाहींसें पाहून कांहीं तरी भाषण करावें, असा क्रम ठेविला. त्यामुळें प्रद्युम्नाचे मनांत तिजविषयीं भोगेच्छा उत्पन्न झाली. परंतु तो भिडस्त असल्यामुळें तिच्याशीं मतलबाचें भाषण करण्यास त्यास धैर्य होईना, असे थोडे दिवस गेले. मथुरा पक्कें समजली कीं, त्याचें मन मजवर आहे, परंतु भयामुळें त्यास धैर्य होत नाहीं. तर आपणच त्याचें भय घालवूं. असें मनांत आणून हरीस सांगितलें कीं, आज रात्रीं तुह्मी बाहेर जावें, ह्मणजे

मी आपलें कार्य करून येईन. मित्रानें तसेंच केलें. नंतर रात्रीं मासूबाईस चांगली झोंप लागल्यावर हळूच उठून आंतील दरवाज्यानें जिना चढून ती वर गेली. तेथें दिवा मंद जळत आहे आणि प्रद्युम्नास गाढ झोंप लागली आहे असें पाहिल्यावर तिलाही एकाएकीं त्या महातानें हालवून जागृत करण्यास धैर्य होईना. ह्मणून तेथें जवळच कांहीं भांडीं होतीं, तीं पडल्यासारिखा आवाज केल्यामुळें प्रद्युम्न किंचित् दचकून जागा झाला. आणि त्यानें तिला पाहिलें.

रत्नाकरा, रात्रीं एकांत ठिकाणीं तारुण्याचे भरांत आलेली सुंदरस्त्री आपण होऊन गळीं पडली असतां तिचा त्याग करील असा पुरुष ह्या जगांत विरला असेल. तिला पाहून प्रद्युम्नाचें आंग कामकंपानें थरथरूं लागलें, परंतु त्यानें विचार केला कीं, नजाणो, कदाचित् ही दुसरे कांहीं कामाकरितां आली असली, तर आपली फजीती होईल. आणि "स्त्रियांचा विश्वास धरूं नये,, असेंही आहे. याकरितां आपण घाई करूं नये. असा विचार करून विवेकानें आपलें मन कांहींसें आवरून राहिला. मथुरेनें विचार केला कीं, अद्यापि त्यास धैर्य होत नाहीं त्यापक्षीं आपण आतां भिऊं नये. सर्व यथास्थित घडेल यांत संशय नाहीं. म्हणून कांहीं न बोलतां त्याचे जवळच जमिनीवर येऊन बसली आणि त्याजकडे पाहून हंसूं लागली. ह्मणून तोही हंसला. तरी ही त्याला धैर्य झालें नाहीं. शेवटीं तिनें, एकदम त्याचे गळ्यास मिठी मारिली. तेव्हां प्रद्युम्नानें तिचा अंगीकार केलाच.

पुढें प्रद्युम्नास तिचा फारच नाद लागला. ती सासरवासी असल्यामुळें संधी येईतेव्हां त्यांचा एकांत घडत असे. ह्मणून त्या नादांतच प्रद्युम्नाचा वेळ जाऊं लागला. त्यामुळें बाजारांत जाणें अगदीं विसरला. आणि मथुरेसही त्याचें वेड लागलें ह्मणून हरीची आणि तिची बरेच दिवस एकांतीं गांठ पडेनाशी झाली.

एके दिवशीं तिला एकांतीं गांठून हरि ह्मणाला वाहवा ! गुरूची विद्या गुरूलाच फळली, असें झालें. मी आपल्या मतलबा करितां त्यास नादीं लाविलें असून तूं त्याचाच नाद धरून माझी वाट सोडिलीस हें ठीक नाहीं.

**मथु०** - छे छे, तसें नव्हे. तुह्मांस मी कधींही विसरणार नाहीं. प्रद्युम्नाचें मन मजवर चांगलें बसून आपला मतलब साधला पाहिजे ह्मणून त्याची मर्जी संपादन करण्यामुळें आणि सासूबाईच्या भयामुळें तुमची गांठ घेण्यास संधी सांपडली नाहीं. तुह्मी पक्कें समजा कीं, मी केवळ द्रव्याचे मतलबा करितांच त्यास नादीं लाविलें आहे. पण माझा सर्व जीवप्राण तुह्मांकडे ओढत आहे. असो, फार काय सांगूं, पुढें तुमची खात्री होईल.

**हरि** - आतां प्रद्युम्नास तर बराच नाद लागला आहे. इतक्यांत त्याजकडून कांहीं द्रव्य उपटण्याची तजवीज करशील, तर मिळेल. कदाचित् तो विचारी आहे ह्मणून मनास विवेक करील, तर मग आपला मतलब अगदीं साधणार नाहीं.

**मथु०** - असें तर खरेंच. त्याजपाशीं कायबरें मागावें. ?

**हरि** - मी काय सांगूं, तुला जें पाहिजे असेल तें माग.

**मथु०** - बरें तर. मी प्रथम एक मोठीशी नथ करून मागतें.

**हरि** - हें मला बरें दिसत नाहीं. कारण कीं, त्यानें नथ दिली तर ती तूं केव्हां घालणार ? सासूबाईनीं पाहिली तर काय सांगशील ?

**मथु०** - कोठें तरी सांपडली, असें सांगेन ह्मणजे झालें.

**हरि** - असें करून यांत फायदातो काय ? सध्या तुला दागिने नाहींत खरे, परंतु तुझा नवरा बाहेर गांवीं गेला आहे तो आल्यावर तुला दागिने करीलच. असें असून नथतरी घेऊन उपयोग काय ? यांत तुझ्या हिताचें कांहींच दिसत नाहीं.

मथु० - तुमचे मतें दागिना मागूं नये, तर काय मागावें ?

हरि - तुलाजें आवडेल, तें माग मला कांहीं कळत नाहीं.

मथु० - वाहवा, तुह्मी जर मला न शिकवाल तर कोणाचें ऐकूं? मला काय मागावें हें सुचत नाहीं. माझासर्व भरंवसा तुह्मांवर आहे.

हरि - बरें तर, मी तुला युक्ति सांगतों. पण ऐकशील तर उपयोग. माझे बुद्धीनें तुझें आणि माझें दोघांचेंही कल्याण होईल.

मथु० - असें आहे तर ती युक्ति मला सांगा, ह्मणजे मी तसेंच करीन.

हरि - करीन ह्मणतेस, पण तुला हा गांव सोडून बाहेर गांवीं जावें लागेल. हें तुझ्यानें होईल ना?

मथु० - छे छे, हें मात्र मला बरें दिसत नाहीं. कारण परगांवीं मला जाण्यास सासूबाईची आज्ञा लागते. मी स्वतंत्र नाहीं. सासूबाई मला कोणत्या निमित्तानें पाठवितील ?

हरि - बायकांची अक्कल चुलीपुरती ह्मणतात तें खरें आहे. मी सांगतों काय आणि तूं समजलीस काय. दुसऱ्याचे नादानें बाहेर गांवीं जाणार आणि सासूबाईची आज्ञा घेणार. वाहवा ! काय शहाणपण! हें तरी बरें आजच बोललीस, नाहींतर एखादें जाते वेळीं सासूबाईस सांगितलें असतेंस, तर मग सगळ्यांची फजीती झाली असती.

मथु० - अहो, आह्मी गरीब बायका. आह्मांस तुमच्या सारख्या कल्पना माहीत नाहींत. मी शहाणी असतें तर अद्यापि दरिद्र कां भोगावें लागलें असतें ? बरें तर आतां माझी अक्कल राहूं द्या. तुह्मी सांगाल तसें मी ऐकतें. इतकें मात्र करा कीं, जेणें करून माझी चौघांत फजीती न होईल आणि जन्माचें दरिद्र जाईल.

हरि - तूं त्याची काळजी करूं नको. आपण एकवेळ निघून गेल्यावर मागें कोणी कांहीं कां बोलेनात. थोडे दिवस बोलतील, मग उगीच राहतील.

आपणांस लोकांशीं काय करावयाचें आहे? आपल्या जिवास सुख होईल तें आपण करावें. खरें ह्मणशील, तर पहा, तुझी ही दरिद्रावस्था पाहून मलाही वाईट वाटतें. त्या मनुष्य जन्मास येऊन पोटभर अन्न नाहीं, मनासारखीं वस्त्रें नाहींत, आंगावर फुटका मणी देखील नाहीं, सर्व काळ दुःख भोगून जाचांत तुला रहावें लागतें. आणि तारुण्यांत एकटें राहून राहून एखादे दिवशीं मरण आलें ह्मणजे संसार सोंपला. मनुष्याचे जन्मास येऊन तरी काय उपयोग? ह्मणून तुला सांगतों असें केलेंस तर सर्व काळ सुखाचा वांटा तुला मिळेल यांत संशय नाहीं.

**मथु०** - बरें तर. तुह्मी ह्मणतां तसेंच करितें, पण एखादें माझे हातून चुकून बिनसलें तर फजीती होईल. यासाठीं वरचेवर मला तुह्मी शिकवीत जा. प्रथम प्रद्युम्नाशीं कसें बोलावें हें सांगा पाहूं?

**हरि** - हें देखील का मीच सांगितलें पाहिजे? बरें, सांगतों हें ऐक. तो तुझ्याशीं आनंदांत असतां, त्यास सांगावें कीं, मला आतां थोडक्याच दिवसांत माहेरीं जाणें आहे यासाठीं तुमची आमची आतां शेवटची हीच भेट होय. हें ऐकून मग तो काय ह्मणतो तसें त्याचा कल पाहून बोलावें. सारांश, कसेंही करून तो तुला बाहेर नेण्याचें पतकरील असें कर ह्मणजे झालें.

**मथु०** - बरें तर तसेंच करितें. आतां कदाचित् सासूबाई येऊं लागतील.

**हरि** - होय आपणांस बराच वेळ झाला. आतां मीही जातों. पण त्याचे नादानें मला फसवूं नको ह्मणजे झालें.

**मथु०** - छे छे, मी तसें करणार नाहीं.

असें बोलून दोघेंही आप आपले ठिकाणीं गेलीं नंतर एक दोन दिवसांनीं संधी साधून तिनें हरीस बाहेर जाण्याची सूचना केली.

आणि रात्रीं प्रद्युम्नाशीं एकांत करून भाषण करूं लागली.

**मथु०** - शेटजी, मला काल माहेरच्या मागारी आला होता. तेव्हां सासूबाई नीं दोन तीन दिवसांनीं पाठवीन, असें त्यास सांगितलें आहे. त्याप्र माणें मला जावें लागेल. यासाठीं आज तुमची आमची ही शेवटची च भेट आहे (रडूं लागते). परमेश्वरानें चार दिवस तुमच्या संगती च्या लाभ दिला. पण माझ्या प्रारब्धा पुढें उपाय नाहीं. मेला [illegible] इतक्यांतच आला. काय करूं, सासूबाई सांगतील तसें ऐकावें लागतें.

**प्रद्यु०** - (तिचे तोंडावरून हात फिरवून) रडूं नको. मलाही तुझे जा ण्याची गोष्ट ऐकून कठिण झालें आहे. दुसऱ्याची वस्तू थोडे दिव स आणिली, ती आपली ह्मणवत नाहीं. पण तूं आतां उगी रहा, आणि उद्यां पुन्हा एक वेळ शेवटची भेट दे. मग मला कांहीं युक्ति सुचली तर सांगेन.

असें ऐकून ती गहिंवर आवरलासा करून खालीं येऊन निजली. दुसरे दिवशीं झालेलें वर्तमान तिनें हरीस कळविलें. प्रद्यु म्नासही ती जाणार हें ऐकून फार कठिण वाटलें. याकरितां त्यानें विचार केला कीं, आपणांस ही चांगली स्त्री प्राप्त झालेली आहे आणि अगदीं गरीबही आहे, यासाठीं हिला सोडून उपयोग नाहीं. माहेरीं गेली तर आपणांस पुन्हा भेटेल याचाही भरंवसा नाहीं. ह्मणून आपण हिला राहवून घेण्याची युक्ति करावी. पण या कामास मित्राचें मत असलें पाहिजे. असा विचार करीत आहे, इतक्यांत मित्र त्यास ह्मणाला.

**हरि** - प्रद्युम्ना, आज तूं चिंताक्रांत कां दिसतोस बरें? रोजचे सा रखी तुझी मुद्रा नाहीं. काय बरें तुला दुःख झालें आहे?

**प्रद्यु०** - मला दुःख तर कांहीं नाहीं, पण गड्या एक नवीनच चिंता उ त्पन्न झाली आहे. आजपर्यंत तुला त्यांतली कांहींच गोष्ट कळविली

नव्हती. पण आज कळविल्या वांचून गहवन नाहीं, ह्मणून सां गतों, ऐक. त्या आमचे घरवालीचे सूनेनें मला नादीं लाविलें आहे. काय ऋणानुबंध असेल तो असो. माझ्या हातून अशी गोष्ट व्हावयाची नव्हती, पण प्रारब्ध योगानें घडली. आतां जें पतकरिलें, तें तडीस नेलें पाहिजे.

हरि - तडीस काय न्यावयाचें ?

प्रद्यु० - दुसरें कांहीं नाहीं. तिजवांचून मलातर चैन पडत नाहीं आणि तिलाही मजवांचून चैन पडत नाहीं. इतक्यांतच माहेराहून तिचा मागारी आला होता. त्याजवळ दोन तीन दिवशीं तिला पाठवावयाचें सासूनें कबूल केलें आहे. या करितां तिला जावें लागेल. मग तिची आपली भेट देखील होणें कठीण पडेल. ह्मणून कांहीं तरी युक्ति करून तिचा माझा बहुत दिवस समागम होईल अशी तजवीज करशील, तर बरें होईल.

हरि - इतकेंचना. अँः याला कांहीं मोठीशी युक्ति नको. ती पूर्णपणें वश असली ह्मणजे झालें.

प्रद्यु० - ती वश आहे, पण पुढें काय करणार ?

हरि - दुसरें कांहीं नाहीं. आपण दोघेही तिला दूर देशीं घेऊन जाऊं. आपण व्यापारीच आहों. कोठें गेलों, तरी आपला व्यापार साधेल. तिनें माहेरीं जाण्याचे निमित्तानें आह्मां बरोबर यावें.

प्रद्यु० - तरमग आपणांस एक दोन दिवसांतच निघावें लागेल.

हरि - होय, असे तर खरेंच. तिचा आणि आपला एक दिवसाचाच बेत झाला पाहिजे. नाहीतर चुकामुक पडेल आणि मसलतफसेल.

प्रद्यु० - मजकडून तयारीच आहे. येथें व्यापार तर कांहींच झालेला नाहीं. मी कोणाचें देणें नाहीं आणि माझें कोणाकडे येणेंही नाहीं उद्यां

घरवालीचें भाडें चुकवून देऊं आणि तयारी करूं.

**हरि**- होय, असें केलेंच पाहिजे. पण तिच्या जाण्याचा दिवस कोणता ठरतो हें प्रथम समजून घेऊन त्यासारिखें आपणही तयार झालें पाहिजे. ह्मणून मी ती बातमी काढितों. प्रद्युम्ना, मी तुला साधा ह्मणत होतों. पण बराच घालवेडा आहेस. अरे, ही गोष्ट इतके दिवस मजपासून चोरून ठेविलीस. हें मित्रत्वास योग्य नव्हे.

**प्रद्यु०**-हें तर खरेंच. तूं मला हंसशील ह्मणून सांगितलें नव्हतें. आज माझी पक्की खात्री झाली कीं, स्त्रियां सारिखी पुरुषाचें मनास मोह उत्पन्न करणारी दुसरी वस्तू नाहीं. तिच्या नादानें मला कांहीं सुचत नाहींसें झालें आहे. आणि व्यापार ही सोडून दूर देशीं जावें लागणार, असें असून ही मनास कांहींच विवेक होत नाहीं.

**हरि**- तुला असें झालें, यांत आश्चर्य नाहीं. स्त्रियांचे नादानें आज पर्यंत कित्येक लोक प्राणांस ही मुकले आहेत, असें ऐकत असतां ही भीति नधरून बहुत लोक परस्त्री लंपट होतात आणि फसतात. स्त्रियांच्या आंगीं परमेश्वरानें तसाच गुण ठेविला आहे. यांत तुझा अपराध नाहीं.

**प्रद्यु०** - पण मीं तुला कळविलें नव्हतें, यामुळें रागतर आला नाहींना ?

**हरि** - प्रद्युम्ना, राग आलातर मित्रत्व कशाचें ? अरे, सर्व गोष्टी कळवितां येतात. पण स्त्रियांचे नादांत पडल्यावर मित्राची ही ओळख न राहून त्याला कळवूं नयेसें वाटतें. पण पहा प्रसंग पडला तेव्हां मित्राशिवाय तुला उपाय कोणीं सांगितला काय? तुझे मनोरथ पूर्ण करण्यास मीच सहाय होत आहें.

**प्रद्यु०** - शाबास. असा असेल तोच मित्र. पण आतां ती कधीं खचीत निघणार, त्याची बातमी लवकर काढ.

हरि - त्याची तुला आतां काळजी नको. स्वस्थ रहा. मी सर्व तजवीज करितों.

असें दोघांचें भाषण झालें. दुसरे दिवशीं मथुरेस हरीनें तें वर्तमान कळविलें. त्यामुळें तिलाही आनंद झाला आणि मनांत ह्मणाली कीं, प्रद्युम्नानें माझा अंगीकार केला, त्यापक्षीं आपलें जन्माचें दरिद्र जाणार आहे. मग राहून तरी काय करावयाचें? नंतर हरीस ह्मणाली, आतां उशीर लावूं नका. तुह्मी सांगाल तेव्हां मी निघण्यास तयार आहें. एक वेळ येथून माझा पाय सुटला ह्मणजे मागें कांहीं कां होईना. आपण अगदीं दूरदेशीं जहाजांत बसून जाऊं. मग आमचे मागें कोण येतो? हरि ह्मणाला, होय, आपण असेंच करूं.

असें बोलून तिसरे दिवशीं प्रातःकाळीं मोठे पहांटेस उठून तिघांनींही जाण्याचा संकेत केला. प्रद्युम्नानें आपलें सर्व सामान सुद्धां युक्तीनें विकून टाकिलें आणि घरवालीस झाल्या दिवसांचें भाडें देऊन मोकळा झाला. जाण्याचे वेळीं दोघेही बाहेर निघून गेले. इतक्यांत थोडे वेळानें त्यांचे मागून मथुराही निघून आली. संकेता प्रमाणें नदीचे पलीकडे डोंगराचे पायथ्याजवळ ती त्यांस येऊन भेटली. इतक्यांत उजाडलें ह्मणून तीं सरळ मार्गानें न जातां आड मार्गानें जाऊं लागलीं. परंतु कोठें जावें हें कांहींच सुचेना. तों एक भिल्ल मार्गांत भेटला. त्यानें त्यांस विचारलें कीं, इतक्या सकाळींच तुह्मी तिघें कोठें जातां? हरि ह्मणाला, आह्मी वाटसरू आहों. पहांटेस उठून अंधारांत चालत असतां वाट चुकून इकडे अरण्यांत आलों. तर आतां पुढें कोण गांव आहे आणि रस्ता कोणीकडे आहे, हें आम्हांस सांगशील, तर तुझे फार उपकार होतील. असें बोलून त्यानें खिशांतून चार आण्याचे पैसे काढून त्याला दिले ते त्यानें घेतले आणि मनांत समजला कीं, त्यांजपाशीं

द्रव्य बरेंच असेलसें वाटतें. पण मी एकटा आहें आणि माझा तीरकम ठाही जवळ नाहीं. त्यामुळें उपाय नाहीं. यांस असेंच आडमार्गानें आपले झोंपड्या पर्यंत नेऊं ह्मणजे मसलत साधेल. असा विचार करून त्यांस ह्मणाला, तुह्मांस रस्ता पाहिजे तर मज बरोबर चला. मलाही पुढच्या गांवीं जाण्याचें आहे. बरोबरच जाऊं ह्मणजे झालें. असें ऐकून तीं त्याचे मागून जाऊं लागलीं. आपलें घर जवळ आलें, असें पाहून भिल्ल ह्मणाला तुम्हीं येथें जराशीं बसा. मी समोरच्या घरीं जाऊन तंबाकू ओढून येतों. हरि ह्मणाला, आह्मी बसतों, पण लवकर याहो. भिल्लानें घरीं जाऊन आपला भाऊ बरोबर घेतला. दोघेही आपले हातांत तीरकमठा घेऊन येत आहेत असें पाहिलें तेव्हां तिघेंही भयभीत झालीं. भिल्ल त्यांचे जवळ येऊन ह्मणाला, तुह्मी द्रव्यवान् दिसतां आणि रात्रीचे घरांतून निघून आलां, त्यावरून मला असें वाटतें कीं, तुह्मी कांहीं तरी लबाडी करून कोणास न कळवितां पळून जात असाल. तर आतां जें तुमचे जवळ द्रव्य असेल, तें सर्व मला द्या; नाहींतर तिघेंही प्राणास मुकाल, यांत संशय नाहीं. असें त्याचे शब्द ऐकून प्रद्युम्न अगदींच घाबरला. तशीच मथुरेची आणि हरीचीही अवस्था झाली. हरी भिल्लास ह्मणाला, बाबारे, आह्मांजवळ द्रव्य अगदीं थोडेंच आहे हें तुला देतों, पण आह्मांस जाऊं दे. असें बोलून गाठोड्यांत सुमारें शंभर रुपयांचा विषय होता, तो सर्व त्याचे स्वाधीन केला, तरीही तो ऐकेना; ह्मणून मथुरेचे अंगावर सुमारें पंचवीस रुपयांचे लहान सहान दागिने होते, ते सर्व काढून दिले. त्यामुळें त्यानें त्यांस जीवदान देऊन पुढें रस्त्याची खुणा सांगितली आणि सोडिलें. त्यामुळें फार घाईनें अडचणींतून व कांट्यांतून ठेंचा खात तिघेंही मोठ्या रस्त्यास येऊन पोहोंचून निर्भय झालीं. प्रद्युम्नानें मनांत विचार केला कीं, आपण दुष्कर्मास प्रवृत्त झालों, ह्मणून परमेश्वरानें ही प्रथमच शिक्षा दिली

आहे. यावरून आतां पुढें काय होणार कोणजाणे. असा खिन्न होऊन हरीस ह्मणाला, मित्रा, आतां सुखरूप कोठें तरी जाऊन राहण्यास मिळा लें ह्मणजे पुरे. आतांच जीवावर पाळी आली होती, पण निभावलें. मित्र ह्मणाला, मी बरोबर असल्यामुळें तुझे शंभर रुपयेच गेले; तुझें कमरेचें सर्व द्रव्य तसेंच बचावलेंना. यावेळीं जर मी नसतों. तर एक कवडी देखील राहिली नसती. मित्राचा उपयोग असा होत असतो हें पक्कें समज. प्रद्युम्न ह्मणाला, होय असें तर खरेंच. आतां लवकरच आपण एखाद्या बंदरांत जाऊन तेथून दूर देशीं जाऊं

असें बोलताहेत, इतक्यांत एक वाटसरू ब्राह्मण त्या मार्गानें आला, त्यास त्यांनीं विचारिलें महाराज, आपण कोठें जातां?ब्राह्मण ह्मणाला, मी राजापुरास जात आहें.

**हरि** - राजापुर कोणीकडे आहे. ?

**ब्राह्मण** - राजापुर ह्मणून कोंकणांत बंदर आहे.

**हरि** - तें,किती लांब आहे ?

**ब्राह्म०** - येथून सुमारें बारा कोश आहे.

**हरि** - तेथून मुंबईस जाण्यास गलबतें मिळत असतील नाहीं बरें ?

**ब्राह्म०** - होय, पाहिजेल तितकीं गलबतें मिळतात. चांगला वारा लागला, तर चार दिवसांत मुंबईस पोहोंचताल्.

**हरि** - बरेंच झालें. आह्मांस मुंबईस जावयाचेंच आहे. तरी राजापुराहूनच जाऊं ह्मणजे झालें. तेथ पर्यंत तुमची सोबत मिळाली हें ही चांगलेंच झालें.

असें बोलून तीं त्याचे मागें जाऊं लागलीं परंतु सुमारें दोन कोश पुढें गेल्यावर मथुरेच्यानें चालवेना; ह्मणून प्रद्युम्नास ह्मणाली, आतां माझ्यानें चालवत नाहीं. येथें गाडी घोडें कांहीं तरी मिळतें, तर बरें झालें असतें.

तें ऐकून ब्राह्मण ह्मणाला, येथून जवळच एक गांव आहे, तेथें घोडीं भाड्यानें मिळतात. तेथ पर्यंत चला. मग घोडें पाहूं. असें ह्मणून तीं हळू हळू त्या गांवा पर्यंत गेलीं. तेथें राजापुरापर्यंतच्या करारानें भाड्याचें घोडें केलें आणि दुसरे दिवशीं राजापुरीं जाऊन पोहोंचलीं.

इकडे मथुरेची सासू प्रातः काळीं उठून पाहते तों सून कोठें दिसेना; ह्मणून बराच वेळ इकडे तिकडे तिनें शोध केला. परंतु दुपार पर्यंत कोठेंच आढळली नाहीं. त्यावरून समजली कीं, हिला माळयावरच्या व्यापाऱ्यांनीं पळविलें असावें, यांत संशय नाहीं. ही बातमी सगळ्या गांवभर झाली. शेजाऱ्या पाजाऱ्यांनीं ही पुष्कळ शोध केला. परंतु थांग लागेना. या करितां सासूनें सरकारांत जाऊन कळविलें. त्यावरून त्यांस पकडण्या विषयीं जाहीर नामे सरकारानें लाविले. इकडे तिघेंही राजापुर येथें एक दिवस राहून लागलेंच मुंबईस जाणारे गलबतावर बसून अगदीं निर्भय झालीं. नंतर हरीचे मनांत असें आलें कीं, आपला बेत येथ पर्यंत सिद्धीस गेला. आतां त्या प्रद्युम्नास समुद्रांत लोटून देऊं, ह्मणजे ही स्त्री आणि सर्व द्रव्य आपणांस मिळेल. मग मुंबईस जाऊन कोठें तरी भाड्याची जागा घेऊन स्वस्थपणानें राहूं ह्मणजे आपणांस सर्व सुख प्राप्त होईल. इतक्यांत त्यास आठवण झाली कीं, द्रव्याचा कसा प्रद्युम्नाचे कमरेस आहे, तो आपणाजवळ आल्यावांचून काय उपयोग. तर आतां पुढें कांहीं निमित्तानें तो मागून घ्यावा ह्मणजे झालें.

असा बेत करून त्या विचारांत होता. परंतु कसा मागण्यास कांहींच योग्य निमित्त दिसेना. असे चार दिवस गेले. वारा उतरण असल्यामुळें चार दिवसांत गलबत हर्णै पर्यंतच गेलें. उतारू लोकांचे हाल होतील, ह्मणून तांडेलानें हर्णैचे बंदरांत वरवा केला. तेथें सर्व—

उतारू बरोबर हीं तिघेंही उतरलीं आणि किनाऱ्यावर आलीं, तों हरि म्हणाला, प्रद्युम्ना, आज परमेश्वरानें आपणांस बरें बचाविलें. तुला यांत लें कांहींच माहित नाहीं. काल रात्रीं गलबतावरचा खलाशी तुझे जवळ बसून हळूहळू चाचपून पाहत होता. त्यानें तुझे कमरेचा कसा पाहिला आहे. त्यास मी ओळखिलें, परंतु आपण त्याचे ताब्यांत असतां बोलून उपयोगी नाहीं. ह्मणून तुला आतां सांगतों कीं, कसा मजजवळ दे. मग खलाशी कसा आहे तो मी पाहीन. असें ह्मणतांच प्रद्युम्नास तें खरें वाटलें आणि त्यानें कसा त्याचे स्वाधीन केला. नंतर सर्वत्रांचें भोजन झाल्यावर सायंकाळीं गलबतावर चढण्या करितां तांडेलानें हाक मारिली. त्यावरून सर्व उतारू सुद्धां हे वर चढले. नंतर प्रद्युम्न गलबतावर निजून राहिला. यामुळें हरीचे मनांतील बेत सिद्धीस जाईना. परंतु त्या रात्रींत चांगला वारा लागून एकदम गलबत मुंबई जवळचे उंदेरी खांदेरीचे बाऱ्यावर जाऊन पोहोंचलें. चांदणी रात्र असल्यामुळें किल्ले पाहण्या करितां एकदम सर्व लोक उठून उभे राहिले. त्यांबरोबर प्रद्युम्नही उठला. इतक्यांत त्यास शौचास होऊं लागलें, ह्मणून त्यानें तांडेलास जागा विचारिल्यावरून त्यानें दाखविली तेथें ह्मणजे गलबताचे मागले बाजूस बाहेरचे आंगास घोडली ह्मणून लांकडाची चौकट टांगलेली असते, तिजवर जाऊन बसावयाचें. परंतु त्यास धैर्य होईना, म्हणून हरीनें त्याचे हात धरिले आणि प्रद्युम्न तेथें बसला. इतक्यांत तिकडे कोणी पाहत नाहीं, असें पाहून एकाएकीं त्यानें प्रद्युम्नाचे हात सोडून देऊन त्यास समुद्रांत पाडिलें आणि तेथून गलबत बरेंच लांब गेल्यावर एकदम ओरडला कीं, धांवारे धांवा, प्रद्युम्न समुद्रात पडला. अशी हरीची आरोळी ऐकून खलाशी लोकांनीं पाण्यांत उड्या टाकिल्या आणि जिकडे तिकडे पाहिलें. परंतु तो फार लांब राहिल्यामुळें त्यास सांपडला नाहीं. शेवटीं निराश होऊन तेवर आले. हरीनें त्याचे बद्दल अतिशय शोक करून दाखविला.

मथुरेस मात्र प्रद्युम्ना बद्दल थोडेंसें खरोखर वाईट वाटलें ह्मणून तिनें हीशोक केला. नंतर सर्व लोकांनीं मिळून त्याचें समाधान केलें.

आपला बेत सिद्धीस गेल्यामुळें हरीस मनांत फार आनंद झाला. परंतु वारंवार दुःखानें उच्छ्वास टाकून, हे परमेश्वरा, काय केलेंस हें! असें बोलत असे. पुढें तें गलबत दुसरे दिवशीं सायंकाळीं मुंबईचे बंदरांत जाऊन पोहों चलें. त्यावरील सर्व उतारू लोक उतरून आप आपल्याठिकाणीं गेले. तशींच हरि आणि मथुरा हीं उतरूं लागलीं, परंतु तांडेल यानें त्यांस उतरूं न देतां आपण निराळीच होडी घेऊन त्यांचे सामाना सुद्धां त्यांस तींत बसवून सरकारचे चौकीवर आणून दाखल केलें तेथें साधारण रीतीनें चौकशी झाली. नंतर त्यांनीं त्यांस पोलीसकामगाराकडे पाठविलें.

पोलीस कामगार चतुर असल्यामुळें त्यांचे तोंडाकडे पाहून यांत कांहीं तरी लबाडी आहे असें समजला आणि त्यानें तांडेल, हरि व मथुरा यांस निर निराळीं ठेवून प्रथम तांडेलाची जबानी घेतली.

**पोलीस कामगार** – हीं तुझे गलबतावर कधीं चढलीं.?

**तांडेल** – सोमवारीं चढलीं.

**पोलीस०** – राजापुराहून गलबत निघाल्यास किती दिवस झाले.?

**तांडेल** – आज सहा दिवस झाले.

**पोलीस०** – इतके दिवस लागण्याचें कारण काय.?

**तांडेल** – वारा उतरण होता, ह्मणून चार दिवसांत हर्णै पर्यंतच आलों. नंतर तेथें वरवा करून पुन्हा गलबत हांकारिलें, तें आतां नुकतेंच बंदरांत आलें.

**पोलीस०** – मयत हा समुद्रांत कधीं पडला.?

**तांडेल** – गेल्या रात्रीं पहांटेस पडला.

**पोलीस०** – यास कोणीं समुद्रांत लोटिलें कीं काय.?

**तांडेल** – यास कोणीं लोटिलें नाहीं. पण हा घोडलीवर बसला असतां

मित्रानें त्याचे हात धरिले होते. इतकें आह्मी पाहिलें. नंतर कसा पडला हें पाहिलें नाहीं. मित्रानें धांवा धांवा ह्मटल्यावर आह्मीं समुद्रांत उड्या टाकून बराच वेळ शोध केला, परंतु थांग लागला नाहीं.

**पोलीस०** - त्याचे जवळ कांहीं द्रव्य होतें काय ?

**तांडेल** - तें मला मुळींच माहीत नाहीं.

**पोलीस** - हीं बरोबरचीं दोघें त्याचीं कोण होतात ?

**तांडेल** - हें मला माहीत नाहीं.

याप्रमाणें तांडेलाची जबानी घेतली. त्यानें झालेली सर्व हकीकत सांगितली. नंतर मथुरेची जबानी घेण्याकरितां तिला उभी करून विचारिलें.

**पोलीस०** - तूं गलबतावर कधीं चढलीस. ?

**मथुरा** - सोमवारी चढलें.

**पोलीस०** - मयत हा तुझा कोण लागतो. ?

**म०** - (विचारांत पडून कांहीं वेळानें.) तो माझा कोणी नाहीं.

**पो०** - तुझें घर कोठें आहे ?

**म०** - मलकापुरास आहे.

**पो०** - घरीं आणखी कोण कोण आहेत.?

**म०** - माझी सासू आहे.

**पो०** - तूं मुंबईस कां आलीस. ?

**म०** - कांहीं तरी धंदा करावा ह्मणून आलें.

**पो०** - बरें तुझे बरोबरचा हा कोण आहे. ?

**म०** - हाही माझा कोणी नाहीं.

**पो०** - तुझा नवरा कोठें आहे.

**म०** - माझा नवरा हिंदुस्थानांत आपले बापा बरोबर गेला आहे.

**पो०** - तूं त्यांचे बरोबर मुंबईस कां आलीस. ?

मथु० - कांहीं तरी धंदा करावा ह्मणून आलें.

पो० - तूं सासूचे आज्ञेनें आलीस किंवा पळून आलीस. ?

म० - मी सासूची आज्ञा घेतली नाहीं आणि पळूनही आलें नाहीं. मला यावेंसें वाटलें ह्मणून मी आलें.

पो० - त्या दोघांची आणि तुझी ओळख कशी झाली. ?

म० - हे आमच्या घरांत भाड्यानें राहत होते.

पो० - किती दिवस राहत होते. ?

म० - सुमारें तीन महिने होते.

पो० - मुंबईस येण्यास त्यांनीं तुला शिकविलें असेल. ?

म० - मी आपल्याच बुद्धीनें त्यांचे बरोबर आलें.

पो० - मयत हा समुद्रांत कसा पडला. ?

म० - तो शौचा करितां गेला होता. तेथून पडला.

पो० - त्याचे बरोबर कोण गेला होता ?

म० - हरि गेला होता.

पो० - त्यानें त्यास पाण्यांत लोटिलें असें तुला वाटतें ?

म० - तें मला कांहीं कळत नाहीं.

पोलीसकामगारानें तिची जबानी घेऊन विचार केला कीं, ही तर याचे बरोबर पळून आली आहे; यांत कोणाचाच गुन्हा नाहीं. कारण ती आपल्या खुशीनें आली. परंतु मयत हा समुद्रांत पडला याज विषयींची चौकशी केली पाहिजे, ह्मणून अगोदर हरीची जबानी घ्यावी. ह्मणून त्यास उभा करून विचारूं लागला.

पो० - मयत तुझा कोण होता. ?

हरि - तो माझा भागीदार आहे.

पो० - तुह्मीं मुंबईस कां येत होतां. ?

हरि - व्यापारा करितां येत होतों.

पो० - व्यापारा करितां किती पैसा आणिला आहे. ?

हरि - पैसा आणिला नाहीं. माझ्या मित्राची चांगली पत आहे, ह्मणून तो पैशा वांचून हुंडयांवर व्यापार करणार होता.

पो० - ही स्त्री कोणाची आहे ?

हरि - ही स्त्री मलकापुरचे ब्राह्मणाची आहे.

पो० - हिला तुह्मी कां आणिली होती. ?

हरि - आह्मीं आणिली नाहीं. उगाच आमचे सोबतीनें मुंबईस आली.

पो० - हिची तुमची ओळख काय ?

हरि - आह्मी हिच्या घरांत राहत होतों.

पो० - हिला तुह्मीं येण्यास कां मना केलें नाहीं. ?

हरि - आह्मीं नको ह्मणून सांगत होतों, परंतु तिनें ऐकिलें नाहीं.

पो० - तुह्मीं हिचे सासूला कां कळविलें नाहीं. ?

हरि - आह्मांस काय जरूर. ?

पो० - हिच्या येण्या पासून तुह्मांस फायदा कांहीं तरी असेल. ?

हरि - फायदा कशाचा ? तिला सांभाळून आणण्याचा त्रास मात्र फुकटचा पडला.

पो० - ही मुंबईस येऊन काय करणार आहे. ?

हरि - तें मला माहीत नाहीं.

पो० - तुझा मित्र पाण्यात कसा पडला. ?

हरि - शौचास गेला असतां घोडली वरून पडला.

पो० - त्याचे जवळ कोण होता. ?

हरि - मी होतों. माझे समक्ष तो पडला. ह्मणून मीं ओरड केली. नंतर खलाशांनीं उडया टाकिल्या. परंतु मिळाला नाहीं.

**पो०** - तो समुद्रांत पडला त्यावेळीं तूं त्याचा हात धरिला होतास कीं काय?

**हरि** - नाहीं. त्यावेळीं मी जवळ उभा मात्र होतों.

याप्रमाणें त्याची जबानी झाली. मयत पाण्यांत बुडाला त्यावेळीं मी जवळ मात्र होतों असें ह्मणतो आणि तांडेलाचे जबानीत यानें त्याचा हात धरिला होता असें आहे. त्यापक्षीं यांत लबाडी दिसते, ह्मणून पुन्हा पोलीस कामगारानें तांडेलास विचारिलें.

**पो०** - मयत हा पाण्यांत कसा पडला?

**तां०** - झाड्यास गेला होता, तेथून पडला.

**पो०** - जवळ उभा कोण होता?

**तां०** - जवळ मित्र उभा होता.

**पो०** - त्यानें त्याचे हात धरिले होते, हें तुझे खचीत ध्यानांत आहे.?

**तां०** - मी सुकाणावर बसलों होतों तेथून जवळच घोडली आहे. त्याचे दोन्ही हात मित्रानें धरले होते, हें माझे पक्कें लक्ष्यांत आहे. पण पुढें मी गलबताच्या नाळीकडे पाहत असतां हा एकाएकीं ओरडला ह्मणून आह्मी उड्या टाकिल्या. परंतु मिळाला नाहीं.

तांडेलाच्या सांगण्यावरून हरीनें हात धरिले होते, असें सिद्ध झालें. ह्मणून पोलीस कामगारानें पुन्हा हरीस उभा करून विचारिलें कीं, तूं त्याचे हात धरिले होतेस कीं नाहीं? तो ह्मणाला, प्रथम हात धरिले होते, परंतु पडला त्यावेळीं मीं धरिले नव्हते. असें सांगितल्यामुळें त्याचे हातून पडला, असें ही उघड होत नाहीं. परंतु हे व्यापारा करितां आलेले असून जवळ द्रव्य नाहीं ह्मणतो, तर यावरून संशय येतो. ह्मणून प्रथम त्याचा झाडा घ्यावा, ह्मणजे समजेल, असा विचार करून त्याचें सर्व सामान तपासिलें. त्यांत नाणें व खुर्दा मिळून दोन रुपये सांपडले यावांचून दुसरें कांहीं द्रव्य नाहीं असें पाहून पोलीस कामगारानें पुन्हा विचार केला कीं, -

एवढ्याच द्रव्यानें हे इकडे आले नसावेत; याचे कमरेस कांहीं तरी द्रव्य असे ल. असें जाणून त्यास विचारिलें कीं, तुझ्या जवळ आणखी द्रव्य नाहींना? हरीनें नाहीं ह्मटल्यावरून त्याचे कमरेस हात घालतांच कसा निघाला तो उघडून पाहतां त्यांत कांही सोनें, व कांहीं रुपये, व कांहीं मोत्यें असें मिळून सुमारें दोन हजार रुपयांचा ऐवज निघाला.

आपणांस पोलीसच्या लोकांनीं आतां मुद्यानिशीं धरिलें व यापासून आ तां मात्र माझी धडगति दिसत नाहीं, असें हरि पक्कें समजला. पोलीस कामगा रानें त्यादोघांस कैद करून ठेविलें आणि तांडेलास जामीन घेऊन सोडिलें.

इकडे प्रद्युम्न समुद्रांत पडल्यावर बराच वेळ गचकळ्या खात होता. इतक्यांत दैव योगानें एक लांकडाचा तुकडा बऱ्याच अंतरावर दृष्टीस पडला. त्यास चांगलें पोहतां येत होतें, ह्मणून लांकडाचे तुकड्याचे आशेनें तिकडे पोहून गेला. आणि तो हातीं लागतांच त्याजवर पडून राहिला. तेणें करून आ पला जीव आतां वांचेल अशी त्यास आशा लागली. वारा पश्चिमे कडील असल्या मुळें पाण्याच्या लाटा किनाऱ्याकडे येत होत्या, त्यां बरोबर तो तरंगत तरंगत अली बागेचे पश्चिमे कडील किनाऱ्या नजिकच्या एका खडकावर लागला. नंतर त्यावर चढून लांकूडही वर ओढून घेतलें. नेसावयाचें वस्त्र सुटून वाहून गेलें. होतें; परंतु आंगांत ल्हानशी बंडी होती, ती मात्र राहिली आहे, असें पाहून त्या बं डीची धांदोटी फाडून कमरेस दोरा बांधिला. आणि बंडीचीच लंगोटी नेसला. कोणी मनुष्य दिसेल ह्मणून पाहत होता, परंतु रात्रीचें समद्र किनाऱ्यावर कोण येतें. कांहीं वेळानें उजाडल्यावर त्यास हुशारी वाटली. मनुष्याचे शब्द ही ऐकूं येऊं लागले, ह्मणून प्रद्युम्नानें मोठ्यानें हाका मारिल्या. परंतु कोणा स हीऐकूं गेल्या नाहींत. शेवटीं निराश होऊन उगीच राहिला. इतक्यांत हळूह ळू ओहोट फिरल्या मुळें खडका वरील पाणी जाऊन सगळा खडक रिकामा झाला. पाहतो तों किनाऱ्या पर्यंत सर्व खडकच आहे, पण तो जागोजाग तुटलेला

असल्यामुळें चालून जातां येणार नाहीं म्हणून तो लांकडाचा तुकडा हळू हळू उचलून खडकावरून चालत गेला, तुटलेल्या जाग्यांतून लांकडाचे आधारानें पोहून जावें. याप्रमाणें जातां जातां किनाऱ्यास येऊन पोहोचला. परमेश्वरानें आपणांस जीवदान दिलें, म्हणून त्याचे आभार मानून कांहीं वेळ स्वस्थ राहिला. आणि इकडे तिकडे पाहतां समोरच गांव दिसल्यावरून गांवांत आला. इतक्यांत कोळी लोकांची एक टोळी हातांत मोठें जाळें घेऊन येत आहे असें त्यानें पाहिलें, म्हणून तसाच तिकडे गेला. त्यांनीं त्यास पाहून कोठून आलास म्हणून विचारिल्यावरून झालेली सर्व हकीकत सांगितली आणि म्हणाला, मी जातीचा ब्राह्मण आहें. मला एखाद्या दयाळू ब्राह्मणाचें घर दाखवाल तर बरें होईल. असें ऐकून त्यांनीं त्यास कृष्णाजीपंत म्हणून एक दयाळू व श्रीमंत ब्राह्मण होता, त्याचे घरीं पोंहोचविलें. प्रद्युम्नानें समुद्रांत पडल्यावरची हकीकत सांगितल्यावरून त्यानें त्यास प्रथम वस्त्रें दिलीं. आणि स्नान घालून भोजन करविलें. नंतर सर्व वर्तमान विचारिल्यावरून प्रद्युम्नानें घराहून निघाल्या पासून घडलेली सर्व हकीकत त्यास सांगितली. ती ऐकून कृष्णाजीपंतानें आपल्यावर घडलेल्या प्रसंगा विषयींच्या कांहीं गोष्टी सांगून त्याचें समाधान केलें आणि आपल्या भावासारिखा मानून त्यास चार दिवस राहून घेतलें. नंतर विचार केला कीं, यास याचे मित्रानें समुद्रांत लोटून दिलें होतें, म्हणून मुंबईस जाऊन त्याचा पत्ता लावावा आणि याचें द्रव्य यास मिळे असें करावें; म्हणून प्रद्युम्नास बरोबर घेऊन मुंबईस आपले मामाचे घरीं आला आणि येण्याचें कारण सांगितलें.

मामानें प्रथम बंदरांतील चौक्यांवर चौकशी केल्यावरून त्यांनीं पोलीस कामगाराकडे जाण्यास सांगितलें. तेथें येऊन विचारितां हरि आणि मथुरा यांस कैद करून ठेविल्याचें कळलें. पोलीस कामगारानें प्रद्युम्ना पासून झालेली हकीकत विचारून घेतली आणि न्यायाधीशा कडून न्याय करविला. त्यावेळीं प्रद्युम्नास समुद्रांत लोटून द्रव्य हरण करण्याचे कामांत मथुरा ही

मिलाफी होती. असें न्यायाधीशाचे नजरेस येऊन दोघांसही कायद्याप्रमाणें शिक्षा दिली आणि प्रद्युम्नाचें सर्व द्रव्य त्याचे स्वाधीन केलें.

प्रद्युम्नानें आपले द्रव्यांतून पांचशें रुपयांचा विषय कृष्णाजीपंतास देऊन खुषी केलें. आणि तेथून निघून कोल्हापुरास पोहोंचल्यावर झालेली हकीकत आपल्या वडील बंधूस कळविली. आणि आपणकेल्या अपराधाची क्षमा मागून पुढें विचारानें वागूंलागला. त्यामुळें त्याचा व्यापार, धंदा आणि लौकिक वाढला.

**चिंता०** - रत्नाकरा, प्रद्युम्नानें आपला मित्र मानून हरीसबरोबर नेलें होतें. परंतु तो दुष्कर्मी असल्यामुळें प्रद्युम्नाचा नाश करून आपणही शिक्षा पावला, ह्मणून तुला सांगतों कीं, अशा मित्राची संगत कधीं धरूं नये. आपल्या मतलबा पुरते मित्रत्वानें वागणारे लोक पुष्कळ असतात. परंतु आपलें हित करणारा, अथवा हिताची गोष्ट सांगणारा मित्र मिळणें फार कठिण आहे. तूं मज जवळच आलास म्हणून बरें झालें.

**रत्ना०** - तूं ह्मणतोस ही गोष्ट खरी आहे. परमेश्वरानें मला तुजकडे येण्याची बुद्धि दिली, हा प्रथमच चांगला शकुन झाला. यावरून पुढेंही माझे मनोरथ सिद्धीस जातील असें खचीत वाटतें.

**चिंता०** - शकुन चांगला आहे. पण पुढें प्रारब्धीं काय आहे कोण जाणे, प्रयत्न करणें हें मात्र आपले हातीं आहे. माझे हातून होईल तितका मी उपाय करितों. तूं चिंता करूं नको. आतां संध्याकाळ झाला आहे. घरीं आईबाप रागें भरतील. ह्मणून घरीं जा आणि उद्यां ये, ह्मणजे कांहीं तरी तजवीज सांगेन.

असें चिंतामणीनें सांगितल्यावर रत्नाकर घरीं गेला. इकडे सत्यभामा यमुनेचे समाचारास जाऊन आल्यावर फार दुःखी होऊन मनांत ह्मणते, हे देवा, अशीच मला तळमळून मारणार काय? मी असा तुझा अपराध तरी

काय केला आहे? एका चिंतेंत असून यमुनेच्या भेटीमुळें थोडीशी आशा लागली होती; परंतु तिला ही तूं सुखी राखिलें नाहींस. मजकरितां तिला तरी कां दुःख देतोस? माझीच काय वाट करशील ती कर. असें बोलून ढळढळां रडत आहे, इतक्यांत सखू जवळ आली आणि तिची अवस्था पाहून ह्मणाली.

**सखू** - बाईसाहेब, आपण दुःख कां करितां? होणें जाणें परमेश्वराधीन आहे. जेंजें प्रारब्धीं असेल तेंतें भोगल्यावांचून चुकत नाहीं. मला ही तुमची अवस्था पाहून फार वाईट वाटतें. पण काय करूं. तुमच्या गांवा लोकिकास भिऊन वागावें लागतें, नाहींतर तुमचे मनोरथ केव्हांच पूर्ण केले असते.

**सत्य०** - अगे, पहा परमेश्वरानें कशी माझी छळणूक मांडली आहे ती. तारुण्य दशेंत आपल्या पती बरोबर आनंदानें क्रीडा करण्याचे हे माझे दिवस असून त्याचा माझा वियोग केला. तशांत ही रत्नाकराविषयीं थोडीशी आशा लागली ह्मणून प्रयत्न केला. तितक्यांत बाबास दुखणें आलें, त्यामुळें तोही प्राप्त होत नाहीं, ह्मणून उपाय करण्यास यमुनेची बुद्धि घेऊं लागलें, पण तिलाही परमेश्वरानें सुखी ठेविलें नाहीं. यावरून पुढें तरी माझी काय अवस्था करणार आहे कोण जाणे.

**सखू**- असेंतर खरेंच. पण चिंता करून काय उपयोग? यमुना बरी होई पर्यंत दुसरा कांहीं उपाय करून पाहूं.

**सत्य०**- मलातर कांहींच सुचत नाहीं. तूंच जर मनावर घेशील तर होईल.

**सखू**-परवांचे दिवशीं रत्नाकर मला भेटला होता. त्यानें उद्यां तजवीज करितों असें सांगितलें होतें; परंतु हा वेळ पर्यंत तिकडचें कांहींच कळत नाहीं. यावरून मला असें वाटतें कीं, कोणीतरी दुष्टानें कांहीं लबाडी सांगून त्याचें मन फिरविलें असेल, अथवा त्याच्या तरुण

आणि रूपवान् स्त्रीला हें वर्तमान कोणीतरी कळविलें असल्यामुळें रत्ना करास ती इकडे येऊं देत नसेल, असें मला वाटतें.

**सत्य०** - होय, तूं ह्मणतेस असेंच मलाही वाटतें. बहुत करून त्याच्या बायको चीच ही बुद्धि असावी. एक दिवस आपल्या मित्रास घेऊन या रस्त्यानें रत्नाकर आला होता, त्यावर दृष्टीस पडला नाहीं. कदाचित् आतां त्यास माझी आठवण देखील होत नसेल. पुरुषाचा स्वभाव असा असतो कीं, जिकडे एकदां नाद लागला, तिकडेच लागतो. पण आतां त्याचा आणि त्याच्या बायकोचा विघड होईल, अशी कांहीं तजवीज करशी ल, तरच आपले मनोरथ सिद्धीस जातील.

**सरयू** - आतां अशीच कांहीं तरी युक्ति केली पाहिजे. माझे मतें रत्नाकरा चे मनांत तिच्या वाईट वर्तणुके विषयीं कांहीं भरून द्यावें ह्मणजे तो तिचा त्याग करील. कां तुह्मांला कसें वाटतें?

**सत्य०** - होय गडे, असें करशील तरच त्याचें मन इकडे वळेल. शाबास, बरीच तुला युक्ति सुचली. आतां केव्हां बरें तुझी त्याची गांठ पडेल.

**सरयू** - उद्यां संध्या काळीं मी मुद्दाम जाऊन त्याची भेट घेईन आणि युक्तीनें त्याचे मनाचा कल पाहून त्यावेळीं सुचेल तसें तिज विषयीं वाईट त्याचे मनांत भरून देईन ह्मणजे झालें.

असा त्या दोघींनीं विचार केला. दुसरे दिवशीं संध्याकाळीं चार वाज तां दासी रत्नाकराची भेट घेण्या करितां रस्त्यानें जात आहे, तों तोच चिं तामणीचे घरीं येतांना मार्गांत भेटला. त्यास पाहून सरयू ह्मणाली.

**सरयू** - कसें काय, आपण बरेंच खरें बोलतां. काल आमच्या बाईसाहेब एकसारख्या रस्त्याकडे दृष्टि लावून आपली वाट पाहत बसून थक ल्या. आपले मनांत ठकवावयाचें होतें, तर येथेंच मला सांगावयाचें होतें. आतां, तरी कसा काय विचार केला आहे तो सांगा. नाहीं तर

उगाच आशा तरी नको. कितीदिवस वाट पहावी.

रत्ना० - तूं काय ह्मणशील तें ऐकणें भाग आहे. पण मी कपटानें बोललों नव्हतों. उगाच का विचारावांचून येववतें. दोघांस ही एकमेकांकडे जाण्याची चोरीच आहे. बरें एखादे तिसरे ठिकाणीं योजना करावी, तर तिला तेथें येण्यास कठीण पडेल. जिकडून तिकडून अडचणच.

सखू० - बरें, पण आतां काय तजवीज योजिली आहे ?

रत्ना० - मित्राकडे जात आहें. आतां तो काय सांगेल तें खरें. पण सत्यभामेला सांग कीं, मी तुझ्या करितां अन्न पाणी देखील सोडिलें आहे. आणि सर्व काळ भेटीच्या चिंतेंत आहे.

सखू - असल्या वर वर गोष्टी मी पुष्कळ ऐकिल्या आहेत. पुरुषाची जातच अशी आहे. (हळूच ह्मणते) घरांतून उपदेश झाला असेल. पण त्यांचीं आंतलीं कर्में पुरुषांस कोठें कळतात.

रत्ना० - काय बोललीस ? पुन्हा बोल पाहूं.

सखू - कांहीं नाहीं. तुमचे असे विचारांतच दिवस जाणार. ज्याला घरांतली बातमी नाहीं त्याच्यानें काय होणार आहे.

रत्ना० - तूं काय ह्मणतेस हें मी अद्यापि समजलों नाहीं.

सखू - समजून काय करावयाचें आहे. तुमच्यांत पराक्रमच नाहीं. ह्मणून अशी दशा होते. तिनें तरी काय करावें, लवकरच कळलें ह्मणून बरें झालें, नाहींतर आमच्या बाईसाहेबांस "पिंजरांतल्या माजरानें बाहेर पडतांच अन्न समजून कापसावर उडी टाकिली आणि निराश होऊन प्राण सोडिला,, तसें झालें असतें.

रत्ना० - आतां मी थोडेंसें समजलों. पण तूंही गोष्ट कधीं पाहिलीस. ?

सखू - हें तुह्मी विचारूं नये आणि मी सांगूं नये. घरोघर दिव्या खालीं काळोख आहेच. परंतु ज्याचे मनाला तें आवडत नाहीं, तो त्याचाविचार

करितो. मला आणखीं विचारूं नका. उगाच तुमचे मनास संताप होईल आणि आमच्या बाईसाहेबांस तुमच्या विषयीं दुःख वाटेल. मी आतां जातें.

असें बोलून दासी मागें फिरली. रत्नाकरानें पुनः पुनः हाका मारिल्या, परंतु परत आली नाहीं. तेव्हां तो निराश होऊन चिंतामणीचे घरीं आला. तों चिंतामणि बाहेर गेला होता, असें त्यास समजल्यावरून कांहीं वेळ उगाच बसला, परंतु त्याचे मनाची चमत्कारिक स्थिती होऊन त्यास चैन पडेनासें झालें. इतक्यांत चिंतामणि आला आणि पाहतो तों रत्नाकराचें तोंड अगदीं उतरलें आहे आणि खालीं मान घालून उगाच बसला आहे, असें पाहून त्यास ह्मणाला.

**चिंता०** - रत्नाकरा, आज तूं असा कां दिसतोस? तुजकडे पाहून मला फार भय वाटलें. मी नुकताच तुझ्या कामासाठीं बाहेर जाऊन आलों.

**रत्ना०** - मित्रा, काय सांगूं. आज मजवर एका एकीं पर्वत कोसळल्या सारखें झालें आहे, त्यामुळें मला कांहींच सुचत नाहीं. अशा समयांत मरण जरी आलें असतें, तरी बरें; पण ही फजीती नको.

**चिंता०** - असें दुःख तरी काय आहे?

**रत्ना०** - मला सांगावयास लाज वाटते. पण तुझ्या जवळ सांगितल्यावांचून राहवत नाहीं. ह्मणून सांगतों, ऐक. आतांच मी तुजकडे येत असतांना, मार्गांत सखू दासी भेटली. तिनें माझ्या बायकोच्या गैर वर्तणुके विषयीं थोडीशी गोष्ट सांगितली. आणि मला धिक्कारिलें. त्यामुळें मला चैन पडेनासें झालें आहे. परंतु तिनें उघड सांगितलें नाहीं. मी विचारीत असतां थोडेसें सांगून चालती झाली. त्यावरून मला असा राग आला आहे कीं, एका एकीं जाऊन बायकोचा घात करावा असें वाटतें. परंतु तुला कळवावें ह्मणून येथ पर्यंत आलों.

आतां मजला जाऊंदे.

**चिंता०** -छे छे, असा अविचार करूंनये. कोणी कांहीं गोष्ट सांगितली, तरी आपण उतावळी करूं नये. जें करणें तें विचारानें करावें. सखू ही केवळ हलकट दासी आहे. तिचें बोलणें आपण खरें मानूं नये. जरा मन स्वस्थ कर, म्हणजे मी तुला या विषयींची गोष्ट सांगेन.

असें बोलून कांहीं वेळ दोघे स्वस्थ राहिले. चिंतामणीनें विचार केला कीं, सत्यभामेनेंच ही उगाच बनाऊ चहाडी करून स्त्री पुरुषांचा विघड करावा असें योजिलें असावें. परंतु रत्नाकरास तें खरें वाटून याच्या मनास संताप झाला आहे. तरी आतां यास अशा प्रकारचीच एक मोठी गोष्ट सांगून त्या गोष्टीचे नादांतच याचा काळ घालविला पाहिजे. नाहींतर घरीं जाऊन हा निरपराधी स्त्रीचा घात करील. म्हणून रत्नाकरास म्हणाला.

**चिंता०** - रत्नाकरा, तूं विचारी पुरुष आहेस, म्हणून तुला सांगतों कीं, आजपर्यंत या जगांत निरपराधी स्त्रियांचे घात केलेले अशा गोष्टी मी बहुत ऐकिल्या आहेत. अरे, "चक्षुर्वै सत्यं,, जें आपण डोळ्यांनीं पाहिलें, तें खरें म्हणावें. दुसऱ्याचे सांगण्यावर विश्वास ठेवूंनये. कदाचित् आपली खात्री झाली; तरी ही एकाएकीं अघोर कृत्य करूं नये. याविषयीं पूर्वी घडलेली एक गोष्ट तुला सांगतों. ती ऐकून तुझें समाधान होईल. परंतु ती गोष्ट फार मोठी आहे, म्हणून आटोपण्यास आपल्या फुरसतीचे मानानें बरेच दिवस लागतील. म्हणून गोष्ट संपे पर्यंत तूं चित्त देऊन ऐकत जाशील तर सांगतों.

**रत्ना०** - मी तुझ्या आज्ञे बाहेर नाहीं. जसें तूं सांगतोस तसें मी ऐकितों. पण तुझ्या सांगण्या वरून आपल्या स्त्री विषयीं पक्की खात्री होई पर्यंत मला अगदीं चैन पडणार नाहीं.

**चिंता०** - अरे, खात्री करण्याची गरज नाहीं आणि तुझी स्त्री तशी दुष्कर्मी

नाहीं. हें मला पक्कें माहीत आहे. उगाच तुझा तिचा विघड व्हावा ह्मणू न दासीनें तुझ्या मनांत ही गोष्ट भरून दिली आहे. आतां माझी गोष्ट सरे पर्यंत तूं स्वस्थ रहा. ह्मणजे तुझी खात्री होईल.

**रत्ना०** - बरें, काय गोष्ट आहेती सांग पाहूं.

रत्नाकर गोष्ट ऐकण्यास तयार झाला असें पाहून चिंतामणि सांगूं लागला.

पूर्वी इंद्रपुरनगरांत राजा वीरसेन राज्य करीत असतां त्यास वृद्धापकाळीं दोन कन्या झाल्या. पहिलीचें नांव चंद्रप्रभा आणि दुसरीचेंनांव कलावती अशीं होतीं. पुढें त्या कन्या शुक्लपक्षीचे चंद्राप्रमाणें वाढत चालल्या. चंद्रप्रभा सद्गुणी होती; ह्मणून राजास फार आवडत असे. राजानें एका सिद्ध पुरुषास गुरु करून त्याचा अनुग्रह घेतला होता, ह्मणून तो नित्य त्याचे दर्शनास जात असे. चंद्रप्रभा आठ वर्षांची झाल्यावर एके दिवशीं राजानें गुरूचे दर्शनास जाते वेळीं तिला बराबर नेलें होतें. सिद्ध पुरुषानें चंद्र प्रभेचीं लक्षणें पाहून विचार केला कीं, ही स्त्री असून पराक्रमी आणि राज्य करणारी होईल, या करितां हिचे कल्याणार्थ कांहीं तरी वस्तू द्यावी. असें मनांत आणून तिला जवळ बोलाविलें आणि एक सुवर्णाची मुद्रिका तिचे अंगुलींत घालून तिला सांगितलें कीं, ही मुद्रिका तुझे हातांत आहे तो पर्यंत तुला दुःख होणार नाहीं, यासाठीं ही जपून बाळगावी व मी मंत्र देतों याचा युध्द प्रसंगीं उपयोग होईल. असें सांगून तिचे कानांत मंत्रोपदेश केला. आणि प्रत्येक गुरुवारीं एकांतीं बसून त्याचा जप करण्यास सांगितलें नंतर चंद्रप्रभेस बरोबर घेऊन राजा घरीं आला. चंद्रप्रभेनें गुरूच्या आज्ञे प्रमाणें मंत्राचा जप चालविला होता. पुढें ती उपवर झाली असतां, तिच्या योग्य वर राजास कोणीच दिसेना, ह्मणून वर शोध करितां करितां बरेच दिवस गेले. इतक्यांत कलावती ही उपवर झाली. एके दिवशीं दोघीजणी आपल्या सख्यां सह बागेंत फिरावयास गेल्या होत्या. तेथें कपोत पक्ष्यांचें जोडें आनंदानें क्रीडा करीत असतां कलावतीनें पाहिलें,

 क्री.१२-६१

त्यामुळें तिचे चित्तास कामाची व्यथा होऊन चंद्रप्रभेस ह्मणाली.

**कलावती** - अगे, आमचा बाबा तर अद्यापि आमचीं लग्नें करीत नाहीं. पहा तें कपोताचें जोडें कसें आनंदानें क्रीडा करीत आहे.

**चंद्रप्रभा** - तूं ह्मणतेस हें खरें, पण आमचा बाबा आमच्या योग्य वर मिळतील, तेव्हां आमचीं लग्नें करील.

**कला०** - इतक्या सगळ्या राष्ट्रांत कोणीच का वर आह्मां करितां मिळत नाहीं.? आतां आपण मोठ्या नाहीं का झालों ? माझ्यानें नाहीं बाई आतां धीर धरवत.

**चंद्रप्र०** - अगे, तुज पेक्षां मी मोठी आहें. मला नाहीं का वाटत ? ह्मणून आपण उतावीळ होऊं नये. थोडासा मनास विवेक करावा.

**कला०** - विवेक करावा खरा, पण मला अगदीं चैन पडत नाहीं. मला वाटतें, बाबाचें मन रात्रं दिवस राज्य कारभारा कडे असतें, त्या मुळें आमचा त्याला विसर तर पडत नसेल. ?

**चंद्रप्र०** - तूं अज्ञान आहेस. लग्नाची काळजी आपणांस का करावी लागते? आह्मी जन्मास आलों त्याचे अगोदरच आमचे पतींचा जन्म झाला आहे. आपणांस ज्ञान नाहीं ह्मणून मात्र कळत नाहीं; पण प्रारब्धांत लिहिलें असेल तसें त्या त्या वेळीं घडत असतें. आमचीं प्रारब्धेंच बाबाचे मनांत शिरून त्याचे हातून कार्य घडविणार आहेत. तूं स्वस्थ रहा. आतां थोड्याच दिवसांत आपलीं लग्नें होतील; मग तूं अशीच तुझे पती बरोबर क्रीडा करशील.

**कला०** - ताई, मी तेथ पर्यंत धीर धरीन, पण त्या मेल्या कामाची पीडा आहेना. संतापला ह्मणजे काय करील कोण जाणे.

**चंद्रप्र०** - हा मूर्खे, अशी काय बडबडतेस. त्या तुझ्या बोलण्यावरून मला तुझें लक्षण बरें दिसत नाहीं. माझ्याहून तूं लहान असून इतकी उतावळी

झालीस, तर पुढें काय करशील कोण जाणे.

**कला०** - ताई, मी बोललें यांत तुला वाईट कांगे वाटलें. आजपर्यंत मी असें कधीं तरी बोललें होतें काय? आतां माझ्या अंगांत संचारला आहे तो बोलतो. मी नाहीं बोलत.

असें दोघींचें भाषण होऊन कांहीं वेळ बागेंतील हवा घेऊन त्या आपल्या सख्यां सह घरीं आल्या. चंद्रप्रभा मनांत ह्मणाली कीं, कलावती एव्हांच निर्भीड पणानें असें बोलूं लागली, यावरून पुढें नांव लौकिक राखील असें वाटत नाहीं. जर एखादा कडक स्वभावाचा नवरा मिळाला तर बरें, नाहींतर ही आपले गुण उधळील. बरें असो, आपण बाबांस कळवूं ह्मणजे ठीक होईल. असें मनांत आणून राजा जवळ जाऊन एकांतीं बागेंतलें भाषण कळविलें तिचें भाषण ऐकून राजानें तिची समजूत केली आणि विचार केला कीं, यांत कलावतीचा अपराध नाहीं. त्यांनीं किती दिवस रहावें. तर आतां आपण विचारांत पडूंनये. त्यांचे प्रारब्धानें जसे मिळतील तसे वर पाहून लग्नें करावीं, ह्मणजे झालें. त्याप्रमाणें त्यानें उत्तम मुहूर्त पाहून देशोदेशींचे राज पुत्रांस स्वयंवरा विषयीं पत्रें पाठविलीं. चंद्रप्रभेच्या रूपाची आणि गुणांची कीर्ती चहूंकडे असल्यामुळें आपणांस ती प्राप्त व्हावी अशा इच्छेनें पुष्कळ राज पुत्र थाटानें निघून इंद्रपुरीं आले. त्यांचा सन्मान करून त्यांस राजानें सभामंडपांत बसविलें. दोघी कन्यांचे हातांत माळा देऊन ह्मणाला, मुलींनो, हे सर्व राजपुत्र बसले आहेत यांतून जो तुमच्या इच्छेस येईल, त्यास माळ घाला. अशी पित्याची आज्ञा होतांच हातांत माळा घेऊन त्या राजपुत्रां कडे पाहूं लागल्या; तों एकाहून एक अधिक रूपवान् दिसल्यामुळें आतां कोणास माळ घालावी अशा विचारांत पडल्या. शेवटीं त्यानीं निश्चय केला कीं, आपण असें करूं लागलों तर येथें सर्व हंसतील त्यापक्षीं प्रारब्धावर हवाला ठेवून माळ घालावी. नंतर चंद्रप्रभेनें

कुलदेवतेचें स्मरण करून सद्गुरूचें ही स्मरण केलें आणि तिच्या समोरच जो राज पुत्र बसला होता, त्यास माळ घातली. तशीच कलावतीनें ही एका राज पुत्रास माळ घातली. चंद्रप्रभेचा पति विचित्रनगरीच्या दुंदुभि राजाचा पुत्र कमलाक्ष नांवाचा होता आणि कलावतीचा पति कुंजर नगरीच्या वीरबाहु राजाचा पुत्र वीररथ नांवाचा होता. राजानें लग्नसोहळा यथास्थित करून आलेल्या राजपुत्रांस सन्मानानें पोचविलें. कमलाक्ष आणि वीररथ ह्या उभय जामातांस कांहीं दिवस राहवून घेऊन नंतर त्यांस थोडेंसें राज्य, कांहीं हत्ती, घोडे इत्यादि आंदण देऊन घरीं पोहोंचविलें. आणि कन्या घरीं ठेविल्या. आपल्या कन्यांचीं लग्नें यथास्थित झालीं ह्मणून राजास फार आनंद झाला. तो कोठेंच मावेना.

एके दिवशीं राजा दोन्ही कन्यांस ह्मणाला, मुलींनो, तुह्मी उपवर झाल्यामुळें माझे चित्तास काळजी होती, परंतु आतां तुमच्या मनास आलें त्यास तुह्मी वरिलें आहे. माझे हातून जें कर्तव्य तें मी केलें; परंतु आतां आपापल्या पतीची मर्जी संपादन करून कुळाची सत्कीर्ति करणें हें तुह्मांकडे आहे. असें ह्मणतांच चंद्रप्रभा बापास नमस्कार करून आनंदित झाली. आणि कांहीं न बोलतां त्याचे मांडीवर बसली परंतु कलावती मुख मुरडून गेली. राजा तें कांहींच मनास न आणितां त्यांचे प्रारब्धावर बोल ठेवून स्वस्थ राहिला.

एके दिवशीं चंद्रप्रभा आणि कलावती दोघीही पुन्हा बागेंत गेल्या असतां कलावतीस चंद्रप्रभा ह्मणाली, आपण मागें येथें आलों होतों; त्यावेळीं तूं बोललीस त्याची तुला आठवण आहे काय? बापानें आपलीं लग्नें केलीं, आतां तरी तुला आनंद झालाना? तुला फार घाई झाली होती. तें ऐकून कलावती ह्मणाली, ताई, तुला काय सांगूं. माझ्यानें बोलवत नाहीं. माझ्या प्रारब्धीं होतें, तसें घडलें. आतां कोणास शब्द लावावा पण

ताई, माझे मनासारिखें झालें नाहीं. असें कलावतीचें भाषण ऐकून चंद्रप्रभा उगीच राहिली. नंतर दोघी घरी आल्या. कलावतीचे मनास तो पति न आल्यामुळें तिचें मन स्वस्थ नव्हतें. परंतु राजाचे धाकामुळें तिचा कांहीं उपाय चालेना.

रत्नाकरा, कलावतीची गोष्ट तुला पुढें सांगेन. पण अगोदर चंद्रप्रभेची गोष्ट सांगतों ऐक.

चंद्रप्रभेचा पति कमलाक्ष लग्न होऊन स्वगृहीं गेल्यावर त्यास शिकारीस जाण्याची फार हौस असल्यामुळें एके दिवशीं अरण्यांत फिरत असतां, एका वृक्षा खालीं कोणी एक गोसावी आंगास राख लाविलेला बसला आहे असें पाहून त्याचे जवळ येऊन प्रणिपात केला आणि ह्मणाला, महाराज आपण त्या अरण्यांत बसलां आहां. येथें थंडी, वारा इत्यादिकांची पीडा होत असेल, तर तुह्मी आमच्या नगरांत येऊन राहिल्यास हें दुःख भोगावें लागणार नाहीं. असें ऐकून गोसावी ह्मणतो, बाबारे नगरांत राहण्या पेक्षां हें अरण्यच आम्हांस आनंददायक आहे. आह्मांस त्या सुखाची गरज नाहीं. आह्मी सर्वस्वाचा त्याग करून येथें येऊन बसलों आहों. असें ह्मणतांच कमलाक्ष ह्मणतो, महाराज आपण सर्वस्वाचा त्याग केला ह्मणतां, त्यापक्षीं पूर्वी गृहस्थाश्रमी असून आतां त्या स्थितींत आलां आहां असें वाटतें. तर काय प्रकार आहे तो कृपाकरून मजला सांगावा. असें ऐकतांच प्रथम गोसाव्याचे नेत्रांतून पाणी आलें. परंतु पुन्हा क्रोध येऊन ह्मणाला, तुला सांगून काय उपयोग? आहे. कमलाक्ष ह्मणाला, महाराज कृपाकरून सांगितल्यास त्या पासून माझा कांहीं तरी फायदा होईल. असा त्याचा आग्रह पाहून गोसावी सांगूं लागला. बाबारे, मी पूर्वी भागीरथीचे कांठीं सुवर्णपुर नगरांतला-व्यापारी होतों. माझे जवळ सुमारें पांच कोटी रुपयांची मत्ता होती. देशोदेशीं माझ्या हुंड्या चालत असून चोहोंकडे माझा लौकिक होता. माझे वाड्यांत दास, दासी, शिपाई, कारकून इत्यादि सर्व असत. माझी स्त्री रूपानें फार

सुंदर असल्यामुळें तिजवांचून मला एक क्षणही चैन पडत नसे. एखादे वेळीं मी परगांवीं जाऊं लागलों असतां, माझ्या स्त्रीनें मी न जावें ह्मणून फार हट्ट घ्यावा. फार जरूरीचेंच काम असल्यास मी जात असें, नाहींतर परभारींच सर्व कामें करवीत असें. सारांश, तिचा मजवर इतका लोभ होता कीं, क्षणभर मी दृष्टीस न पडलों, तर तिला ती वेळ कठिण जात असे. मला संतान नव्हतें. एके दिवशीं सूर्यग्रहण पर्वणी होती ह्मणून सर्व लोक गंगा स्नाना करितां गेले होते. कित्येक स्त्रियाही नाना प्रकारची पूजा सामग्री घेऊन स्नाना करितां गेल्या होत्या. कित्येक भिक्षुक ब्राह्मण पूजा सांगण्या करितां जागोजाग हातीं साहित्य घेऊन फिरत होते. अशा समयीं मीही स्नाना करितां तेथें गेलों होतों. नंतर वाळवंटांत वस्त्रें ठेवून स्नान करून वस्त्रें पांघरून बसलों होतों, इतक्यांत माझे जवळच पलीकडच्या बाजूस कांहीं स्त्रिया स्नान करण्यास आल्या असतां स्नान करून गंगापूजन झाल्यावर परस्पर सुख दुःखाच्या गोष्टी सांगूं लागल्या. ( एके ठिकाणीं पुष्कळ स्त्रिया मिळाल्या ह्मणजे कांहींतरी गोष्टी निघतच असतात. ) इतक्यांत कोण स्त्री कशी आहे, या विषयीं गोष्टी निघाल्या. त्या मला ऐकूं येत होत्या. एक ह्मणते, बाई, गोपाळशेटीची बायको राधाबाई चांगली आहे हो. तिला मोठेपणाचा अभिमानच नाहीं. दुसरी ह्मणते, माधवदासशेट याची बायको पण दयाळू आहे. तशीच गोपिकाबाई देखील चांगल्या स्वभावाची आहे. पण बाई तिला कोणाचे घरीं जाण्यास अगदीं बनत नाहीं, परंतु आह्मी तिजकडे गेलोंतर आमचा सन्मान करिते हो. तिसरी ह्मणते, तुह्मी सगळ्या वाखाणाल्याल,पण मोठ्या शेटची (माझी) बायको यमुनाबाई सगळ्यांत चांगली असून ती कधींच बाहेर पडत नाहीं. तिची नवऱ्यावर अतिशय प्रीति आहे. फार काय सांगूं, ती केवळ पतिव्रताच आहे. अशा परस्पर बोलत असतां, त्यांचे जवळच रामकृष्णभट ह्मणून एक ब्राह्मण बसला होता, तो

माझ्या समोरच होता. माझे बायकोस पतिव्रता ह्मटल्याचें ऐकून त्यानें नाक मुरडलें, तें माझ्या दृष्टीस पडलें, तेव्हा मी मनांत समजलों कीं, माझ्या बायकोचें वर्णन ह्या करीत होत्या, इतक्यांत त्यानें नाक मुरडल्यावरून खचीतपणें तिचें कांहीं तरी वाईट कृत्य असावें. असा संशय येऊन लागलाच माझे मनास जो त्वेष आला, तो सांगतां येत नाहीं. मला चैन पडेनासें झालें. घरीं येऊन पाहिलें तों माझी वाट पाहत बायको बसली आहे. मी घरांत गेल्यावर नित्याप्रमाणें प्रीति पुरःसर वागूं लागली. परंतु त्वेष आल्यामुळें तें कांहींच मला गोड लागेनासें झालें. मजला असें वाटे कीं, एकदां काय गोष्ट आहे ती कळेल, तरच बरें होईल. नंतर मी जसें तसें भोजन केलें, आणि बायकोस कळूं न देतां भटजींचे घरीं गेलों; तों भटजी भोजन करून पानसुपारी खात बसले होते. त्यांनीं मला पाहतांच मनंजीवर बसविलें. पानसुपारी वगैरे देऊन येण्याचें कारण विचारल्यावर मी बोललों, भटजी महाराज, आपण आज गंगेवर स्नानास गेलां होतां, त्यावेळीं माझे बायकोची गोष्ट निघाली होती, ती ऐकून तुह्मीं नाक मुरडलें, त्याचें कारण काय तें मला खरोखर सांगा. भटजी ह्मणाले, अहो केव्हां? मला स्मरण नाहीं. तुह्मीं का तेथें आले होतेत.? मी पूजेच्या गडबडींत होतों. मला कांहीं माहीत नाहीं. असें भटजींनीं उडवाउडवीनें भाषण केलें. कांहीं केल्यानें सांगेनात. नंतर मी तेथून घरीं आलों. इकडे बायकोचा तर नित्याप्रमाणें पाठ चाललाच होता. कधीं ही माझी अवज्ञा केली नाहीं. दिवसें दिवस अधिकच प्रीति दाखवीत असे. पण माझे मनांत एकदां जो संशय आला तो जाईना. पुनः दुसरे दिवशीं भटजी बुवा यांजकडे गेलों आणि अति आग्रह धरून विचारूं लागलों, तरी ते कांहींच बोलेनात. फारच गळीं पडल्यासारिखें मीं केलें, तेव्हां ह्मणाले, शेटजी, मला कांहीं माहीत नासून तुह्मी विचारितां, तर काय सांगूं? पण मला असें वाटतें कीं, त्यावेळीं माझ्या नाकावर माशी बसली असेल, ह्मणून

मी नाक मुरडलें असेल. तुह्मांस मात्र तें विपरीत दिसलें पहा. असेंही एखादे वेळीं होतें. या विषयीं तुह्मांस एक गोष्ट सांगतों.

एके दिवशीं आमच्या शेजारीं रामभाऊ ह्मणून एक व्यापाऱ्याचा कारकून राहत होता, त्याजकडे त्याचे कांहीं मित्र वगैरे एखादे समयीं येऊन बसले ह्मणजे करमणूकी करितां जुन्या कादंबरीच्या गोष्टी चालत असत. एके दिवशीं गोष्टीत एक कोतवालाची फजीती झाल्याची गोष्ट बोलत आहेत, इतक्यांत त्यामार्गानें गावचा कोतवाल घस्ती करितां फिरत होता. त्याचे कानीं ती गोष्ट पडली. परंतु गोष्टीचें मूळ अथवा शेवट कांहींच त्यास नसमजतां तींतील थोडकेच शब्द कानीं पडले. त्यामुळें त्याचे मनांत असें आलें कीं, हे माझी निंदा करीत बसले आहेत. असें मनांत येऊन निघून गेला. दुसरे दिवशीं रात्रीं त्याच ठिकाणीं येऊन, त्यांजवर कांहीं बनाऊ खटला करून त्यास सरकारांत नेऊन शिक्षा दिल्या. असा प्रकार गोष्टीचा आदि अंत ध्यानांत न आणिल्यामुळें झाला. तसें तुह्मी करीत आहां. खरोखरच तुह्मी विचारितां ही गोष्ट माझे ध्यानांत देखील नाहीं. असें भटजींनी निक्षून सांगतांच मीउगाच राहून घरीं आलों. तो दिवस गेला. पुन्हा दुसरे दिवशीं मीं विचार केला कीं, या गोष्टीची खात्री होईल तरच हा जीव वांचेल. नाहीं तर दिवसें दिवस याचसंशयानें मी मरणार आहें, तर पुन्हा एक वेळ निकरानें भटजींस विचारून पाहूं, ह्मणून प्रातःकाळींच त्यांचे घरीं गेलों. बरोबर घरांतील कटार कमरेस लावून नेली होती. भटजींस विचारिलें महाराज, कसें काय तुह्मी एकीकडे येऊन मला खचीत काय वर्तमान आहेतें सांगा. नाहींपेक्षांमी असाच झुरणीस लागून मरेन.

**रामकृष्णाभट** – अहो, पण तुह्मींतर शिकस्तच केली. मला माहीत नसून मी काय सांगूं?

**मी** – (रागानें) अहो तुह्मीं मला ठकावितां काय? नाकावर माशी

बसल्याची मुद्रा कशी आणि मनास न आल्याची मुद्रा कशी, हें मला समजत नाहीं कीं काय? तुह्मी नाहींनाहीं ह्मणून मी ऐकणार नाहीं. तर लवकर सांगा पाहूं.

**रा॰भ॰** – मी सांगत नाहीं. आतां तुह्मी काय करणार? कायहो पण जुलूम हा, मी सांगूं, तरी काय?

**मी** – ( हातांत कटार घेऊन ) भटजी महाराज, तुह्मी सांगत असाल, तर बरें आहे, नाहीं पक्षीं पहा हा मी तुमचे पुढ्यांतच ह्या कटारीनें आपलें शिर कापून प्राण देतों.

असें ह्मणून कांहीं वेळ वाट पाहून हातांतील कटार आपले मानेवर ठेवून मान कापण्यास सिद्ध झालों. हें पाहून भटजी घाबरून गेले. आणि माझा हात धरून ह्मणतात, बावारे, आतां तूं आपल्या प्राणांवरच उदार झालास, तर तुला सांगतों ऐक.

**रा॰भ॰** – पहा, तें समोरच तुमचें घर आहेना. येथून मला सर्व दिसत आहे. पण सांगतों असें करा, ह्मणजे सर्व तुमच्याच दृष्टीस पडेल. उद्यां सकाळीं बाहेर गांवीं आठचार दिवसांचे मुदतीनें जाण्याचा घाट घालून तयारी करा आणि सर्वत्रांस गेल्याचा बहाणा दाखवून माझे घरीं येऊन रहा. ह्मणजे काय आहे तें मी दाखवीन.

असे भटजींचे शब्द ऐकून माझे मनांत जी धडकी भरली ती सांगतां येत नाहीं. मला कंप सुटला. घरीं जाण्याची सुद्धां शुद्धि राहिली नाहीं. परंतु तसाच घरीं आलों आणि पाहतों तों बायकोच्या प्रीतींत कांहींच अंतर नाहीं. त्यावरून मला मोठें आश्चर्य वाटलें आणि ही रात्र जाऊन उजाडतें केव्हां असें मला झालें. रात्रींच बायको जवळ उदईक बाहेर गांवीं जावयाचें काम आहे असें बोलूं लागलों, त्यावेळीं न जाण्या विषयीं तिनें फारच हट्ट धरिला. तुह्मी गेल्यावर मग मी इकडे आठदिवस कोंचेन

ही आशाच नको, असें ती बोलली. राजपुत्रा, कायरे सांगूं. त्या वेळीं मी कसा मूर्खा सारखा राहून तिचे ते कपटी बोल मधुर मानीत होतों. असो, दुसरे दिवशीं प्रातःकाळीं बाहेर गांवीं जाण्याची तयारी केली. शिपाई, कारकून बरोबर घेतले. चांगला घोडा बसण्या करितां घेतला. बरोबर कटार, तलवार अशीं हत्यारें घेतलीं. याप्रमाणें खरोखरच तयारी करून निघून गेलों. त्यावेळीं तिनें बहुतच आकांत केला. पण कांहीं न मानितां गेलों. पुढें सुमारें चार कोस लांब गेल्यावर बरोबरचे सर्व लोकांस सांगितलें कीं, मी हुंड्यांचे कागद घेण्यास विसरलों आहें, तर आतां परत जाऊन येई पर्यंत तुह्मी येथेंच रहावें. मला उशीर लागला तरी कोणी ही परत येऊं नये. अशी सक्त ताकीद देऊन तसाच सुमारें दोन घटका रात्रीस भटजींच्या घरीं मी येऊन बसलों. रामकृष्ण भटजींचें भोजन झाल्यावर सुमारें प्रहर रात्रीस भटजींनीं मला खिडकी जवळ उभें केलें आणि ह्मणाले, शेटजी, समोर पहा, तें तुमचें घर आहे. पहा, ही समोरच तुमच्या घराच्या पिछाडीची खिडकी आहे. त्याचे खालीं शिडी सारखें काय उभें दिसतें? (चांदणी रात्र असल्यामुळें दिसत होतें) असें ह्मणून कांहीं वेळ उभे आहेत, तों शेजारींच एक लष्करी पठाण रहात असे, तो त्या शिडीवर चढून खिडकींतून आंत गेला. असें पाहिलें आणि माझें काळीज धस्स झालें. हर हर! नारायणा! कायरे मूर्खपणा हा! अशी ती दुष्ट स्त्री असून मला तिचे शब्द गोड लागत होते. स्त्रियांचे धैर्याची आणि कपटाची बरोबरी करणारा दुसरा कोणी दिसत नाहीं. असें मनांत आणून भटजींचा विचार घेऊन तसाच हळूच युक्तीनें येऊन बऱ्याच वेकानें त्या शिडीवर चढलों. आंत पाहतों तों दोघें जणें एका पलंगावर निजलीं आहेत. त्यांस गाढ झोंप लागली आहे, असें पाहून जवळ गेलों. आणि तलवारीचा घाव घालणार, इतक्यांत विचार केला कीं, बायकोस मारावें तर स्त्री हत्या होते, त्यापेक्षां त्या दुष्टास मारून निघून जावें. मग

काय होईल ते पाहूं. असें मनांत आणून युक्तीनें हळूच त्या पठाणाचें शिर कापून पलंगा खालीं टाकिलें आणि तसाच घरांतील एका अंधाराचे कोपऱ्यास दडून राहिलों. कांहीं वेळानें त्याचें रक्त वाहून तें त्या दुष्ट कर्मी स्त्रीचे आंगाखालीं वाहत गेलें. थंड लागल्या मुळें ती जागी होऊन पाहते तों तें भयंकर कृत्य दृष्टीस पडलें आणि घाबरली. इकडे तिकडे कोणी मनुष्य आहे काय ह्मणून पाहूं लागली. तेव्हां तिला न सांपडेन अशा अवघड ठिकाणीं मी जाऊन बसलों. ती ह्मणाली कीं, कोणीतरी दुष्टानें त्याच शिडीच्या वाटेनें येऊन हें कृत्य केलें असावें. बरें, असो. ( मी बाहेर गांवीं गेल्यामुळें माझा संशय आला नाहीं. ) मजपाशीं अनेक युक्ति आहेत. असें ह्मणून शिर आणि धड एका वस्त्रांत बांधून माळ्यावर धान्याचें कोठार होतें, त्यांत खोल पुरून ठेविलें आणि वर सुमारें खंडीभर धान्य टाकिलें. अरे ज्या स्त्रीच्यानें तांब्याभर पाणी सुद्धां आणवत नसे, तिचें हें, सामर्थ्य काय? असें आश्चर्य करीत आहें तों तिनें खालीं उतरून रक्तानें भरलेलीं वस्त्रें व बिछाना हीं सर्व जाळून टाकिलीं आणि दुसरा बिछाना घालून स्वस्थ निजली. नंतर हळूच आल्यामार्गानें खालीं उतरून मी भटजीचे घरीं आलों. इतक्यांत उजाडण्याचा समय झाला ह्मणून घोड्यावर बसून जिकडे चार कोशांवर माझे शिपाई व कारकून होते, तिकडे जाऊन पोहोंचलों. त्यांस सांगितलें कीं, आपलें जें काम बाहेर गांवीं जाण्याचें होतें, तें सध्या तहकूब केलें. असें ह्मणून सर्व मनुष्यांसह घरीं परत आलों. तों नित्याप्रमाणें माझी बायको दरवाज्यांत येऊन मी आल्यानें आनंद झाला, असे दाखवून प्रिय भाषण करूं लागली. तसेंच नेहमीं प्रमाणें स्नानाकरितां मला पाणी द्यावयाचें व आंगास सुगंधी तेल लावावयाचें तें त्या दिवशीं तिनें केलें नाहीं. कारण रात्रीचे धान्य उपसण्याचे मेहनती मुळें सर्वांग दुखत होतें. पाणी घेण्यास मलाच सांगितल्यावरून मी ह्मटलें, काय आज आंगास नाहीं का लावावयाचें?

हें ऐकून ती ह्मणाली, माझ्यानें आज उठवत देखील नव्हतें.परंतु तुह्मी आ
ल्याचा आनंद झाल्यामुळे हुशारी आली. इतक्यांत मी हळूच बोललों, रा
त्रीच्या मेहनतीनें आंगदुखत असेल. असें वर्मभेदाचें माझें भाषण ऐकूनती
समजली कीं, तें कृत्य यानेंच केलें असावें. तर आतां यास जिवंत ठेवून उ
पयोग नाहीं. असें ह्मणून घरांत खुंटीस लटकविलेली तलवार होती, ती घेऊन
एका एकीं माझ्या आंगावर धांवून आली. इतक्यांत मी हीतसाच पळत जा
ऊन दुसऱ्या खोलींत ढाल आणि तरवार होती, ती घेऊन येऊन एकदम
एका घायानें स्त्रीचे दोन तुकडे केले. त्यावेळीं माझे मनास वाटलें कीं, अशा
स्त्रीस हेंच शासन योग्य आहे. हें कृत्य मी केलें, परंतु आतां आपण येथें राहून
उपयोग नाहीं, सरकारांत जाऊन मरावें लागेल. ह्मणून जवळच कांहीं गवत
होतें, तें चहूंकडे पसरून घरास अग्नि लावून दिला आणि मी तसाच बाहेर
पडून आलों. नंतर तो वाडा सर्व मालमत्ते सुद्धां जळून गेला. त्यांत माझी
स्त्री ही जळून गेली, असा प्रकार सर्वत्रांस वाटला. अशी हकीकत झाल्यावर
मी सर्वस्वाचा त्याग करून, प्रपंचांत कांहींच सुख नाहीं, हें खचीत समजून
परमार्थ साधन करण्या करितां सद्गुरू जवळ जाऊन त्याची सेवा केली. म
जवर कृपा होऊन अनुग्रह झाला. आतां योगाभ्यास करण्या करितां त्या
अरण्यांत येऊन बसलों आहें. अशी माझी पूर्व कथा आहे कमलाक्षा, तूं
नगरांत येऊन रहा, असें मला ह्मणतोस, तर बाबारे, तें सुख आतां मला
नको. तूं राजपुत्र आहेस. तुला प्रजेचें पालन केलें पाहिजे, ह्मणून तुलाच तें
योग्य आहे. असें त्या गोसाव्याचें भाषण ऐकून कमलाक्ष उगीच राहिला आ
णि त्यास नमस्कार करून आपल्या बरोबरच्या लोकांसह घरीं येण्यास प
रतला. कमलाक्षाचा स्वभाव फार संशयी असल्यामुळे तो वाटेनें मनांत विचा
र करीत चालला कीं, गोसावी यानें जी गोष्ट सांगितली, ती फार चमत्कारिक
आहे. नवरा घरीं असतां पठाणा बरोबर त्या स्त्रीनें व्यभिचार केला आणि

बाहेरून पातिव्रत्य दाखवीत होती. तस्मात् स्त्रिया काय करतील याचा भर-वसा नाहीं. बरें, आपलें लग्न झाल्यापासून आपली स्त्री माहेरींच आहे, ती तरी अशा रीतीनें वागत नसेल, असें म्हणवत नाहीं. कांतर अगोदर स्त्रियां-चें धैर्य मोठें, तशांत मी तिजपाशीं नाहीं, म्हणून तिला काम सहन न होऊन खचीत ती व्यभिचार करीत असेल, यांत संशय नाहीं. यास्तव आपण अगोदर तिकडे जाऊन तिची परीक्षा पहावी आणि निष्पाप असली तर अंगीकार करावा, नाहींतर तिचा नाश करावा. असा त्यानें विचार केला. नंतर हें कृत्य करण्यास केव्हां जाईन असें त्याला झालें.

रत्नाकरा, आतां सायंकाळ झाला, तूं घरीं जा आणि उद्यां चार वाजतां ये. म्हणजे पुढची गोष्ट सांगेन पण घरीं जाऊन त्या निरपराधी स्त्रीचा घात करूं नको हो. असें चिंतामणि बोलतांच रत्नाकर घरीं गेला. तेथें आपल्या स्त्रीस कांहीं न बोलतां नित्याप्रमाणें वागून, दुसरे दिवशीं चार वाजतां चिंताम णीचे घरीं आला. चिंतामणि त्याचे जवळ बसून म्हणाला, रत्नाकरा, पुढें ऐक.

इकडे चंद्रप्रभा आणि कलावती एके दिवशीं प्रातःकाळीं देवीचे पूजना चें साहित्य घेऊन बागेंतून एकमेकींचा हात धरून गोष्टी सांगत जात असतां कारंज्याचे हौदाशीं येऊन उभ्या राहून पाहूं लागल्या. तों आंतील नानाप्र कारचे मत्स्य इकडून तिकडे फिरत आहेत. इतक्यांत मनुष्यांचे भय मानून ते मत्स्य पाण्यांत तळीं जाऊन दिसत नासे झाले, म्हणून ते वर पुन्हा येण्या करितां पूजा साहित्यांतील कांहीं तांदुळ हातांत घेऊन चंद्रप्रभेनें हौदांत टाकिले, तों त्या तांदुळां बरोबर करांगुलींतील मुद्रिका हौदांत पडली. ती तिच्या लक्ष्यांत राहिली नाहीं. ती हौदांतील एका मोठ्या मत्स्यानें गिळिली. पुढें देवी-ची पूजा करून दोघीही आनंदानें घरीं परत आल्या. नंतर भोजनाचे वे-ळीं आपल्या हातांत मुद्रिका नाहीं, असें चंद्रप्रभेनें पाहून चिंताग्रस्त झा ली आणि विचार करूं लागली; परंतु ती कोठें पडली, हें कांहींच सुचेना.

ह्मणून जिकडे तिकडे सर्व ठिकाणीं शोध केला, परंतु सांपडेना. शेवटीं निराश झाली आणि ह्मणते, हे परमेश्वरा, गुरूच्या आज्ञे प्रमाणें त्या मुद्रिकेचें आजपर्यंत प्राणाहून अधिक संरक्षण केलें असून आज एकाए-कीं नाहींशी झाली. त्यावरून माझे प्रारब्धीं कांहींतरी दुःख भोगणें आहे, असें खचित वाटतें. मी तर कोणाचें वाईट न करितां बापाचे आणि गुरूचे आज्ञे प्रमाणें वागून आपल्या प्राणपतीच्या सेवेची इच्छा करीत राहिलें आहें. असें असून दैवयोगानें कांहीं तरी संकट येण्याचें दिसत आहे. असें तिचे मनांत येऊन तिला अन्न पाणीही गोड लागेनासें झालें.

इकडे कमलाक्षाचे मनांत आपल्या स्त्रीची परीक्षा पहावी असा विचार आलाच होता. त्यामुळें तो थोडक्याच दिवसांनीं देशपर्यटन करण्या करितां बापाची आज्ञा घेऊन निघाला. बरोबर एक घोडा मात्र बसण्या करितां घेतला आणि कांहीं जवाहीर व कांहीं मोहरा आणि रुपये बरोबर घेऊन एकटाच नगरांतून श्वशुर गृहीं येण्या करितां निघाला. तो सुमारें चार कोश आ-ल्यावर तेथें एका लहानशा शहरांत जाऊन वेश बदलून व्यापारी बनला आणि पुढें चालता झाला. आपल्या नगरापासून वीस कोशांवर आला, तों सायंकाळ झाल्यावर एका शहराचे बाहेरील मारुतीचे देवळांत वस्तीस उ-तरला. तेथें दुसरें कोणीच मनुष्य नव्हतें. नंतर देवळा समोरचे तळ्याचें पा-णी आणून कांहीं फराळ करून बिछाना घालून पडून राहिला. इतक्यांत तेथून जवळच मनुष्याचा शब्द ऐकूं आला. ह्मणून तिकडे कानदेऊन ऐकत आ-हे, तों असे शब्द ऐकिले कीं, " कोणी देवळांत उतरला आहे, त्यानें ही जागा सोडून जावें, नाहींतर कांहीं वेळानें त्याचा मृत्यु जवळ आला आहे असें समजा-वें,, तें ऐकून कमलाक्ष भयभीत झाला. आणि मनांत विचार करितो कीं, हा शब्द मनुष्याचा ह्मणावा, तर कोणी दिसत नाहीं. त्या पक्षीं पिशाच तर न-सेल.? आपण येथून जावें हेंच बरें आहे, नाहींतर विषाची प्रतीती कोणी

पडावी. असा विचार करून चांदण्यामुळें मार्ग दिसत होता ह्मणून कमलाक्ष गांवाकडे येत आहे, तों अकस्मात् अत्यंत सुंदर रूपवान् आणि तारुण्याचे भरांत आलेली अशी एक स्त्री त्याचे दृष्टीस पडली. ती अशी होती कीं, जिचें रूप पाहतांच पुरुषाचें मन मोहित झाल्यावांचून राहणारच नाहीं. तशीच तिची वाणी ही मोहकारक होती. तिला पाहून याची अक्कल गुंग होऊन मनांत ह्मणतो, ही मनुष्य ह्मणावी, तर हिला एवढ्या रात्रीं याठिकाणी येण्याचें कारण दिसत नाहीं. हिच्या बरोबर ही कोणीच नाहीं. जर पिशाच ह्मणावी तर रूपानें सुंदर आणि तारुण्याचे भरांत दिसत आहे आणि पिशाचाचीं लक्षणें कांहींच दिसत नाहींत. त्यापक्षीं आतां हिलाच विचारावें. मग काय होईल तें होवो. असा विचार करून त्यानें "एवढ्या रात्रीं तूं येथें कोण व कशासाठीं आली आहेस?" असें दोन तीन वेळां मोठ्यानें विचारिलें. परंतु ती कांहीं उत्तर देईना. ह्मणून अगदीं जवळ जाऊन पाहतांच तिचें अत्यंत सुंदर रूप असल्यामुळें कमलाक्षाचे मनांत काम उत्पन्न झाला आणि ह्मणतो, हे स्त्रिये, एक शब्द तरी बोल. मौन कां धरिलें आहेस? असे कमलाक्षाचे शब्द ऐकून ती स्त्री ह्मणते, अरे, तूं कोण आहेस? मजला एकाएकीं, स्त्री ह्मणतोस, तुला कांहीं लज्जा वाटत नाहीं? तूं मला ओळखिलें नाहींस. परंतु तुझ्यासारखे स्त्री ह्मणणारे, माझे हातून आजपर्यंत अनेक मरण पावले आहेत. तशीच तुझी दशा होणार आहे असें मला दिसतें. असें ऐकतांच कमलाक्ष कांहींसा भयभीत झाला. परंतु शूर असल्यामुळें धैर्य धरून ह्मणतो, अगे, तूं स्त्री आहेस. तुझ्यानें माझें काय होणार आहे? उगाच मला भय घालून मी भिणार नाहीं. मला असें वाटतें कीं, तूं माझें धैर्य आणि मन पाहत असशील. याकरितां अगोदर तूं कोण आहेस हें सांग. मग जें करणें असेल, तें कर. हें ऐकतांच तिनें एकाएकीं कमलाक्षाचे गळ्यास मिठी मारिली. आणि ह्मणाली, प्राणप्रिया माझा अंगीकार करावा.

मी तुमचें धैर्य पाहून तुमची स्त्री झालें. आतां आपण सुखानें विलास करूं, नंतर मी कोण आहें हें आपणांस समजेल. कमलाक्ष अगोदरच कामातुर झाला होता, त्यानें तें मान्य केलें. परंतु मार्गांत असल्यामुळें ह्मणाला, भगे, तूं ह्मणतेस हें मला मान्य आहे, पण अशा उघड्या मार्गांत ही गोष्ट करणें योग्य नाहीं. ह्मणून तुझें राहण्याचें ठिकाण असेल तेथें जाऊन आपण विलास करूं. तें तिनें कबूल केलें नंतर दोघेंही एकमेकांच्या हातांत हात घालून पुढें जाऊं लागलीं. इतक्यांत एक पुरुष मार्गानें येत आहे असें दिसलें. त्यास पाहून कमलाक्षाचे मनांत लज्जा उत्पन्न झाली आणि त्या स्त्रीचा हात सोडून जरासा दुरून चालूं लागला, ह्मणून स्त्री ह्मणते, प्राणप्रिया, आपण भिऊं नये. जो येत आहे तो माझा दास आहे. असें ह्मणून जवळ येऊन त्याचा हात धरिला. जरा पुढें जातांच तो मनुष्य भेटला आणि या दोघांस पाहून ह्मणतो, कायहो तरी निर्लज्ज हीं! रस्त्यांत एकमेकांचा हात धरून चाललीं आहेत! असें ह्मणून अगदीं जवळ येऊन ह्मणतो, तुह्मी कोण आहां? एवढ्या रात्रीं दोघें कोणी कडे गेलां होतां? तें ऐकून कमलाक्ष कांहींच बोलला नाहीं. पण ती स्त्री बोलली, आह्मी मार्गानें जांत आहों, तसाच तूं आपल्या मार्गानें जा. आमची हकीकत विचारण्याचें काय कारण आहे? असें तिचें उत्तर ऐकतांच तिच्या कठोर शब्दावरून ही कोणी स्त्री या पुरुषाचे नादीं लागून फिरत आहे असें समजून ह्मणाला. मी शहरचा कोतवाल आहें. मला जबाब दिल्यावांचून तुह्मांस मी पुढें जाऊं देणार नाहीं. हें ऐकून त्या स्त्रीनें असा विचार केला कीं, कोतवालास देखील आपण मोहित करावें, ह्मणजे आपलें सर्व काम साधेल. असें मनांत आणून ह्मणते, कोतवाल साहेब, मी बोललें ह्मणून आपण रागें भरूं नये. मी आपली दासी आहें. असें ऐकतांच कोतवालास आश्चर्य वाटलें. परंतु दुसरा मनुष्य (राजपुत्र) जवळ असल्यामुळें त्याच्यानें कांहीं बोलवे ना.

परंतु त्या स्त्रीचें सुंदर रूप पाहून तो मोहित होऊन तिचे मागून चालूं लागला. असें पाहून ती ह्मणते, कोतवाल साहेब, मी एवढ्यारात्रीं इकडे आलें, याचें कारण काय ह्मणाल तर आजपर्यंत बहुत दिवस तुमच्याशीं एकांत भाषण करण्याची इच्छा करीत होतें, पण तशी संधी कधींच आली नाहीं. आपण नित्य मार्गानें घस्तीस फिरतां असा शोध काढून आज आपणा साठीं आलें आहें. तर मनाप्रमाणें आज हेतु सिद्धीस जाणार असें दिसतें. (कोतवाल असें समजला कीं, बरोबरचा पुरुष हा कोणी तरी हिच्याच मताचा असावा.) तर आतां आपला कसा विचार आहे? कोतवाल ह्मणतो तुझ्या मर्जी प्रमाणें मी सिद्ध आहें. याप्रमाणें कोतवाल ही नादीं लागलासें पाहून स्त्री ह्मणते, कोतवाल साहेब, आपण आपल्या घरीं जाऊन आनंदानें विलास करूं. आपणांस आतां कोणाचें भय नाहीं. आज माझे घरांतील सर्व माणसें दुसरें गांवीं गेलीं आहेत, त्या मुळें ही संधी चांगली साधली आहे. असें ह्मणून त्यास घेऊन जाऊं लागली. एका हातांत राजपुत्रास धरिलें आणि दुसरे हातांत कोतवालास धरिलें. पुढें जातां जातां एक लहानसें घर ओसाड होतें तेथें संकेता प्रमाणें आणून दोघांसही तेथें बसविलें आणि कांहीं वेळानें ह्मणते, कोतवाल साहेब, आपल्या मनाप्रमाणें हेतु सिद्धीस जाण्यास आज वेळ बराच साधला आहे. तर आतां उशीर कां करावा, असें ह्मणून तिनें त्या घरांत जाऊन कोतवालास खुणा केली कीं, आपण आंत यावें. तो मोहित झालेला कोतवाल आंत गेला आणि पाहतो तों तेथें अंधार आहे. परंतु तिच्या नादीं लागल्यामुळें ती ह्मणे तसें करणें भाग पडलें. त्यास अंधारांतच बसवून ह्मणते, कोतवालसाहेब, आपण अशा अंधारांत रहावें हें ठीक नाहीं. दिवा लावण्याची कांहीं तजवीज करूंया. असें ह्मणून त्यास तेथेंच बसवून दिव्याचे निमित्तानें एकीकडे जाऊन पुन्हा परत येऊन ह्मणते,

आज घरांत विस्तव नाहीं. ह्मणून आपण शेजारचे घरांतून दिवा आणूं. असें ह्मणून बाहेर आली आणि कमलाक्षाचे जवळ येऊन ह्मणते, प्राणप्रिया, आपल्या आनंदांत हें विघ्न आलें आहे, तरी युक्तीनें त्यास फसवून आपला मनोरथ सिद्धीस नेतें. आपण उतावीळ मात्र होऊं नये. स्वस्थ असावें. असें ह्मणून त्या घराचे बाहेरचे खोलींत तिचा साथी तिनें ठेविला होता, त्यास सुचविलें कीं, आपलें कार्य आज चांगलें साधत आहे, परंतु मी आल्यावर हूं ह्मणेन, त्यावेळीं तूं माझे पायाजवळचें सामान घेऊन पळून जा. अशी सूचना करून आंत गेली आणि ह्मणते, कोतवालसाहेब, आपल्यासाठीं दिवा आणिलाच पाहिजे; परंतु मजला बाहेर जाण्यास भीती वाटते आणि येथें सेवक होता, तोही गेला. तर आपले जवळचें हत्यार मजला द्यावें. ह्मणजे मी आतां लवकरच दिवा आणितें. आणि कांहीं आपल्या करितां, विड्याचे साहित्यही आणितें. असें ह्मणतांच त्या मोहित झालेल्या कोतवालानें आपले हातांतील तरवार तिजला दिली. ती घेऊन बाहेर आली आणि राजपुत्रास हळूच हातीं धरून दुसऱ्या खोलींत (सोबती होता त्या खोलींत) घेऊन गेली. दोघेंही एकमेकांचे गळ्यांत हात घालून बसली असतां उतावळा झालेला कमलाक्ष तीस हळूच ह्मणतो, आतां उशीर लावूं नये. आपला मनोरथ सिद्धीस न्यावा. स्त्री ह्मणते, इतके उतावीळ कां होतां? त्यामेल्या कोतवालाचें विघ्न आलें आहे, तें टाळलें पाहिजेना. अशीं हळू हळू भाषणें होत आहेत, इतक्यांत कमलाक्षानें आपले जवळचें सामानाचें गांठोडें जमिनीवर ठेविलें. असें पाहून तिनें खुणा करितांच सोबती तें उचलून घेऊन हळूच निघून गेला. अनंतर स्त्री ह्मणते, प्राणप्रिया, आतां असें करून उपयोगी नाहीं. त्यामेल्या कोतवालाची कटकट युक्तीनें दूर करून येतें. असें ह्मणून तेथून निघून घरीं आली. आज आपला धंदा चांगला साधला, असें ह्मणून तिनें तें गांठोडें सोडिलें, तों त्यांत कांहीं मोहरा, कांहीं जवाहीर, व कांहीं रुपये असें बहुत द्रव्य सांपडलें. तें पाहून ती आपले

चातुर्याची वाहवा करीत राहिली.

इकडे कोतवाल आणि कमलाक्ष तिची वाट पाहत बसले, परंतु ती परत आली नाहीं. ह्मणून निराश होऊन प्रथम कोतवाल बाहेर आला आणि कांहीं वेळ उभा राहून ह्मणतो, अरे, मी कोतवाल असून माझी तरवार ही घेऊन मला त्या स्त्रीनें फसविलें काय.? तस्मात् मजला धिक्कार असो. स्त्रियांचें धैर्य अचाट आणि कर्म दुष्ट आहे हें खचीत झालें. हे कोतवालाचे शब्द राजपुत्रानें ऐकिले आणि आपले गांठोडें पाहतो तों तें जवळ नाहीं. आपणांस ही तिनें फसविलें, असें समजून दोघेही समदुःखी झाले, त्यामुळें एकमेकांची लज्जा नाहीं ह्मणून कमलाक्ष बाहेर आला आणि ह्मणतो, कोतवाल साहेब, तुमची तरवारच गेली, पण माझें सर्व द्रव्य गेलें. आतां आह्मी दोघेही हिच्या नादीं लागून फसलों. तर हा दोष तिजकडे नाहीं. आह्मीच नादीं लागलों नसतों, तर असें कां झालें असतें.

**कोतवाल** - तूं कोण आहेस, ?

**कमलाक्ष** - मी व्यापारी देवळांत उतरलों होतों. तेथून पिशाचाचे भयानें गांवांत येत असतां, हिची गांठ पडली आणि हिच्या रूपास मोहित होऊन फसलों. असो, तुह्मी आह्मी यासमयीं मित्र झालों आहों. आतां प्रारब्धावर बोल ठेवून राहूं.

असें ह्मणून दोघेही खिन्न झाले. परंतु ते चतुर आणि विद्वान् असल्यामुळें त्यांनीं असा विचार केला कीं, स्त्री असून हिनें आह्मांस फसविलें त्या अर्थी ही कोठील कोण आहे त्याचा शोध करून हिला शिक्षा केली पाहिजे. हिनें आजपर्यंत असे अनेक लोक फसविले असतील, असा विचार करून कोतवाल ह्मणाला..

**कोत०** -मित्रा, ही कोण असावी असें तुला वाटतें ?

**कम०** - मी देवळांत असतां, शब्द झाला आणि तेथें कोणीच मजला

दिसलें नाहीं; त्यावरून असें वाटतें कीं, ही कोणी तरी पिशाच्च असावी.

**कोत०** - तुह्मी पिशाच ह्मणतां, परंतु जर ही पिशाच असती तर माझ्या तरवारीचा तिला काय उपयोग होता? आह्मांस मोहित करून तिनें आणिलें, त्यापक्षीं जर पिशाच असती, तर आम्हां पासून उपभोग घेऊन आमचे हाल केले असते. परंतु तसें नकरितां तिनें भामट्या सारखी मात्र कृति केली, यावरून मला असें वाटतें कीं, हिचा लोकांस मोहित करून नागविण्याचा धंदा असावा.

**कमलाक्ष**-जर ही भामटी आहे ह्मणावी, तर हिनें आजपर्यंत बहुत लोकांस फसविलें असेल, पण अद्यापि कोणी हिला धरीत नाहीं. यावरून आश्चर्य वाटतें. हिच्यारूपास आह्मीं भुललों अशीच लोकांची गति होत असेल काय?

**कोत०** - मला असें वाटतें, ही त्या गांवांतली राहणारी नसावी. कशावरून ह्मणाल, तर अशा दुष्ट कृत्यामुळें ही कधींच शिक्षा पावली असती. त्या शहरांतील लोक सुज्ञ असून न्यायाधीश फार चतुर आहेत आणि सरकारी बंदोवस्त ही चांगला आहे. कधीं कोणाचे घरीं चोरी होत नसून सर्व लोक सुखी आहेत.

**कम०** - मला असेंच वाटतें कीं, ही बाहेर गांवचे फिरस्त्यास मात्र रस्त्यावर गांठून आह्मां प्रमाणेंच नागवितें. परंतु ते आपण मोहित होऊन फसतात ह्मणून लज्जेनें बोभाट करीत नाहींत.

अशा अनेक प्रकारच्या कल्पना करीत बसले. नंतर तिचा शोध लावण्याचा प्रयत्न करावा, ह्मणून त्या ओसाड घरांतून निघून शहरांत आले. राजपुत्रास कोतवालानें आपले बिऱ्हाडीं आणिलें. आणि त्याची सुश्रूषा चांगली ठेविली. बरीच रात्र झाली होती, ह्मणून दोघेही निद्रिस्त झाले.

रत्नाकरा, आतां मला बाजारांत जावयाचें आहे ह्मणून तूं घरीं जा.

आणि उद्यां असाच ये. रत्नाकर ह्मणाला, अरे, तूं जाते वेळीं सत्यभामेच्या घराकडू-नच जाशील. तेव्हां साधल्यास तिकडची कशी काय अवस्था आहे हें लक्ष्यांत आण हो. आतां मी घरीं जातों असें बोलून तो निघून गेला आणि चिंतामणि बाजारांत गेला. दुसरे दिवशीं नित्याप्रमाणें रत्नाकर येतांच चिंतामणि ह्मणाला. अरे. काल ती खिडकींत दिसली नाहीं. पण दासी मात्र बाजारांत भेटली. मी तिला हाक मारिली, तरी न बोलतां तीचालती झाली. यावरून तिनें तुझ्याबायको विषयींची बनाऊ गप्प तुला कळविली हें सिद्ध झालें. असो, आतां कालची गोष्ट पुढें सांगतों ऐक.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं कमलाक्षानें आपला घोडा मारुतीचे देवळाजवळ होता तो आणून कोतवालाचे आंगण्यांत बांधून ठेविला. नंतर दोघांनीं एकांतीं बसून युक्ति काढिली कीं, जसें आपणांस हिनें फसविलें, असेंच ही पुन्हा कोणास तरी फसवीलच. ह्मणूनआतां असें करावें कीं, आपला कोणी मनुष्य देवळांत वस्तीस पाठवून त्याचे शोधावर आपण राहूं आणि तिला पकडूं. असा विचार करून पुढें चार पांच दिवस जाऊं दिले. नंतर तेथें शेजारींच एक वीरबळ ह्मणून रजपूत राहत असे. तो धीट आणि चतुर होता. त्यास त्यांनीं बोलावून आणिलें आणि सांगितलें कीं, तूं धीट आणि हुशार आहेस, तसाच शक्तीनें व पराक्रमानें बळकट आहेस. ह्मणून तुला आह्मी एक काम सांगतों, तें केलें पाहिजे. असें ह्मणतांच तो वीरबळ रजपूत तयार झाला. त्यास त्यांनीं सांगितलें कीं, कोणी एक स्त्री मार्गस्थांस नागवीत असते, तिचा शोध करणें आहे, याकरितां तूं सायंकाळीं मुशाफराचा वेश घेऊन मारुतीचे देवळांत जाऊन रहा. आणि तेथें निजल्याचें सोंग कर. नंतर तुला कांहीं शब्द ऐकूं येईल. त्यास न भितां शहरांत परत येऊं लाग. मग मार्गांत एक स्त्री भेटेल. ती तुला शहराबाहेरच्या ओसाड घरांत नेईल आणि तुझे जवळचें गांठोडें घेऊन जाईल. इतक्यांत आह्मीं दोघेही तेथें येऊन तिला धरूं, असा त्यांनीं त्या जवळ-

ठराव करून सायंकाळीं त्यास एक गांठोडें बनावून दिलें. त्यांत फाटकीं वस्त्रें घालून एक तांब्याचें भांडें मात्र बांधिलें. अशा तयारीनें त्यास देवळांत पाठविलें. नंतर तो तेथें जाऊन उतरला असतां पूर्ववत् शब्द झाला, तो ऐकून न भितां तो शहरांत येऊं लागला, तों मार्गांत त्या स्त्रीची गांठ पडली. वीरबळास पाहून ती ह्मणते.

**स्त्री** – कोण हो तुह्मी, कोठून आलां, आणि कोठें जातां? थांबा जरा मला ही तुमच्या बरोबर यावयाचें आहे.( असें ह्मणून चालूं लागली. पुन्हा ह्मणते,) अहो, तुह्मी तर वाटसरू दिसतां. एवढी रात्र पर्यंत कोठें होतां.?

**वीरबळ** – मी रात्रीचाच मार्ग चालत असतों. कां ह्मणाशील, तर दिवसा उन्हाचा ताप असतो. रात्रीं थंड हवा लागते. मला कोणाची भीति वाटत नाहीं. आतां कोठें तरी गांवांत वस्तीस राहूं ह्मणजे झालें.

**स्त्री** – अहो, तुह्मी जर गांवांत वस्तीस राहणार, तर चला माझ्या घरीं मी तरी एकटीच असतें. मला सोबत होईल. आणि तुमची ही कर्मणूक होईल.

**वीर०** – मला तूं घरी या ह्मणतेस, पण तूं कोण आहेस व तुझें घर कोठें आहे हें मला सांग.

**स्त्री** – माझें घर जवळच आहे. माझे घरांतील सर्व मनुष्यें कांहीं कामा करितां दुसऱ्या गांवीं गेलीं आहेत. तीं सुमारें आठ दिवसांनीं येतील तों पर्यंत मला एकट्यानेंच दिवस काढिले पाहिजेत, अशा काळजींत होतें. आतां तुह्मी सज्जन मजला मिळालां तर फार बरें झालें. माझी जात घरीं गेल्यावर तुह्मांस कळेल.

असें तिचें भाषण ऐकून वीरबळ तिजकडे न्याहाळून पाहतो, तों ती अत्यंत रूपवान् आणि भर उमेदींत. आलेली अशी त्याला दिसली. आणि

कोतवालानें सांगितलेला संकेत विसरून तिला मोहित झाला आणि तिच्या सारखें ऐकूं लागला. नंतर ह्मणतो, हे स्त्रिये, तूं ज्यापक्षीं मला घरीं बोलाविनेस, त्यापक्षीं मी येतों, पण मला तुजकडे येऊन लाभ काय? हें ऐकून स्त्री ह्मणाली, कायहो, माझ्या बोलण्याचा भाव तुह्मांस कळला नाहींसें वाटतें. असें पहा कीं, आमची स्त्रियांची जात, आह्मी सर्व काळ सासुरवासांत रहावें. तशांत माझा नवरा आहे, तोमेला माझ्या उपयोगी नाहीं. ह्मणून मला ज्यावेळीं संधी साधते त्या वेळीं तुमचे सारखे परोपकारी पुरुषां पासून मी आपला निर्वाह करून घेतें. त्या तारुण्यांत जें सुख भोगावें, तें माझे प्रारब्धीं नाहीं. मी तरी काय करावें? असो. आतां तें बोलून उपयोगी नाहीं. सध्या तुह्मीच माझे हेतु पूर्ण केले आहांत. असें तिचें भाषण ऐकून वीरबळ तर अगदींच तल्लीन झाला आणि मनांत ह्मणाला ही तर अगदींच माझ्या नादीं लागली आहे. आतां काय होतें, तें पाहूंतर खरें. कदाचित् माझ्याजवळच्या गांठोड्याचीच इच्छा धरून मजला नेत असेल, तर गांठोड्यांत कांहीं ऐवज नाहीं. हें गेलें तरी चालेल. पण अशी स्त्री मिळत असतां आपण कां सोडावी? असा विचार करून त्यानें एकदम तिचा हात धरिला आणि दोघें ही शहराकडे येऊं लागलीं. तिनें तेथून जवळच दुसरें एक ओसाड घर होतें, तेथें त्यास आणिलें आणि अगदीं वश झाल्याचें दाखवून कांहीं वेळ त्या पाशीं गोष्टी सांगत बसली आहे, तों वीरबळानें गांठोडें खालीं ठेविलें. इतक्यांत तिचा सोबती संकेतानें तेथें होताच, तो तें उचलून घेऊन पळाला. नंतर ती पाणी पिण्याचे निमित्तानें बाहेर आली आणि तशीच चालती झाली. कांहीं वेळ वीरबळानें वाट पाहिली. परंतु ती परत आली नाहीं. ह्मणून हिनें मला ही ठकविलें असें त्याचे मनांत येऊन गांठोडें पाहतो तों, तें ही नाहीं. ह्मणून मनांत खिन्न होऊन आपले ठिकाणीं परत आला.

इकडे कोतवाल आणि कमलाक्ष पूर्वींच्या ओसाड घराजवळ वाटपाहत

बसले होते; तों फार रात्र झाली, तथापि तेथें कोणीच आलें नाहीं, ह्मणून मारु तीचे देवळांत जाऊन पाहतात तों बीरबळ तेथें नाहीं. नंतर घरीं परत आले, इतक्यांत पहांट झाली ह्मणून कांहींशी निद्रा घेऊन प्रातःकाळी उठतांच बी रबळाचे घरीं दोघे ही आले, तों तो निजला होता. त्यास उठवून त्यांनीं वि- चारिलें, अरे, रात्रींची हकीकत कशी काय झाली? बीरबळ ह्मणाला, मी पहांटे पर्यंत देवळांत होतों. कोणी शब्द ही केला नाहीं आणि कोणी भेटली ही नाहीं. असें ऐकून त्यासही तिनें खचीत फसविलें आहे, असें समजून को तवाल ह्मणतो, अरे, तूं खोटें बोलतास. आह्मी देवळांत आलों त्यावेळीं तूं तेथें नव्हतास. त्यावरून तुलाही तिनें फसविलें आहे. तर खचीत काय झालें तें सांग. नाहीं तर तुलाही शिक्षा करूं. असें ह्मणतांच त्यानें सर्व हकीक- त सांगितली. ती ऐकून कोतवालानें तोंडांत बोट घातलें आणि कमलाक्षास ह्मणाला, मित्रा, हिनें तर शिकस्त केली. तथापि मी कोतवाल आहें, हिला धरल्यावांचून सोडणार नाहीं. असें ह्मणून घरीं गेले. पुन्हा चार दिवसां नंतर आपला एक हुशार शिपाई गांठोडें देऊन कोतवालानें देवळांत पाठविला. आ णि आपण कमलाक्षासबरोबरघेऊन दिवस असतां देवळाचे आतील गाभाऱ्यांत जाऊन राहिला. थोडकी रात्र झाल्यावर पूर्ववत् शब्द झाला, ह्मणून शिपाई शहरा कडे येऊं लागला. तों वाटेंत ती स्त्री भेटली आणि शिपायास पाहून ह्मणते, अहो उभेरहा, उभेरहा. पलीकडच्या गांवांतून माझा नवरा आणि मी अशीं दो घें ह्या गांवांत येत असतां संध्याकाळ झाली. इतक्यांत येथून मागें एक कोशा वर जें मोठें रान आहे, त्यांतून एक भिल्ल येऊन नवऱ्यास मारून त्यानें माझे आंगा- वरील दागिने सर्व नेले. मी त्याची फार विनवणी केली, ह्मणून मला मात्र जि वंत सोडिलें. तशीच मी एकटी घरीं जात आहें. आतां तुह्मी मला भेटलेत तेव्हां धीर आला. मी तुमचे बरोबर येतें असें तिचें ह्मणणें शिपायानें कबूल केलें. नंतर दोघें ही गांवांत जाऊं लागलीं. जातां जातां तिनें अनेक तऱ्हेनें

त्यास मोहित करावयाचा घाट घातला. परंतु तो सर्व जाणत असल्यामुळें ति-
ला श्रेय मात्र ह्मणे. कोतवाल आणि कमलाक्ष फार दूर अंतरानें त्यांचे मागून ह-
ळू हळू येतच होते. पुढें त्या ओसाड घरांत तिनें शिपायास नेलें. इतक्यां-
त कमलाक्ष व कोतवाल यांनीं बाहेरून कडी घातली. तेव्हां तिचे मनांत भीति
उत्पन्न झाली. परंतु बाहेर जाण्यास उपाय सुचेना इतक्यांत तिचा साथी जो आं-
त होता, त्यानें त्या घराचे माळ्यावर चढून पळण्या करितां खालीं उडी टाकिली.
आणि पळत होता इतक्यांत कोतवालानें जागो जाग आपले शिपाई ठेविले
होते, त्यांनीं त्यास धरिलें, इकडे कोतवाल आणि कमलाक्ष दाराची कडी का
ढून उजेड करून आंत गेले, आणि तिला धरिलें. तेव्हां मात्र ती खचीत
समजली कीं, आपण आतां यांचे हातीं सापडलों. आतां शिक्षा खचीत
भोगावी लागणार. असो, केल्या कर्माचीं फळें भोगिलींच पाहिजेत. तथापि सु
टण्याची युक्ति करावी. असें तिचे मनांत आलें. परंतु उपाय चालेना. कोतवा-
लानें त्या दोघांसही धरून नेऊन चौकींत ठेविलें. आणि घरीं निघून गेला.
प्रातःकाळीं त्या स्त्रीस आणिलें आणि तिला ह्मणाला कीं, तूं आजपर्यंत
बहुत लोकांस ठकविलें असशील. तसेंच आह्मांस ही ठकविलेंस. परंतु
आतां मात्र तुझे पापाचे घडे भरले. ह्मणून सांपडलीस. तर आह्मी वि-
चारितों ते खरें सांग.

**कोतवाल** - तूं कोणाची स्त्री आहेस? आणि कधीं पासून हें कसब करूं
लागलीस?

**स्त्री** - कोतवालसाहेब, मी तर गुन्हाच केला आहे. त्या अर्थी शिक्षेस पा
त्र आहें. पण माझी सर्व हकीकत सांगतें ती ऐका. मी मगध देशाच्या
राजाची कन्या आहें. माझें नांव रत्नकला. मी जन्मलें त्या वेळीं जातक
वर्तवून ज्योतिषी यांनीं सांगितलें कीं, हे राजा, ही पांच वर्षांची झाली
ह्मणजे हिचा त्याग करावा, नाहीं तर तुमचा नाश होईल. नंतर मी

पांच वर्षांची होतांच पित्यानें मला अरण्यांत सोडिलें. त्या ठिकाणीं इकडे तिकडे फिरत फिरत मनुष्याचा आसरा पाहत असतां, तेथें एक गोसावी तपश्चर्या करीत होता, त्यास पाहून तिकडे गेलें.त्यानें मी बारावर्षांची होईपर्यंत माझा सांभाळ केला. नंतर असें सांगितलें कीं, तूं आतां उपवर झालीस, त्या पक्षीं तुला येथें ठेवून उपयोगी नाहीं. आणि तुझे प्रारब्धीं दुष्ट कर्में आहेत, तीं अशीं कीं, शंभर पुरुषांस मार्गांत तूं नागविशील आणि त्या उपरांत जे पुरुष तूं नागविशील, त्यांत कोणी श्रीमान् व चतुर असा पुरुष तुला मिळेल. तो तुझ्या रूपास मोहित होऊन तुला वरण्याचा प्रयत्न करील, त्यास त्वां वरावें. असें त्या गोसाव्यानें मला सांगून आपला शिष्य बरोबर देऊन जवळच्या एका गांवांत मला पोहोंचविलें. नंतर कांहीं दिवस तेथें राहून भिक्षा मागून उदरपोषण केलें. पुढें त्या गांवांतच एका सावकारास फसवून त्याचें द्रव्य घेतलें आणि त्या द्रव्यानें आपला निर्वाहचा लविला. नंतर तेथून दुसऱ्या गांवीं जाऊन बहुत लोक नागविले. परंतु मला कोणी धरिलें नाहीं. आतां त्या गांवांत येऊन राहिलें. येथें येणारे फिरस्त लोकांचा मार्ग असल्यामुळें माझा सर्व बेत सिद्धीस जाऊं लागला. हा सोबती मी मदतीस बाळगिला, त्याचा ही धंदा मज बरोबर चालूं लागला. असें करीत असतां, हल्लीं माझे प्रारब्ध-लेखा प्रमाणें शंभर पुरुष मी फसविले. आतां तुमची आणि या दैवशाली पुरुषाची (कमलाक्षाची) गांठ पडली आहे, त्यापक्षीं गोसाव्यानें सांगितल्या वचना प्रमाणें तुम्हां दोघांतून एक माझा पति नेमलेला असावा, असें वाटतें. तर आतां उशीर लावूं नये. माझा भाग्योदय होण्याची हीच वेळ आहे म्हणून माझा अंगीकार करावा. मी आज पर्यंत जें कृत्य केलें तें सर्व प्रारब्धानें झालें. आतां मलाही त्याचा पश्चाताप झाला आणि

मी राज कन्या आहें ह्मणून माझे योग्यते प्रमाणें पतीचें ही भाग्य उदयास येईल. हें खचीत आहे. तर आतां उशीर लावूं नये. मी अपराधी जरी आहें तरी आपण क्षमा करूं लागल्यास आपले स्वाधीन आहे. मी आपली स्त्री झालें. आतां मला क्षमा न कराल, तर आपला पुरुषार्थ नव्हे. (असें ह्मणून तिनें कोतवालाचे पाय घट्ट धरिले आणि नेत्रांनीं अश्रु आणिले ) . )

याप्रमाणें खरेपणाचा तिनें सर्व भाव केला. हें पाहून कमलाक्षाचे मनांत कांहीं द्रव आला आणि त्यानें मनांत असा विचार केला कीं, ही राजकन्या आहे, त्या पक्षीं दैव योगानें जरी हिचे हातून दुष्ट आचरण घडलें, तरी आतां नियमा प्रमाणें घडल्यावर पश्चात्तापानें ही शुद्ध झाली. आणि मी ही राजपुत्र आहें ह्मणून ही मज करितांच उपजली कीं काय कोण जाणे. त्याप्रमाणें त्याचे मनांत आलें, परंतु कोतवाल जवळ असल्या मुळें त्याच्यानें कांहींच बोलवेना आणि पूर्ण खात्रीही होईना ह्मणून उगाच राहिला. कोतवाल ह्मणतो, मित्रा, पहा ह्या स्त्रीचें कापट्य कसें आहे तें. नाना प्रकारच्या गोष्टी सांगून ही सुटून जावयास पाहत आहे. परंतु आह्मीं हिचें सर्व कापट्य जाणत आहों. अहो, ज्यावेळीं ही आह्मास मागंति भेटली, त्यावेळीं असेंच बोलून हिनें आह्मांस फसविलें. असें कोतवालाचें भाषण ऐकून ती स्त्री निराश झाली. आणि आपली कांहींच अक्कल चालत नाहीं, असें खचीत समजली. कमलाक्ष ह्मणतो, कोतवाल साहेब, हिनें जी गोष्ट सांगितली, ती ऐकून मला आश्चर्य वाटलें. परंतु आतां हिला चौकींत पाठवावी. आपण हिजविषयीं विचार करूं., असें ऐकून कोतवालानें तिला शिपायाचे स्वाधीन करून चौकींत पाठविलें आणि दोघे ही एकांतीं बसून विचार करूं लागले. कमलाक्ष ह्मणाला कोतवालसाहेब, हिची गोष्ट आपण जशी ऐकिली, तशीच माझी गोष्ट मी आपणास सांगतों. परंतु तुह्मी आह्मी मित्र झाल्यामुळें ही गोष्ट तिसऱ्यास

कळविणार नाहीं, अशी शपथ करावी. असें ऐकतांच कोतवालानें शपथ केली. आणि ऐकूं लागला.

**कमलाक्ष**– कोतवालसाहेब, मी विचित्रनगरीच्या दुंदुभिराजाचा पुत्र आहें. देशाटन करून अनेक चमत्कार पहावे, म्हणून वेश पालटून निघालों. ही स्त्री राजकन्या आहें ह्मणते, त्यावरून गोसाव्यानें हिला सांगितलेल्या संकेताप्रमाणें जर तिचा माझा संयोग घडणें असला, तर कोणजाणें. मला तर असें वाटतें. पण आतां तुमचें मत कसें काय आहे तें सांगा पाहूं.

**कोतवाल**–मित्रा, तूं राजपुत्र आहेस, हें आतां मला समजल्यावरून आज माझा भाग्योदय झाला, असें मी समजतों. तर जेणें करून तुझें समाधान आणि कार्य होईल तेंच मला कर्तव्य आहे. पण असें पहा कीं, जसें या स्त्रीनें आपणांस मार्गांत फसविलें, तसेंच हें हिचें बोलणें नसेल कशावरून?

**कम०**– अहा, असें रूप लावण्य आणि चातुर्य उत्तम कुळावांचून असणार नाहीं. जर ही कपटीच असती, तर रूपवान् असल्यामुळें कोणी तरी हिला बहुत द्रव्य देऊन आपलीशी केली असती. परंतु तसें नहोतां फक्त लोकांस फसविण्याचें मात्र हिनें कृत्य केलें आहे. त्यापरीं केवळ प्रारब्धानेंच घडलेलें आहे. पण अद्यापि हिला खरोखर पुरुषाचा संग झाला नसावा. असें वाटतें. पहा मी राजपुत्र रूपानें आणि तारूण्यानें पूर्ण असून मार्गांत मला भेटून हिनें गांठोडें मात्र फसवून नेलें. पण माझे रूप लावण्याचा अगदींच धिःकार कसा करवेल? त्यावेळीं कामाची व्यथा हिला झालीच नसेल काय? विचारवंत पुरुष असला तरी तोही त्या कामानें फसतो. मग स्त्रियांचें अंगीं पुरुषापेक्षां दशगुणित कामज्वाला असून त्यांच्यानें कसें राहवेल? तर असें असतां मजला ही वश झाली नाहीं यानें कारण पहिल्यानें मी कोण आहें, हें तिला माहित नसून आणि श्रीमान्

किंवा दरिद्री आहें हें ही माहित नव्हते. पुढें माझे गांठोडयांत द्रव्य आणि कांहीं वस्तू मिळाल्या त्यावरून ही खचीत समजली असावी आणि शंभर पुरुष फसविल्याची इयत्ता पूर्ण झाली होतीच. असे सर्व प्रकारचे विचार पाहतां हिचें भाषण सर्व खरें दिसत आहे. त्यापक्षीं आतां माझा मनोरथ आपण सिद्धीस न्यावा. हेंच मिनत्व चालवावें. ( असें बोलून तिचें रूप मनांत आणून उतावळा झाला. )

कोत० – राजपुत्रा, तुह्मी तर उतावीळ झालांसें दिसतें. परंतु अद्यापि तुमची बाल बुद्धि आहे, असें मी समजतों. ह्मटलें आहेकीं; "स्त्रियः चरित्रं पुरुषस्य भाग्यं ॥ देवो नजानाति कुतो मनुष्यः" अहो, स्त्रियांचें चरित्र व पुरुषाचें भाग्य हीं देवही जाणत नाहीं. तर मनुष्यास कोठून समजणार. नानाप्रकारच्या गोष्टी सांगून पुरुषांस फसवावें, आणि मन वळवून घ्यावें, असे अनेक गुण स्त्रियांचे आंगीं वसत असतात. त्यांतलीच ही स्त्री आहे. राजकन्या असती तर हिची अशी अवस्था कधींच घडली नसती. आणि प्रारब्ध ह्मणजे काय आहेकीं, आपण जें कृत्य करण्यास प्रारंभ केला, तें यथास्थित करीत असतां, त्यांत जर यश मिळालें नाहीं तर आपलें प्रारब्धीं नाहीं, असें ह्मणतात. एवढाच प्रारब्ध ह्मणण्याचा उपयोग आहे. अशीं दुष्ट कर्में करणें हें प्रारब्ध नव्हे बरें, असो. आपणास आतां या गोष्टीची प्रचीती दाखवितों. आपण स्वस्थ बसावें आणि हिची ही सर्व कपट विद्या समजून आपण नादीं लागू नये.

असें बोलून तिच्या सोबत्यास कोतवालानें आपल्या समोर आणविलें आणि त्यास विचारूं लागला.

कोत० – अरे, तूं कोण आहेस?

सोबती– महाराज, मी त्याच गांवांतला शूद्र आहें. मी पूर्वी एका वाण्याकडे नोकरीस होतों. नंतर एकदिवस हिची माझी मार्गांत गांठ पडली.

माझे मनांत ही कोणी मोठ्या कुळांतील स्त्री असेल. ह्मणून मी कांहींच न बोलतां वाटेनें चालत असतां हिनें मला जवळ बोलावून विचारिलें. अरे, तूं कोठें असतोस? जातीचा कोण आहेस? मग माझी हकीकत मी सांगितली. ती ऐकून मला ह्मणाली. अरे, तुला पुष्कळ द्रव्य मिळण्याची युक्ति सांगते, तीकर. तेव्हां मी गरीब दशेंत असल्यामुळें ऐकूं लागलों. त्यावेळीं लोकांस मार्गांत नागविण्याचा धंदा हिनें सांगितला. तो मला नीट वाटला नाहीं. पण मी तारुण्याचे भरांत असल्यामुळें हिच्या रूपास भुलून तिच्या ह्मणण्या प्रमाणें कबूल केलें. आणि जसें जसें ही मला सांगे तसा तसा वागूं लागलों. नंतर कधीं कधीं लोकांस लुटण्याचा प्रसंग येई, त्यावेळीं मी हिचे सांगण्या प्रमाणें मात्र करीत असें. एके दिवशीं माझे मनांत असें आलें कीं, आपण हिच्या नादीं लागलों, यामुळें द्रव्य तर मिळालें पण हिचा लाभ झाला नाहीं. असें वाटून एके दिवशीं मी हिला प्रश्न केला कीं, आपण दोघेंही एक मनानें वागतों, यावरून तुझे आणि माझे मनांत अगदीं अंतर नाहीं. तशांत मला ही दुसरी स्त्री नाहीं आणि तुझा ही कोणी दुसरा पुरुष दिसत नाहीं, तर अशा तारुण्यांत जें सुख भोगावें तें भोगण्यास आपण दोघेंही पात्र असून घडत नाहीं. याचें कारण काय? तें ऐकून ही ह्मणाली, अरे, तुला द्रव्य मिळविण्याचा मार्ग दाखविला आणि तुझें दरिद्र तर घालविलें. कांहीं दिवसांनीं तुझी सर्व इच्छा पूर्ण होईल. उतावीळ होऊं नको. असें ह्मणून तिनें दिवस घालविले. मी मात्र आशा धरून राहिलों. हिची माझी गांठ एकांतीं कधींच झाली नाहीं. आणि हिनें अजून भोगसुखाचा अनुभव घेतला नसावा असें मला खचित वाटतें. मी हिच्या संगतीनें तुमचे हातीं सांपडलों, त्यापक्षीं शिक्षेस पात्रच आहे. परंतु झालेला खराप्रकार मी सांगितला आहे. त्यावरून आपल्या

मर्जीस येईल तसें करावें.

हें ऐकून घेऊन कोतवालानें त्यास चौकींत पाठविलें. सोबत्याचे भाषणा वरून कोतवालास ही तिनें सांगितलेली सर्व हकीकत कांहींशी खरी वाटूं लागली. आणि कमलाक्षनर आपल्या करितांच ही स्त्री नेमिली आहे असें समजला. परंतु कोतवालाचे मनांत असें आलें कीं, ज्यापक्षीं त्यास्त्रीचे नादांत आपण लागलों, त्यापक्षीं एकवेळ ही आपल्यास प्राप्त होईल, असें झालें पाहिजे. अशी कोतवालाचे मनांत बुद्धि उत्पन्न झाली. पुनः कमलाक्ष ह्मणतो, कोतवालसाहेब, कसें काय, आतां तुमची खात्री झालीना? पहा, ही राजकन्या खरी आहे. तिच्या प्रारब्धीनें त्या गोष्टी झाल्या. पण तिचे सुखाचे दिवस जवळ आले असें वाटतें. आतां तुमचे हातीं अपराधी ह्मणून सांपडली आहे. त याणि तिला सोडणें हें तुह्मां कडेसच आहे. असें कमलाक्षाचें भाषण ऐकून कोतवाल म्हणाला, राजपुत्रा, अद्यापि माझे मनांतील शंका गेली नाहीं, ह्मणून माझ्यानें सोडवत नाहीं. आणि अपराध्यास शिक्षा दिल्यावांचून सोडणें हें ही अयोग्य आहे. प्रत्यक्ष आपली स्त्री अथवा पिता, बंधु, कोणी जरी असला तरी आमच्या सरकारच्या कायद्या प्रमाणें ते अपराधी ठरल्यावर शिक्षा दिलीच पाहिजे. हा आमचा सरकारी नोकरांचा धर्म आहे. ह्मणून मी सोडणार नाहीं. तुह्मी उगाच नादीं लागूंनका. फुकट त्या नादानें फसून जाल. अहो, स्त्रियांचें कापट्य याहून अधिक ही असतें. असें कोतवालाचें भाषण ऐकून कमलाक्षाचा निरुपाय होऊन तो उगीच राहिला आणि कोतवाल त्या स्त्रीचे प्राप्तीची बुद्धि धरून उपाय करूं लागला. एके दिवशीं रात्रीं त्यानें तिला आपले घरीं आणविलें आणि एकांतीं नेऊन म्हणाला, स्त्रिये, तूं तर अपराधी ठरून आमचे स्वाधीन झालीस. पण तूं आपली हकीकत खरी सांगितल्यामुळें मी तुला सर्व क्षमा करितों. तूं मार्गांत मला नादीं लाविलेंस आणि फसविलेंस, परंतु आतां तरी एक वेळ तुह्मी आह्मी आनंद विलास करूं. मग तुला पाहिजे तें कर. असें त्याचें भाषण ऐकून

. स्त्री ह्मणाली कोतवालसाहेब, आपण कायद्यानें वागणारे सुज्ञ असून मला असें बोलतां हें योग्य नाहीं. मी जरी तुमचे हातीं सांपडलें, तरी माझे हातून अशी गोष्ट होणार नाहीं. परंतु जर आपली इच्छाच असेल,तर मी कबूल आहें. पण माझ्या नियमाप्रमाणें जो पुरुष मला मिळाला, तो तुमचा मित्र होय त्याची मी स्त्री होणार आहें. तर प्रथम त्याचें माझें एक मन करून द्यावें. नंतर मी आपल्या सांगण्यास कबूल आहें. आणि माझ्या सोबत्यास ही प्रथम सोडून द्यावा. ह्मणजे मी तुमचीच आहें. अशी कोतवालास तिनें आशा दाखविली. नंतर तिला कोतवालानें तेथेंच ठेवून घेतलें. परंतु तिजवर जबरी करवेना, ह्मणून उगाच राहून निद्रिस्त झाला. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं उठून म्हणाला, हे स्त्रिये, आतां तुला मी चौकींत पाठवीत नाहीं. माझ्या घरींच तूं रहावेंस ह्मणजे तुझ्या मना प्रमाणें घडेल. मग तरी माझी आठवण राहील ना. असें बोलून तिला घरांतच ठेविलें. कमलाक्ष दिवाणखान्यांत एकटाच निजला होता. तो प्रातःकाळीं उठून पाहतो तों स्त्री घरांत दृष्टीस पडली. ह्मणून कोतवालास म्हणाला, कोतवालसाहेब, ही इकडे कशी आली? कोतवाल म्हणाला, अरे, तूं माझा मित्र आहेस, तुझे मनांत जें जें येईल तेंतें, मी पूर्ण करणार. तर आतां ही स्त्री आपले मनानें तुला वश झाली आहे. ह्मणून तुझे मनास वाटेल तें कर.

असें कोतवालाचें प्रसन्न भाषण कमलाक्षास अमृततुल्य वाटलें आणि केव्हां रात्र होते असें त्यास झालें. तो दिवस त्यास वर्षासारखा भासला. नंतर रात्र होतांच एकांतीं दोघांची गांठ पडली. कमलाक्षास आनंद झाला आणि माझ्या प्रारब्धानें ही स्त्री मजकरितां पाठविली, असें वाटून तो अगदींच वेडा झाला. तिला जवळ बसवून ह्मणाला; हे स्त्रिये पहा, तूं मज करितां अशीं दुष्टकर्मे केलींस आणि शेवटीं तुझी माझी भेट झाली. आतां तुझ्या दुःखाचा समुद्र आटला. हें ऐकून स्त्री म्हणाली, महाराज, आपण ह्मणतां, ही गोष्ट खरी. पण अगोदर आपला देश कोण, नाम काय, जात कोण, वगैरे सर्व

मला सांगावें. असें ऐकतांच राजपुत्र आपला सर्व वृत्तांत सांगूं लागला. त्यांत मी आपल्या स्त्रीची परीक्षा पहावयास जात आहें असेंही कळविलें. तें ऐकून ती ह्मणते, अहो, तुह्मी बऱ्याच बुद्धीनें बाहेर पडलां आहां. पण तुह्मांस असें कळत नाहीं कीं, जसे तुह्मी माझ्या रूपास भुलून माझा अंगीकार केलात, व हें कृत्य तुह्मी पुरुष विचारवंत असून करितां, तर स्त्रियांनी जर एखादे वेळीं अज्ञान पणानें असें केलें, तर त्यांत त्यांचा काय अपराध? याचा तुह्मींच विचार आपल्या ठिकाणीं करून पहा. तुह्मी आपले स्त्रीस माहेरीं ठेवून इकडे बहुत दिवस राहिलां आणि तीतर तारुण्याचे भरांत आलेली आहे. अशा समयीं कामाची व्यथा जर तिला सहन झाली नाहीं, तर त्यावेळीं जशी तुमची अवस्था झाली आहे, तशी तिची झाली तर तिच्या हातून गैर चाल घडल्यास तिचा काय अपराध आहे? जसें आपलें मन तसेंच तिचें मन असेल. मग आपण जाऊन तिची परीक्षा करणार आणि खरोखर कांहीं घडलें असेल तर तिचा त्याग करणार हें अनुचित कर्म आहे. याकरितां तुह्मी तिच्या परीक्षेस जाण्याच्या विचारांत पडूं नये. आतां जरी ती कशीही असली तरी मी तुमची केवळ आवडतीच झालें आहे. आणि तुह्मांकरितां अनेक वाईट कर्में माझे हातून घडलीं. इतक्यांतून मी शुद्ध राहून आज तुमची राणी झालें. आतां तुमचा माझा जोडा जन्म पर्यंत परमेश्वरानें सुखी ठेवावा, ह्मणजे झालें. असें ह्मणून राजपुत्राच्या गळ्यास तिनें मिठी मारिली, आणि पुन्हा ह्मणाली, प्राणप्रिया, आपणांस मीं फार श्रम दिले आहेत ह्मणून मी केवढीतरी अपराधी आहें? पण तुह्मीं थोरांनीं ते माझे सर्व अपराध क्षमा करून माझा अंगीकार केला. यावरून मी पूर्ण प्रारब्धाची आहें. असें खचीत आहे. आणि अगोदर दुःख भोगून मग सुखाचा लाभ झाला, तर त्या सारखा आनंदच नाहीं. आतां तुह्मी आह्मी अवघी रात्र आनंदांतच घालवूं. असें ह्मणून राजपुत्राचे मांडीवर उसें ठेवून निजली आणि मनांत विचार करिते कीं, त्याला आपण बरेंच नादीं लाविलें

आहे; पण याजपासून कांहीं द्रव्यलाभ करून घ्यावा, हेंच आपलें कृत्य आहे. त्यापेक्षी आतां असेंच त्यास गोष्टी सांगून फसवावें. असा विचार करून ह्म णते, प्राणप्रिया, आपण एकांती आहों आणि दोघांचें मन एक झालें आहे. ह्या समयीं आपण जीं भाषणें करितों, तीं अमृततुल्य वाटतात. तर अशा भाषणांपासून जो आनंद होईल, तो सुरत झाल्यावर जाईल. याजकरितां, अगोदर अशाच कांहीं करमणुकीच्या गोष्टी सांगूं. पण तुह्मी प्रथम एक मला गोष्ट सांगा. मगमी सांगेन. कमलाक्ष ह्मणतो, हे स्त्रिये, तूं ह्मणतेस हें खरें आहे. मला गोष्ट सांगा ह्मणतेस, परंतु तुझ्या तोंडची गोष्ट मला फार आवडते. ह्मणून तूंच प्रथम सांग आणिमी ऐकतों. असें कमलाक्षाचें भाषण ऐकून ती पुढील कल्पित गोष्ट सांगूं लागली.

एका नगरांत एक बहुरूपी राहत असे. त्यास एक पुत्र आणि एक कन्या अशीं दोन मुलें होतीं. पुत्राचें रूप उत्तम होतें. तो केवळ श्रीमान् राजबिंडा असा दिसत असे. बहुरूप्याचा धंदा ह्मटला ह्मणजे अनेक प्रकारचीं रूपें घेऊन द्रव्य मिळवावें. परंतु त्याचे मना प्रमाणें त्यास द्रव्य मिळेना, ह्मणून त्यानें एक युक्ति काढिली. ती अशी कीं, आपणांस दोन अपत्यें झालीं आहेत, त्यांत कन्या आहे. हिला तर लग्न करून दुसऱ्यास दिलीच पाहिजे. परंतु मुलगा आहे यास आपली विद्या शिकवावी, ह्मणजे द्रव्य मिळेल. असा विचार करून तो गांव सोडून दुसऱ्या गांवीं जाऊन त्यानें त्या मुलास लहानपणा पासून स्त्रीचा वेष दिला. याचे स्तनाचे ठिकाणीं कांहीं औषध लावीत असे, त्यामुळें पुढें कांहीं दिवसांनीं त्याचे स्तनही मोठे होऊं लागले. आणि सर्व काळ स्त्रीचा पोशाख त्यास दिलेला असल्यामुळें लोकांस हा पुरुष असल्याचा संशय ही आला नाहीं. तो बहुरूपी आपला पूर्वी प्रमाणें धंदा करून उदर निर्वाह करीत असे. नंतर कांहीं वर्षांनीं एका मुलीचें त्यानें लग्न केलें. आणि दुसरी मुलगी तर मुलगाच होता. त्याचें लग्न करून उपयोगी नाहीं. असें ह्मणून तशीच ठेविली. परंतु लोक त्यास ह्मणूं लागले कीं, मुलगी मोठी झाली. अद्यापि तिचें लग्न

का करीत नाहींस. असें बोलून बोलून लोकांनीं त्यास लज्जा आणिली. म्ह-
णून त्यानें असा विचार केला कीं, ही कन्या समजून हिचें लग्न करावें. मग
पुढें काय होईल तें होवो. असें ह्मणून बारावे वर्षी एका परगांवच्या बहुरूप्या-
चे मुलास ती कन्या ह्मणून देऊन लग्न केलें आणि लोकापवाद घालविला. क
न्या मोठी होईपर्यंत बापाचे घरीं असावी असा त्यांचे जातींत नेम होता. त्या प्र
माणें तिला आपले घरीं ठेविलें. अगोदर सुंदर रूपवान् मुलगा असून त्यास स्त्रीचें
रूप दिलेलें आणि लहानपणा पासून सर्व स्त्रियांच्या चाली, भाषणें इत्यादि
बापानें शिकवलेलीं असल्यामुळें स्त्री सारिखाच तो दिसत असे. तारुण्या
चे भरांत आलेल्या स्त्री सारखें त्याचें रूप दिसूं लागलें, तेव्हां बापानें आतां आ
पला हेतु सिद्धीस न्यावा. असें मनांत आणून पुत्राचे मतानें कल्पना केली
कीं, आपण जरी लोकांस आपलें कसब दाखवून गांवो गांव फिरलों, तरी आ
पलें दरिद्र जाणार नाहीं. तर एखादें अघटित कृत्य करण्याचें धैर्य केल्या शि
वाय उपयोग नाहीं. ह्मणून असें करावें कीं, आपल्या स्त्री रूपानें मोहित करू
न मार्गस्थ पुरुषांस फसवावें आणि त्यांचें कांहीं द्रव्य असेल तें हिरून घ्यावें.
असा विचार करून नानाप्रकारच्या युक्ति त्यास सांगितल्या. आणि तोही बा
पाहून चतुरच होता. यामुळें त्यानें त्या कृत्यास आरंभ केला. पुढें तो बाप आ-
णि लेक दोघेही एका मोठ्या शहरांत येऊन राहिले. आणि पहिल्या मुलीस
सासरीं पाठविलें.

इतकें होऊन ती स्त्री राजपुत्रास ह्मणते, प्राणप्रिया, आतां पुढें मी गोष्ट
सांगेन ती ऐकून खचीतच तुमच्या मनांत संशय आल्यावांचून राहणार नाहीं.
पण आपण संशय न आणाल तर सांगतें. ही गोष्ट मजला गोसाव्यानें खरोखर
घडलेली सांगितली आहे. असें ह्मणून पुढें सांगूं लागली. त्या बहुरूप्यांनीं ते-
थें राहून बहुत लोकांस फसविलें. परंतु मनासारखा पैसा मिळाला नाहीं. म्हणून
एखाद्या श्रीमंतास गांठून फसवावें असें त्यांस वाटलें. ज्या शहरांत ते येऊन राहिले

होते , तेथें त्या देशच्या राजाचापुत्र राहत असे. त्यानें आपल्या बरोबरीचे वया-
चे मित्र पांच बाळगिले होते आणि त्यास बाग बगीच्यांतून फिरण्याचा आणि
हवा घेण्याची फार आवड असें. एके दिवशीं आपल्या मित्रांसह तो बा
गेंत फिरत असतां, हे बहुरूपी बाप लेंक त्या मार्गानें जात होते, त्यांस पाहून
राजपुत्र आपल्या मित्रांस ह्मणाला ही अत्यंत रूपवान् तरुणी त्या पुरुषा बरोब
र कोण आणि कोठें बरें जात आहे? हें ऐकून मित्रांनीं तिला पाहिलें. त्यांतून ए
क ह्मणतो, महाराज, ही स्त्री तर उत्तम दिसते, परंतु हिचा जिकडे जाण्याचा
रोंख आहे, तिकडे तर फक्त वाळवंट मात्र आहे. कोणाचें घर नाहीं अथवा पुढें
जाण्याचा मार्ग ही नाहीं. तेव्हां हिच्या जाण्यांत कांहीं तरी मतलब असावा. दु
सरा ह्मणतो, ही स्त्री आह्मी या शहरांत कधींच पाहिली नाहीं, यावरून ही
कोणी तरी नवीन आलेली रस्ता चुकून फिरत आहे असें वाटतें. तिसरा ह्मणतो,
अहो, तसें नव्हे. ही संध्याकाळची वेळ आहे, त्या वेळीं पिशाचांची फिरण्याची
वेळ असते. त्या पलीकडच्या वाळवंटांत पूर्वी एका पुरुषास एकवेळ अशीच
भुताची गांठ पडली होती, असें मीं ऐकिलें आहे. तशीच ही कोणी असेल. च-
वथा ह्मणतो, छे छे, भुताची तर गोष्टच नको. भुताच्या गोष्टी ऐकावया पुरत्या
मात्र आहेत. प्रत्यक्ष कोणाच्यानें दाखववत नाहीं. मला वाटतें कीं, ती कोणी
तरी बाग पाहण्या करितां आली होती. आपण आंत आहों ह्मणून बाहेरूनच
फिरत आहे. पांचवा ह्मणतो, चौघांनीं कल्पना केल्या, पण त्या सर्व खोट्या आहे-
त. मला तिच्या चालीवरून असें वाटतें कीं, आपण राजपुत्र आहां ह्मणून आपली
भेट घ्यावी अशा इच्छेनें ही कोणी परगांवची स्त्री तिजवर कांहीं तरी संकट आलें
असेल, तें निवारण करावें अशी इच्छा धरून आली असावी. याप्रमाणें पांच
जणांनीं पांच तऱ्हेच्या कल्पना केल्या, पण राजपुत्राचे मनास एकही आली नाहीं.
तो तिच्या रूपयौवनास मोहित झाला. त्यास असें वाटलें कीं, ही स्त्री आपली इच्छा
धरूनच मुद्दाम दृष्टीस पडण्याचे हेतूनें आली असावी. तर आतां चमत्कार

पाहूं असें मनांत आणून उगाच राहिला.

इकडे तीं दोघें जणें त्या बागेंचे भोंवतालची मौज पाहत पाहत जागोजाग उभीं राहत राहत फिरूं लागलीं. राजपुत्र आणि त्याचे मित्र यांची नजर आपणां कडेंच लागली आहे असें समजून एका बाहेरच्या झाडा खालीं बसलीं. तथापि राजपुत्राची नजर त्यांजकडे होतीच. हें पाहून बहुरूपी चतुर असल्यामुळें पक्कें समजला कीं, राजपुत्राचे मनांत हिज विषयीं इच्छा उत्पन्न झाली आहे, तर आतां आपला कार्यभाग होईल. जरा धीर धरावा, ह्मणजे झालें. असें समजून तशींच बसलीं. इतक्यांत सूर्यास्ताचा समय झाला, ह्मणून राजपुत्र उतावळा होऊन मित्रांस ह्मणतो, मित्रहो, पहा, तुह्मी सर्वांनीं कल्पना केल्या, पण त्या व्यर्थ आहेत. ही स्त्री माझीच इच्छा धरून माझे समोर मुद्दाम आली असावी. आतां आपण तिला बाग पाहण्याचे निमित्तानें इकडे बोलवावें. असें ह्मणून आपले दासास आज्ञा केली कीं, तिला विनंती करून सन्मानानें बाग पाहण्यास आंत बोलीव. असें ऐकतांच दास तेथें जाऊन ह्मणतो, बाईसाहेब, बाग पाहण्याची आपली इच्छा असेल तर आंत चलावें, आमच्या धन्याची मनाई नाहीं. असें त्याचें भाषण ऐकून कांहींशी लज्जा दाखवून ती बागेंत आली. जिकडे राजपुत्र आणि त्याचे मित्र होते, तिकडे न जातां एकीकडेंच पाहत पाहत फिरत आहे, असें पाहून राजपुत्रही हळू हळू फिरत फिरत तिचे जवळ जवळ गेला. तेव्हां कांहींशी लज्जा दाखवून ती एकीकडे उभी राहिली. असें पाहून राजपुत्र ह्मणतो, हे स्त्रियें, आमची लज्जा धरूं नये. जें तुझे मनांत आहे, तें आह्मी समजलों आहों तर आतां लज्जा कशाला पाहिजे? असें ऐकतांच राजपुत्राकडे पाहून तिनें किंचित् हास्य केलें. त्यावरून तो समजला कीं, हिचा हेतु ह्माच आहे. त्यापक्षीं आपण हिला आपल्या महालीं न्यावें. परंतु ही कोण आहे हें प्रथम कळलें पाहिजे. असें मनांत आणून ह्मणतो. तूं कोण आहेस तें सांग. स्त्री सांगते, महाराज, मी गंधर्व-कन्या आहें. त्या मृत्यु लोकांतील पुरुष वरावा

अशी माझी इच्छा असल्यावरून आपल्या पित्याची आज्ञा घेऊन देशोदेशींचे राजपुत्र पाहत फिरत आहें. त्यांत जो माझ्या मनास येईल, त्यास मी वरीन. परंतु त्याचे बरोबर यथेच्छ क्रीडा जरी केली अथवा मृत्युलोकींच्याच स्त्रियां प्रमाणें जरी वागलें, तरी ज्यावेळीं माझे मनास येईल त्या वेळीं मी निघून जाईन. असा माझा नियम आहे. ही माझी हकीकत मी सांगितली आहे. आपण राजपुत्र आहां हें मी जाणत आहें. असें ह्मणून पुन्हा कांहीं लज्जा दाखवून तिनें किंचित् हास्य केलें. तें पाहून राजपुत्र अगदींच उतावळा होऊन ह्मणाला, तुझ्या मुखचर्येवरून मी समजलों, पण उघड बोलवत नाहीं. तशांत येथें माझे अनेक मित्रही आहेत. या करितां माझा दास मी येथें ठेवितों. त्याचे बरोबर माझे महालीं येण्याची तसदी घ्यावी, ह्मणजे सर्व मनोरथ सिद्धीस जातील. पण तुला खचितच आलें पाहिजे. नाहींतर मी चातका सारखा वाट पाहत बसेन. असें बोलून राजपुत्र आपले मित्रांत जाऊन मिळाला. आणि त्यांस ह्मणतो, माझे मनांत जी कल्पना आली, ती खरी झाली. परंतु याची हकीकत पुढें तुह्मांस सांगेन असें ह्मणून मित्रांसह तेथून निघून गेला. जातांना आपला सेवक मात्र तेथें ठेवून त्यास सांगितलें कीं, आह्मी गेल्यावर हिला महालांत घेऊन ये. त्याप्रमाणें ती स्त्री आपला सोबती (बाप) बरोबरून आणितां सेवका बरोबर एकटीच आपणां कडे येत आहे, हें राजपुत्रानें खिडकींतून पाहिलें. आणि मनांत ह्मणाला आज माझे सारिखा भाग्यवान् कोणी नसेल. स्वर्गींची स्त्री मला प्राप्त झाली, यावरून माझें रूपही अत्यंत सुंदर आहे, हें खचित आहे. असें मनांत ह्मणत आहे, इतक्यांत त्याचे महालांत एकांत ठिकाणीं सेवकानें तिला आणून सोडिलें. तेव्हां राजपुत्र तिला ह्मणाला, हे प्राणप्रिये, हे सुकुमारे, तुला मजकरितां फारश्रम झाले आहेत, तर बस ह्या पलंगावर. असें ऐकतांच कांहीं न बोलतां ती पलंगावर बसली. राजपुत्र

ही तिज जवळ बसून तिच्या गळ्यांत हात घालून अति आनंद पूर्वक भा षणें करूं लागला आणि ह्मणतो,हे स्त्रिये, आज आपला जोडा कसा जमला आहे? मला वाटतें कीं, ह्या पृथ्वीवर आपणा सारखीं कोणीच नसतील. तूं तर गंधर्व कन्या आहेस आणि मी मृत्यु लोकींचा मानव असून तूं माझी इच्छा केली स, यावरून मीही भाग्याचा पूर्ण आहें. अशी नानाप्रकारचीं भाषणें करूं लाग- ला. परंतु ती कांहींच बोलेना. ह्मणून पुन्हा ह्मणाला, हे स्त्रिये, अगोदर आप पा मृत्यु लोकींच्या पंच पक्वान्नांचें भोजन करावें. नंतर आपणांस अवघी रात्र आहेच. असें ह्मणून भोजनाचें तार आणवून आनंदानें भोजन करण्यांत वे ळ घालविला. नंतर पान सुपारी इत्यादि नाना प्रकारचे विलास चालल्यावर ह्मणाला, गंधर्व लोकींच्या चाली कशा काय असतील, त्या मला माहित ना हींत. ह्मणून जर माझे भाषणांत कांहीं अपराध घडत असेल तर त्याची क्षमा त्वां करावी. मी केवळ तुझा दास आहें आणि हा देह मी तुला अर्पण केला आहे. असें राज पुत्राचें अत्यंत नम्रपणाचें भाषण ऐकून ती (बहुरूपी) स्त्री मनांत ह्मणते, आपला बराच मतलब साधण्याचा हा वेळ आहे. परंतु मी स्त्री नाहीं, याकरितां कांहीं तरी उपायानें ही वेळ घालविली पाहिजे. अ सें मनांत आणून ह्मणते, स्वामीराज, मी आपली दासी आहें. आपण अ पशब्द जरी बोलला, तरी मला सहनच केले पाहिजेत. तथापि तुमच्या बोल ण्यांत कांहीं वाईट नाहीं. तुमच्या रीती प्रमाणें तुह्मी बोलतां हें मी जाणत आहें. आपण कांहीं चिंता करूं नये. मी केवळ या चरणांची दासी आहें. म ला आपण इतकें विनवून बोलूं नये. असें ह्मणून तिनें त्याचे गळ्यांत हा त घालून मिठी मारिली.

इकडे कमलासाचे गळ्यास मिठी मारून त्याचे जवळची स्त्री ह्मणाली, पहा, ती स्त्री नसतां राजपुत्रास इतकें मोहित केलें कीं, तो सर्वस्वी तिचे स्वाधीन झाला. मग माझ्या सारख्या राजकन्येला आपण आनंद दिला, तर

आश्चर्य नाहीं. हें ऐकून कमलाक्ष ह्मणाला, , पुढें ती गोष्ट कशी काय झा
ली, तें मला सांग पाहूं. असें ऐकतांच ती सांगूं लागली. महाराज, जशीं आ
पण आनंदांत आहों. तशींच तीं दोघें जणें असतां गंधर्व कन्या (बहुरूपी)
ह्मणाली, प्राणप्रिया, आजची रात्र आपणांस असाच आनंद करीत घालविली
पाहिजे. आपण माझ्या योग्य पति समजून मी आपणांस वरण्याचा संकेत
केला, त्याप्रमाणें येथें आलें. पण आपण आतांच उतावीळ होऊं नये. कारण
माझा कांहीं नियम आहे तो आपण ऐकावा. तो असा कीं, प्रथम वर
मनास आल्यावर बापाची आज्ञा घेतली पाहिजे. तो नको ह्मणणार नाहींच,
पण वडिलांची आज्ञा घेणें हा आपला धर्म आहे. तर असें केल्या वांचून
आपले मनोरथ सिद्धीस जाणार नाहींत. कारण कीं, माझे वडील बहिणी
नें पित्याची आज्ञा न घेतल्यामुळें ती अजून पर्यंत बंदी शाळेंत पडली आहे.
तसें झालें तर या आपल्या सुखांत किती अंतर येईल बरें? ह्मणून आतां
ही रात्र अशीच गोष्टी बोलून काढिली पाहिजे. असें ह्मणून उगीच राहिली. रा
जपुत्र ह्मणाला, तूं ह्मणतेस हें खरें आहे, पण पहा अशा रंगांत आपण अस
तां मला निराश करून तूं जाणार आणि पुन्हा परत येशील हें तरी खरें क
शावरून? तर या बद्दल मला कांहीं भाक द्यावी. असें ऐकतांच तिनें आप
ले हातांतील आंगठी त्याचे हातीं दिली. आणि ह्मणाली, प्राणप्रिया: माझा
आपणांस विश्वास नाहीं, तर ही माझी आंगठी आपणाजवळ ठेवा. मी निय
मित वेळीं परत न आलें तर आपण ही आंगठी मुखांत घालावी, ह्मणजे मी
त्याच वेळीं प्राप्त होईन. ही माझे विश्वासाची देणगी आपणांस मीं दिली आ
हे. पण मी आतां आपणांस वरावयाचा निश्चय केला आहे, ह्मणून मी पि
त्यास जाऊन सांगणार, तर आपले कडून कांहीं तरी त्यास दाखविण्या क
रितां राज चिन्हित निशाणी असली पाहिजे. असें ऐकून राजपुत्र अ
गदीं वेडा झालेला असल्यामुळें त्यानें आपले गळ्यांतील नवरत्नांचा हार

काढून तिचे गळ्यात घातला. तसा हार कोणत्याही राज्यांत नव्हता. हार आपल्या गळ्यांत आला असें पाहून गंधर्व कन्या (बहुरूपी) आपलें कार्य साधलें ह्मणून आनंद मानून, जावयाचा विचार करूं लागली. त्यावेळीं बरीच रात्र शिलक असल्यामुळें राजपुत्र ह्मणतो हे प्राणप्रिये, तूं तर आतां जाणार, पण मला तुझा वियोग क्षणभर ही सोसणार नाहीं. तर उजाडे पर्यंत आपला वेळ आनंदांत जावा, ह्मणून तुझे बहिणीस बापानें बंदींत ठेविल्याची गोष्ट सांग. गंधर्व कन्या (बहुरूपी) ह्मणाली. ती गोष्ट तर फारच मोठी आहे. परंतु थोडक्यांत सांगतें. असें ह्मणून ती स्त्री सांगूं लागली.

कमलाक्ष ह्मणाला हे स्त्रिये, ती गोष्ट ऐकावी असें मलाही वाटतें, परंतु आतां रात्र थोडी उरली आहे, या करितां लवकर सांग. असें ऐकून ती सांगूं लागली.

गंधर्व कन्या (बहुरूपी) ह्मणाली माझी बहीण देवमनोहारिणीनामक होती. ती उपवर होतांच तिनें ही मृत्युलोकींच्या वराची इच्छा करून बापाची प्रार्थना केली. त्यानें तिचे मनाप्रमाणें करण्यास आज्ञा दिली. परंतु मना सारखा वर मिळाला ह्मणजे मला कळवून मग त्यास वरावें असें त्यानें सांगितलें. नंतर ती माझे सारखी चहूंकडे फिरत असतां, एका राजपुत्रास मोहित झाली आणि त्याची गांठ एकांतीं घ्यावी ह्मणून प्रयत्न करूं लागली. एके दिवशी राजपुत्र बाजारांतून जात असतां तिनें त्यास पाहिलें आणि पुरुषाचें रूप घेऊन जवळ जाऊन ह्मणाली, महाराज, मी दूर देशाहून आपणा जवळ राहून नोकरी करावी या इराद्यानें आलों आहे. परंतु माझी दाद लागत नाहीं. याज करितां आज आपणांपाशीं येऊन समक्ष विनंती करीत आहें. तर मला नोकरी द्यावी, असें ऐकतांच राजपुत्रानें बरोबर येण्याची आज्ञा दिली. घरीं परत गेल्यावर त्यानें विचारिलें. अरे, तुला आह्मी चाकरीस ठेवितों. परंतु तुझ्या आंगीं गुण काय आहेत तें सांग. पुरुषवेषधारी माझी बहीण ह्मणाली, महाराज, मी

आपल्या पदरीं असल्यानें ज्यावेळीं आपणांवर संकट येईल त्यावेळीं तें दूर करण्यास मी समर्थ आहें. तें ऐकून राजपुत्रास आनंद झाला. आणि मनांत ह्मणाला. असा चतुर सेवक मिळाल्यावर कोण न ठेवील ? असें ह्मणून त्यास दरमहा १००० रुपये पगार करून ठेविलें. कांहीं दिवस गेल्यावर राजपुत्र एके दिवशीं शिकारीस गेला. तेव्हां त्यासही बरोबर नेलें होतें. राजपुत्रास शिकारीमुळें श्रम झाले, इतक्यांत तेथें एक सरोवर त्याचे दृष्टीस पडलें. त्याजवर नानाप्रकारचे राजहंस क्रीडा करीत आहेत आणि त्यांतील कमळें ही प्रफुल्लित आहेत असें पाहिलें. राजपुत्र तेथें जाऊन पाणी पिऊन क्षणभर बसला आहे. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, त्या तळ्यांतून एक अत्यंत रूपवान् स्त्री बाहेर येऊन (हें कृत्य माझ्या बहिणीचें होय.) तेथें जवळच एक लहानसें शंकराचें देवालय होतें, त्यांत गेली. हें पाहून त्यास फार आश्चर्य वाटलें आणि तिचें अप्रतिम सुंदर रूप पाहून काम मोहित झाला. इतक्यांत जवळ चाकरही नाहीं. असें पाहून देवळांत गेला. नंतर ती पूजा करीत असतां तिजकडे न्याहाळून पाहून ह्मणाला, अशी स्त्री आपणास प्राप्त होईल तरच या जन्माचें सार्थक, नाहीं तर व्यर्थ आहे. ह्मणून आपण हिला विचारूं ह्मणजे झालें. असा विचार करीत उभा आहे, इतक्यांत ती नाहींशी झाली. कांहीं वेळ तो तिची वाट पाहून निराश झाला. इतक्यांत माझ्या बहिणीनें पुनः पुरुषाचें (चाकराचें) रूप धरिलें आणि राजपुत्रास शोधीत देवळांत आला. त्यास पाहून राजपुत्र ह्मणाला, सेवका, मी एक चमत्कार पाहिला आहे. पण जर तूं त्या वस्तूची प्राप्ति करून देशील, तरच आज पर्यंत तुला चाकरीस ठेविल्याचें सार्थक होईल. असें ऐकतांच सेवक ह्मणाला, महाराज, मी हुकुमाचा चाकर आहें. आज्ञेप्रमाणें काम केलेंच पाहिजे. असें ऐकतांच सर्व हकीकत राजपुत्रानें त्यास सांगितली. सेवक ह्मणाला महाराज, इतकेंच ना? मी करितों. आपणांस आज रात्रीं तिची प्राप्ति करून देईन, पण मला बक्षीस काय मिळेल ? राजपुत्र ह्मणाला,

तुला तुझे इच्छे प्रमाणें देईन. आतां आपण घरीं जाऊं. असें ह्मणून स्वारी परत घरीं आली. सुमारें दोन घटका रात्र झाल्यावर माझी बहीण खरोखर रूपानें एका एकीं राजपुत्राचे महालांत उत्पन्न झाली. तिलाच सरोवरावर आपण पाहिलें असें त्याला वाटून त्यानें सेवकाची आपल्या मनांत वाहवा केली. आणि तिला पलंगावर बसविलें. अशा एकांत समयांत तो कामातुर झाला. आणि माझी वहीण ही फार दिवस वाटच पाहत होती. पण आमची अशी चाल आहे कीं, कोणास एकदां वचन दिलें अथवा जें मुखानें कांहीं बोललों तें खरें केल्यावांचून रहावयाचें नाहीं. ह्मणून तशीच राहिली होती. परंतु हा समय चांगला आहे असें वाटून, ती ही मोहित होऊन त्यारात्रीं दोघांनीं यथेच्छ क्रीडा केली. नंतर त्यांची प्रीति फार जडल्यामुळें कित्येक दिवस तेथेंच राहिली. आणि बापाची आज्ञा विसरली. एकेवेळीं बापानें आपली कन्या कोठें आहे, याचा विचार केला. त्यावरून सर्व वृत्तांत ध्यानांत आला आणि हिनें फार वाईट कर्म केलें, असें वाटून एका एकीं राज महालांतून त्यानें तिला उचलून नेलें आणि बंदींत घालून ठेविलें.

कमलाक्षास स्त्री ह्मणाली, पहा, तो बहुरूपी असून त्यानें बनावून आपल्या बहिणीची गोष्ट सांगितली, ती सर्व त्या राजपुत्रास खरी वाटली. इतक्यांत उजाडण्याचा समय जवळ आला, असें पाहून ती गंधर्व कन्या (बहुरूपी) जाण्यास निघाली आणि ह्मणाली, महाराज, आतां लोभ असावा. मी लौकर पित्यास भेटून परत येतें. असें ह्मणून जाऊं लागली. राजपुत्रानें तिचे गळ्यास मिठी मारिली आणि त्यास गहिंवर आला. तिनें ही तसेंच केलें आणि ह्मणाली मला ज्या बागेंत आपण भेटलां तेथें नेऊन पोहोंचवावें. त्या प्रमाणें राजपुत्रानें तिला तेथें सेवकाकडून पोहोंचविलें.

तो बहुरूपी आपलें कार्य चांगलें साधलें, ह्मणून आनंदानें जाऊन आपले बापास भेटला. आणि सर्व वृत्तात सांगितला. परंतु नवरत्नांचा हार मिळविला

तो विकण्यास धैर्य होईना. कारण एवढ्या किंमतीचा हार त्याजपाशीं कसा आला, असें कोणी विचारिलें तर काय सांगावें, अशी चिंता करीत फिरत होता. पहा कीं, खरोखर अशी वस्तू हलक्या मनुष्याजवळ असली तर सहजच संशय येणार आहे. कित्येक दिवस तो बहुरूपी त्या हाराचे विक्री करितां फिरत असतां त्याचा बाप मृत्यु पावला. पुढें तो वयांत आला, त्यामुळें तो आपलें स्त्रीरूप घेण्याचें सोडून जवळचे द्रव्यावर निर्वाह करूं लागला. एके दिवशीं अशी गोष्ट झाली कीं— इतकें बोलून रत्नकला कमलाक्षास ह्मणाली, महाराज, यावरून पहा कीं, त्यानें तर केवळ स्त्रीचे वेशानें असें पुष्कळ लोकांस फसविलें, मग प्रत्यक्ष स्त्रिया फसवितील त्यांत आश्चर्य नाहीं. असें ऐकून कमलाक्ष ह्मणाला, स्त्रिये, पुढें त्या हाराची व्यवस्था काय झाली, हें तुला माहीत आहे? ती बोलली, त्याची हकीकत मला माहीत आहे, पण सांगावयास मी कबूल नाहीं. आतां आपला आग्रहच आहे, ह्मणून सांगतें. तो बहुरूपी फिरत फिरत याच शहरीं आला होता, तो देवळांत उतरल्यावर मी तुह्मांसारखेंच त्यास फसवून तो हार घेतला आहे. असें बोलून उगीच राहिली. इतक्यांत कमलाक्षास तो हार पाहण्याची इच्छा उत्पन्न झाली; ह्मणून विलास भोगणें वगैरे सर्व विसरला आणि ह्मणाला, हे स्त्रिये, तो हार आत्तां कोठें आहे तो मला दाखविशील? स्त्री ह्मणाली, आतांच पाहिजे असेल तर मी जाऊन आणीन. पण कोतवालसाहेबांस मात्र मी हार तुह्मांस दिला आहे हें कळवूं नये. तुमचा सेवक मात्र माझे बरोबर द्यावा. तो हार आणून तुमचे गळ्यांत घालावा असें मला वाटतें. परंतु माझे गळ्यांतही कांहीं तरी तुमचे बरोबरीनें असलें पाहिजे, तें मात्र मजपाशीं नाहीं. हें ऐकून कमलाक्ष ह्मणाला, माझे जवळ दुसरा एक लहानसा हार आहे तो तुझे गळ्यांत घालीन. हा पहा माझे जवळ आहे. असें बोलून त्यानें आपणा जवळचें जवाहीर

सोडून त्यांतील हार काढून तिचे हातांत दिला. तो पाहून ती ह्मणाली, प्राणनाथ, हा तुह्मांस कसा दिसतो पाहूं. कमलाक्ष ह्मणाला, हा लहान आहे ह्मणून स्त्रियांचे उपयोगी आहे. तर तुझ्याच गळ्यांत घालू पाहूं कसा दिसतो तो. असें ऐकतांच तो हार तिनें आपल्या गळ्यांत घातला आणि कांहीं वेळ आनंदाच्या गोष्टी सांगून ह्मणाली, तुमचा हार साधारणच आहे. त्या माझ्या हाराचा प्रत्येक मणी ह्या सगळ्या हाराचे किमतीचा होईल. कमलाक्षास तो हार केव्हां मिळेल असें झालें. त्यानें विचार केला कीं, आतां रात्र थोडी राहिली आहे. जरी आतां हिला परत येण्यास उशीर लागला, तरी ही आपलीच झाली आहे, ह्मणून सर्व काळ आनंद भोगण्यास मिळेल. पण हिच्या तोंडांतून आल्याप्रमाणें त्याचवेळीं हार मिळेल तर बरें होईल. असें ह्मणून हार आणण्यास तिला पाठविण्यास सिद्ध झाला. स्त्री ह्मणाली, महाराज, मजबरोबर तुमचा सेवक येऊं द्या, ह्मणजे हार आणितें. परंतु मी हार आणण्यास गेलें आहें, हें कोतवालसाहेबांस कळूं नये. असें ऐकतांच कमलाक्षानें (कमलाक्ष सेवकास बोलाविण्यास खालीं आला, इतक्यांत तिनें खडूनें तेथें असें लिहून ठेविलें कीं, मी बहुरूपी आहें, तुला फसविलें.) हळूच खालीं येऊन सेवकास उठविलें आणि तिचे बरोबर जाण्यास सांगून तिची रवानगी करून आपण वाट पाहत बसला. तो स्त्रीरूपी बहुरूपी सेवका बरोबर गांवांत येऊन एका गल्लींत शिरला आणि 'माझें जरूरीचें काम करून मी परत येईं पर्यंत तूं येथें उभा रहा.' असें त्यास सांगून आपले सोबत्याचे घरीं गेला आणि पुरुषाचें रूप घेता झाला. नंतर आपण आजपर्यंत धंदा केल्याचें सार्थक आज झालें, असें ह्मणून त्याचा सोबती व तो हे दोघे ही दुसरे गांवीं निघून चालते झाले.

इकडे सेवक बराच वेळ वाट पाहून परत आला तों उजाडलें. क-

मलाक्षानें सेवकास पाहून ह्मटलें, अरे, कसें काय झालें? तिला कोठें सोडिलेंस.? तो ह्मणाला, आपण सांगितल्याप्रमाणें मी तिचे बरोबर गेलों. पण तिनें 'आतां मला सोबत नको. मी जाऊन परत येतें' असें सांगून एका गल्लीचे नाक्यावर मला उभें केलें व मी वाट पाहत राहिलों. परंतु उजाडे पर्यंत ती तेथें आली नाहीं, ह्मणून परत आलों. कमलाक्षास अद्यापि आशा होती, परंतु चांगलें दिसूं लागल्यावर तीं अक्षरें त्याचे नजरेस पडलीं आणि मला त्यानें पूर्ण फसविलें, असें समजून उगीच राहिला. इतक्यांत कोतवाल येऊन ह्मणाला, कसें काय झालें? रात्रीची स्त्री कोठें आहे? तें ऐकून सर्व हकीकत कमलाक्षानें त्यास सांगितली. ती ऐकून कोतवालास ही त्या बहुरूप्याचे कसबाचें आश्चर्य वाटलें. परंतु तो कमलाक्षाचें समाधान होण्यासाठीं ह्मणाला कीं, गेल्याचा शोक करून काय उपयोग? ज्यानें आपणांस फसविलें तो तर आतां आह्मांस खचीत सांपडणार नाहीं. आपण राजपुत्र आहां. आपणांस द्रव्य ह्मणजे काय पदार्थ आहे? तें ऐकून कमलाक्षास आपण मूर्ख ठरलों असें वाटलें आणि आपल्या मनाचें समाधान करूं लागला. त्यास असा विचार झाला कीं, त्या बहुरूप्यानें स्त्रीचें रूप घेऊन अनेक लोकांस फसविलें आणि शेवटीं मलाही फसविलें. इतका स्त्रीचे रूपास मोहित झाल्यानें माझे अंगीं अज्ञानपणा आला. व त्यानें आपलीच गोष्ट मला फिरवून सांगितली, तरी ही मी विचारवंत असून उमजलों नाहीं. त्यापक्षीं हा गुण स्त्रियांचे मोहाचा आहे. असो, यामुळें आपणांस बराच बोध झाला. नंतर कोतवालास ह्मणाला. कोतवालसाहेब, त्या प्रसंगानें आपण माझे मित्र झालां, ह्मणून माझी खरी गोष्ट मीं तुह्मांस कळविली आहे. ती कोणापाशीं न बोलण्याविषयीं शपथ दिल्याची आठवण ठेवावी. आपण मला आश्रय दिला हे आपले उपकार मी विसरणार नाहीं. माझें द्रव्य बहुरूप्यानें फसवून नेलें, तें त्याचे चातुर्या बद्दल मीं त्यास बक्षीस दिलें असें समजतों. माझें सर्व द्रव्य गांठोड्यां

तच नव्हतें. अद्यापि मजपाशीं संकेताच्या कामास जाऊन परत घरीं येऊन पोहोंचण्यापुरतें द्रव्य शिलक आहे. तर आतां माझे कार्यास जाण्यास मला आपली आज्ञा असावी. असें ह्मणतांच कोतवालानें कांहीं दिवस राहण्याविषयीं फार आग्रह केला, ह्मणून आणखी दोन दिवस राहून तो राजपुत्र पुढें जाण्यास निघाला. बसण्याकरितां घोडा होताच. तसाच घोड्यावर बसून आपणां जवळील कांहीं हिरे विकून त्यानें मोहरा व रुपये घेतले आणि एक चांगली तरवारही बरोबर घेतली. नंतर कोतवालाचा निरोप घेऊन मार्गस्थ झाला. जाता जातां मनांत अनेक प्रकारचे तरंग येऊं लागले.

चिंतामणि ह्मणाला, रत्नाकरा, असें पहा कीं, जोंपर्यंत पुरुष स्त्रियांचे नेत्रकटाक्ष बाणांनीं विंधिला नाहीं, तों पर्यंत सर्व चातुर्य आणि पराक्रम त्यांचें तेज आहे. परंतु एकदां तो बाण हृदयास लागला ह्मणजे पुरुषाचें धैर्य खचून जातें. महान् तपोनिधि विश्वामित्रा सारखे जे लोहपिष्ठ भक्षण करून राहणारे त्यांचीही अवस्था अशीच झाली. ऋष्यशृंग हा महान् तपस्वी होता व त्यास स्त्री ह्मणजे काय हें माहीत देखील नव्हतें. परंतु प्रसंगीं स्त्रियांनींच त्याला मोहून दशरथाचे सभेंत यज्ञाकरितां आणिलें. मग सामान्य पुरुषाची काय कथा आहे? कमलाक्ष जरी पराक्रमी, विद्वान् आणि चतुर होता, तरी स्त्री मोहा पुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. तशांत स्त्री नसून उत्तम बहुरूप्यानें तो स्त्रीवेष धारण केला होता. आणि खऱ्याहून खोट्याचें तेज ज्यास दिसतें. अशा सर्व कारणांमुळें कमलाक्षाचे चातुर्याचा उपयोग कांहींच झाला नाहीं.

इकडे कमलाक्ष मार्ग चालत असतां त्याचे मनांत अनेक विचार येऊं लागले. ते असे कीं, आपलें लग्न झाल्यास सुमारें चार महिने झाले. त्यापक्षीं इतके दिवस तिला (चंद्रप्रभेला) मजवांचून कसें चैन पडलें असेल? असें आहे कीं, जों पर्यंत आपण एखादे वस्तूचा अनुभव घेतला नाहीं तों पर्यंत तिची

गोडी नाहीं. पण एकवेळ त्या वस्तूची प्राप्ति होऊन गोडी लागली ह्मणजे मग सर्वकाळ ती मिळण्याची इच्छा होते. त्याप्रमाणें माझे व स्त्रीचे गांठीस चार महिने झाले. तिला पतीच्या सुखाचा अनुभव आला आहे. त्यापक्षीं तिच्यामनांत कामेच्छा उत्पन्न झाल्यावांचून राहिलीच नसेल व मी तिजपाशीं नसल्यामुळें अन्य पुरुषाचे योगें तिनें आपली इच्छा पूर्ण केली असेल यांत संशय नाहीं. अशा नानाप्रकारच्या कुकल्पना करीत तो मार्गानें जात होता, इतक्यांत दोन प्रहरचा समय झाला, परंतु जवळ कोठें गांव दिसेना व पाणी ही दिसेना ह्मणून तसाच पुढें गेला, इतक्यांत एक लहानसा गांव दृष्टीस पडला. परंतु मार्गांत कोणी मनुष्य भेटेना, त्यामुळें गांवाचें नांव किंवा कांहींच वर्तमान कळेना. ह्मणून गांवाकडे गेला, तों त्या गांवांतून धूर वर जात आहे, असें पाहून त्याचे मनांत आलें कीं, येथें कांहीं तरी चमत्कार असावा. ह्मणून पुढें येऊन गांवांतील देवळाजवळ त्यानें घोडा उभा केला आणि कोणी मनुष्य भेटेल ह्मणून पाहूं लागला. परंतु कोणीच भेटलें नाहीं. त्या गांवांतील बरीच मनुष्यें एका एकीं मह्मारीच्या उपद्रवानें मरून गेलीं होतीं. त्यां पैकीं कित्येकांस अग्निकर्म झालें आणि भयानें बाकीचीं मनुष्यें गांव सोडून गेल्यामुळें कित्येकांचे मुर्दे तसेच घरोघर पडून राहिले होते. कमलाक्ष ती भयंकर अवस्था थोडीशी पाहून तसाच मागें फिरला. त्याला तृषा फार लागली होती, परंतु तेथील पाणीही पिण्याचें भय वाटून तो गांव सोडून पुढें चालता झाला. उन्हाच्या तापानें व्याकुळ होऊन त्याचें तोंड सुकून गेलें आणि अन्न पाणी मिळालें नाहीं त्यामुळें तो अगदीं चिंताक्रांत झाला. तेव्हां मनांत ह्मणाला कीं, मी घराहून निघाल्यापासून सर्वत्र दुःखच भोगीत आहें, यावरून आतां पुढें तरी मी ज्या कार्यास जात आहें, त्याचा परिणाम विपरीतच होणार असें दिसतें. अशा अनेकप्रकारच्या कल्पना करीत हळू हळू जातां जातां सायंकाळचा एक प्रहर दिवस राहिला, तरीही कोठें पाणी मिळेना. तेव्हां आतां प्राण जातो

किंवा राहतो अशा चिंतेंत पडला आहे, इतक्यांत दुरून मनुष्याचा शब्द ऐकूं आला. ह्मणून त्या सुमारास तसाच धीर धरून चालला असतां, गांव दिसूं लागला. जवळ गेला, तों तें मोठें शहर आहे असें दिसूं लागलें. मग त्यास हुशारी येऊन लवकरच त्या शहरांत येऊन पोहोंचला. त्या शहराचें नांव भरतपुर होतें. तेथें एक मोठें देवालय होतें. त्या पुढें रमणीय सरोवर होतें तें पाहून घोड्यावरून खालीं उतरला आणि यथेच्छ पाणी पिऊन तृप्त झाला. नंतर घोड्यासही पाणी पाजून कोतवालाचे घराहून कांहीं फराळाचें घेतलें होतें तें खाऊन शांत झाला. नंतर त्या देवळांत जाऊन शंकराचें दर्शन घेऊन बसला आहे इतक्यांत उन्हाचे तापानें आणि अन्न पाणी वेळेवर न मिळाल्यामुळें ग्लानि आली होती ह्मणून तेथेंच त्यास निद्रा लागली. निद्रेचे भरांत त्यास चमत्कारिक स्वप्न पडलें. "मनीं वसे तें स्वप्नीं दिसे" या ह्मणी प्रमाणें त्या स्वप्नांत त्यानें असें पाहिलें कीं, आपली स्त्री एका तरुण व रूपवान् पुरुषाचा हात धरून फिरत आहे आणि तीं दोघें बोलत बोलत त्याजकडे येत आहेत. स्त्री ह्मणाली कीं, हा माझा पहिला पति, याचें मुख आज दृष्टीस पडत आहे. याला माझी दया आली नाहीं. हा इतका निर्दय आहे, हें पूर्वी मला माहीत नव्हतें. ईश्वर कृपेनें आतां तुमची गांठ पडली, तेणें करून मला सुखाचा वांटा मिळाला. ह्मणून आतां याची अडचण कशाला पाहिजे? याला मारून टाका, ह्मणजे आपण अगदीं निर्भय राहूं. असें तिचें भाषण ऐकून त्या पुरुषानें तरवार हातांत घेतली आणि वार करणार, इतक्यांत हा भयानें जागृत झाला. मग पाहतो तों जवळ कोणी नाहीं ह्मणून आपण स्वप्नांत ही गोष्ट पाहिली, असें समजला. परंतु मनांत ह्मणाला, काय हें स्त्रियांचें दुष्ट कर्म! आपल्या नवऱ्याला मारण्यास देखील त्या चुकत नाहींत. असो, आपण बाहेर निघालों आहों, त्या अर्थी आपला बेत सिद्धीस नेलाच पाहिजे. मग काय होईल तें होवो. असें ह्मणून त्या देवळांतून निघाला, तों सायंकाळ झाला ह्मणून

न शहरांत येऊन एका व्यापाऱ्याचें मोठें घर पाहून तेथें उतरला. व्यापारी लोकांकडे परगांवचे वच्छाद येत असतात, त्या प्रमाणें ह्राही गेला. तेथें जातांच घरधन्यानें त्याचा सन्मान केला आणि कोठून आलां वगैरे क्षेम- कुशल वृत्त विचारिल्यावरून कमलाक्षानें आपण व्यापारी असल्याचेंसां गितलें. नंतर तेथें त्याची सोय यथास्थित झाली. रात्रीं भोजन वगैरे झा- ल्यावर एकत्र बसून गोष्टी चालल्या असतां तो घरधनी जुनाट व्यापारी असल्यामुळें त्या बनाऊ व्यापाऱ्याचे बोलण्यांत फेर झालेला त्याचे ध्यानांत येऊन त्यास शंका आली. ह्मणून त्यानें तशाच आणखी कांहीं व्यापार धं- द्याच्या गोष्टी चालविल्या शेवटीं तो खचीत समजला कीं, हा व्यापारी नव्हे. या करितां याला खरी हकीकत विचारिली पाहिजे. ह्मणून तो सर्व मंडळी निजावयास गेल्यावर एकटाच कमलाक्षा जवळ आला. आणि ह्मणाला, महाराज, आपण मला ज्या सर्व गोष्टी सांगितल्या, त्यावरून आपणांस व्यापा- राची माहिती नाहीं असें खचीत समजलों. तर आपण कोण आहां हें खरें सांगावें. मी तें कोणास कळविणार नाहीं, असें ह्मणून त्यानें शपथ केली. नंतर कमलाक्षानें आपली सर्व हकीकत त्यास सांगितली. व्यापारी ह्मणाला. आप- ण थोर गृहस्थ आज अशा प्रसंगानें आमचे घरीं आलां. नाहींपेक्षीं आ- पण आमचे दृष्टीस देखील पडणें कठिण. पण मी असें ह्मणतों कीं, ज्या स्त्रीच्या शोधास आपण जातां तिची वाईट चाल आपण कांहीं ऐ- किली आहे काय? कमलाक्ष ह्मणाला शेटजी, ऐकिली तर नाहीं. परंतु कित्ये- क स्त्रिया अशीं कर्मे करीत असतात, ह्मणून परीक्षा मात्र पाहणें आहे. व्यापारी ह्मणाला, महाराज, आपण ह्मणतां ही गोष्ट मला बरी दिसत ना- हीं आणि त्यापासून एखादे वेळीं भयंकर परिणाम होतो. ह्मणून आपणांस नुक्तीच एक नवीन घडलेली गोष्ट सांगतों.

ह्याच भरतपुरनगरांत धनशेट ह्मणून सावकार आहे. त्यास एक

कुवराबाई नांवाची मुलगी आहे. ती रूपानें अत्यंत सुंदर आहे. बापानें एकुलती एक कन्या असल्यामुळें तिचे लहानपणापासून लाड पुरविले. पुढें ती उपवर झाल्यावर त्याचे जातीचे लोक येथें फार नाहींत ह्मणून येथून दहा कोशांवर कमळाज नामक एक गांव आहे, तेथील आपल्या बरोबरीच्याच एका व्यापाऱ्याचा मुलगा माधवदास नामक आहे, त्यास देऊन तिचें लग्न केलें. परंतु बापाची लाडकी असल्यामुळें बहुतकरून ती माहेरींच असे. पुढें ती वयांत आली, तेव्हां सासरीं गेल्यावर तिची आणि नवऱ्याची प्रीती जडली. मग माहेरीं येण्यास तिला फार कठिण वाटूं लागलें. सर्वकाळ पतीची सेवा करावी व त्याचें मनरंजवीत असावें, हें तिला फार आवडूं लागलें. असे कांहीं दिवस गेल्यावर एके दिवशीं बापानें तिला आणण्या करितां मागारी पाठविल्यावरून सासऱ्यानें तिला माहेरीं पाठविलें; परंतु माधवदासाचे मनास तें आलें नाहीं. बायको गेल्यापासून त्यास वेड लागल्यासारखें झालें व चैन पडेना. शेवटीं तो कामाचे प्रबळतेमुळें बाजारांत एका वेश्येचे नादीं लागला. परंतु बापास तें कांहींच माहीत नव्हतें. हा मोठ्या सावकाराचा पुत्र आपला मित्र झाला ह्मणून वेश्येस आनंद होऊन द्रव्य संपादन करण्याची इच्छा धरून त्याचे मनाप्रमाणें ती वागूं लागली. तेणें करून त्यास आपल्या बायकोचें स्मरण देखील होईनासें झालें. घरांतील सर्व शिलकेचें काम त्याजकडेसच बापानें दिलें होतें. त्यामुळें त्यानें कितीही द्रव्य खर्च केलें तरी बापास तें कळत नसे. असे कांहीं दिवस गेल्यावर त्या वेश्येचे मनांत असें आलें कीं, त्याची बायको माहेरीं गेली आहे, ती इकडे न येईल तर आपणांस पुष्कळ द्रव्य मिळेल. ह्मणून तिनें विचार केला कीं, याला कांहीं तरी त्याचे बायकोची बनाऊ चहाडी सांगावी ह्मणजे तिचा त्याग करून हा आपणांसच वश राहील, असें मनांत आणून उपाय योजूं लागली. त्या वेश्येजवळ एक तिचा जुना मित्र होता. तो जातीचा सोनार होता. त्याला तिनें सांगितलें कीं, माधवदासाच्या सासुरवाडीस जाऊन त्याचे

बायकोचें घर पाहून ये, म्हणजे त्याला तिची कांहीं तरी चहाडी सांगून हा तिचा त्याग करील असें करूं. असें सांगून तिनें त्यास इकडे पाठविलें. राजपुत्रा, पहा, वेश्या द्रव्या करितां काय करितील याचा विश्वास नाहीं. कुवराबाई बिचारी पतिव्रता असून तिजवर हें व्यर्थ संकट आलें. तो सोनार येथें येऊन धनशेटीचे दारावरून फिरत असे. एके दिवशीं त्यानें कुवराबाईस खिडकींत उभी असतांना पाहिलें. त्यावेळीं तिची ही नजर त्याकडे जाऊन हा आपल्या सासरचा सोनार आहे असें तिनें ओळखिलें. कारण तो तिच्या सासऱ्याकडे दागिने नीटकरण्याचें काम कधीं कधीं करीत असे. तिनें त्यास हाक मारिली, अहो शेटजी, इकडे या, असें म्हणूनत्यास वर बोलाविलें आणि तुम्ही कधीं आलां वगैरे सर्व हकीकत विचारून आपल्या सासरींचा सर्व समाचार त्यास विचारिला. सर्व सुखरूप असल्याचें वर्तमान त्यानें सांगितल्यावरून तिला आनंद झाला आणि तिला नवऱ्याची आठवण झाली. मग तिनें त्या सोनारास तुम्ही कधीं जाणार म्हणून विचारिलें, त्यावरून त्यानें एक महिन्याचे आंतच जाऊं असें सांगितलें. तेव्हां तिनें येथें माझे माहेरीं थोडेच दिवसांत कांहीं देवकार्य आहे, तें झाल्यावर मी ही येणार आहें असें सांगितलें. सोनार म्हणाला, बरें आहे. आपण बरोबरच जाऊं. असें म्हणतांच तिनें बापास सर्व हकीकत कळविली. व त्यानें ही त्यासोनारास सांगितलें कीं, तुम्ही जाते वेळीं मला कळवा. हिला तुम्हाबरोबर सासरीं पाठवावयाची आहे. तें ऐकून सोनार उठून गेला. परंतु आपला मतलब साधण्याकरितां रोज एकवार येऊन तिला भेटत असे. एके दिवशीं त्यानें कांहीं दागिन्यांची गोष्ट काढिली. त्यावरून तिनें सांगितलें कीं, माझे हातांतील आंगठी लहान होते, ती जरा मोठी करून द्या. असें म्हणून तिनें ती आंगठी सोनारास दाखविली. ती त्यानें पाहिली आणि म्हणाला, ही मी आतांच नीट केली असती, पण माझीं हत्यारें येथें नाहींत. बरें आपण घरीं गेल्यावर करूं. असें म्हणून त्यानें ती परत दिली. पुन्हा म्हणाला, बरें तर द्या इकडे मी

ज्याचे घरीं उतरलों आहे, त्याचे दुकानांतून आनांच नीटकरून आणितों. उशीर कशाला पाहिजे. असें ह्मणतांच तिनें विश्वासानें आंगठी त्याजपाशीं देऊन लवकर आणण्यास सांगितलें. ती आंगठी घेऊन तो निघून गेला. परंतु ही गोष्ट तिनें बापास कळविली नव्हती. संध्याकाळ झाला तरी सोनार आला नाहीं. त्यामुळें तिचे मनांत संशय येऊं लागला. परंतु दुसरे दिवशीं ही आला नाहीं, तेव्हां पक्कें समजली कीं, त्यानें मला ठकविलें. आतां ही गोष्ट जर बापास कळली तर तो फार रागें भरेल, याकरितां त्यास न सांगतां तिनें आपले आईजवळ मात्र सांगितलें. त्यानंतर बरेच दिवस तिनें सोनाराची वाट पाहिली, परंतु तो पुनः दृष्टीस पडला नाहीं. तेव्हां तीं निराश झाली.

इकडे सोनार आंगटी घेऊन आपल्या गांवीं गेला. आणि ती वेश्येस दाखवून ह्मणाला, पहा, मी ही तिची आंगठी आणिली आहे. यावर आतां कांहीं कल्पना कर. असें ह्मणून ती त्यानें तिचे स्वाधीन केली. रात्रीं माधवदास आल्यावर वेश्या त्यास ह्मणाली, कीं, आज एक फिरस्ता व्यापारी आला होता, त्यापासून मी एक आंगठी विकत घेतली आहे. तिजवर नांव असल्यामुळें मी त्यास विचारिलें कीं, तूं ही कोणापासून आणलीस? तो ह्मणाला, मला एके ठिकाणीं मिळाली. परंतु पुनः मी त्यास फारच आग्रहानें विचारल्यावरून खरें वर्तमान त्यानें सांगितलें. तें असें कीं, भरतपुर शहरांत एका सावकाराचें मोठें घर आहे, तेथें कोणी एक स्त्री अत्यंत रूपवान् आहे. ती खिडकींत उभी राहिलेली पाहून माझें मन अगदीं वेडें झालें, ह्मणून मी तिजकडेच पाहत राहिलों. तिची माझी एक दृष्टि झाल्यावर तिनें ही मला खुणा केली आणि वर बोलाविलें. आह्मी फेरीवाले व्यापारी असल्यामुळें आमचा संशय कोणास यावयाचा नाहीं. तसाच मी वर गेलों तों तिनें कांहीं दागिने घेण्याचें निमित्त करून बराच वेळ मला बसविलें. तिचे मनांत माझेविषयीं कामेच्छा झाल्यामुळें ती जाऊं देईना. परंतु मला भय वाटूं लागलें, ह्मणून मी पुन्हा पुन्हा जावयास सिद्ध होई. परंतु

तिचें मन अगदीं वेडें झाल्यामुळें ती निर्लज्ज झाली. असें पाहून मलाही तसेंच झालें. मग धैर्य धरून तसाच राहिलों. रात्रीं घरधनी घरीं येण्यास प्रहर रात्र होत असे. तोंपर्यंत तिचेंच राज्य आहे असें तिनें सांगितलें आणि माड्यावर एक लहानशी खोली होती तींत मला ठेविलें. रात्र झाल्यावर आमचा उभयतांचा मनोरथ सिद्धीस गेला. मग तिचा नाद लागल्यामुळें कांहीं दिवस मी तेथें नित्य जाऊं लागलों. एके दिवशीं तिच्या हातांतील आंगठी अंधेरांत पडली. ती माझे पायास लागल्यामुळें मी उचलून घेतली. परंतु ती खालीं पडल्याचें तिला भान नव्हतें. व मी आपल्याजवळ ठेविल्याचें मलाही स्मरण राहिलें नाहीं. नंतर तेथें कित्येक दिवस त्या स्त्रीचे नादांत राहिल्यानें माझा व्यापार नीट चालेनासा झाला. ह्मणून "थोडी तो गोडी,, असें मनांत आणून एके दिवशीं मी पुन्हा येणार नाहीं, बाहेर गांवीं जातों. असें तिला सांगितलें, तेव्हां तिचे डोळ्यांनीं पाणी आलें आणि माझे गळ्यास मिठी मारून ह्मणाली, पुन्हा आतां कधीं येणें होईल? मग मी आठचार दिवसांनीं येईन असें सांगून परत आलों. नंतर पूर्वप्रमाणें आपला व्यापार चालविला. अशी त्या आंगठीची हकीकत त्यानें सांगितली आहे. तुमचे सासुरवाडचे गांवांत अशी कोण आहे बरें? मेल्या गरतींनीं आमचा धंदा बुडविला आहे, त्या असें करूं लागल्या; मग आह्मांकडे कोण येतो? असें तिचें भाषण ऐकून माधवदासानें आंगठी पहावयास मागितली. त्यावरून वेश्येनें काढून त्याचे हातांत दिली. ती पाहून आपले घरांतीलच असावी असें त्यास वाटलें. मग उजेडांत निरखून पाहतो तों ही खचीत आपले बायकोचीच आंगठी आहे, असें समजला व तिजवर आपलें नांवही त्यानें पाहिलें. त्यामुळें जो त्याचे मनास संताप झाला तो सांगतां येत नाहीं. आपल्या स्त्रीनें माहेरीं असें कृत्य चालविलें आहे काय? बरें, कांहीं चिंता नाहीं. असें ह्मणून त्या वेश्येस ह्मणाला. आतां मी घरीं जातो ही आंगठी मला पाहिजे. वेश्येस तें कांहींच बोलेनें; ह्मणून तिनें ती त्यास दिली.

ती घेऊन तो घरीं आला आणि चैन पडेनासें होऊन केव्हां बायकोचें शासन करीन असें त्यास झालें. नंतर बापाची आज्ञा घेऊन सासुरवाडीस येण्याकरितां निघाला. तो दुसरे दिवशीं संध्याकाळीं येऊन ह्या गांवीं पोहोंचला आणि सासऱ्याचे घरीं गेला, तो जांवई आल्याचें वर्तमान कळतांच सर्वांस आनंद झाला. त्यांत कुवराबाईचा तर आनंद कोठेंच मावेना. परंतु तिला पाहिल्याबरोबर त्याचे आंगाचा तिळपापड होऊं लागला. नंतर भोजनादिक झाल्यावर रात्री आनंदानें एकांताच्यावेळीं कुवराबाई त्याचे पायाजवळ येऊन बसली. परंतु तो कांहींच बोलेना. तेव्हां झोंप लागली असें समजून तिनें त्यास जागृत केलें नाहीं. अशी ती रात्र गेली. नंतर दुसरे दिवशीं तिला घरीं न्यावया करितां आलों असें त्यानें सासऱ्यास कळविलें. सासऱ्यानें लागलीच तयारी करून दुसरे दिवशीं डोली करून तिला त्याज बरोबर रवाना केलें. मार्गानें जात असतां सुमारें पांच कोशांवर एक मोठी नदी लागली, तिला पायउतार नव्हता आणि पाणी उतरतें होतें. यामुळें नाव ही चालविण्याचा उपाय नव्हता. ह्मणून तेथें तरून जाण्यास भोपळ्यांची सांगड असे. माधवदासानें तेथें कांहीं वेळ बसून त्या सांगडवाल्यास एकीकडे नेऊन असें सांगितलें कीं, माझी एक गोष्ट तुला सांगावयाची आहे. तूं ऐकशील तर तुला पंचवीस रुपये देईन. तो ह्मणाला, काय आहे ती सांगा. माधवदास ह्मणाला अरे, ही माझी बायको आहे. हिनें दुष्कर्म केलें ह्मणून हिला मी मारणार आहें. तर ही तुझ्या सांगडीवर बसल्या नंतर तूं दोर काप, ह्मणजे ती बुडून जाईल. असें ऐकतांच सांगडवाला ह्मणाला, मजकडून अशी गोष्ट होणार नाहीं. पुन्हा माधवदास ह्मणाला, अरे, जरी तूं असें न केलेंस तरी मी हिला मारणारच, तुला रुपये मिळणार ते मात्र तूं घालवितोस. परंतु मी सांगतों तसें करण्यास तुला कांहीं पाप नाहीं. त्याचें पाप माझे मस्तकीं आहे. असें ह्मणतांच त्या सांगडवाल्यानें तें कबूल केलें. नंतर तिला सांगडीवर बसवून पलीकडे नेत असतां नदीचे मध्यभागीं गेल्यावर-

सांगडीचे दोर कापतांच कुवराबाई पाण्यांत पडून वाहू लागली. असें माधवदासानें पाहून कांहीं वेळ शोक केल्यासारिखें दाखविलें आणि बरोबर आलेले डोलकऱ्यास परत पाठविले. नंतर सांगडवाल्यास पंचवीस रुपये देऊन आपण घरीं निघून गेला.

कुवराबाई वाहत असतां दैववशात् त्या सांगडीचा एक भोपळा तिचे हातीं लागला. तो पोटाखालीं घेतांच ती तरूं लागली. परंतु पोहतां येत नव्हतें ह्मणून तशीच वाहत वाहत सुमारें दोन कोश पर्यंत गेली. त्या ठिकाणीं नदीचे कांठच्या एका झाडाची खांदी पाण्यावर आडवी आलेली होती आणि तिकडेच पाण्याचा ओघ असल्यामुळें ती खांदी तिनें धरिली आणि तिला पुष्कळ डहाळ्या असल्यामुळें त्या धरीत धरीत किनाऱ्यास आली. नंतर पलीकडे कोणी शेतकरी लोक जमीन नांगरीत होते, त्यास तिनें आपली हकीकत सांगितली आणि कांहीं पैसे द्यावयास करून आपलें माहेर येथून जवळच आहे असें त्यांस सांगून त्यांतील एक मनुष्य तिनें बरोबर घेतला आणि माहेरीं येऊन पोहोंचली. मग बरोबर आणिलेल्या मनुष्यास बोलल्याप्रमाणें पैसे दिले आणि घरीं वर्तमान कळविलें. तें ऐकून सर्वत्रांस ही वांचल्याबद्दल आनंद झाला. परंतु मुद्दाम तिला बुडविलें हें कृत्य कोणास ही माहीत नव्हतें. कुवराबाईचे मनांत मात्र अंदेशा आला होता, ह्मणून तिनें आपले बापास सांगितलें कीं, मला मुद्दाम माझे नवऱ्यानें बुडविलें असावें, कशावरून ह्मणाल तर रात्रीं माझे बरोबर त्यानें भाषण ही केलें नाहीं. आणि सुमारें पंधरा दिवसां मागें हरवलेली माझी आंगठी मी त्याचे हातांत पाहिली. त्यावरून असें वाटतें कीं, कांहीं तरी संशय त्याचे मनांत येऊन त्यानें हें कृत्य मुद्दाम केलें असावें. असें ह्मणतांच बापानें विचारिलें कीं, आंगठी कधीं हरवली? कुवराबाई ह्मणाली, बाबा मी खरी गोष्ट सांगतें. आंगठी हरवली नाहीं. माझे सासरचा पांडशेट सोनार आला होता. त्या जवळ ती मोठी करून आणण्यास मी दिली होती. ती मला त्यानें परत न देतां ठकवून नेली. तिजपासून हा अनर्थ झाला असावा. असें कन्येचें

भाषण ऐकून तिचा बाप घोड्यावर बसून त्या गांवीं गेला आणि सरकारांत जाऊन कळविलें कीं, माझे मुलीची आंगठी पांडशेट सोनारानें ठकवून आणिली आहे. तिची किंमत सुमारें पन्नास रुपये आहे. तर तिचा शोध करावा. असें ऐकतांच तेथील पोलीसकामगारानें त्या सोनारास बोलावून आणिलें आणि विचारिलें, पांडशेट, तुह्मी यांचे मुलीची आंगठी आणिली आहे काय? असे ह्मणतांच पांडशेट ह्मणाला, मी आंगठी कशी आहे ही पाहिली देखील नाहीं. मग पोलीसकामगारानें त्याजला अनेक प्रकारचे प्रश्न केले, त्यामुळें त्याचे बोलण्यांत कांहीं फेर पडलासा वाटून त्यास पक्का संशय आला. ह्मणून त्या सोनारास एकीकडे शिपायाचे स्वाधीन करून जरब देऊन कबूल करविलें. तेव्हां मी बाजारांतील तारा नामक वेश्येस ती आंगठी दिली, असें त्यानें सांगितल्यावर त्या वेश्येस तेथें आणिलें आणि तिची जबानी घेतली, पण ती कबूल करीना. सोनारानें खरोखर सांगितल्या मजकुरावरून आणि सावकाराचे सांगण्यावरून तिला ही एकीकडे नेऊन तपास करविला. नंतर ती ही कबूल झाली कीं, ती माधवदास नामक सावकार पुत्रास दिली. असें ह्मणतांच त्यास ही बोलाविलें. त्यानें सांगितलें, ही आंगठी माझे बायकोची आहे. पण ती त्या वेश्येचे हातीं लागून तिनें मला दिली व एक बनाऊ गोष्ट सांगून माझे बायकोचे वाईट कर्माविषयीं माझे मनांत भरून दिलें. असें दुष्टकर्म त्या वेश्येनें केलें. पोलीसकामगाराचे ध्यानांत हें आल्यामुळें त्यानें त्या वेश्येस आणि सोनारास शिक्षा दिली. नंतर सर्व आप आपले ठिकाणीं गेले. सावकारपुत्रास आपण वाईट कर्म केलें असें वाटून पश्चाताप झाला आणि कुवराबाई पतिव्रता असल्यामुळें नवऱ्यानें आपणांस बुडविल्याचें तिनें कांहींच मनांत न आणितां, पूर्वीप्रमाणें त्याचे सेवेंत तत्पर राहिली. सारांश, राजपुत्रा, त्या सावकारपुत्रानें विचार न करितां, आपली स्त्री बुडविली होती, परंतु तिचे पातिव्रत्यानेंच तिला तारलें ह्मणून बरें झालें. तर विचारावांचून कांहीं गोष्ट केली असतां परिणामीं पश्चाताप होतो, याकरितां तुह्मी आपले

स्त्रीचे परीक्षेस जातां, परंतु असा अविचार मात्र करूं नका. खरोखर विचार पूर्वक जें करणें तें करा. एवढेंच आमचें सांगणें आहे. बरें असो. आपण मोठे गृहस्थ आज आमचे घरीं प्रसंगानें आलां, त्यामुळें आह्मी आपणांस बोललों. परंतु याचा राग मात्र येऊं देऊं नका आणि स्नेह ठेवा हेंच मागणें आहे. आतां रात्र फार झाली. मी निजावयास जातों. असें ह्मणून व्यापारी निजावयास गेला आणि कमलाक्षास ही निद्रा लागली.

इतकी गोष्ट सांगून चिंतामणि ह्मणाला, रत्नाकरा, आतां तुझी जाण्याची वेळ झाली आहे, ह्मणून तूं घरीं जा आणि उद्यां लवकर ये, ह्मणजे पुढें सांगेन. तें ऐकून रत्नाकर घरीं गेला. आणि दुसरे दिवशीं आल्यावर चिंतामणि गोष्ट सांगूं लागला.

प्रातःकाळीं कमलाक्ष व्यापाऱ्यास विचारून तें नगर सोडून निघाला. तो सुमारें दोन कोश गेल्यावर तेथून पुढें अरण्य लागलें. जिकडे तिकडे नानाप्रकारचे वृक्ष, वल्ली, तशींच वेळूचीं बेटें आणि शाल, तमाल, कदंब इत्यादि मोठमोठे वृक्षांनीं दाट भरलेली सर्व झाडी असून तिचे पुढें एक मोठा पर्वत आहे, त्याजवरही दाट झाडी आहे, त्यांत नानाप्रकारच्या वनपशूंचे शब्द होत आहेत, अशा घोर अरण्यांत तो आला आणि पुढें दोन मार्ग झाले आहेत, असें पाहून विचारांत पडला आतां कोणत्या मार्गानें जावें ह्मणून कांहीं वेळ तेथेंच उभा राहिला. आणि मार्गांत कोणी मनुष्य न भेटल्यामुळें चिंताक्रांत झाला. परंतु आतां येथें उभें राहून तरी काय करावें, कोणत्या तरी एका मार्गानें जावें असा विचार करून जाऊं लागला. परंतु खरा मार्ग चुकून पुढें तेथून सुमारें एक कोस गेला, तों तेथें त्यानें एक लहानशी विहीर पाहिली. तींत पाणी थोडेंच होतें. परंतु तृषा लागल्यामुळें तींतील पाणी पिऊन झाडाखालीं बसला आहे, इतक्यांत लांबून मनुष्याचा शब्द ऐकूं आला. आपण रस्ता चुकलों किंवा काय तें विचारावें ह्मणून त्या शब्दाचे सुमारानें तिकडे गेला, तों लहानसें एक झोपडें दिसलें. जवळ जाऊन आंत

कोण आहे ह्मणून विचारितांच एक स्त्री कुरूप आणि अमंगळ अशी बाहेर आली तिला मार्ग विचारिल्यावरून आपण मागच्या दोन रस्त्यांचे ठिकाणींच चुकलां आणि इकडे आला असें तिनें सांगितलें. कमलाक्ष ह्मणाला, तूं कोण आहेस? ती ह्मणाली, मी भिल्लाची स्त्री आहें. माझा नवरा अरण्यांत फळें मुळें आणावयास गेला आहे. कमलाक्ष ह्मणाला. तुह्मी अशा अरण्यांत कां राहता? ती ह्मणाली, आमचा येथें निर्वाह चालतो मग गांवांत राहून आह्मांस काय कर्तव्य आहे? असें बोलत आहेत तों त्याच घरांत कोणी एक स्त्री अत्यंत रूपवान् होती, ती हा कोणी परकी मनुष्य आला आहे असें समजून हळूच त्याचे दृष्टीस पडली. तिला पाहून कमलाक्षास आश्चर्य वाटलें कीं, अशी रूपवान् स्त्री याचे घरीं कशी आली असावी बरें? आपण भिल्लीणीस विचारून पाहूं असें मनांत ह्मणून त्यानें विचारिलें, ही तुमचे घरांत कोण आहे? त्यानें हिला पाहिलें असें समजून भिल्लीण ह्मणाली ती माझी सवत आहे तुह्मांस ही चौकशी कशाला पाहिजे? असें ह्मणतांच ह्यांत कांहीं तरी कपट आहे. असें तो समजला. इतक्यांत त्या सुंदर स्त्रीनें पुन्हा कमलाक्षाचे दृष्टीस पडून हात जोडून मला या दुष्टानें धरून आणिलें आहे अशी खुणा केली. तेव्हां त्याचे मनांत आलें कीं, ही स्त्री भिल्लानें मार्गांतून धरून आणलेली असावी. परंतु ती बिचारी काय करिते. भिल्लाचे भयामुळें येथें कोणी मनुष्य ही यावयाचें नाहीं. ह्मणून आपण हिला ह्या संकटांतून सोडवून नेऊं असें मनांत आणून त्या भिल्लीणीस ह्मणाला, ही तुझी सवत नव्हे. कोणी तरी रस्त्यांतून धरून आणलेली आहे, हें मी खचीत समजलों. तर आतां हिला माझे स्वाधीन कर. ह्मणजे मी हिला ठिकाणावर नेऊन पोहोंचवितों. नाहींतर तूं असें न केल्यास त्या माझ्या तरवारीनें प्रथम तुझे दोन तुकडे करून टाकीन. नंतर तुझा नवरा आला तर त्याचाही समाचार घेईन. असें ह्मणून त्यानें तरवार हातांत घेतली. तें पाहून भिल्लीण भयभीत होऊन कांहीं न बोलतां उगीच राहिली. घरांतील

स्त्रीस बाहेर बोलावून कमलाक्ष आपल्याबरोबर नेण्यास सिद्ध झाला. इतक्यां त भिल्लही फळें मुळें घेऊन घरीं परत येत होता. तो त्यास पाहून समज ला कीं, हा कोणीतरी मोठा गृहस्थ आहे. परंतु आपण भिल्ल आहों. आप ल्यापुढें याचें काय चालणार आहे? असें ह्मणून कमलाक्षाचे जवळ येऊन ह्मणतो तूं कोण आहेस? तुला येथें येण्याचें कारण काय? तूं मुकाट्यानें आपल्या मार्गानें जा, नाहींतर फुकट मारला जाशील. असें तो भिल्ल बोलत आहे, इतक्यांत कमलाक्षानें एका एकीं तरवारीचे घायानें त्याचे दोन तुकडे केले. हें पाहून त्याची बायको कांहीं नबोलतां उगीच राहिली आणि कमलाक्ष त्या स्त्री स आपल्या घोड्यावर बसवून आपण पायांनीं चालत चालत मागील रस्त्याचे तिठ्यापर्यंत परत आला. इतक्यांत त्या मार्गानें एक घोडेवाला भाडेकरी भाडें पोहोंचवून रिकामा परत जातांना दृष्टीस पडला. त्याचें घोडें भाड्यानें करून त्या घो ड्यावर तिला बसवून आपण आपल्या घोड्यावर बसला. आणि त्या स्त्रीचे सां गण्यावरून तिचे घराकडे जो मार्ग जात होता, त्या मार्गानें आपणांस नेण्यास त्या नें भाडेकऱ्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें तोच मार्ग धरिला. नंतर जातां जातां दोनप्रहरचा समय झाला ह्मणून कोठें उतरण्या करितां त्या भाडेक ऱ्याचे मतानें मार्गावरच एक लहानसा गांव होता तेथे जाऊन तीं उतरलीं. मग वाण्याचे दुकानांतून शिधासामग्री व भांडीं आणून स्वयंपाक केला आणि नि घांचें ही भोजन झालें. नंतर कांहीं वेळ विश्रांती करितां कमलाक्ष झाडाखालीं-च निजला. तशीच ती स्त्रीही एकीकडे त्याचेजवळच बसली आहे. असें पाहून कमलाक्ष तिला झालेली हकीकत विचारूं लागला. त्यावरून ती ह्मणाली, मी येथून सुमारें दहा कोशांवर आनंदपुर ह्मणून एक शहर आहे तेथील एका सावकारा ची स्त्री आहें. माझें नांव मोहिनी. मी आपले माहेराहून घोड्यावर बसून घरीं जात असतां, माझे बरोबरचा गडी गैरमाहीत असल्यामुळें चुकून या आड मार्गानें गेलों. तेथें त्या भिल्लानें आह्मांस पाहून माझे गड्यास एक तीर मारिला.

तो त्याचे छातींत लागून तत्काळ त्याचा प्राण गेला. त्याचें प्रेत पलीकडे एका झाडींत त्यानें नेऊन टाकिलें आणि मला घोड्यावरून खालीं उतरून ह्मणाला, तुझ्यापाशीं काय आहे ? तें सर्व दे. नाहींतर तुलाही अशीच मारितों. असें ह्मणतांच जीव वाचविण्याकरितां मी आपले आंगावरील सर्व दागिने काढून देऊन त्याची विनंती केली कीं, बाबारे, आतांतरी मला सोडून दे. हें ऐकून त्यानें मला आपले घरीं नेलें. घोड्याची व्यवस्था काय झाली ती मला माहीत नाहीं. यागोष्टीस आज चारदिवस झाले. मीरोज त्याची प्रार्थना करीं कीं, बाबारे, मला रस्त्यावर तरी नेऊन पोहोंचीव ह्मणजे मी हळू हळू चालत जाईन. अशा अनेक प्रकारें त्याची विनवणी केली. परंतु आज उद्यां असें करीत त्यानें चार दिवस काढिले. इतक्यांत परमेश्वरास माझी करुणा आली ह्मणून तुमचें येणें झालें. तुह्मांस पाहिल्याबरोबर मला धीर आला. आणि आज परमेश्वरच मजकरितां आला असें मला वाटलें. आतां तुह्मी मला माझे सासरीं पोहोंचवा ह्मणजे तुमचे मजवर फार उपकार होतील. असें ऐकून कमलाक्ष ह्मणाला, उपकार कशाचे, संकटांतील प्राण्यास सोडवावें हा आमचा राजकुळाचा धर्मच आहे. तूं कांहीं चिंता करूं नको. मी आतां तुला सासरीं पोहोंचवितों. ती ह्मणाली तुह्मी राजकुळांतील ह्मणतां आणि तसें लक्षण तर दिसत नाहीं. केवळ गरिबा सारिखा पोषाक करून एकटेच फिरतां याचें कारण काय ? कमलाक्ष ह्मणाला, मी राजपुत्र आहें खरा, पण कांहीं माझें तसेंच काम आहे, ह्मणून वेश बदलून जात आहें. स्त्री ह्मणाली असें तरी काय काम आहे ? मला कां सांगाना. मी कोणापाशीं बोलणार नाहीं. असें ऐकतांच कमलाक्ष ह्मणाला, तुला खरी हकीकत सांगतों, पण कोणापाशीं न बोलण्याविषयीं शपथ कर. असें ह्मणतांच तिनें शपथ केली. नंतर कमलाक्षानें आपली सर्व हकीकत सांगितली ती ऐकून मोहिनीस हा त्याचा अविचार आवडला नाहीं. परंतु आपण याला बोलून काय उपयोग. हा राजपुत्र आहे आपल्या मना सारिखें केल्याशिवाय

कधीं राहणार नाहीं. मग आपले शब्द तरी फुकट कां घालवावे. असें समजून उगीच राहिली. तों सायंकाळचा एक प्रहर दिवस राहिला, असें पाहून कमलाक्षा चे मनांत हिच्याविषयीं कामकल्पना आली. परंतु विचार केला कीं, आपण येथें बोललों तर ही कबूल करणार नाहीं. कारण कीं, भाडेकरी जवळच आहे. तर आज संध्याकाळीं वस्तीस मार्गांत उतरलों ह्मणजे तेथें आपलें काम साधेल. असें मनांत आणून उगीच राहिला. नंतर पुढें जाण्याची तयारी करून तीं मार्ग चालूं लागलीं. सायंकाळीं रात्रीं वस्तीस राहण्याकरितां एका गांवांत गेलीं. तेथें कोणाचे घरीं न जातां देवळांतच उतरलीं. जवळ फराळाचें वगैरे कांहीं नसल्याकारणानें तेथील दुकानांतून कांहीं मिठाई आणण्याकरितां भाडेकऱ्यास पाठविलें. इतक्यांत कमलाक्ष उतावळा होऊन स्त्रीस ह्मणाला तुला मीं सोडवून आणिलें त्यापक्षीं माझी गोष्ट ऐकशील तर सांगतों. असें ऐकतांच ती ह्मणाली, ऐकण्या सारखी असेल तर ऐकेन. सांगा तर खरी. असें ह्मणतांच त्यानें आपलें मनोगत तिला कळविलें. तें ऐकून मोहिनी ही उत्तम कुळांतील असल्यामुळें तिला आवडलें नाहीं. आणि मनांत ह्मणाली कीं, आतां येथेंच मी नाहीं म्हणून सांगेन तर कदाचित् हा उगीच राहणार नाहीं. ह्मणून आशा दाखवून यास आपले सासरीं न्यावें. असें मनांत आणून ह्मणाली, राजपुत्रा. तुह्मी बोलतां ही गोष्ट मला मान्य आहे आणि माझे मनांत ही तेंच होतें, पण तें माझ्यानें एकाएकीं कसें बोलवेल? तुह्मांकडूनच झालें, आतां ठीक आहे. पण आपण घाई करूं नये. येथें चोरीनें जें काम करावयाचें त्या पेक्षां घरीं जाऊन आपला मनोरथ सिद्धीस नेला तर काय वाईट आहे? आपण उद्यां घरीं जाऊं आणि यथेच्छ क्रीडा करूं. माझा नवराही घरीं नाहीं. व्यापाराकरितां दुसरे गांवीं गेला आहे. घरांत सासरा आहे तो वृद्ध झालेला असल्यामुळें तो आतां कांहींच मनास आणीत नाहीं. आणि बाकीचीं सर्व मनुष्यें माझे आज्ञेंत आहेत. आपणांस कोणाचें ही भय नाहीं. असें असतां

अशा देवळांतच उतावळें व्हावें, हें योग्य नाहीं. असें ऐकून कमलाक्षास आनंद झाला. नंतर फराळाचें भाडेकऱ्यानें आणिलें तें खाऊन रात्रभर तेथेंच निजून राहिली. प्रातःकाळीं उठून सुमारें प्रहर दिवसास आनंदपुरास येऊन पोहोंचलीं. घरीं येतांच त्या मोहिनीनें आंत जाऊन आपल्या मनुष्यां कडून राजपुत्राचा सन्मान करविला. भोजनादिक झाल्यावर भाडेकऱ्यास तिनें भाडें देऊन घालविलें. नंतर मार्गांत झालेली सर्व हकीकत घरीं कळविली. त्यावरून द्रव्य गेलें पण जीव वांचला ह्मणून सर्वांस आनंद झाला. कमलाक्षाचे मनांत तेथें रहावयाचें होतें, म्हणून कांहीं न बोलतां निजून राहिला. सायंकाळ झाला तथापि तो जात नाहीं, हा आपणांकरितांच राहिला आहे. असें समजून मोहिनीनें रात्रीचे बोलण्याप्रमाणें घाट घातला. रात्रीं भोजनादिक झाल्यावर त्या घराचे जवळच हवा घेण्याचा बंगला होता, त्यांत त्याला निजविलें आणि घरांतील सर्व कामकाज आटोपल्यावर सर्वांस निद्रा लागल्यावर आपण हळूच एक गडी बरोबर घेऊन त्या बंगल्यांत राजपुत्राचे जवळ आली आणि ह्मणाली, कमलाक्षा तुह्मांला कालरात्रीं मी देवळांत सांगितल्याप्रमाणें आलें आहे. आतां आपण यथेच्छ क्रीडा करूं.

**कमलाक्ष**— मी येथें येऊन निजल्यापासून मला अगदीं चैन पडलें नाहीं. तूं केव्हां येशील असें मला झालें होतें. इतका उशीर कां लागला बरें?

**मोहिनी**— अगोदर जेवणास जराशी रात्र झाली. तशांत आणखी माझी जाऊ पुराण ऐकावयास जात असते, तिनें पुराणांतली एक गोष्ट मला सांगितली. ती ऐकत असतां मला कांहीं संशय आला ह्मणून मी तिला प्रश्न केला. त्याचें उत्तर तिला बरोबर देतां आलें नाहीं. ह्मणून बराच वेळ तिचें माझें त्या विषयीं भांडण झालें, ह्मणून जरासा उशीर झाला. बरें, आपण सज्ञ व विद्वान् आहां, ह्मणून त्याच प्रश्नांचीं उत्तरें प्रथम मला

**कम०** – असे कोणते प्रश्न आहेत? विचार पाहू.

**मो०** – हें जग कसें उत्पन्न झालें?

**कम०** – परमेश्वराचे इच्छेनें उत्पन्न झालें.

**मो०** – आह्मांस उत्पन्न कोणी केलें?

**कम०** परमेश्वरानें केलें आणि पालन ही तोच करितो. तसाच नाश ही त्याचेच इच्छेनें होत असतो.

**मो०** – ईश्वरानें जीवखाणी किती उत्पन्न केल्या आहेत आणि त्यांचीं नांवें कोणती?

**कम०** – ईश्वरानें एक जारज, दुसरी उद्भिज, तिसरी अंडज, चवथी स्वेदज. अशा चार जीवखाणी उत्पन्न केल्या आहेत.

**मो०** – मनुष्यांत प्रथम जाती किती उत्पन्न केल्या?

**कम०** – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अशा चार जाती परमेश्वरानें उत्पन्न केल्या. नंतर त्यांपासून परमेश्वराचे इच्छेनें दुसऱ्या जाती निर्माण झाल्या आहेत.

**मो०** – पाप ह्मणजे काय?

**कम०** – दुसऱ्यास हरएक प्रकारें दुःख देणें, हें मुख्य पाप आहे. आणखीं अनेक तऱ्हेचीं लहानसान पातकें आहेत.

**मो०** – माता कोणती?

**कम०** – राजाची स्त्री, गुरूची स्त्री, मित्राची स्त्री, सासू आणि आपली आई या पांच माता जाणाव्या.

**मो०** – बाप कोणता?

**कम०** – ज्यापासून आपला जन्म झाला तो बाप. आणि मौंजी बंधन करणारा, आपणास विद्या पढविणारा, अन्न देणारा, संकटापासून मुक्त करणारा हेही बापासारखेच जाणावे.

इतकें ऐकून मोहिनीनें कमलाक्षाचे गळ्यास मिठी मारिली आणि ह्मणाली हर हर! तूं माझा पिता आणि मी तुझी कन्या झालें असून आमचे हातून अ घोर पाप घडणार होतें. पण परमेश्वरानें माझे जावेस बुद्धि देऊन पुराणांतल्या गोष्टी काढविल्या आणि मीं तुह्मांस प्रश्न केले, त्यावरून हें मला कळलें. ना हींतर सर्वस्वी नाश करून घेण्यास पात्र झालें असतें. कां तुह्मांस कसें वा टतें ? असें ह्मणतांच कमलाक्षानें विचार केलाकीं, ही कुलीन आणि चतुर आ हे, ह्मणून युक्तीनें मला प्रश्न करून माझ्या वचनानेंच मला फसविलें आहे. आतां आपण ही हिला कन्याच ह्मणावी. असा विचार करून ह्मणाला, हे कन्ये, तूं ह्मणालीस हें खरें आहे. ज्याचे हातून कधीं ही पाप घडलें नाहीं त्याची बुद्धि एखादे वेळीं तिकडे वळली, तर परमेश्वर कांहीं तरी योगानें पाप करूं देत नाहीं. हें खचीत आहे. मी तुला भिल्लाचे घरांतून सोडविलें ह्मणून मी तुझा बाप झालों आणि तूं माझी कन्या झालीस हें मला माहित होतें. परंतु उगाच मी तुझें मन पाहत होतों. जाणून बुजून माझ्यानें तरी पाप करवेल काय ? मी तसा अविचारी नाहीं. असें ह्मणतांच मोहिनी मनांत समजली कीं, हा आप ल्या वचनानेंच फसला, ह्मणून आतां अशा गोष्टी सांगतो. मी कबूल असतें तर यानें पाप केल्यावांचून सोडलें नसतें. असो आतां आपलें याचें नातें झा लें, त्यापक्षीं यास कांहीं तरी हिताची गोष्ट सांगावी, असें मनांत आणून कम लाक्षास ह्मणाली, बाबा जें झालें तें नीटच झालें. परंतु पुढें आपले स्त्रीची परी क्षा करण्यास जातां, असें आपण मला मार्गांत कळविलें, त्यावरून थोडेंसें सुच वितें कीं, पुरुषांनीं स्त्रियांची परीक्षा कधींही पाहूं नये. प्रारब्ध योगानें जी स्त्री आपणांस प्राप्त झाली, तिचें कर्म ही प्रारब्धाधीनच आहे. जिच्यामनांत व्य भिचार बुद्धि नसून ती सर्व काळ आपल्यापतीची सेवा करून पातिव्रत्य रक्ष ण करिते, ती स्त्री उत्तम होय. परंतु तशी मिळणें हें सुदैव होय. कदाचित् दुर्गुणी मिळाली तर आपण कितीही उपाय केले तरी तिचे दुर्गुण ती कधीं ही

टाकणार नाहीं. कोणत्याही उपायांनीं तो आपलें मनासारखें करील, यांत संशय नाहीं. यावरून मला एक गोष्ट आठवली आहे ती सांगतें ऐका.

मणिपुर नगरांत धर्ममती नामक एक सावकार होता. त्याची कन्या प्रेममालिनी नामक होती. ती फार बुद्धिमान् असल्यामुळें बापानें तिला अनेक विद्या शिकविल्या. त्यामुळें तिचे चातुर्यास अधिकच पुष्टीकरण झालें. त्या सावकाराचे घरा जवळच दुसरा एक सामान्य गृहस्थ राहत असे. त्यास दामोदर नामक पुत्र होता. त्याचाही विद्याभ्यास चांगला चालला होता. दोघांचीं घरें जवळ जवळ असल्यामुळें दामोदर आणि प्रेममालिनी हीं दोघें लहानपणीं एकत्र खेळत असत. पुढें दामोदराचें वय चवदा वर्षांचें व प्रेममालिनीचें बारा वर्षांचें झालें. त्यावेळीं एके दिवशीं खेळत असतां, दामोदर ह्मणाला, अगे, आतां मजबरोबर खेळत आहेस ह्मणून त्यावेळीं तुझें आंग माझे आंगाशीं लागतें. परंतु पुढें तूं मोठी झाल्यावर तुझे बरोबर एक शब्दही बोलावयास मिळणार नाहीं. मग आंगास आंग तर कोठून लागणार? असें त्याचें भाषण ऐकून प्रेममालिनी ह्मणाली. दामोदरा, तूं बोललास तें मी समजलें. पण तसें नव्हे. जसें सध्या उभयतांचे मनांत प्रेम आहे, तसेंच जर राहील, तरमग कां नाहीं घडणार? तूं मात्र मैत्रींत अंतर करूं नको, ह्मणजे झालें. मी विसरणार नाहीं. अरे, आजपर्यंत तुह्मी आह्मी आनंदांत काळ घालविला तो विसरूं काय? असें प्रेममालिनीचें भाषण ऐकून दामोदर उगीच राहिला. पुढें दोघेंही मोठीं झालीं, ह्मणून एकत्र खेळण्याचा त्यांस घरांतील मनुष्यांनीं प्रतिबंध केला. पुढें एक दोन वर्षांनीं प्रेममालिनीस ऋतु प्राप्त झाला. तेव्हां आईबापांनीं तिला सासरीं पाठविण्याचा विचार केला. तो दामोदरास कळला. परंतु तिची त्याची गांठ पडेना. ह्मणून प्रेममालिनीनें एक पत्र लिहून त्यास युक्तीनें पोहोंचतें केलें. त्यांत मजकूर असा होता कीं, "माझे प्रिय मित्रा, दामोदरा, तुला मी विसरलें नसून वडिल माणसांचे प्रतिबंधामुळें तुझी भेट झाली नाहीं. परंतु पूर्वीच्या भाषणांचें स्मरण मला आहे.

त्याकरितां जिकडे मी जातें तिकडे तूं ये. ह्मणजे इच्छित मनोरथ पूर्ण होतील. असें पत्र दामोदरास पोहोंचवून आपण सासरीं गेली. पुढें कांहीं दिवस गेले. दामोदरही भरउमेदींत आला होता त्यामुळें त्यास प्रेममालिनीची आठवण झाली ह्मणजे चैन पडेना. बहुत दिवस तिचे सासरचे गांवीं जाण्यासनिमित्त पाहत होता. परतु जाणें होईना. त्याचे वयास अठरा वर्षें झालीं, तेव्हां तो व्यापार धंदा करूं लागला. नंतर तो कोठें ही गेला, तरी त्यास घरांतून फारसा प्रतिबंध होत नसे. तेव्हां एकवेळ प्रेममालिनीचे गांवीं देवाचे उत्सवाचें निमित्त करून निघून गेला. आणि तेथें एका ब्राह्मणाचे घरीं उतरला. त्याला प्रेममालिनीचे सासऱ्याचें नांव माहीत होतें. ह्मणून त्यानें तिच्या घराचा शोध करून घर पाहिलें. नंतर नित्य सायंकाळ झाला ह्मणजे त्यामार्गानें जात असावें, असा क्रम ठेविला. एके दिवशीं प्रेममालिनीनें त्यास पाहिलें आणि मनांत ह्मणालीकीं, आतां कांहींतरी उपायानें त्याची भेट घ्यावी. परंतु घरांत सासू, सासरा, दीर, नणंदा, जावा इत्यादिकांचे भयामुळें तिचा बेत सिद्धीस जाईना. नवरा तर केवळ काळासारिखाच होता. यामुळें तिला कोणाशीं बोलण्याचाही प्रतिबंध होता. अशा बंदोबस्तांत ती होती. इकडे दामोदर रोज तिच्या दारावरून जात असे, परंतु प्रेममालिनी त्याचे दृष्टीस देखील पडेना. ह्मणून निराश होऊन मनांत ह्मणाला, मी चार दिवसांचे बोलीनें घराहून आलों. आणि आठ दिवस होऊन गेले. घरीं माझी वाट पाहत असतील. इकडे तर आल्यासारिखा कांहींच लाभ झाला नाहीं. त्यापक्षीं आतां घरीं जावें हेंच बरें आहे. असा मनांत विचार करून आणखी दोन तीन दिवस वाट पहावी आणि मग जावें असा त्यानें निश्चय केला.

इकडे प्रेममालिनी दामोदराचे भेटी करितां उत्सुक झालेली होती. परंतु तिचा कांहीं उपाय चालेना, ह्मणून कोणी पुरुष घरांत नसतां तिनें हळूच एक पत्र लिहिलें. त्यांत असें लाक्षणिक लिहिलें होतें कीं, भ्रमरी कमळांत गुंतून पडल्यामुळें भ्रमराचा वियोग झाला आहे. पण सूर्योदय झाल्यावर कमळ प्रफुल्लित

होऊन उभयतांचा समागम होईल यासाठीं हे भ्रमरा, निराश होऊंनको. धीर धर. असें त्यापत्रांत लिहून तें जवळ ठेविलें होतें. एके दिवशीं सायंकाळीं दामोदर ह ळू हळू दारावरून चालला आहे असें पाहून तिनें पुढील गच्चीवरून हळूच तें पत्र त्याचे पुढ्यांत टाकिलें. दामोदरानें तें उचलून वाचून पाहिलें. त्यावरून तिचे मनांतील भावार्थ समजला आणि मनास धीर आला ह्मणून तसाच आणखीं कांहीं दिवस तो तेथें राहिला.

प्रेममालिनीनें पत्रद्वारें त्यास कळविलें. परंतु अशा बिकट बंदोबस्तांतून बाहेर जावयास कांहीं युक्ति सुचेना. शेवटीं ती फार चतुर असल्यामुळें तिनें अशी कल्पना केली कीं, आपण घरांतील सर्व मनुष्यांचें मन प्रथम आपणाक डे वळविलें पाहिजे. मगसर्व कांहीं करितां येईल. असाविचार करून त्या प्रमाणें वागूं लागली. नवऱ्याची सेवा अशी करूं लागली कीं, जेणें करून त्याचें इजवर प्रेम फारच बसलें. ही जसें ह्मणे, तसें तो करूं लागला. त शीच सासऱ्याची ही सेवा योग्यरीतीनें केल्यामुळें त्याचीही सुनेवर प्रीति बस ली. तशीच सासू, जावा, नणंदा इत्यादिकांचे मतानें वागून इतकी त्यांची म र्जी संपादन केली कीं, प्रेममालिनी सारखी स्त्रीच कोणी नाहीं, असें त्यांस वा टूं लागलें. तसेंच सेवक, दासी वगैरे यांसही गोडभाषणांनीं वशकेलें. सारांश ती सर्वांस आवडती झाली आणि तिच्या मताशिवाय घरांत कांहींच चा लेना असें झालें. प्रेममालिनी लहानपणा पासून फार चतुर आणि विद्या शिकलेली होती, त्यामुळें लवकरच तिनें त्यांची मर्जी संपादन केली.

इकडे दामोदरानें मनांत विचार केला कीं, पत्र मला मिळाल्या पासून बरेच दिवस झाले. पण अद्यापि कांहींच घडत नाहीं. घरींतर मजसाठीं मनु ष्यांनीं कहर केला असेल. असें असतां मी मूर्खा सारखा वाट पाहत बसलों आहें. पण आतां या गोष्टीचा परिणाम केल्याशिवाय जाऊं नये. असा त्यानें निश्चय केला. आणि कांहीं कामाकरितां मी येथें राहिलों आहें, लवकरच

येईन असें पत्र घरीं पाठविलें. त्यामुळें घरची काळजी जराशी कमी झाली आणि मनांत ह्मणाला कीं, प्रेममालिनी करितां आपण आलों व तिचें मजवर प्रेमही आहे. परंतु ती बंदोबस्तांत असल्यामुळें तिची गांठ नपडतां दिवस मात्र फुकट चालले आहेत. त्यासाठीं आपणच तिकडे प्रवेश होण्याची युक्ति करावी. प्रथम कांहीं तरी निमित्तानें तेथें जावें आणि ओळख करावी. नंतर त्याच घरीं राहण्याची तजवीज करावी. आणि कोणाचे मनांत अंदेशा न येईल असें वागावें परंतु पुन्हा मनांत शंका आली कीं, मी तरुण असल्यामुळें घरांत मला ठेवणार नाहींत. बरें, कदाचित् तसें ही घडलें तर घरांतल्या सर्व बायकांस कांहीं तरी बाई, ताई, काकू इत्यादि नांवांनीं हाका माराव्या लागतील. त्यांत माझे प्रिय सखीस मी काय नांव ठेवावें? कदाचित् तिला हाकच न मारिली आणि बोललों नाहीं, तर लोकांचे मनांत संशय येईल, ही अडचण आहे. तर तें ही उपयोगी नाहीं. आपण रोज तिचे दारावरून जातों, परंतु ती एक वेळ देखील दृष्टीस पडत नाहीं. यावरून माझे सर्व मनोरथ फुकट जाणार असेंच दिसतें. अशा नाना प्रकारच्या कल्पना मनांत येऊं लागल्या, तेणें करून त्यास चैन पडेनासें झालें.

इकडे प्रेममालिनीनें सर्व मनुष्यांची मर्जी संपादन करून घेतल्यामुळें ती सर्वांस आवडती झाली होती. इतक्यांत तिनें एक चमत्कारिक युक्ति काढून प्रयत्न चालविला. तो असा कीं, एके दिवशीं ती भ्रतारासह एकांतीं निजलेली असतां एका एकीं त्याचे आंगास घट्ट मिठी मारून मोठ्यानें ओरडली, ह्मणून भ्रतार जागा झाला. आणि ह्मणाला हें काय? हें काय? तेव्हां ती भ्याल्या सारखें दाखवून ह्मणाली हापहा, मला कोणी ओढीत आहे. धांवा धांवा, लवकर. असें मोठ्यानें ह्मणून पुन्हा ओरडूं लागली. त्यामुळें घरांतील सर्व मनुष्यें जागीं झालीं आणि जवळ येऊन

पाहतात तों तिनें असें केलें कीं, जसें कोणी एरवाद्या मनुष्यास ओढीत न्यावें. त्याप्रमाणें पलंगावरून खालीं आली आणि दरवाज्याकडे ओढल्या साररवी जाऊं लागली. पुन्हा ह्मणाली, अहो, पाहतां काय? मला धरा. हा कोणी मला ओढीत नेत आहे. हें ऐकून सर्व मनुष्यें घाबरून गेलीं. इतक्यांत तिनें एकाएकीं धाडकन् जमिनीवर आंग टाकिलें आणि निश्चेष्टित पडली. असें पाहून कोणी वैद्य आणण्यास गेले, कोणी पंचाक्षरी आणण्यास गेले. अशी त्यांची धांवाधांव झाली. वैद्यांनीं नानाप्रकारच्या मात्रा दिल्या. पंचाक्षऱ्यांनीं मंत्रादिकांचे प्रयोग केले. परंतु कोणाचा उपाय चालेना. ती तशीच जमिनीवर पडून राहिली. कोणास कांहीं उपाय सुचेनासा झाला. आतां काय करावें अशा विचारांत सर्व होतीं, इतक्यांत ती हळूच उठून बसली आणि मोठ्यानें ह्मणाली, मूर्खहो, तुह्मी काय मला घालविणार? मी तुमचा बाप आहें. तुह्मी मला काय करावयाचें आहे? तीं गरीब बिचारी भुतें, त्यांतला मी नव्हें. असे तिचे विकराळ शब्द ऐकून सर्व लोक तटस्थ उभे राहिले. त्यांतून एक धीट होता, त्यानें विचार केला कीं, हें भूत नव्हे, तर कोणीतरी देवता असेल. याकरितां आपण आणखी विचारून पाहूं. असें मनांत आणून ह्मणाला, तूं कोण आहेस? आणि तुझें मागणें काय? या झाडाचे हाल कां करितोस? असें ह्मणतांच मोठ्यानें हात आपटून बोलली अरे, मला तुह्माशीं काय कर्तव्य आहे? मी माझी वस्तू नेतों. मी कुबेराचा दूत आहें. असें ह्मणून उगीच राहिली. ह्मणून लोकांनीं ऊद, कापूर इत्यादि जाळून पुन्हा प्रश्न केला. तूं दूत आहेस, पण या झाडाचे हाल कां करितोस तें सांग. ह्मणजे तुझें मागणें काय असेल तें देतां येईल. असें ऐकून ती पुन्हा बोलली. अरे, मी आपली हकीकत तुह्मांस सांगतों. हा हिचा नवरा पूर्वजन्मीं राजा होता. हा [illegible] एका पर्वतावर तपश्चर्या करितां गेलेलों असून मी

तेथें सहज गेलों होतों. हिचें रूप पाहून माझे मनांत कामसंचार झाला. ह्मणून इजवर मी बलात्कार करूं लागलों. त्यावेळीं माझे धन्याचें (कुबेराचें) विमान वरून जात होतें. तेव्हां त्यानें मला पाहिलें आणि खालीं येऊन हिला माझ्या हातून सोडविलें. नंतर मला ब्रह्मराक्षस होशील असाशाप दिला. ह्मणून मी भयभीत होऊन लागलाच उःशाप मागितला. त्यावरून माझें मनोगत जाणून मला उःशाप दिला कीं, पुढें हीं दोघें जन्म घेतील त्यावेळीं ही स्त्री वयांत आल्यावर तूं त्याच पर्वतावर तिला आणून उपभोग घेशील. तेव्हां तुजपासून तिला एक पुत्र होईल. तेणें करून तूं मुक्त होऊन मजकडे येशील. तेव्हां लागलाच मी राक्षस झालों. आणि हिची वाट पाहत होतों. आतां माझा समय आलेला आहे. ह्मणून हिला मी कधीं सोडणार नाहीं. तुह्मी मुकाट्यानें आप आपल्या ठिकाणीं जा. नाहींतर फुकट प्राणांस मुकाल. असें ह्मणून पुन्हा मोठ्यानें ओरडून हात आपटून जमिनीवर पडली.

सर्वत्रांनीं हें वर्तमान ऐकून विचार केला कीं, हा ब्रह्मराक्षस आहे, त्यापक्षीं आतां तो आपलें खरें केल्याशिवाय राहणार नाहीं. ह्मणून प्रार्थना करून इतकें मागावें कीं, हिचा उपभोग येथेंच घ्यावा. पर्वतावर नेऊं नये. नाहींतर तो हिचे हाल केल्याशिवाय राहणार नाहीं. आतां जें प्राक्त्न आहे तें चुकत नाहीं. तर आपल्या दृष्टीसमोरच काय होईल तें होवो. ह्मणून त्यांनीं पुन्हा ऊद, कापूर इत्यादि जाळून नानाप्रकारचे सुगंधी पदार्थ तिजवर उधळून प्रार्थना केली. तेव्हां ती पुन्हा उठून बसली. आणि ह्मणाला तुह्मी माझा सन्मान केला त्यामुळें मी प्रसन्न झालों. ह्मणून पर्वतावर नेणार नाहीं. येथेंच उपभोग घेईन. परंतु मी कोणत्याही पुरुषाच्या वेशानें मध्यरात्रीचे पुढें येथें येईन, त्यावेळीं जर कोणी मला प्रतिबंध कराल अथवा हाक मारालं, तर मरून जाल, ही आठवण ठेवा. असें भाषण करून जमिनीवर

पूर्वप्रमाणें पडली. पुनः कांहीं वेळानें एका एकीं उठून उंच उडी मारून जिकड तिकडे धांवून धाडकन् जमिनीवर पडली.

असें पाहून लोक समजले कीं, आतां आंगांतील राक्षस गेला. ह्मणून तिची उठण्याची वाट पाहत बसले. इतक्यांत तिनें सावध झाल्यासारखें केलें आणि उठून बसली, जांभया दिल्या आणि लज्जायमान होऊन उभी राहिली. मग हळूच ह्मणाली, हें काय झालें बरें? इतके लोक कां आले आहेत? असें ह्मणतांच लोकांनी झालेला सर्व मजकूर तिला सांगितला. तो ऐकून रडूं लागली आणि ह्मणाली अरे, प्रारब्धा, मी आजपर्यंत परपुरुषाकडे पापदृष्टीनें पाहिलें देखील नाहीं. असें असून ह्या ब्रह्मराक्षसाचे हातीं मला देणार, त्यापेक्षां मला ह्यावेळीं जरकोणी विष देईल, तर बरें. पण अशा दुष्टकर्मांत परमेश्वरा मला घालूं नको. असें नाना प्रकारें बोलून तिनें फारच शोक दाखविला. ह्मणून लोकांनी तिचें समाधान केलें कीं, जी गोष्ट कोणाचे ध्यानींमनीं देखील नसून एका एकी घडून आली, तिला काय करणार? कबूल न केलें, तर तो काय सोडणार आहे? नानाप्रकारचे हाल करील, त्यापेक्षां आह्मीं कबूल केलें आहे त्याप्रमाणें करावें, तें बरें. येथें तुमचा उपाय नाहीं. तुमचे मनांत अथवा स्वप्नांत देखील अशी गोष्ट यावयाची नाहीं. आतां मुकाट्यानें तसें करावें. नाहीं ह्मणूं नका. नाहींतर एखादें अरिष्ट पुन्हा होईल. आतां आह्मी जातों, असें ह्मणून सर्व लोक आप आपल्या घरीं गेले आणि आश्चर्य करीत राहिले.

प्रेममालिनीचे सासऱ्यानें राक्षसास कबूल केल्याप्रमाणें आपल्या घरास लागून लहानसा बंगला होता त्यांत पलंग बिछाना इत्यादि विलास भोगाचें साहित्य, तसेच सुगंधिक पदार्थ राक्षसाचे मनरंजनार्थ आणून ठेविले. आणि नित्य मध्यरात्रीचे सुमारास तिकडे कोणी न जातां एकटीच प्रेममालिनीस पाठवूं लागला.

प्रेममालिनीनें विचार केला कीं, मी माझ्या बाळमित्रा करितां,जी युक्ति काढिली, ती तर चांगली साधली. आतां यथास्थित आनंद करण्यास कोणाचें भय नाहीं. कोठें ही गेलें तरी कोणीच मला बोलणार नाहीं. असें जाणून मनास वाटेल तिकडे फिरूं लागली. परंतु राक्षसाचे भयानें तिला कोणी बोलत नसे. एके दिवशीं रात्रीं दामोदर ज्या घरांत राहत असे; तेथें कांहीं निमित्तानें तिनें जाऊन त्यास सर्व हकीकत कळविली आणि सांगितलें कीं, प्राणमित्रा, तुजकरितां मी एवढें कृत्य केलें. त्यापक्षीं आतां मध्यरात्री उपरांत तूं नित्य येऊन आपले मनोरथ यथेच्छ पूर्ण करून घे. तूं येथें आल्यापासून मला चैन पडेनासें झालें. ह्यासाठीं हा प्रयत्न केला. पण परमेश्वरानें सिद्धीस नेला. आतां कांहींच भय नाहीं. असें दामोदरास सांगून घरीं आली. पुढें नित्य त्यांनीं आपले कामाची शांति करून दिवस घालविले.

कमलाक्षा, ज्या स्त्रियांचे मनांतच व्यभिचार कर्त्तव्य आहे. त्या अनेक युक्ति करून तरी सिद्धीस नेतील. हें या गोष्टीवरून आपण समजलां असाल. आतां तुमचा स्त्रीच्या परीक्षेस जाण्याचा निग्रहच असेल, तर जा. पण विचारावांचून एखादी गोष्ट करूनका: हें माझें सांगणें आहे. कमलाक्ष ह्मणाला, तूं सांगितलीस ही गोष्ट खरी. परंतु जर आपली स्त्री व्यभिचार करिते असें समजलें तर नवऱ्यास तें कसें सहन होईल? याजकरितां अद्यापि तिचा माझा फारसा समागम झाला नाहीं, तोंच जर आपली खात्री करून घेतली आणि तिचें मन शुद्ध असेल तर मला किती आनंद होईल बरें? यासाठीं मी करितों हें योग्य आहे, असें मला वाटतें ह्मणूनच जातों. विचारावांचून मी कांहींच करणार नाहीं, हें तूं खचित समज. उद्यां प्रातःकाळीं मी निघून जाणार. नंतर परत येतेवेळीं ह्यामार्गानें आलोंतर तुझी माझी भेट होईलच. त्यावेळीं तुला खरोखर काय वर्तमान झालें तें कळेल. ह्याप्रमाणें त्याचें भाषण ऐकून मोहिनी [illegible]

हळूच उठून गेली.

चिंतामणि ह्मणाला, रत्नाकरा, पहा स्त्रियांचीं अशीं अघोर कर्में असतात. कोणत्या वेळीं कायकरितील याचा नेम नाहीं. परंतु मोहिनी सारखी पतिव्रता असलीतर ती कधीं ही पाप करणार नाहीं. पहा, कमलाक्ष एकांतीं निर्भय ठिकाणीं प्राप्त झाला असतां, त्याला ही युक्तीनें बापा सारखा ठरवून पापाचे भयानें ती आपलें व्रत संभाळून राहिली. तशीच तुझी स्त्री आहे यांतसंशय नाहीं. आणि सत्यभामेनें तिजविषयीं दासी कडून बनाऊ गोष्ट तुला कळवून तिचा घात योजिला, यावरून सत्यभामा कशी आहे हें ही कळलें. असो, आतां संध्याकाळ झाला आहे ह्मणून घरीं जा. उद्यां आलास ह्मणजे पुढें गोष्ट सांगेन. असें ह्मणतांच रत्नाकर घरीं निघून गेला. दुसरे दिवशीं तो येऊनबसतांच नित्याप्रमाणें चिंतामणि पुढें गोष्ट सांगूं लागला.

कमलाक्ष राजपुत्र मोहिनीचे घरांतील सर्व मनुष्यांचा निरोप घेऊन प्रातःकाळीं पुढें जाण्यास निघाला. तेथून इंद्रपुर नगर एक दिवसाचे मजलेवर राहिलें, असें समजल्यावरून त्यास पुढील विचार मनांत दिसूं लागले. त्या दिवशीं सायंकाळ पर्यंत मार्ग चालतां चालतां इंद्रपुरचे अलीकडे दोन कोशांवर विद्यानगर ह्मणून एक जुनाट गांव होतें तेथें आला. तेथील सर्व लोक सुखी होते. त्या गांवांत रात्रीं एका ब्राह्मणाचे घरीं कमलाक्ष जाऊन उतरला. तेव्हां त्याब्राह्मणानें त्याचासन्मान करून कोण कोठील वगैरे हकीकत विचारल्या वरून कमलाक्षानें आपण व्यापारी असल्याचें सांगितलें. त्यावरून ब्राह्मणानें त्याची चांगली बरदास्त ठेविली. आणि भोजनादिक झाल्यावर त्याचे बरोबर घटकाभर गोष्टी बोलून निजावयास गेला. राजपुत्र ओटीवर एकटाच निजला होता, इतक्यांत मध्यरात्रीचे सुमारास त्या घराचे मागील भिंतीस भोंक पाडून दोघा चोरांनीं आंत प्रवेश केला. तेव्हां त्यांची गडबड ऐकून घरधनी जागृत झाला. त्यास त्या चोरांनीं बांधून ठेविलें आणि ओरडलास तर

ठार मारूं असें भय घातलें. परंतु त्याची बायको होती तिचे पायास चोराचा पाय लागल्यामुळें ती जागी झाली आणि चोरचोर, धांवा ह्मणून मोठ्यानें ओरडली. त्यामुळें. कमलाक्ष जागृत झाला. त्यानें तें ऐकिलें आणि समजला कीं, चोर घरांत शिरले आहेत. ह्मणून आपण यावेळीं त्यांस शासन करून घरधन्याचें संरक्षण करावें. असें मनांत आणून हातांत तरवार घेऊन घराचे मागील बाजूस शोधीत शोधीत जिकडे चोरानीं भोंक पाडिलें होतें, तेथें गेला आणि पाहतोतों आंत अंधार असल्यामुळें कांहीं दिसत नव्हतें आपण आंत जावें तर काय होईल कोण जाणे. ह्मणून येथेंच उभें राहून चोर बाहेर आले ह्मणजे त्यांस मारावें असें मनांत आणून भिंतीं जवळ मुकाट्यानें उभाराहिला. चोरांनीं ब्राह्मणाचे घरांतील द्रव्याची मोट बांधिली आणि त्यां पैकीं एक प्रथम बाहेर पडला. तेव्हां कमलाक्षानें तरवारीचे घायानें त्याचे दोन तुकडे केले. तें आंतील चोरानें जाणल्यावरून तो भयभीत झाला आणि पळावयास मार्ग पाहूं लागला. परंतु त्या घरास एक मागील दरवाजा होता. तिकडेसच त्यांनीं भोंक पाडिलें होतें. त्यामुळें आणि पुढील दरवाज्यानें जावें तर तिकडे आणखी कोणी तरी असेल, अशाभयानें त्याचा निरुपाय झाला. त्यानें विचार केला कीं, आपण बाहेर जाऊन मरावें, त्यापेक्षां आंतूनच अगोदर मारणारा कोण आहे हें पहावें. असें मनांत आणून हळूच भोंकांतून पाहतो तों बाहेर कोणी पुरुष हातांत तरवार घेऊन उभा आहे. त्यानेंच आपले सोबत्यास मारिलें, अशी खात्री झाल्यावर चोरानें आपली तरवार हातांत घेतली आणि एका एकीं बाहेर आला. तो फारच चपळ असल्यामुळें कमलाक्षाचा घाव त्यानें चुकविला आणि त्यास परत वार केला. तो कमलाक्षानें आपल्या तरवारीवर सांभाळून, कांहीं वेळ अशी दोघांची झटपट होऊन शेवटीं चोरास कमलक्षानें ठार मारिलें. परंतु आणखी चोर घरांत आहेत किंवा नाहींत हें कळेना. ह्मणून त्यानें ब्राह्मणास हाक मारिली. आणि

म्हणाला, महाराज, मी तुमचे ओटीवरचा व्यापारी, इकडचे बाजूस येऊन दोन चोरांस ठार मारिले. आतां तुम्ही भिऊं नये. हें ऐकून ब्राह्मणास धीर आला आणि बोलूं लागला. नंतर घरांत चोर नाहींत, असें जाणून कमलाक्षानें दिवा लावविला आणि जिकडे तिकडे उजेड केला. तेव्हां जें द्रव्य चोरांनीं बाहेर आणिलें होतें तें ब्राह्मणास देऊन सुखी केलें. आपलें संरक्षण व्यापाऱ्यानें केलें, असें जाणून तो ब्राह्मण त्याचा फार आभारी झाला आणि म्हणाला, बाबारे, आज तूं आमचे प्राण व द्रव्य वांचविलेंस त्यापक्षीं तूं केवळ आमचा अन्नदाता आहेस. तुझें धैर्य पाहून तूं व्यापारी नव्हेस असें मला वाटतें. तर खचीत कोण आहेस हें मला सांग. तें ऐकून कमलाक्षानें त्या ब्राह्मणास सांगितलें कीं, मी व्यापारी नव्हें, राजपुत्र आहें. माझें नांव कमलाक्ष. कांहीं कामाकरितां इंद्रपुरनगरास जात आहें. आतां मला तुमचा इतकाच आश्रय असावा कीं, इंद्रपुरांत मला राहण्याकरितां विश्वासू स्थळ मिळेल अशी ओळख द्यावी. आणि पुनः तुमचे घरीं आलोंतर माझी आठवण असावी. याप्रमाणें बोलून परस्पर कांहीं भाषणें करितां करितां ती सारी रात्र गेली. प्रातःकाळ झाला म्हणून कमलाक्ष पुढें जाण्याकरितां निघाला. त्या ब्राह्मणाचा भाचा इंद्रपुरनगरांत होता त्यास त्यानें चिठ्ठी लिहिली कीं, यागृहस्थानें आम्हांवर मोठे उपकार केले आहेत, म्हणून त्यांचा सन्मान राखून बिऱ्हाडास जागा द्यावी. ती चिठ्ठी घेऊन कमलाक्ष निघाला. तो प्रहर दिवसास इंद्रपुरांत जाऊन पोहोंचला आणि शहरांतून त्या ब्राह्मणाचे घराचा शोध करीत चालला आहे तों वाटेंतच राजवाडा असल्यामुळें त्यानें वरती पाहिलें. तों राजवाड्याच्या शेजारचे बंगल्यांत कोणी स्त्री अत्यंत रूपवान् दृष्टीस पडली. म्हणून निरखून पाहूं लागला. हीच आपली स्त्री असावी, असें त्यास वाटलें, म्हणून कांहीं वेळ तिजकडेच पाहत राहिला. त्याचा वेश बदललेला होता, म्हणून राजकन्येनें त्यास न ओळखितां, हा कोणी पापदृष्टीनें मजकडे पाहत आहे, असें वाटून खिडकीचें

दार बंदकेलें. हें पाहून कमलाक्ष पुढें चालता झाला. ब्राह्मणाचे घराचा पत्ता लागल्यावर तो तेथें उतरला आणि चिठ्ठी दिली. ती वाचून पाहून त्या ब्राह्मणानें त्याचा सत्कारकरून कोण कोठील विचारिल्यावरून कमलाक्षानें सर्व हकीकत सांगितली आणि रात्रीं घडलेलें वर्तमान सांगितल्यामुळें त्या ब्राह्मणास आनंद झाला. नंतर त्यानें कमलाक्षाची उत्तमप्रकारें बरदास्त ठेविली. आपणास राहण्यास चांगली जागा मिळाली, असें पाहिल्यावर त्यास फार समाधान वाटलें. नंतर भोजनादिक झाल्यावर सायंकाळीं राजवाड्याजवळचे बंगल्या समोर जाऊन उभाराहिला आणि नित्य याप्रमाणेंच क्रम ठेविला. परंतु आंत प्रवेश करण्याकरितां काय युक्ति करावी हें कांहीं सुचेना. असे कितीएक दिवस लोटले. एके दिवशीं नित्य या बंगल्यांत येणारा कोण आहे हें पहावें, असें मनांत आणून त्यानें बिऱ्हाडचे ब्राह्मणाचे ओळखीवरून राजवाड्याचे समोरचे घरांतील गृहस्थाशीं स्नेह केला.आणि तेथें जाऊन नित्य बसावें असें ही कित्येक दिवस चालविलें. त्याची दृष्टि सर्वकाळ रस्त्याकडे असे. ह्मणून कित्येक लोकांचे मनांत कांहीं संशय येऊं लागला. त्यामुळें पत्ता न लागतां असेच आणखी दिवस गेले तर पुढें काय करावें अशाविचारांत तो होता. इतक्यांत त्या बंगल्यांत एक माळीण फुलें घेऊन गेली आणि कांहीं वेळानें बाहेर आली, असें दृष्टीस पडलें. याप्रमाणें चार पांच दिवस पाहून ती येथें नित्य येणारी आहे असें जाणून एके दिवशीं ती परत घरीं जात असतां तिचे मागें जाऊन त्यानें तिला विचारिलें कीं, माळीणबाई, तुमचे जवळच्या फुलांस एकदम गिऱ्हाईक मिळालेंतर किती किंमत घ्याल ? तें ऐकून माळिणीनें पांच रुपये किंमत सांगितली. ती कबूलकरून त्यानें तीं सर्व फुलें घेतलीं आणि ब्राह्मणाचे घरीं देवाकरितां नेऊन दिलीं. दुसरे दिवशीं त्याचप्रमाणें ती परत जातांना उरलेलीं सर्व फुलें खरेदी केलीं. असें बरेच दिवस झालें.त्यामुळें

राजपुत्राची माळणीशीं बरीच ओळख झाली. नंतर एकेदिवशीं तिचे मागून जाऊन त्यानें तिचें घर पाहिलें. नंतर दुसरे दिवशीं भलतेचवेळीं तिचे घरीं जाऊन फुलें मागितलीं. तीही तिनें प्रयत्न करून आणून त्यास दिलीं. असेंही कांहीं दिवस गेल्यावर फुलांचे निमित्तानें माळणीचे घरीं जावें आणि कांहीं वेळ नानाप्रकारच्या सुख दुःखाच्या गोष्टी सांगत बसावें, तिचे मुलांस खाऊ नेऊन द्यावा, अशा रितीनें माळणीजवळ त्यानें चांगला स्नेह केला. एक दिवस विचारलें कीं, तुह्मीं नित्य बंगल्यांत फुलें नेतां तीं कोण घेतें? माळीण ह्मणाली, राजाची कन्या चंद्रप्रभा आहे ती माझेकडून नित्य फुलें व वेण्या घेत असते आणि बहुतकरून तिच्याच आश्रयानें आमचें चालत आहे. तिला फुलांची तर फार आवड आहे. आणि ती बापाची फार लाडकी असल्यामुळें तिला तो बंगला बांधून दिलेला आहे. बरें, तुह्मी येथें समोरच राहतां आणि तुह्मांला माहिती कशी नाहीं. हें आश्चर्य वाटतें. हें माळिणीचें भाषण श्रवण करून कमलाक्ष ह्मणाला, एकून तुजवर तिची कृपा पूर्ण आहे, नाहीं बरें? माळीण ह्मणाली, आह्मां गरिबांवर मोठ्यांची कृपा ती काय असणार? त्यांनीं आमचे पोटास दिलें आणि एखादा शब्द बोललीं तर आह्मांवर कृपाच आहे असें समजावयाचें. पण आपण विचारितां याचें कारण कायबरें ? तो ह्मणाला, कारण काय असणार? उगाच विचारिलें. असें बोलून निघून गेला. पुढें नित्य माळिणीचे घरीं जाऊन बसावें, तिला कांहीतरी निमित्तानें द्रव्य द्यावें, असेंकरून त्यानें तिचें मन प्रसन्न केलें. त्यामुळें त्याचा स्वभाव चांगला आहे असें वाटून निष्कपटपणानें त्याचे जवळ ती वागूं लागली. एके दिवशीं कमलाक्ष तिला ह्मणाला कीं, मी एक गोष्ट तुला विचारितों, पण ती ऐकशील तर. माळीण ह्मणाली, माझे हातून होण्यासारखी असेल तर ऐकेन. हें ऐकून तो बोलला कीं, जिला तूं नित्य फुलें नेऊन देतेस,

ती एके दिवशीं खिडकींत उभी राहिलेली मी पाहिली. त्यावरून तिचें रूप माझे मनांत दिसत आहे. तेणेंकरून माझी बुद्धि चंचल झाली आहे. मला अन्न सुद्धां गोड लागत नाहीं. ह्मणून जर तिची प्राप्ति मजला होईल, तरच मी वांचेन, नाहींतर खचीत मरेन. तूं ह्मणशील कीं, ह्या कृत्यांत आपण पडलों, तर कांहीं भय उत्पन्न होईल, तर असें समजूं नको. मी कच्चा नाहीं. तिचें मन मजवर असलें, तरच प्रयत्न करीन, नाहींतर उगीच बसेन. पण तिची माझी एक वेळ गांठ पडावी, असें करून देशील, तर मी तुझें जन्माचें दारिद्र दूर करीन. असें कमलाक्षाचें भाषण ऐकून माळीण ह्मणाली, बाबारे, ही गोष्ट कशी घडेल? ती राजकन्या आणि तूं फिरस्ता आहेस. तुझी आणि तिची बरोबरी कशी होईल? आपले बरोबरीची पाहून तिची इच्छा केलीस, तर कदाचित् प्राप्त होईल. आकाशच्या चंद्राची इच्छा केली तर तो कसा मिळेल? ह्मणून तूं व्यर्थ ह्या भरीस पडूं नको. एखादें भलतेंच करून फुकट मरून जाशील. आणि तुला असें कर्तव्य असेल तर माझे घरीं तूं येऊं सुद्धां नकोस. असें तिचें उत्तर ऐकून तो कांहींसा खिन्न झाला. परंतु मनांत समजला कीं, हिला आशा दाखविली तरी ही भयामुळें ऐकत नाहीं. ह्मणून आतां हिला मी काय देणार तें उघड कळविलें ह्मणजे पैशाचे आशेनें ही माझें काम करील. असें मनांत आणून ह्मणाला, अगे पहा कीं, जर माझा एक वेळ तेथें प्रवेश करून देशील, तर मी तुला शंभर मोहरा देईन आणि मी तेथें पोहोंचल्यावर राजकन्येची मजवर प्रीति जडली ह्मणजे तीच तुजला बक्षीस देईल. त्याकरितां पहा, जर तूं एवढें काम करशील, तर बरें होईल. यांत तुला माझेमतें भय नाहीं. माळीण ह्मणाली, बरें, जर अशी तुझी इच्छा असेल, तर मी तसें करीन, पण आतां आपण कांहीं तरी कल्पना काढूं. असें ह्मणून दोघें विचार करूं लागलीं. माळीण ह्मणाली, तुझे आंगीं गुण काय

आहेत? तेव्हां तो ह्मणाला, माझे आंगीं अनेक गुण आहेत. परंतु तेथें प्रवेश करण्यास उपयोगी अशी एक विद्या आहे. ती ही कीं, बुद्धिबळें खेळण्यांत मी फार कुशल आहें. आणि राजकन्येसही बुद्धिबळें खेळण्याचा बराच नाद आहे असें मी ऐकिलें आहे. जर या निमित्तानें प्रवेश झाला तर ठीक पडेल. माळीण ह्मणाली होय. हीयुक्ति चांगली आहे. राजकन्येस हा नाद आहे खरा. आणि ती जेव्हां तेव्हां असें ह्मणत असते कीं, मजप्रमाणें बुद्धिबळें खेळणार कोणी नाहीं. असो, तर आतां मी त्याविषयीं तजवीज करितें. असें ह्मणून सायंकाळीं वेण्या, फुलें, हार, गजरे इत्यादि तयार करून घेऊन राजकन्येकडे गेली. आणि नित्याप्रमाणें फुलें दिल्यावर तेथें जराशी बसली, इतक्यांत चंद्रप्रभा आणि तिच्या सख्या बुद्धिबळाचा डाव खेळून आपण परस्पर डाव जिंकल्याबद्दलचीं भाषणें करीत आहेत, तों माळीण हळूच बोलली कीं, बाईसाहेब, आपणांपाशीं माझी विनंती आहे. आज्ञा होईल तर बोलतें. चंद्रप्रभा ह्मणाली, काय बोलणें असेल, तें बोल. माळीण ह्मणाली तुह्मी बुद्धिबळांचा डाव खेळतां, असाच एक खेळणारा माझे शेजारीं राहत असतो. तो ह्मणतो कीं, माझे सारखा खेळणारा मला कोणीच आढळत नाहीं. मी बहुत नगरें जिंकून आलों आहें. त्यापक्षीं आपणांकडे त्याची परीक्षा व्हावी. आपण सांगाल तर त्यास इकडे आणण्याची तजवीज करीन. चंद्रप्रभा ह्मणाली असा उंचा खेळणारा आहे काय? बरें, कसा खेळतो तो आपण पाहूं. आह्मी त्यास जिंकूंच असें ह्मणत नाहीं, परंतु तो बढाई सांगतो त्यासारिखा कांहीं तरी गुण असेलच. आह्मांहून जास्त गुण असल्यास आह्मीं त्याजपाशीं शिकून घेऊं. असें बोलून माळणीस ह्मणाली, बरें, उद्यां तूं त्याला येथें आणशील? माळीण ह्मणाली, आणीन. इतकें भाषण होऊन माळीणीनें घरीं येऊन कमलाक्षास सर्व हकीकत सांगितली आणि ह्मणाली, उद्यां सायंकाळीं मी तुला तिकडे नेईन. पण मला देणगी द्यावयास केलीस, तिची आठवण

आहेना ? तो ह्मणाला वा:, तें मी विसरणार नाहीं. उद्यां तेथें आपण जाऊन परत आलों, ह्मणजे लागलीच देईन. तूं कांहीं चिंता करूं नको. माळीण ह्मणाली, बरें तर, जा आतां आपल्या घरीं. मीही आतां आपले कामास जातें. असें बोलून दोघेंही निघून गेलीं.

दुसरे दिवशीं सायंकाळीं कमलाक्षानें अगदीं गरिबा सारखा पोशाख केला आणि माळणीचे घरीं येऊन ह्मणाला, माळीणबाई, पहा, आतां मी कसा दिसतों तो- ती ह्मणाली. बाबा आतां बरा गरिबाचा वेश धरिलास. अरे, पण तूं त्या वेशानें तेथें गेलास, तर तुझ्या आंगीं गुण असेच मलीन असतील असें त्यांस वाटेल. तो ह्मणाला, यांतच आपली वाहवा आहे. प्रथम दिसण्यांत साधा दिसून मग गुण बाहेर पडल्यावर जी वाहवा होते, ती चांगली. नाहीं तर प्रथम मात्र भपका केला आणि तसा गुण नसला, तर फजीती होते. ह्मणून मीं केलें हेंच योग्य आहे. पण आतां चल-लवकर. उशीर नाहींका झाला? असें कमलाक्षाचें भाषण ऐकून माळीण तयार झाली आणि दोघेंही राजकन्येच्या बंगल्यांत गेलीं. माळणीनें बोलल्याप्रमाणें खेळणारा आणिला ह्मणून चंद्रप्रभेस आनंद झाला आणि त्याचा सन्मान करून त्यास बसविलें. ती मनांत ह्मणाली, हा तर मलीन दिसतो. पण गुणाला मान आहे. आतां काय आहे तें पाहूं ह्मणून बुद्धिबळें आणण्याकरितां आंत गेली. इतक्यांत सख्याही बरोबर जाऊन तिला ह्मणाल्या. बाई, हाच का तुह्मीं खेळणारा वारवाणलात तो? त्याच्या चर्येवरून आतां पुढें हा काय ध्वज लावणार ते समजलें. चंद्रप्रभा ह्मणाली, तुह्मी असें ह्मणूं नका. मनुष्याचे पोषाकावरून त्याचे गुणांची परीक्षा होत नसते. त्यासाठीं धीर धरून रहा. आतांच कायतें समजेल. असें बोलून बुद्धिबळांचा पट घेऊन बाहेर आल्या. नंतर कांहीं वेळ बसून तुह्मी कोठचे राहणार व कोण वगैरे प्रश्न केले. त्यांचीं उत्तरें कमलाक्षानें कांहीं तरी

देऊन समजूत केली. नंतर चंद्रप्रभेनें ह्मटलें कीं, आपण बुद्धिबळें खेळण्यांत कुशळ आहां अशी कीर्ति ऐकिली, त्यावरून आपला गुण पहावा, असें आह्मांस वाटलें. ह्मणून आपणांस बोलाविलें आहे, तर कशीकाय मर्जी आहे? कमलाक्ष ह्मणाला, आपल्या मर्जी प्रमाणें करावें. तें ऐकून चंद्रप्रभेनें डाव मांडून तयार केला. असें पाहून तो ह्मणाला, प्रथम तुह्मी दोघी जणी खेळा. ह्मणजे जिकडे कमीपणा होईल, तिकडे मी डाव सांगण्याची मदत करीन. असा एक डाव प्रथम खेळूं. चंद्रप्रभा तसें करूं लागली. दोघी जणींनीं खेळ चालविला. त्यांत चंद्रप्रभेचे सखीस खेळण्याचें ज्ञान कमी असल्यामुळें तिच्याडावाची अव्यवस्था होऊं लागली. तेव्हां कमलाक्षानें तिला शिकवून दोघींची बरोबरी केली. नंतर डाव बराच वेळ बरोबरीनें चालला. तो शेवटास जाईना. राजकन्येनें हा खेळण्यांत बराच कुशळ आहे असें जाणिलें. इतक्यांत जयवंत नामक प्रधानपुत्र तेथें आला (तोही केव्हां केव्हां खेळण्याकरितां येत असे) त्यासही जवळ बसविलें. दोघांचे डाव बरोबरीनें चालले आहेत असें प्रधानपुत्रानें पाहून चंद्रप्रभेचा पक्ष धरून तिला शिकवूं लागला. ह्मणून राजपुत्रानें किंचित् आपल्या चातुर्याचा उपयोग केला. त्यामुळें सखीनें डाव जिंकिला. इतक्यांत सायंकाळ झाला ह्मणून खेळणें आटोपलें. नंतर कांहीं वेळ गोष्टी बोलून राजपुत्रानें घरीं जाण्यास आज्ञा मागितली. त्यावरून उद्यां सायंकाळीं प्रहर दिवसास यावें असें ठरवून राजकन्येनें आज्ञा दिली व तो निघून गेला.

इकडे प्रधानपुत्र आणि चंद्रप्रभा इत्यादिकांनीं त्याचें खेळण्याचें चातुर्य पाहिल्यावरून तीं एकमेकास ह्मणालीं कीं, हा गृहस्थ सामान्यसा दिसतो, पण खेळणार बहादर आहे यांत संशय नाहीं. चंद्रप्रभा बोलली कीं, मला त्यानें प्रथमच जिंकण्याचा वेळ आणिला होता. परंतु मी बराच सांभाळला. नंतर माझी मतिच चालेनाशी झाली. सारांश, खेळावें तर अशा जवळच खेळावें. नाहींतर आह्मी रोज खेळतों तें काय उपयोगी? अशी त्याची सर्वांनीं वाहवा केली.

इकडे कमलाक्षानें माळणीचे घरीं परत येऊन तिला झालेलीसर्व हकीकत सांगितली आणि करारा प्रमाणें शंभर मोहरा तिचे स्वाधीनकरून ह्मणाला, तुला कराराप्रमाणें दिलें आहे. आतांतरी खरें वाटलेंना? तूं घाबरी झाली होतीस, पण माझें काम केलेंस त्यापेक्षां मी तुला दिलें हें थोडेंच आहे. याहून माझें काम पुरतें झाल्यावर आणखी बक्षीस देईन. असें बोलून बिऱ्हाडीं निघून गेला. पुन्हा दुसरे दिवशीं सायंकाळीं करारा प्रमाणें कमलाक्ष एकटाच राजकन्येकडे आला आणि स्वतां न खेळतां, दोघीजणींस ही आपण शिकवून डाव चालविला. त्यांत कोणी कोणास जिंकीत नाहींत आणि दोघांचें चातुर्य सारखें असल्यावर असाच डाव चालेल, संपणार नाहीं, असें त्यानें दाखविलें. तो डाव फार वेळ चालल्यामुळें सायंकाळ झाला ह्मणून सर्व उठून गेलीं. त्यादिवशीं प्रधानपुत्र आला नव्हता. याप्रमाणेंच तिसरे दिवशींही खेळ चालविला. त्यांत दुसरा कांहीं चमत्कार दाखविला. असेचमत्कार पाहून राजकन्या फारच आनंदित झाली आणि मनांत ह्मणाली, याच्या योगानें आपणांस ही विद्या बरीच साधेल, यांत संशय नाहीं. त्यामुळें याजला नित्य खेळण्यास बोलाविण्याची तिची फारच उत्कंठा झाली. असे बरेच दिवस गेले. प्रधानपुत्र जयवंत हा केव्हां केव्हां येऊन खेळण्यास बसत असे आणि डाव संपला ह्मणजे उठून जाई. या प्रमाणें क्रम चालला होता. एके दिवशीं प्रधानपुत्र आणि चंद्रप्रभा यादोघांचा डाव चालला असतां कमलाक्ष चंद्रप्रभेच्या पक्षाचा झाला. तो डाव लवकर संपेना. तेव्हां प्रधानपुत्रानें चंद्रप्रभेस डोळ्यानें खुणाविलें, तें त्यानें पाहिलें. इतक्यांत डाव तसाच ठेवून प्रधानपुत्र आणि चंद्रप्रभा दिवाणखान्यांतून आंत गेलीं व कांहीं वेळानें बाहेर येऊन पुन्हा तो डाव चालविला. तो कमलाक्षानें जसातसा पुरा केला. नंतर फार वेळ झाल्यामुळें सर्व आपआपले ठिकाणीं गेलीं.

प्रधानपुत्र आणि चंद्रप्रभा हीं मध्येचखेळ सोडून गेलीं, याचें कारण असें कीं, लहानपणीं ज्यागुरुजवळ तीं दोघें विद्या शिकलीं होतीं, त्या गुरूनें अशी आज्ञा केली होती कीं, ज्या अस्त्र विद्या मीं तुह्मांस सांगितल्या आहेत त्यांचा जप सूर्यास्त समयास नित्य एकांतीं करावा. त्याकरितां, नित्य सूर्यास्ताचे वेळीं तीं दोघें जेथें जेथें असत, तेथें तेथें जप करीत. एखादे वेळीं प्रधानपुत्र चंद्रप्रभेकडे असलातर दोघेंही एकांतीं जाऊन जपाकरितां एकेच ठिकाणीं बसत. आणि हीं दोघें परस्परांशीं भावंडांप्रमाणें वागत असत. असा त्यांचा क्रम चालला होता. तो तेथील दास, दासी इत्यादिकांस माहीत असून राजास ही माहीत होता. याच कारणानें दोघेंही घरांत गेलीं होतीं.

प्रधानपुत्रानें चंद्रप्रभेस डोळ्यानें खुणाविलें, तें कमलाक्षानें पाहतांच त्याचें मनांत शंका उत्पन्न झाली कीं, याखुणेंत कांहींतरी मतलब असावा. तीं पुन्हा बाहेर आलीं तेव्हां नेत्र झांकून एकांतीं जप केल्या कारणानें दोघांच्याही मुद्रेंत जो कांहीं फेर झाला होता, तो पाहून तर त्याच्यामनांत पक्का संशय उत्पन्न झाला. मग तेथून निघून बिऱ्हाडीं गेल्यावर त्यानें विचार केला कीं, आतांच उतावीळ होऊन उपयोग नाहीं. आणखी काय होतें तें पाहूं. असें मनांत आणून नित्याप्रमाणें खेळण्याचा क्रम त्यानें चालविला. परंतु अस्तमान होण्याचे पूर्वीच डाव पुरा होत असल्यामुळें तितक्या दिवसांत प्रधानपुत्र आणि चंद्रप्रभा, यांचे एकांताचासमय तेथें आला नाहीं. परंतु पुन्हा एके दिवशीं डाव लांबला तेव्हां मात्र तसें घडून आलें. नंतर कित्येक वेळा खेळ लांबला ह्मणून तसेंच झालें. कमलाक्षाचे मनांत संशयामुळें वाईट वाईट कल्पना येऊं लागल्या. अशीचाल आहे कीं, एकदां मनुष्याचे मनांत जी गोष्ट भरून गेली, तीच त्यास दिसत असते. तशांत जरी ती उलट असली, तरी तीचतुर पुरुषास देखील कळत नाहीं. मनांत भरल्या गोष्टीवरच पुढें त्याच्या कल्पना चालतात. आणि तेच तो सिद्ध करितो, तसें कम-

लाक्षास झालें आणि तो मनांत ह्मणाला, आपण ज्या कामासाठीं आलों त्यासारखें कांहींसें येथें दिसतें खरें. हिला येथें मीं बरेच दिवस ठेविल्यामुळें त्या प्रधानपुत्रानें सख्य करून हिला वश केलें ह्मणून ही इतकी निर्भीडपणानें वागूं लागली. बरें पुढें पाहूं काय होतेतें. पुन्हा मनांत विचार आला कीं, एकेच वेळेवर ( अस्तमानीं ) हीं उठून जातात याचें कारण काय असावें बरें? ती वेळ कांहींसा अंधार पडल्या सारखी असते. ह्मणून एकांतास समय बरा. असा त्यांचा विचार असेल, असें वाटतें. कदाचित् रात्रीं याउभयतांची गांठ पडण्या सारिखी संधी मिळत नसेल, ह्मणून हीच वेळ हीं साधितात, हेंच खचीत आहे. ह्मणून त्यानें आणखी कांहीं दिवस तसाच खेळण्याचा क्रम ठेविला. इतक्यादिवसांत पांच सहा वेळ दोघांचा एकांत तेथें होण्याचा प्रसंग आला होता.

तेथील सर्वांस त्यांचें कारण माहीत होतेंच. परंतु कमलाक्षास वाटलें कीं, ही गोष्ट आपण कोणास विचारून उपयोगी नाहीं. हीं सर्व त्यांचेच मताचीं असतील आणि आपण विचारल्यामुळें त्याचें मनांत कांहीं संशयही येईल. मग आपला मतलब साधणार नाहीं. खचीत ही स्त्री अगदीं निर्भीडपणानें व्यभिचार करणारी आहे. जी गोष्ट मी मनांत आणिली. ती तर खचीत झाली. आतां येथें राहून उपयोगी नाहीं. जाण्याची तजवीज करावी. असें मनांत आणून दुसरे दिवशीं त्यानें असा खेळ खेळून दाखविला कीं, प्रधानपुत्र आणि चंद्रप्रभा यांस एक प्यादें देखील जाग्यावरून उचलण्यास विचार पडूं लागला. त्यावरून त्यांची पक्की खात्री झाली कीं, आह्मी खेळणारीं ह्मणवितों पण या सृष्टींत अभिमान कोणीं धरूंनये, हेंच सत्य आहे. तो डाव संपल्यावर कमलाक्षानें त्यांस सांगितलें कीं, आपणांजवळ मी बरेच दिवस खेळलों. आतां मला घरीं जाण्यास आज्ञा असावी. चंद्रप्रभा ह्मणाली, तुह्मी जाण्याची घाई कां करितां? आपणांस द्रव्याची इच्छा असेल, तर बोला. तो ह्मणाला,

मी द्रव्य मिळविण्यासाठीं इकडे आलों नाहीं सहज आलों होतों. इतक्यांत आपली इच्छा झाली ह्मणून येथें आलों. परंतु आतां बरेच दिवस झाले, ह्मणून मला गेलेंच पाहिजे. राजकन्या ह्मणाली, आपल्या समागमानें आह्मांसही खेळाचें बरेंच ज्ञान झालें. आणखी कांहीं दिवस आपण राहतां तर बरें झालें असतें. पण आतां आपली मर्जी.

कमलाक्षाचे मनांत कुतर्क आल्यापासून त्याचें मन तेथें लागेना आणि चंद्रप्रभेचें तोंड पाहूंनये. असें त्यास वाटूं लागलें. परंतु वेश बदलून आल्यामुळे कांहीं बोलतां येईना. ह्मणून तसाच आपला क्रोध शांत करून चंद्रप्रभेची आज्ञा घेऊन परत आला आणि माळिणीचे घरीं जाऊन सांगितलें कीं, मी ज्या कामा करितां, इतका प्रयत्न केला तें कांहींच घडलें नाहीं. ह्मणून आतां मी आपल्या गांवीं परत जातों. परंतु या प्रसंगीं तुझी माझी चांगली ओळख झाली आहे, याकरितां पुन्हा मी कधीं इकडे आलों तर मात्र ओळख असावी. बरें, आणखी तुला मीं असें पुसतों कीं, चंद्रप्रभे कडे जो पुरुष येत असतो. तो कोण आहे? माळीण ह्मणाली, तो प्रधानपुत्र आहे. कमलाक्ष ह्मणाला, त्याचा हिचा इतका स्नेह होण्याचें कारण तरी काय असावें? माळीण ह्मणाली तें मी कांहीं जाणत नाहीं. पण त्या उभयतांचें परस्पर फारच सख्य आहे. कमलाक्ष ह्मणाला, त्यांचें इतकें सख्य असण्यांत दुसरा मतलब तर कशाचा, पण दोघेंही समवयस्क आहेत. त्यावरून समजावें. माळीण ह्मणाली, मलाही तसेंच वाटतें. पण त्या थोरांच्या गोष्टी आपण मनांत देखील आणीत नाहीं. कारण आह्मी गरिबांनीं त्यांत जर मन घातलें आणि तें त्यांस कळलें, तर मग आह्मांस येथें रहावयास देखील नको. कमलाक्ष ह्मणाला बरें कांहीं चिंता नाहीं त्यांचें वाईट कृत्याचें शासन त्यांस परमेश्वर थोडकेच दिवसांत करील. पण इतकें करण्यास मुख्य चंद्रप्रभाच आहे. नाहींतर तो हिच्या घरीं येऊन इतका निर्भीडपणानें

वागला नसता. असो, आपण आपल्यापुरती चौकशी करावी. बरें, आतां मी जातों. असें बोलून कमलाक्ष निघून गेला. तो आपल्या बिऱ्हाडीं आल्यावर कांहीं दिवस तेथें एक दिवस राहून आग्रह करितां त्यानें त्याचा आग्रह धरला. आणि अगत्य मानून आपल्या नगरास परत जावयास निघाला. तो येते वेळीं दोन कोशांवर पूर्वी ज्या ब्राह्मणाचे घरीं चोर मारिले होते. त्याचे येथें एक दिवस राहिला आणि त्यास कांहीं द्रव्य देऊन त्याचा निरोप घेऊन निघाला, तो आपली मानलेली कन्या जी सावकाराची स्त्री मोहिनी, तिचे घरीं येऊन पोहोंचला. त्याला पाहतांच तिनें त्याचा सन्मान करून नानाप्रकारच्या पक्वान्नांचें भोजन घातलें. आणि रात्रीं पूर्वीप्रमाणें त्यास एकांतीं भेटून विचारलें कीं, ज्या कामाकरितां तूं गेलास तें कसें काय पाहिलें? कमलाक्ष ह्मणाला, त्याची गोष्टच नको. मला सांगावयासही लज्जा वाटते. पण तूं माझी कन्या झालीस, आतां परकेपणा नाहीं, याकरितां, तुला झालेली हकीकत सांगतों. असें ह्मणून त्यानें सर्व वर्तमान तिला कळविलें. तें ऐकून मोहिनी ह्मणाली, ही गोष्ट ऐकून मला मोठें आश्चर्य वाटतें. बाबारे, अशाही कितीएक स्त्रिया असतील. माझ्यानें नाहीं ह्मणवत नाहीं. आणि तूं चतुर असून स्वतः पाहून आलों असें ह्मणतोस, त्यापक्षीं आतां संशय तो काय असावयाचा? आणि एकांतीं दोघांचें काम दुसरें काय असावयाचें? पण हें तिचे बापास माहीतच नसेल काय? कमलाक्ष ह्मणाला, राजाचें मन सर्वकाळ प्रजापालनाकडे असतें. त्याला कोणी कळवील तेव्हां समजणार. नाहींतर अशा गोष्टी कशा कळतील? तेथील सर्व मनुष्यें त्यांस वश आहेत, त्यामुळें राजास कळत नाहीं. ती व्यवस्था पाहिल्याबरोबर माझे अंगाची आग झाली, पण काय करूं. आपण एकाएकीं अविचार करणें ठीक नाहीं. असो. असा तर प्रसंग आला आहे. आतां पुढें काय होणार तें होवो. ती ह्मणाली, अशा दुष्ट स्त्रियांस शासन परमेश्वर करीलच यांत संशय नाहीं. पण तूं आतां उतावळी करूं नको. तूं उद्यां जाणार आतां

पुन्हा कधीं आलास तर मात्र इकडे येण्यास विसरूं नको. हें माझें सांगणें आहे. कमलाक्ष ह्मणाला, ह्मणूनच मी परत येऊन तुला भेटलों. आतां उद्यां प्रातःकाळीं मला गेलें पाहिजे नगराहून निघाल्यास बरेच दिवस झाले. तिकडे बाप काळजी करीत असेल. त्यासाठीं त्वकर जातों. ती ह्मणाली, बरें, मी जातें आतां. असें बोलून मोहिनी घरांत गेली. प्रातःकाळीं कमलाक्ष निघाला, तो परत येतांना पुन्हा कोलवालाचे घरीं येऊन त्यास भेटला. त्यानें ही एक दिवस त्याला राहवून घेतलें आणि वर्तमान विचारिल्यावरून कमलाक्षानें कांहींतरी सांगून वेळ काढिली नंतर दुसरे दिवशीं त्याचा निरोप घेऊन निघाला तो कांहीं दिवसांनीं परत आपल्या नगरास येऊन पोहोंचला आणि तो सर्व पोषाक वगैरे टाकून पूर्वी प्रमाणें खरा राजपुत्र होऊन बापास भेटला. आपला पुत्र बहुत दिवसांनीं परत आल्यामुळें राजानें महोत्साह केला. तेव्हां सर्वांस आनंद झाला

आपण देशाटनास गेल्या पासून राज्यात काय काय प्रकार वगैरे झाले हें वर्तमान कमलाक्षानें सर्व विचारल्यावरून बापानें सांगितलें कीं, अधिक वर्तमान कांहीं नाहीं, पण तूं गेल्यापासून मला चिंता लागली होती, ती आज दूर झाली. आतां तूं गेल्यापासून कोण कोणतीं ठिकाणें वगैरे पाहिलींस ती सर्व हकीकत मला सांग पाहूं. हें ऐकून राजपुत्रानें कांहींतरी वर्तमान सांगून पित्याचें समाधान केलें, आणि आपल्या मनांत मात्र खंती होऊन राहिला.

पुढें कांहीं दिवस गेल्यावर कमलाक्ष आपले स्त्रीचा यात करण्याचा विचार करून बापास ह्मणाला, बाबा मी देशाटन करीत असतां, एक देश पहावयाचा राहिला आहे. जर आज्ञा द्याल,तर तो पाहून येईन. हें पुत्राचें भाषण ऐकून राजानें आज्ञा दिली. नंतर कमलाक्ष जाण्यास निघाला. तेव्हा त्यानें आपले बरोबर दोन घोडस्वार मात्र घेतले आणि कांहीं

उत्तम मिठाई आणून तिचे दोन भाग करून एका भागांत कांहीं कैफी पदार्थ घालून नीट खुणेनें ती सर्व मिठाई आपले बरोबर घेतली आणि सासुरवाडीस जाण्या करितां घराहून निघाला.

इकडे चंद्रप्रभा आणि प्रधानपुत्र इत्यादिकांनीं त्या खेळणाराचे गुणांची तारीफ केली. नंतर एके दिवशीं त्यांनीं माळिणीस विचारलें कीं, याची सर्व हकीकत तुला माहीत आहे काय? माळीण ह्मणाली, मी काय सांगूं. त्यानें माझे जवळ खेळाची तारीफ सांगितल्यावरून मी आपल्या आज्ञे प्रमाणें आपणांस भेटविला. या खेरीज मला त्याची कांहीं माहिती नाहीं. चंद्रप्रभा ह्मणाली, याचे आंगीं हा मोठा गुण आहे त्यावरून हा कोणी तरी चांगला विद्वान् असेल असें वाटतें. माळीण ह्मणाली होय, विद्ये शिवाय चातुर्य नसतें हें खरेंच आहे. पण आपला निरोप घेऊन गेला त्यावेळीं त्यानें आपणांस कांहींच सांगितलें नाहीं? चंद्रप्रभा ह्मणाली, सांगितलें तर नाहीं.पण पहिल्यानें आला त्यावेळीं जी त्याची मुद्रा होती ती मात्र पुढें पुढें निराळीच दिसूं लागली. आणि त्याचें मनही येथें लागेनासें झालें. माळीण ह्मणाली, काय असेल, ते कोण जाणे. पण बाई, आह्मा गरिबांस असल्या चौकशा कशाला पाहिजेत. तो कोण कां असेना. आपल्या आज्ञे प्रमाणें काम तर मी केलें. चंद्रप्रभा ह्मणाली, तुजकडे काय आहे? पण मला थोडा संशय आला आहे कीं, हा कोणी तरी आपला वेश बदलून फिरणारा मोठ्या कुळांतला गृहस्थ असावा. यांत संशय नाहीं. माळीण ह्मणाली मला ही तसेंच वाटलें. पण आमचें चातुर्य हें काय, फुलें विकण्या पुरतें. चंद्रप्रभा ह्मणाली, अगे, तूं तरी बरीच दिसतेस. तुझ्या बोलण्यावरून मी पक्कें समजतें कीं, त्याची तुला सर्व माहिती आहे. तर खरें काय असेल तें सांग. तूं भिऊं नको. माळीण ह्मणाली, भिऊं कशाकरितां? पण तुह्मांस तरी इतकें त्याचें काय काम आहे? कोणी कां असेना, त्याचा गुण तर पाहिलाना? चंद्रप्रभा ह्मणाली, गुण पाहिल्या.

वरूनच मला संशय आला. आतां सांग पाहूं खरें कायतें. तें ऐकून मा- ळीण मनांत ह्मणाली, त्यांचे मर्जीप्रमाणेंच कां होईना. आपणांस जी माहि- ती आहे ती सांगण्यास काय हरकत आहे? ह्मणून ह्मणाली, बाईसाहेब, मी आपणांस खरोखर सांगतें कीं, तो कोणी तरी चांगल्या कुळांतला मनुष्य हो- ता. त्याचा मतलब काय असेल तो मला कळला नाहीं. पण जाते वेळीं मला तो इतकेंच बोलला कीं, मी ज्या कामाकरितां इतका प्रयत्न केला तें सिद्धीस गेलें. असें मात्र त्याचें भाषण मी ऐकिलें आहे. आतां यारवेरीज मला कांहीं माहीत नाहीं. प्रथमच जर हें मला कळतें, तर आपणांस सांगितलें असतें. पण आतां काय उपयोग.

हें माळिणीचें भाषण ऐकून चंद्रप्रभेचे मनांत अनेक तरंग येऊं लागले. परंतु कांहींच सुचेना. शेवटीं मनांत ह्मणाली कीं, माझी मुद्रिका हरवली आहे. त्यामुळें आतां काय घडेल कोणजाणे. मी तर परमेश्वराजवळ निरपराध वा- गत आहें. प्रारब्धांत काय असेल तें असो. ह्मणून उगाच राहिली.

नंतर एके दिवशीं रात्रीं चंद्रप्रभेस स्वप्न पडलें, त्यांत आपण लाल वस्त्र नेसून अरण्यांत पति समागमें गेलें आहें आणि दोघेंही कडुनिंबाचे वृक्षा- वर चढलों आहों व चारी बाजूंस एका एकीं कडा तुटलेला दिसून चोहोंकडे तांबड्या रंगाचें पाणी असून तेथून जाण्यास मार्ग नाहीं. असें पाहून भीति उत्पन्न होऊन लागलीच ती जागी झाली आणि प्रातःकाळीं तें स्वप्न तिनें बापा- स कळविल्यावर त्यानें आपल्या आचार्यास बोलावून स्वप्नाचें फळ विचारिलें. त्यांनीं सांगितलें कीं, हें स्वप्न चंद्रप्रभेस फार वाईट आहे. या करितां हिला सासरीं पाठवून पतीची भेट करावी. मग जें होणें तें परमेश्वराधीन आहे. आणि याविषयीं शांतिही करावी. असें आचार्याचें भाषण ऐकून राजा, चं- द्रप्रभा इत्यादि सर्व चिंताग्रस्त झालीं. व आचार्यांकडून यथा शास्त्र शांति करविली. नंतर राजानें चांगला दिवस पाहवून चंद्रप्रभेस सासरीं पोंचवि-

ण्याची तयारी केली. आणि तिचे बरोबर जाण्यास विश्वासू असे दोन मुत्सद्दी नेमिले. तसेच पन्नास हत्ती, पन्नासस्वार, हजार पाय दळ. आणि दहा दासी, अशा थाटनें चंद्रप्रभेस पालखींत बसविलें. निघते वेळीं चंद्रप्रभेनें आईबापांचे गळ्यास मिठी मारितांच उभयतांस जो गहिंवर आला, तो लिहितां येत नाहीं. आज पर्यंत कन्येचें पालन केलें आणि ती आतां आपणांपासून दूर जात आहे असें पाहून उभयतांचे नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. आईच्यानें तर चंद्रप्रभेस सोडवेना. परंतु तिनें विचार करून जाण्यास आज्ञा दिली. आणि नगराचे मोठ्या दरवाज्या पर्यंत सर्व मानकरी, सरदार इत्यादिकांसह राजा पोहोंचविण्यास आला. पुढें चंद्रप्रभा आपल्या बरोबरच्या लोकां सह मार्गानें जाऊं लागली. जातां जातां चार दिवसांनीं अर्धमार्गांत आलीं आहेत, इतक्यांत कमलाक्ष दोन स्वारांनिशीं त्याच मार्गानें येत होता, त्याची यांची गांठ पडली. त्यास घोड्यावरून येतांना सर्वांनीं पाहिलें इतक्यांत तो जवळ आला ह्मणून मुत्सद्दी यांनीं त्यास प्रणिपात केला आणि वर्तमान कळविलें. नंतर ज्या ठिकाणीं भेट झाली, त्या ठिकाणाहून जवळच एक लहानसें गांव होतें, तेथें कमलाक्षाचे आज्ञेनें जाऊन सर्व ही उतरले आणि जागो जाग डेरे, राहुट्या दिल्या आणि. चंद्रप्रभे करितांच एक किनखापी तंबू घेतलेला होता, तोही उभा केला. त्यांत कमलाक्ष आणि चंद्रप्रभा अशीं दोघेंही बसलीं, पतीस पाहतांच चंद्रप्रभेस मोठा आनंद झाला. सर्व दास दासी यांनीं सामग्री आणून भोजनाची तयारी केली आणि आनंद झाल्याचीं चिन्हें दाखविलीं. कमलाक्ष व चंद्रप्रभा त्यांस त्या तंबूंत बसून बराच वेळ झाला. परंतु परस्परांचें भाषणच होईना. कारण कमलाक्षाचे मनांत निजविषयीं पूर्ण रोष होता. चंद्रप्रभेच्यानें लज्जेमुळें बोलवेना आणि प्रथमच स्त्रियांनीं बोलावें यांत अमर्यादा आहे, असें मनांत आणून ती बोलली नाहीं. कांही वेळ दोघें ही उगाच बसल्यामुळें दासीस आश्चर्य वाटलें आणि चंद्रप्रभेस

ह्मणाली, बाईसाहेब, कांहीं निराळेंच दिसतें. यजमान बोलत नाहींत याचें कारण काय बरें? चंद्रप्रभा ह्मणाली, नबोलले तरी आपण बोललें पाहिजे. असें ह्मटल्यावर ती दासीस एकीकडे करून हात जोडून पतीजवळ उभी राहिली. आणि बोलली, स्वामीराया, मीं असा अपराध तरी काय केला कीं, आपण भाषणही करीत नाहीं. हा वेळपर्यंत माझे हातून अन्याय झाल्याचें दिसत नाहीं. परंतु आपणांस कांहीं वाटत असेल तर क्षमा असावी. मी चरणांची दासी आहें. आतां क्रोधाची शांति व्हावी. असें भाषण ऐकून कमलाक्षानें विचार केला कीं, हिजबरोबर भाषण ही करूं नये खरें, पण आतांच मीं असें केलें तर आपला बेत सिद्धीस जाणार नाहीं. याज करितां हिला प्रेम दाखवून फसवावें हें बरें. असें मनांत आणून ह्मणाला, हे स्त्रिये, मला क्रोध आला नाहीं. परंतु अगोदर तुझे मुखांतील शब्द रूप उदकाचे बिंदु निघाले ह्मणजे माझे चातकाचें समाधान होईल, ह्मणून वाट पाहत होतों. आतां मला बोलण्यास आनंद वाटला. असें ह्मणून परस्परांनीं आनंदाच्या गोष्टी केल्या. त्यावेळीं चंद्रप्रभेनें लग्नांत आपली व माझी प्रीति जडली त्यावेळींच मला गर्भ राहिला आहे असें कळविलें. नंतर दोघांनींही भोजन केलें. सर्व मुत्सद्दी, स्वार, शिपाई इत्यादिकांचीं भोजनें झाल्यावर ते पुढें निघण्याचे तयारीच्या आज्ञेची वाट पाहत होते. परंतु कमलाक्ष आणि चंद्रप्रभा कांहीं वेळ भाषणें करून विश्रांती करितां निद्रिस्थ झालीं. कमलाक्षाचे मनांत एक दोन दिवस तेथेंच राहून आपले मनांतील बेत सिद्धीस न्यावयाचा होता. त्या ठिकाणापासून दोन तीन कोशांवर एक मोठें अरण्य होतें. तेथें शिकारीचे निमित्तानें चंद्रप्रभेस नेऊन सोडण्याचा त्यानें निश्चय केला. ह्मणूनच सायंकाळीं कांहीं वेळ त्यानें निद्रेंत घालविला. नंतर उठून मुत्सद्दी यांस कळविलें कीं, आतां दिवस थोडा राहिला आहे, ह्मणून येथेंच वस्तीस राहूं. असा बेत ठरल्यावर सर्वही तेथें राहिले. ती रात्र आनंदांतच गेली. रात्रौ कमलाक्ष आणि चंद्रप्रभा यांचा एकांत व्हावा, परंतु ती गरोदर असल्यामुळें तसें घडलें

नाहीं. पुनः प्रातःकाळ होतांच तयारीचा हुकूम घेण्यास मुत्सद्दी आले. परंतु हुकूम होईना कमलाक्ष ह्मणाला, आपणांस फार जलदीनें जाऊन तरी काय करावयाचें आहे? येथून जवळच मोठें अरण्य आहे, तेथें शिकारी करितां आज जावें असें माझे मनांत आहे. याकरितां सर्व तयारी करावी आणि येथेंही नीट बंदोबस्त ठेवावा. शिकार करून सायंकाळीं परत येऊं. असा हुकूम होतांच सर्व तयारी झाली. इतक्यांत चंद्रप्रभा मनांत ह्मणाली आज शिकारीस जाण्याची तयारी आहे आणि मलातर दुष्ट स्वप्न पडलें आहे ह्मणून न जातील तर बरें. पण शूर पुरुषांस नको कोणी ह्मणावें? त्यापेक्षां आपण ही बरोबर जावें, ह्मणजे झालें. ह्मणून बोलली कीं, प्राण प्रिया, आपण शिकारीस जातां आणि मी बरोबर न यावें काय? मला अरण्यांत शिकार करण्यास भीति वाटत नाहीं. आज्ञा असेल तर येतें. कमलाक्षाचे मनांतही तसेंच कर्तव्य होतें, ह्मणून ह्मणाला, बरें, तुझी मर्जीच असेल तर माझ्यानें नको कसें ह्मणवेल? चल तर जाऊं. हें ऐकतांच चंद्रप्रभा तयार झाली. दोघेंही आप आपलीं हत्यारें बरोबर घेऊन घोड्यावर बसलीं. एकंदर लोकांतून निमे लोक बंदोबस्ताकरितां तेथें ठेवून बाकीचे बरोबर घेतले. अशा थाटानें घोर अरण्यांत गेले. नंतर वाद्यें वाजविल्याबरोबर चोहोंकडून श्वापदें भयभीत होऊन पळूं लागलीं. हें पाहून त्यांचे मागें लागल्यामुळें तिकडे सर्व लोकांची फुटाफुट झाली. चंद्रप्रभेनें एका व्याघ्रास बाण मारिला त्यामुळें तो घायाळ झाला इतक्यांत कमलाक्षानें दुसरा बाण मारून त्याचा प्राण घेतला. अशीं अनेक श्वापदें मारीत मारीत कांहीं सेवकां निशीं पुढें जातां जातां एक सिंह त्यांचे दृष्टीस पडला, ह्मणून कमलाक्ष त्याचे मागें लागला. चंद्रप्रभेनेंही त्याचे बरोबर आपला घोडा फेंकला. अशीं तीं दोघें त्या सिंहाचे मागें गेल्यामुळें बरोबरच्या लोकांच्या व यांच्या मध्यें चार कोशांचें अंतर पडलें. आणि मार्गही कोठें समजेना. इतक्यांत सिंह जवळ दिसल्यामुळें राजपुत्रानें त्यास बाण मारून घायाळ केलें व चंद्रप्रभेनें तत्काळ एक बाण मा-

रून त्याचा प्राण घेतला. आपल्या लोकांपासून आतां आपण बऱ्याच अंतरावर आलों असें पाहून कमलाक्ष तेथेंच आपल्या मनांतला मतलब साधण्यास सिद्ध झाला आणि आपणांस तहान लागली आहे असें ह्मणून पाणी शोधूं लागला, तों जवळच एक लहानसा निर्मळ पाण्याचा झरा दृष्टीस पडला. तो पाहून दोघेंही घोड्यावरून खालीं उतरलीं. नंतर कमलाक्षानें आपले जवळची मिठाई काढून थोडीशी चंद्रप्रभेस खावयास दिली. आणि आपणही खाऊन विश्रांती करितां तेथेंच कांहीं वेळ बसला. चंद्रप्रभेनें जी मिठाई खाल्ली तींत कांहीं अमली पदार्थ घातलेला असल्यामुळें तिला देहभान नाहींसें होऊं लागलें. कांही वेळानें तिला गाढ निद्रा लागली, हें पाहून कमलाक्षानें आपल्या मनांतील मतलब साधिला. तो असाकीं, प्रथम त्यानें तिचे आंगावरील थोडेसे अलंकार काढून घेतले, मग आपल्या घोड्यावर बसून तिचाही घोडा हातीं धरून आडमार्गानें शोधीत शोधीत आपल्या लोकांत येऊन पोहोंचला आणि मोठा आक्रोश करून घात झालारे घात झाला! असें ह्मणून शोक करूं लागला. तें ऐकून सर्व लोक घाबरे झाले. आणि काय झालें ह्मणून विचारूं लागले. तेव्हां चंद्रप्रभेस सिंहानें खाल्या बद्दलचें बनाऊ वर्तमान कमलाक्षानें सांगितलें. तें ऐकून सर्व शोक करूं लागले. कमलाक्षानें तर फारच शोक दाखविला. आणि घोड्यावरून खालीं उतरून भूमिवर पडला. सेवकांनीं त्याचें समाधान केलें आणि बोलले कीं, अहो, तुह्मीं अगोदर स्त्री अरण्यांत आणावयाची नव्हे. बरें, कदाचित् आणिली तर आपले लोकांत तरी मिळून रहावें. तसेंही न करितां भलतेच अरण्यांत उभयतांनीं जाऊन हा घोर प्रसंग आणिला. असो, प्रारब्धापुढें इलाज नाहीं. योजिलें काय आणि झालें काय. कमलाक्ष ह्मणाला, तो सिंह तर मीं मारिलाच, पण माझें स्त्री रत्न गेलें. आतां मीं काय करूं. असें नानाप्रकारें बोलून दीर्घ शोक करून दाखविला. कित्येक लोकांनीं असा विचार केला कीं, तिला कोणत्या ठिकाणीं मारिलें हें आपण पाहून येऊं. हें कळतांच कमलाक्ष

ह्मणाला, अरे, तुह्मी आतां पाहून काय करणार? हे पहा तिचे अलंकार, मी त्या सिंहास मारून परत येत असतां, मार्गांत पडलेले आढळले. आतां जाऊन काय ती दृष्टीस पडणार आहे? त्या क्रूर सिंहानें भक्षून टाकिली. परमेश्वरा, मी राजपुत्र पराक्रमी असतां माझी स्त्री सिंहानें भक्षावी? हर हर! काय प्रारब्ध हें! असें शोकांचे उद्गार काढून जमिनीवर कांहीं वेळ पडून राहिला. तेव्हां जवळच्या लोकांनीं त्याचें समाधान केलें आणि त्यास घेऊन पूर्वीचे ठिकाणावर परत आले. तों अस्तमान झालें. त्या रात्रीं सर्वांस फार दुःख झाल्यामुळें ती सर्व जागा भयंकर दिसूं लागली. असा प्रसंग अकस्मात् घडल्यामुळें सर्व चिंतेंत पडले. पण चिंता करून उपयोग काय, असें ह्मणून सर्वही पुढील विचार करूं लागले. मुत्सद्दी लोकांनीं कमलाक्षास विचारिल्यावरून त्यानें सांगितलें कीं, आतां येथें राहून उपयोग नाहीं. जसें प्रारब्धीं होतें तसें घडलें. तेथें कोणाचा उपाय नाहीं. तर आतां तुह्मी सर्वांनीं आपले ठिकाणीं जावें. मीही परत जातों. असें बोलून त्यानें सर्वांस परत रवाना केलें आणि आपण आपल्या दोन स्वारांनिशीं घरीं परत आला आणि शोक करूं लागला. नंतर आईबापांसही तसेंच (बनाऊ) वर्तमान त्यानें सांगितलें, तें ऐकून त्यांस अतिशय दुःख झालें. परंतु झाल्या गोष्टीचा शोक करून ती आतां येत नाहीं, असा विचार करून उगीच राहिलीं. कमलाक्षही आपण यथा योग्य काम केलें असें समजून स्वस्थ राहिला.

रत्नाकरा, आतां संध्याकाळ झाली. पुढची गोष्ट उद्यां सांगेन. आतां तूं घरीं जा. असें चिंतामणीचें भाषण ऐकून रत्नाकर घरीं गेला. दुसरे दिवशीं तो आल्यावर चिंतामणि पुढें सांगूं लागला.

इकडे सर्व लोकांनीं परत येऊन झालेलें वर्तमान चंद्रप्रभेचे बापास कळविलें. तें ऐकतांच तो सिंहासनावरून धाडकन् खालीं पडला. तो बराच वेळ सावध होईना. नंतर सेवकांनीं नाना प्रकारचे शीतळ उपचार केले. त्यामुळें कांहीं वेळानें तो सावध होऊन हळू हळू मंदिरांत गेला. राणिवशांत ही तें

वर्तमान कळतांच सर्व मनुष्यें शोक करूं लागलीं. राजाची आवडती कन्या आणि तिचा परिणाम असा झाल्यामुळें सर्व प्रजेस ही तसेंच दुःख वाटलें. नंतर त्या दुःखाचा हळू हळू विसर पडत चालला. प्रत्यक्ष नवरा बरोबर असतां अशी गोष्ट झाली, ह्मणून कोणाचे मनांत कांहीं संशय आला नाहीं.

इकडे चंद्रप्रभा त्या कैफामुळें सुमारें चार घटका पर्यंत सावध झाली नाहीं. परंतु थोडा थोडा अम्मल उतरत चालल्यावर तिची चमत्कारिक स्थिती झाली. नंतर शुद्धीवर येऊन पाहते तों अगदीं अस्तमान होऊन अंधार पडला आहे आणि जवळ पतिही नाहीं, ह्मणून प्राणनाथ, प्राणनाथ, अशा हाका मारूं लागली. पण तेथें कोणीच नव्हतें त्यामुळें निराश होऊन ह्मणाली कीं, माझा घात करण्या करितांच मला प्राणनाथांनीं येथें आणिलें काय, असामी अन्याय तरी काय केला? अशा विचारांत आहे तों जिकडे तिकडे क्रूर पशूंचे शब्द होत आहेत आणि मनुष्याचा वास ही नाहीं अशा त्या भयंकर अरण्यांत तिला देहभान नाहींसें झालें. मग अवघी रात्र तेथेंच असावध पडून राहिली. किंचित् अरुणोदयाचा प्रकाश होतांच पक्ष्यांचे शब्द होऊं लागले आणि दिसूं लागलें. नंतर उठून चोहोंकडे पाहते तों पति नाहीं आणि घोडाही नाहीं. जिच्या आंगावर सूर्य किरणें ही कधीं पडावयाचीं नाहींत अशा स्त्रीला एकाएकीं घोर अरण्यांत एकटें असण्याचा प्रसंग आल्यावर तिची अवस्था काय झाली असेल, हें सहज लक्ष्यांत येईल. जिकडे तिकडे दाट झाडी लागली आहे असें पाहून ह्मणाली, आतां कोठें जावें, काय करावें, प्राण द्यावा तर आत्महत्या होते आणि गर्भहत्या ही होते. अशा समयीं अरण्यपशूही जरी मला खातील तरी बरें. परमेश्वरा, मीं असा तुझा कायरे अपराध केला होता? बरें केला असेल तरी याची क्षमा करून मजला या संकटांतून सोडीव. नाहीं तर एखाद्या पशू कडून माझा अंत तरी करीव. ह्या समयीं तुजवांचून आतां दुसरा कोणी नाहीं. असा नानाप्रकारें शोक करीत आहे, इतक्यांत रामायणांतील जानकीचें स्मरण झाल्यावरून ह्मणाली, परमेश्वरा, तूं तरी अशा

समयीं दया करशील असें मला वाटत नाहीं. प्रत्यक्ष आपली स्त्री जानकी तिजवर ही असाच दुर्घट प्रसंग आणिलास, मग माझा काय पाड आहे? असो, तुझी इच्छा असेल तसें कर. अशी नानाप्रकारें शोकाकुलित होऊन या झाडांतून त्या झाडींत याप्रमाणें चालत पडत झडत फिरूं लागली. इतक्यांत एक सिंह तिचे दृष्टीस पडला, त्यास पाहून बोलली, हे पंचानना, मला या समयीं तुजवांचून कोणी दिसत नाहीं. आजपर्यंत माझ्या बापानें माझें पालन केलें, परंतु या देहाचें सार्थक कांहींच झालें नाहीं. ह्मणून आतां तूं तरी आपली क्षुधा शांत करून माझा देह सार्थकीं लाव. सिंह हा पशु क्रूर असूनही तिला कांहींच दुःख न देतां एकीकडे निघून गेला. असें पाहून ती ह्मणाली अरे देवा, माझ्या देहास सिंह देखील स्पर्श करीत नाहीं. असा मी अन्याय तरी काय केला आहे? मला वाटतें कीं, मी पूर्वजन्मीं कांहीं तरी अघोर पातकें केलीं असतील ह्मणून त्वां हा प्रसंग मजवर आणिला आहे. असें ह्मणून पुनः इकडून तिकडे जात आहे, तों पायांस कांटे रुतल्यामुळें तिला एक पाऊलही पुढें टाकवेनासें झालें व सर्वांगास तिडका लागल्या. इतक्यांत मनुष्याचा शब्द ऐकूं आला, ह्मणून कांहींसा धीर येऊन त्या शब्दाचे समारानें तिकडे जाऊं लागली. तों एक ह्मातारा भिल्ल हातांत तीरकमटा घेऊन फिरत आहे, असें तिनें पाहिलें. तेव्हां मनांत ह्मणाली आतां हा भिल्ल तरी मला मारील तर बरें. वांचून तरी काय उपयोग आहे? असेंच दुःख भोगावें लागणार. अशा विचारांत आहे, इतक्यांत तो भिल्ल ही कोणी श्रीमंताची स्त्री अरण्यांत शोक करीत बसली आहे असें पाहिल्यावरून जवळ आला आणि ह्मणाला, बाई, तूं कोणाची कोण आणि या घोर अरण्यांत कां आलीस? चंद्रप्रभा ह्मणाली, मी आपल्या पती बरोबर या अरण्यांत शिकारीस आलें असतां मला येथें एकटी टाकून माझे प्राणपति कोठें गेले तें मला कळत नाहीं. अवघी रात्र मी येथें आहें, परंतु मला पशूंनींही खालें नाहीं. आतां तूं तरी मला मारून टाक अथवा तूं माझा बाप आणि मी तुझी कन्या आहें असें समजून माझी व्यवस्था

कर हें ऐकून त्या वृद्ध भिल्लास तिची करुणा आली तो ह्मणाला, बाई, तूं माझी कन्या ह्मणतेस तर मीही तसेंच मानितों. आतां तूं कांहीं चिंता करूं नको. तुझ्या पतीनें तुला अरण्यांत मुद्दाम सोडिलें आहे, असें मला वाटतें. तुला वनपशूंनीं भक्षिलें असेल असें जाणून तो तर स्वस्थ राहिला असेलच. त्यापक्षीं तूं आतां माझे घरीं चल. मी कन्ये प्रमाणें तुझें पालन करीन. असें भिल्लाचें भाषण ऐकून चंद्रप्रभेस कांहींसा आनंद झाला आणि मनांत ह्मणाली आतां परमेश्वरास माझी करूणा आली, ह्मणून त्यानें यास पाठविलें. असो, आतां या वांचून आपणास कोणी नाहीं. त्या पक्षीं हा ह्मणेल तसें ऐकावें हें बरें. ह्मणून त्याचे बरोबर जाण्यास सिद्ध झाली आणि ह्मणाली, बरें बाबा, तुला तरी परमेश्वरानेंच पाठविलें आहे, त्यापक्षीं चल, मी येतें. असें बोलून तेथून सुमारें एका हाकेवर त्या भिल्लाचें लहानसें झोंपडें होतें, तेथें त्याचे बरोबर गेली. ह्मातान्यानें ऊन पाण्यानें तिला न्हाऊं घालविलें. त्याचे घरांत चांगलीं वस्त्रें होतीं, त्यांतून तिला देऊन संतोषित केलें. तो जातीचा भिल्ल होता, परंतु तिच्या आंगावरचे अलंकारांचा अभिलाष नधरितां खरोखर कन्येप्रमाणें त्यानें तिचें पालन केलें. जेणें करून तिचे मनास समाधान होई तें तो करीत असे. त्या भिल्लाचे घरांत लोकांस लुटून आणिलेल्या उंच्या उंच्या जिनसा होत्या, त्या त्यानें चंद्रप्रभेस दिल्या. याप्रमाणें सुमारें तीन महिने लोटले. त्यामुळें चंद्रप्रभेस दुःखाचा थोडासा विसर पडला. तिनें माहेरीं जाण्याची इच्छाच धरिली नाहीं. कारण, बापास आपण आतां तोंड काय दाखवावें, असें तिला वाटलें. परंतु नऊ महिने भरण्याची संधी जवळ आली होती, ह्मणून त्या भिल्लास तिनें कळविलें, तें ऐकून तो ह्मणाला, बाई, तूं कांहीं चिंता करूं नको. तुजवर असा प्रसंग आला आहे, त्या पक्षीं आमच्यानें जितकें करवेल तितकें आह्मी नीट करूं. माझे घरांतील सर्व मनुष्यें तुझें आज्ञेंत राहतील. परंतु तीं रानटी असल्यामुळें मात्र त्यांस तुमच्या सारख्यांच्या बाळंतपणाची माहिती नाहीं.

तूं जसें सांगशील तशीं तीं मनुष्यें वागतील. असें त्या दयाळू भिल्लाचें भाषण ऐकून चंद्रप्रभेस आनंद झाला. घरांतील सर्व मनुष्यांची ही तिजवर अत्यंत प्रीति जडली होती. पुढें आणखी आठ दिवस लोटल्यावर प्रसूत होण्याचा समय दिसल्यामुळें तिनें घरांतील मनुष्यांस सुचविलें. त्या प्रमाणें त्यानीं सर्व व्यवस्था ठेविली. नंतर प्रातःकाळीं चंद्रप्रभा प्रसूत होऊन पुत्ररत्न झालें. तेव्हां भिल्लास वसवंसि ही आनंद झाला. नंतर तिचें बाळंतपण त्या भिल्लाचे घरांतील मनुष्यांनीं जितकें यथास्थित करवलें, तितकें केलें. त्यामुळें चंद्रप्रभेस आनंद झाला तो घरीं असल्यानें ही झाला नसता. चंद्रप्रभेनें पुत्र अरण्यांत जन्मपावला ह्मणून त्याचें नांव वनजात असें ठेविलें. शुक्लपक्षींचे चंद्रा प्रमाणें तो पुत्र वाढूं लागला. चंद्रप्रभेवर दुःखाचा प्रसंग होता खरा, परंतु पुत्राचें लालन पालन करण्यांत तिचे दिवस आनंदांत जाऊं लागले. आपणांस या भिल्लानें सांभाळिलें, ह्मणून त्याचे उपकार ती वारंवार मनांत आणीत असे. याप्रमाणें आणखी चार महिने तसेच आनंदांत लोटल्यावर तिला बरीच शक्तिही आली. एके दिवशीं ती भिल्लास ह्मणाली कीं, मी घरांत राहून कंटाळलें आहें, त्यामुळें माझा वेळ जात नाहीं. ह्मणून तुज बरोबर जवळच्या अरण्यांत येतें. हें ऐकून त्यानें तिला बरोबर नेलें. ती हळू हळू चालत त्याचे मागून गेली. तेथें एक व्याघ्राची ढोल होती, तींतून वाघिणीचीं पिलें बाहेर आलीं होतीं. त्यांस पाहून चंद्रप्रभा ह्मणाली, अरे, हीं पिलें पहा कशीं खेळत आहेत तीं. यांतून मजला एक धरून देशील तर बरें होईल. हीं मोठीं मौजेचीं दिसतात. आपण चला जरा जवळ जाऊं. तें ऐकून भिल्ल ह्मणाला, छे छे, हीं पिलें आतां लहान दिसतात, पण घरांत बाळगून उपयोगी नाहींत. मोठीं झाल्यावर तीं घातकरण्यास कधीं चुकणार नाहींत. चंद्रप्रभा ह्मणाली, एकून हीं पिलें दुष्ट आहेत काय? तर मी त्यांस मारितें. तुझा तीरकमठा इकडे दे. हें ऐकून त्यानें तीरकमठा तिचे हातांत दिला. तो घेऊन तिनें एक तीर सोडिला, तो एका पिलास

लागून तें मरण पावलें, ह्मणून दुसरा तीर मारिला, तो दुसऱ्यास लागून तें ही पडलें. इतक्यांत कांहीं वेळानें त्या ढोलींतून वाघीण गर्जना करीत एका एकीं बाहेर आली आणि पुच्छ आपटून दाढा चावून जांभया देत आहे, असें पाहिल्यामुळें भिल्ल ही कांहींसा भयभीत झाला. लागलाच त्यानें चंद्रप्रभेचे हातांतील तीरकमठा घेऊन मोठासा एक तीर मारिला. तो वाघिणीचे मर्मस्थानीं लागल्यामुळें ती ही मृतप्राय होऊन पडली. नंतर दोघें परत फिरलीं. इतक्यांत विजयपुरचा जयवंत नामक राजा शिकारी करितां त्याच अरण्यांत आला होता. त्यानें अकस्मात् चंद्रप्रभेस दुरून पाहिलें, ह्मणून तो जवळ आला आणि तिच्या रूपयौवनास मोहित होऊन तिचा अभिलाष धरून ह्मणाला, हे स्त्रिये, तूं तर सुकुमार आणि उत्तम कुळांतली दिसतेस असें असून या भिल्ला बरोबर अरण्यांत कां फिरतेस? चंद्रप्रभा त्याचे प्रश्नाचें उत्तर न देतां लज्जायमान होऊन उभी राहिली. ह्मणून राजानें भिल्लास विचारिलें, त्यावरून त्यानें खरें वर्तमान सांगितलें. तें ऐकून राजा ह्मणाला, अरे, तूं बहुत दिवस हिचें पालन केलेंस. आतां हिला अशीच किती दिवस ठेविशील. जर तिची इच्छा असेल तर मी तिला तिच्या माहेरीं पोहोंचवीन. भिल्ल ह्मणाला, तिला माहेरीं पोहोंचवावी हें तर योग्यच आहे, पण मी तिचें कन्ये प्रमाणें पालन केलें आहे. आतां तिचे मर्जीस आल्यास तसें करूं. असें ह्मणून चंद्रप्रभे जवळ येऊन बोलूं लागला. मुली, कशी काय मर्जी आहे? जर तुझ्यामनांत जाणें असेल तर तजवीज चांगली आहे. मी देखील तुला पोहोंचविण्यास येतों. चंद्रप्रभा बोलली बाबा आपण येथें कांहींच बोलूं नये. पहिल्यानें घरीं चलावें. मग आपणांस जाणें असेलतर तशी तजवीज करितां येईल. पण या राजा बरोबरच आपण जावें हें ठीक नाहीं. असें तिचें भाषण ऐकून राजास भिल्लानें सांगितलें कीं, ती माहेरीं सध्या जात नाहीं. तिचे मनांत आलें ह्मणजे मी पोहोंचवीन. तें ऐकूनराजास क्रोध आला. परंतु तेथें आपण एकटाच असल्यामुळें कांहीं न बोलतां आपल्या

मंडळींत येऊन सर्व वर्तमान कळविलें. तेव्हां सर्वानुमतें असें ठरलें कीं, ही स्त्री या भिल्लानें लुटून आणिलेली आहे. आणि त्याच्याच भयामुळें तिच्यानें कांहीं बोलवत नसेल. त्याअर्थी आपण तेथें जाऊन त्यास शासन करून तिला घेऊन यावें, असा विचार करून ज्याठिकाणीं तो भिल्ल राहत होता, तेथें ते सर्व आले आणि त्याचे घरास वेढा घातला. तें पाहून चंद्रप्रभेस दुःखावर डाग दिल्यासारिखें झालें. राजानें त्या भिल्लास बाहेर बोलावून सांगितलें कीं, अरे, जर ती स्त्री तूं आमचे स्वाधीन न करशील, तर तुला ही आह्मी ठार मारूं आणि तिला घेऊन जाऊं. या करितां तूं व्यर्थ कां मरतोस? ती स्त्री आमचे स्वाधीन कर ह्मणजे झालें. भिल्लानें विचार केला कीं, याचे मनांत जें कर्तव्य आहे तें केल्या शिवाय हा सोडणार नाहीं. आपण मात्र व्यर्थ मरून जाऊं. त्या पेक्षां हिला ह्याचे स्वाधीन करावी हें बरें. असें मनांत आणून ह्मणाला, महाराज, मी पाठविण्यास तयार आहें, पण तिचें मत कसें काय आहे तें पाहतों. असें ह्मणून घरांत येऊन एकंदर वर्तमान चंद्रप्रभेस सांगितलें. तें ऐकून तर ती संकटांत पडली. परंतु तिनें विचार केला कीं, राजापुढें आपलें काय चालणार आहे? आह्मीं त्याचें न ऐकिलें तर तो जुलुमानें मला घेऊन जाईल यांत संदेह नाहीं. ह्मणून भिल्लास ह्मणाली कीं, जर निरुपाय आहे तर मी जातें. पुढें जें होणें असेल तें होईल. आतां भिऊन उपयोग नाहीं. भिल्लानें त्याप्रमाणें राजास सांगितल्यावरून तो आपले सेवक तेथें ठेवून सर्व सैन्यासह आपल्या नगरास निघून गेला. दुसऱ्या दिवशीं त्यानें आपले कांहीं लोक बरोबर देऊन तिला आणण्या करितां पालखी पाठविली. तेव्हां चंद्रप्रभेनें निघण्याची तयारी केली. घरांतील सर्व मनुष्यांनीं आपली सेवा चांगली केली ह्मणून तिनें आंगावरील कांहीं अलंकार काढून त्यांस वांटून दिले. आणि आपण पालखींत बसली. तेव्हां भिल्ल ही तिचे बरोबर निघाला. जातां जातां तिच्या माहेराकडे जाण्याचा रस्ता सोडून विजयपुराकडे तिला नेत आहेत, असें

पाहून चंद्रप्रभे जवळ येऊन भिल्लानें तिला कळविलें. तेव्हां ती ह्मणाली, बाबा, आतां बोलून उपयोगी नाहीं. प्रारब्धानें जें घडेल ते घडो. असें बोलून स्वस्थ राहिली. इतक्यांत तिची पालखी नगरांत येऊन राजवाड्याजवळ एक लहानसा रमणीय बंगला होता, तेथें नेऊन उतरली आणि इतमामासह तिला बंगल्यांत नेऊन ठेविलें. तेथें दासी वगैरे सर्व व्यवस्था राजानें उत्तम प्रकारची ठेविली होती. हा चमत्कारिक सत्कार पाहून चंद्रप्रभेचे मनांत संशय आला. परंतु पुढें काय होतें तें पाहूं ह्मणून उगाच राहिली. भोजनादिक झाल्यावर तिनें त्या भिल्लाचा समाचार घेऊन जवळचे चाकरांस त्याची नीट व्यवस्था ठेवण्यास सांगितलें. तो दिवस असाच गेला. दुसरे दिवशीं राजा स्वतः येऊन तिला विचारूं लागला, कां, आतां कसें काय? त्या भिल्लाचे घरीं राहणें बरें वाटतें किंवा येथें बरें वाटतें? आजपर्यंत जर मला हें कळतें तर तुला इतके हाल भोगावे लागलेच नसते. आतां तरी तुझे सुखाचे दिवस आले ह्मणून माझी गांठ पडली आणि तुझें येथें येणें झालें. तर कांहीं चिंता करूं नको. स्वस्थ चित्तानें रहा. तुला येथें कोणत्याही गोष्टीस कमी पडणार नाहीं. आणीकही दासी तुज पाशीं पाहिजे असतील तरी ठेवितों. असें राजाचें भाषण ऐकून चंद्रप्रभा कांहीं न बोलतां खालीं मान घालून राहिली. त्याजकडे वर दृष्टि करून तिनें पाहिलें देखील नाहीं. त्यावरून ही अपरिचित ठिकाणीं आलेली असल्यामुळें कांहींच बोलत नाहीं असें मनांत समजून राजा आपले ठिकाणीं निघून गेला. पुढें चार दिवस लोटल्यावर तो पुन्हा एके दिवशीं येऊन चंद्रप्रभेसमोर उभा राहिला. त्यास पाहून तिनें मान खालीं घातली. त्यामुळें त्यास किंचित् क्रोध आला, परंतु एका एकीं त्याच्यानें तिला बोलवेना. मग कांहीं वेळानें ह्मणतो, काय? आतां मनांत अंदेशा कोणता आहे? मी येथें तुला सुख भोगण्या करितां आणिलें असून माझे भाषणांचा अपमान करितेस, हें मला बरें दिसत नाहीं. मला असें वाटतें कीं, तूं आपल्या घरीं असतीस तरी देखील तुला इतकें सुख झालें नसतें. अशी मी सर्व प्रकारची

सिद्धता केली आहे. माझे राज्यांत कोणती ही वस्तू दुर्मिळ नाहीं. जी जी तुझी इच्छा असेल तीती मी पूर्ण करीन. या करितां तूं अगदीं मनांत कांहीं भय न बाळगितां सुखानें रहा. परंतु अशा सर्व सुखांत तुला मीं ठेविलें असून तूं मजकडे पहात देखील नाहींस, यामुळें मात्र मला तुझे गुण आवडत नाहींत. माझे मनाचा हेतु असा आहे कीं, तुला सर्व राज्याची स्वामिणी करावी. आणि माझी पट्टराणी आहे तिनें ही तुझें दास्य करावें. माझें राज्य ही मला तुजहून अधिक वाटत नाहीं. याकरितां एकवेळ प्रेमानें मजकडे पहा, म्हणजे माझें समाधान होईल. असा काम मोहित होऊन भाषणें करूं लागला. चंद्रप्रभेस या भाषणांवरून राजाचे मनांतील भाव समजला आणि मनांत म्हणाली, हे परमेश्वरा, मला त्या भिल्लाचे घरीं ठेविलेंस तेंच बरें होतें. आतां या दुष्टाचे हातीं मी सांपडलें आहें. हा आपले मनोरथ सिद्धीस नेल्याशिवाय राहणार नाहीं. आणि माझे व्रताचा भंग होईल. त्या पेक्षां मला आतांच मरण येईल तर बरें आहे. आजपर्यंत मीं पुष्कळ दुःख भोगिलें, आतां पुढें आणखीं तरी असे प्रसंग पाहणें नको. अशी नाना प्रकारें विलाप करीत आहे व परमेश्वराची प्रार्थना करीत आहे तों राजा तिज पुढें उभाच होता तो पुन्हा बोलला कां अद्यापि मनांतील शंका गेली नाहीं? अगे, तूं विचार कर कीं, ज्याहेतूनें मी तुला येथें आणिलें तो हेतु सिद्धीस नेल्याशिवाय उगीच राहीन काय? त्यापेक्षां तूंच होऊन माझे हातानें सुखाचा उपभोग घेशील तर बरें आहे. हें त्याचें भाषण चंद्रप्रभेचे हृदयास बाणासारिखें खोंचलें आणि क्रोधानें तिची मुद्रा फिरली. परंतु ती विवेकानें सांवरून म्हणाली हे राजा, तूं मला आणून माझें पालन पोषण करीत आहेस. परंतु प्रजेचें पालन करणें हा राजाचा धर्मच आहे. त्यानेंच जर नीति सोडिली, तर प्रजा ही नीतीनें वागणार नाहीं. म्हणून तुझ्या मनांतील ही दुर्बुद्धि सोडून दे. कारण आजपर्यंत ज्यांनीं अशी दुष्ट बुद्धि धरिली, त्यांचा परिणाम कसा काय झाला हें तुला माहीतच असेल. परंतु मी पुन्हा सांगतें. रावणानें सीतेचीइच्छा धरून तिला

चोरून आणिली आणि नानाप्रकारें तिला आपलें वैभव दाखविलें, तसेच वश हो-ण्या करितां अनेक उपाय केले, परंतु ती पतिव्रता असल्यामुळें त्याचे ते सर्व प्र-यत्न व मनोरथ व्यर्थ गेले. शेवटीं राज्यास व प्राणास ही मुकला. त्याच प्रमाणें इं-द्रानें अहल्येचा व्रतभंग केल्यामुळें त्याचे सर्वांगास भगें पडलीं. चंद्रानें आ-पल्या गुरुपत्नीशीं गमन केल्यामुळें त्यासही क्षय लागला. त्याच प्रमाणें पांडवांची स्त्री जी द्रौपदी तिचा अभिलाष दुर्योधनानें धरिल्यामुळें तोही प्रा-णास मुकला. असे पूर्वी अनेक पुरुष परस्त्रियांचे अभिलाष बुद्धीमुळें नाशपा-वले आणि हल्लीं ही जे अशी दुर्बुद्धि धरितात ते त्याच प्रमाणें नाश पावत आहेत. ह्मणून तूं हा दुष्ट हेतु सोडून दे. नाहींतर तुझी ही तशीच दशा होईल. यासा-ठीं विचारानें राहून राज्याचा उपभोग तुला बहुत दिवस मिळेल अशी वर्तणूक कर. आणखी सांगतें कीं, तुझें वैभव आणि राज्य मोठें असलें तरी मला तें काय करावयाचें आहे? तूं कितीही उपाय केलेस तरी मीं तुजशीं भाषण देखी-ल करणार नाहीं. अरे, ज्या दुष्ट स्त्रिया जार कर्म करणाऱ्या असतील, त्याच तु-ला योग्य आहेत. मज सारख्या पतिव्रतेवर तुझी पापदृष्टि कधींही चालणार नाहीं. ह्मणून तुला तुझे जिवाची आशा असेल तर अतःपर ही दुष्ट वासना धरूं नको. इतकें बोलून खालीं पाहूं लागली. राजानें हे कठोर शब्द ऐकून मनांत विचार के-ला कीं, ही स्त्री अनाथा सारखी अरण्यांत असतां मीं येथें सुखांत आणून ठेविली तरी हिला माझें बोलणें कांहींच रुचत नाहीं. त्यापक्षीं ही आपणांस सा-ध्य होणें कठीण आहे. परंतु कांहीं धीर धरावा. तिचें चित्त अद्यापि स्वस्थ झालें नाहीं. असें मनांत आणून निघून गेला आणि नित्याहून अधिक चांगली तिची व्यवस्था ठेवूं लागला. नंतर आपण स्वतः जाऊन आपणांस ही वश होत नाहीं, ह्मणून राणीस पाठवावी, कारण स्त्रियांचीं वर्मे स्त्रियांस माहीत असतात, त्यांमुळें ही गोष्ट घडून येईल, असा विचार करून रात्रीं एकांताचे ठिकाणीं आपले स्त्री-स हळूच बोलूं लागला. अगे, असें पहा कीं, पतीची जीजी इच्छा असेल, ती ती

स्त्रियांनीं पूर्ण करावी हा स्त्रियांचा धर्म आहे. आणि माझे मनांतील इच्छा पूर्ण तूं न करशील तर तुझी माझी प्रीति कशी राहील? राणी ह्मणाली, यांत अधिक तें काय सांगितलेंत? जी तुमची इच्छा असेल ती माझ्यानें होईल तितकी पूर्ण करणें आणि तुह्मीं सांगाल तें ऐकणें हा माझा धर्मच आहे आणि हा देहच तुह्मांस अर्पण केला आहे. त्याअर्थी तुह्मीं जें सांगाल तें ऐकणें भाग आहे. ह्मणून काय आज्ञा असेल ती सांगावी. मी त्याप्रमाणें वागण्यास सिद्ध आहें. तें ऐकून राजा ह्मणाला, मी एक नवीन स्त्री अरण्यांतून आणून ठेविली आहे, ती मला वश व्हावी ह्मणून दोन वेळां तिजपाशीं स्वतां जाऊन नानाप्रकारें बोध केला, परंतु तिचे मनांत कांहींच द्रव न येतां माझे भाषणाचा तिरस्कार करून ती उलटा मलाच बोध करिते याकरितां जर ती स्त्री मला वश करून देशील, तर तूं माझी हितकर्ती खरी. आतां तूं ह्मणशील कीं, ती मला वश झाल्यामुळें तुजवर माझी प्रीति कमी होईल, तर तसें मी कधीं करणार नाहीं. परंतु मला तिजविषयीं इच्छा उत्पन्न झाल्यामुळें चैन पडत नाहीं. यासाठीं आतां कोणत्याही युक्तीनें तें काम कर ह्मणजे झालें. असें राजाचें भाषण ऐकून राणी ह्मणाली, मी तुह्मांकरितां उपाय करीन. पण जर ती पतिव्रता असेल, तर आपली सर्व खटपट फुकट जाणार आहे. एखादा शाप देईल तर सर्व राज्यासह दग्ध करून टाकील. यासाठीं युक्तीनेंच तिचें मन वळविलें पाहिजे. राजा ह्मणाला, तुला वाटेल तसें कर. असें उभयतांचें भाषण झालें. नंतर दुसरे दिवशीं राणी चंद्रप्रभेस भेटण्याकरितां आली. चंद्रप्रभेनें सन्मान करून तिला बसविलें आणि ह्मणाली बाई, पहा, मी अरण्यांत होतें, तेथून तुमच्या यजमानांनीं मजला येथें आणिलें त्यामुळें आतां मजला कांहींसा मार्गाल विसर पडला आहे. तुमची भेट व्हावी अशी इच्छा करीत होतें, परंतु तुह्मींच मजवर कृपा करून आलांत, यावरून तुमची मजवर प्रीति पूर्ण आहे, अशी माझी खात्री झाली. राणी ह्मणाली बाई, तुह्मांस भिल्लांचे घरीं राहण्याचें कारण काय बरें? तेव्हां चंद्रप्रभेनें

लहानपणापासून घडलेलें सर्व वर्तमान तिला कळविलें. तें ऐकून राणीचे मनांत आलें कीं, ही पतिव्रता आहे, ह्मणून आपल्या पतीस कधीं ही वश होणार नाहीं. परंतु न जाणो. दुःखांत पडली होती यामुळें कशी बुद्धि होईल कोण जाणे. आपण तिचे मनांतील भाव युक्तीनें काढावा ह्मणजे सहज कळेल. ह्मणून बोलली, बाई, तुह्मास आमच्या स्वामींनीं येथें आणिलें त्याचा हेतु तरी काय असावा बरें ? चंद्रप्रभा ह्मणाली, मला माहेरीं पोहोंचविण्याकरितां तेथून आणिलें, परंतु तिकडचा मार्ग सोडून त्या मार्गास लागल्या बरोबरच मी त्यांचे मनांतला भाव समजलें. पण काय करावें ? स्त्रियांची जात पराधीन आहे. हें तुह्मांसही माहीतच आहे. मला येथें आणून ठेविलें आहे व जरी मला कोणत्याही प्रकारें कांहीं कमी नाहीं, तरी हे सर्व भोग मला विषाप्रमाणें वाटतात. याहून त्या भिल्लाचे घरचीं मनुष्यें जीं मजवर प्रीति करीत होतीं, ज्यांनीं माझें बाळंतपण केलें आणि हे दिवस दाखविले, त्यांचे उपकार माझ्यानें फेडवणार नाहींत. एखादी जारिणी स्त्री असतीतर तिला येथील सर्व भोग आनंद देणारे झाले असते. पण मी तशी नव्हें. मला कांहींच रुचत नाहीं. राणी ह्मणाली, बाई, हें खरेंच आहे. पण अशा स्थितींत इतकें तरी कोण करणार आहे ? चंद्रप्रभा ह्मणाली, हें सर्व ठीक आहे, पण राजाचीं कठोर वचनें माझे हृदयास बाणां सारखीं लागलीं. त्यामुळें मात्र मला मरण बरेंसें वाटतें. राणी ह्मणाली, अशीं कायतीं वचनें ? चंद्रप्रभा ह्मणाली, दुसरीं काय असणार ? तुमचे स्वामीचे मनांत माझ्या अभिलाषाची बुद्धि आहे. ह्मणून त्यांनीं येथें मला आणिलें आहे. राणी ह्मणाली, जर त्यांची तशी मर्जी असेल तर मजकडून कांहीं आडकाठी नाहीं. मीं तुमचे बरोबर सवतीमत्सर करणार नाहीं. दोघी ही बहिणीचे नात्यानें राहूं ह्मणजे झालें. चंद्रप्रभा ह्मणाली, बाई, तुह्मीं सांगतां खरें, पण तें मला रुचत नाहीं. आणि तुमच्या बोलण्यावरून तुमचेही मनांतला भाव कळून आला. अहो, हा स्त्रियांचा देह मूळचाच अपवित्र होय. तशांत जर दुष्ट कर्में

केली, तर मग पुढें काय दशा होईल? पूर्व जन्मीं कांहीं पातकें केलीं असतील, त्यामुळें हें दुःख भोगीत आहें. आणि आतां अशींच केलीं तर मग परमेश्वर मला काय शासन करील बरें? आजपर्यंत तुह्मी अनेक गोष्टी ऐकिल्या असतीलकीं, व्यभिचार बुद्धीनें स्त्रियांची आणि पुरुषांची काय गति झाली. असें असून जाणून बुजून तसें करण्यास आपणांस धैर्य कसें होईल. राणी ह्मणाली, हें खरें, पण जर आपणांवर तसेंच संकट आलें, तर आपण काय करणार? प्राणाहून तर कांहीं अधिक नाहीं. आणि खचीत आहे कीं, जर तुह्मीं वश न व्हाल तर तुमची धडगत मला दिसत नाहीं. त्याचा स्वभाव असा आहे कीं, आपल्या मनासारिखें न झालें तर मग काय करितील कोणजाणे. त्यापेक्षां कां होईना, तुह्मांस येथें कांहीं कमी होणार नाहीं. आणि मी ही तुह्मांस वश आहें, यामुळें मत्सर ही होणारनाहीं. तर माझे मतें तुह्मी ऐकावें हें बरें. चंद्रप्रभा ह्मणाली, बाई, आतां तुमच्या गोष्टी पुरत. तुह्मांस ही मीं ओळखिलें. राजा आपला हेतु सिद्धीस न गेला तर माझे प्राणाचा नाश करील इतकेंचना? पण त्यानें असें केलें असतां, त्यास स्त्री हत्येचें पातक घडेल. मग त्या पासून तोही नाश पावेल. आणि प्राणाचा तरी नाश करणें हें मनुष्याचे हातीं नाहीं. कारण आयुष्य संपल्या वांचून तसें घडत नाहीं; आतां असें असून जर त्याचा आग्रहच असेल, तर मात्र तुह्मांला लवकरच वैधव्य दशा प्राप्त होईल यांत संशय नाहीं. पहा आतां याचा दाखला लवकरच येईल. परमेश्वरास माझी करुणा नसेलच काय? त्याचे घरीं न्याय नाहींच काय? बरें, आतां तुह्मी माझा समाचार घेतला, इतकी तुमची दया मजवर आहे, यामुळें मला आनंद आहे. पण बोलल्याचा मात्र राग येऊं देऊं नका. मी दुःखानें गांजल्यामुळें कांहीं तरी माझे तोंडानें वेडें वांकडें येत असतें. स्त्रियांचीं वर्मे स्त्रियांसच माहीत असतात, एवढें लक्ष्यांत ठेवा ह्मणजे झालें. असें चंद्रप्रभेचें भाषण ऐकून राणी उठून गेली.

रात्रीं राजा लवकरच महालीं येऊन राणीस ह्मणाला, कसें काय? काम

झालेंना? राणी ह्मणाली, कामकाय होणार? मीं तुम्हांस पहिल्यानेंच सांगितलें होतें कीं, ती पतिव्रता असेल तर वश होणार नाहीं. पण एकदां का तुमच्या मनांत आलें ह्मणजे तेथें ब्रह्मदेवाचेंही चालावयाचें नाहीं. मग माझा पाड काय? उगाच मी तेथें गेल्यामुळें माझा अपमान मात्र झाला. पण मला त्याचा राग नाहीं. कारण पतिव्रता स्त्री परपुरुषानें किती ही खटपट केली तरी त्याला वश होणार नाहीं. आणि आपण तिला ही गोष्ट जर बोललों तर राग येणार नाहीं काय? पहा, मी आपणांस परमेश्वर मानून खऱ्याभावानें पातिव्रत्य राखून जर वर्तत आहें, तर दुसऱ्या एखाद्या राजानें मला संपत्तीचे सुखाची आशा दाखविली, अथवा मजवर जरी अनेक प्रसंग आणिले तरी मी माझे व्रताचा भंग करीन काय? याचा विचार तुह्मीच करा ह्मणजे झालें. राजा ह्मणाला पुरे, तुझ्या मनांतला भाव मी समजलों. कशीतरी माझी समजूत करूं पाहतेस. पण तूं खचित तिला कबूल करूनच आली असशील. आतां उगाच नको. खरें सांग एकदां लवकर काय तें. राणी ह्मणाली, मीं सांगितलें हेंच खरें आहे. मी खोटें सांगेन असें आपणास वाटतें काय? राजा ह्मणाला, तसें मला वाटत नाहीं, पण ती मला वश झाली तर तुला तें सहन होणार नाहीं. यासाठीं मात्र मला संशय येतो. राणी ह्मणाली, बरें तर, तसेंच कां होईना. मेलें जिकडून तिकडून माझेच कपाळीं येतें. आपण किती जरी खरेपणानें वागलें तरी तुह्मांस तें सर्व खोटेंच वाटतें. राजा ह्मणाला, पण असें करूं नको. मला एकदां खचीत सांग. ती मला नाहींना वश होत? राणी ह्मणाली, जें खरें होतें तें मीं पहिल्यानेंच सांगितलें. पण गरिबाचें मानितें कोण. आतां माझी एक विनंती आहे ती ऐकिली पाहिजे. आपण तिच्या वाटेस जाऊं नये. तिला जिकडची तिकडे पोहोंचती करावी. यांत आपलें कल्याण आहे आणि तसें न करितां जर आपलाच आग्रह चालवाल तर मात्र मला बरीगत दिसत नाहीं. राजा ह्मणाला, वाहवा, तूं मला हें ब्रह्मज्ञान सांगूं नकोस. मी तिला पक्केपणें ओळखिलें आहे. ती जर पतिव्रता असती, तर अशा अरण्यांत

भिल्लाचे घरीं कां आली असती? मी तर आपला हेतु सिद्धीस नेल्यावांचून कधीं राहणार नाहीं. मग काय होईल तें होऊ. आतां तुझ्या हातून कांहींच होत नाहीं, हें मी समजलों. राणी ह्मणाली बरें आहे. आपल्या मर्जी पुढें माझें काय चालणार आहे? तर जसें विचारास येईल तसेंच करा. पण आतां ह्या गोष्टी पुरे करा. रात्र फार झाली. असें ह्मणून नित्याप्रमाणें विलास करून दोघेंही निद्रिस्थ झालीं.

दुसरे दिवशीं राजानें चंद्रप्रभेजवळच्या सर्व दासींस बोलावून सांगितलें कीं, जरह्या स्त्री तुह्मी मला वश करून द्याल, तर तुह्मांस मी चांगलें बक्षीस देईन. आणि हें काम तुह्मी केलेंच पाहिजे. असें ऐकून दासींनी तें कबूल केलें आणि निघून गेल्या. त्या नित्याप्रमाणें चंद्रप्रभेची सेवा करीत असतां, त्यांतील जी दासी मुख्य होती, ती चंद्रप्रभेस ह्मणाली, बाई, आज आह्मी असें ऐकिलें कीं, महाराजांची आपणांवर खुष मर्जी झाली आहे. पण इकडे पाहिलें तों तें आपणांस कांहींच आवडत नाहीं, याचें कारण काय बरें? चंद्रप्रभा ह्मणाली. अगे, राजाज्ञाला ह्मणून काय झालें. तो भलतेंच मागेल तर तें कसें ऐकावें? मी तर कधीं ऐकणार नाहीं. मग काय होईल तें होऊ. त्या मेल्याचें तोंडाकडे देखील मी पाह्मणार नाहीं. दासी ह्मणाली, बाई, तुह्मी ह्मणतां हें खरें, पण आतां त्याचे हातीं सांपडल्या आहांना. तो तर कधींही सोडणार नाही. तरआ तां तुह्मी तरी उगाच कां आग्रह धरितां? अशा हट्टानें तुमची मला बरी गती दिसत नाहीं. तो तुमचे हाल करील यांत संशय नाहीं. चंद्रप्रभा ह्मणाली हालच जर प्रारब्धीं होणें असले तर ते चुकतील काय? भोगावेच लागणार. ह्मणून काय भलतेंच कर्म करावें? दासी ह्मणाली, खरं. पण बाई पुरुषांचें मन फार वेडें आहे. एकदां मनांत आलें ह्मणजे मग त्यांस जरी कोणी कसेंही सांगितलें तरी आपलेंच खरें करतील पण तुमची तर धन्य आहे बरं आतां असें तरी करा कीं, आपलेंच खरें करून दाखवा ह्मणजे आलें आह्मीच तुमची मौज पाहतों.

दासी मनांत पक्कें समजली कीं, ही कांहीं केल्यानें वश होत नाहीं. परंतु आह्मी कबूल केल्याप्रमाणें न केलें तर एखादे वेळीं आमचें डोकें मारतील. या- साठीं हिचे कांहीं हाल करून पाहूं. असें मनांत आणून तिनें त्या दिवशीं चं- द्रप्रभेला वेळेवर भोजन दिलें नाहीं. नंतर तिनें हाक मारिली तर न ऐकलें- सें करावें, व रागानें बोलावें आणि तिचा तिरस्कार करावा, याप्रमाणें सर्व दा- सी वागूं लागल्या. असेही कितीएक दिवस लोटले. एके दिवशीं राजानें दासीं- स बोलावून विचारिलें कीं, मी सांगितल्या कामास बरेच दिवस झाले, तेव्हां तें काम कसें काय केलें? दासी ह्मणाल्या, काम तर कठीणच दिसतें. पण अद्यापि आमचा उपाय असेल तितका करून पाहतों. ह्मणून आतां आह्मी तिचे कांहीं- से हाल करणार आहों. यासाठीं आपली आज्ञा असावी. राजा ह्मणाला, तुह्मां- स वाटेल तसें करा. पण वश झाली पाहिजे. असें राजाचें भाषण ऐकून दासी निघून गेल्या आणि त्यांनीं चंद्रप्रभेचे हाल पूर्वींपेक्षां ज्यास्त चालविले. तिला वेळेवर अन्न मिळूं नये, पाणी मिळूं नये; धड वस्त्रही नाहीं; कोणीच मनुष्य तिचे जवळ अ- सूं नये. तिचे मुलाचाही त्यांनीं कंटाळा करावा, दोनदोन दिवस अन्नपाण्यावांचून तिला ठेवावें आणि तिनें मुलास घेऊन उगाच रहावें. असा दुर्घट प्रसंग त्या दा- सींनीं चंद्रप्रभेवर आणिला. तेव्हां ती मनांत ह्मणाली, परमेश्वरा. जो सत्यानें राहील त्याला तूं असेंच दुःख देऊन परीक्षा पाहतोस काय? ही चंद्रप्रभा सा- मान्य नव्हे. प्राण गेला तरी आपला निश्चय सोडणार नाहीं. पण ह्या बालकाचे मात्र हाल माझ्यानें पाहवत नाहींत. त्याचे नशिबींच जर असें असेल, तर देवा तूं तरी काय करणार आहेस? अशी नानाप्रकारें विलाप करीत आहे, इतक्यांत राणी पुन्हा तिजला भेटण्या करितां कोणास न कळत एकटीच आली. तिला पाहून चंद्रप्रभा उठून उभी राहिली. राणी ह्मणाली, कां बाई, तुह्मी खुशाल आहांना? मी बरेच दिवस झाले ह्मणून पुन्हा तुमचे समाचारासाठीं आलें. चंद्रप्रभा ह्मणा- ली, माझें खुशाल असणें काय, आणि नसणें काय? जसें प्रारब्धीं आहे तसें भोगीत

आहे. असेंच कांहीं दिवस चाललें तर मी या जन्मांतून मोकळी तरी होईन. मला त्याचें दुःख नाहीं. पण या बाळाचें काय होईल कोण जाणें आतां तुह्मी मजवर एक उपकार करा कीं, माझे जिवास बरें वाईट झालें तर त्या माझे बाळाचा सांभाळ तुह्मी करा. एवढें माझें मागणें आहे. राणी ह्मणाली, बाई, असें भलतेंच काय बोलतां? झालें तरी काय? तुह्मी काय ह्मणतां हें मी अद्यापि समजलें नाहीं. तुह्मांस दुसरें तर कांही संकट नाहींना? चंद्रप्रभा ह्मणाली, संकट कशाचें, आतां माझे हाल करून तरी काय होतें हें पाहण्याची तजवीज चालली आहे. पण मेलेलें मेंढरूं आगीस भीत नाहीं. प्राण जाई पर्यंतच कायते हाल होतील. एकदां तसें झालें ह्मणजे कटकट गेली. हें ऐकून राणीनें दासीस विचारिलें, कायग, तुह्मी हिचे हाल मांडिले काय? दासी ह्मणाली, बाईसाहेब, आह्मी हाल करीत नाहीं, पण सरकारच्या हुकुमा पुढें आह्मी काय करावें? तें ऐकून राणी मनांत ह्मणाली, परमेश्वरा, या पतिव्रतेच्या नशिबींच असें आणिलेंस काय? आज ती दुःखांत आहे अशीच मी एखादे वेळीं पडलें नर मला ही असेंच भोगावें लागेल. यासाठीं आपण हिचे हाल होऊं देऊं नयेत. असा विचार करून दासीस ह्मणाली, अगे, तुह्मांस सरकारची आज्ञा असेल तशा तुह्मी वागत असाल हें तर ठीकच आहे. पण माझें तुह्मांस एक सांगणें आहे तें तुह्मीं ऐकिलें पाहिजे. आज पासून तुह्मी हिचे हाल करूं नका. जशी माझी चाकरी करितां, तशीच ही समजून वागा. आणि तुह्मांस सरकार विचारतील तर मात्र हाल चालविले आहेत असें सांगा. मी तुह्मांस असें सांगितलें हें मात्र कळूं देऊंनका. असें पहा कीं, पुरुषांचे मनांत एकदा गोष्ट आली, ह्मणजे मग इकडे दुसऱ्याचें कांहीं का होईना. तें कोणी मनास आणीत नाहींत. पण आज हिची जशी दशा आहे, तशीच जर आपणांवर वेळ आली तर कसें होईल याचा विचार करून वागलें पाहिजे. सरकारांतून तुह्मांस सामग्री मिळाली नाहीं तर मजकडून मागून घ्या. असें राणीचें भाषण ऐकून दासींनीं तसें करण्याचें कबूल केलें.

राणी चंद्रप्रभेस ह्मणाली, बाई, आतां झालेंना? दासी हुकुमाच्या चाकर त्यांचा तरी उपाय काय? पण मी आतां तुमचे मनांतील भाव खरोखर समजलें त्यापक्षीं तुह्मी कांहीं चिंता करूं नका. जें तुह्मांस दुःख तें मलाच आहे. आमच्या यजमानाची तर बुद्धि वाईट झालीच आहे. पण तुमचे खऱ्या पातिव्रत्यामुळें परमेश्वर दया करील आणि कांहीं दिवसांनीं त्यांची ही ती बुद्धि जाईल. तुह्मी स्वस्थ रहा. असें ऐकून चंद्रप्रभेस कांहींसें बरें वाटलें आणि ह्मणाली, बाईसाहेब, आतां तुमची मजवर कृपा झाली त्यामुळें मला धीर आला, ( मुलास मांडीवर घेऊन ह्मणाली.) पण त्या माझ्या बाळाचे फार हाल होत आहेत हे माझ्यानें पाहवत नाहींत. तें ऐकून राणीनें त्या बाळास निजजवळून घेऊन आपल्या पोटाशीं धरिलें आणि ह्मणाली, किती ग हें गुणाचें मूल आहे. पण हा गर्भी आल्यापासून याचे हालच होताहेत, यावरून मला असें वाटतें कीं, पुढें ह्याला पुष्कळ सुख प्राप्त होईल. कां कीं, 'ज्याला आरंभीं दुःख त्याला पुढें सुख' असें ह्मणून तिनें त्याचें चुंबन घेतलें. इतक्यांत राणीचे स्तनांस पान्हा सुटला ह्मणून त्या मुलास स्तन देऊन तृप्त केलें. राणीस ही पुत्र झाला होता. परंतु तो मरून नुकतेच दोन महिने झाले होते. त्यामुळें तिला आपल्या पुत्राचें स्मरण झालें व नेत्रांतून अश्रु आले आणि ह्मणाली, माझ्या बाळा, कोठें रे गेलास! असाच मी तुला घेतला असता. पण माझ्या नशिबीं नाहीं, त्यास तूं तरी काय करशील? असें ह्मणून दुःख करीत आहे, इतक्यांत चंद्रप्रभा ह्मणते, बाई, आतां तें आठवून उपयोगी नाहीं. सध्या हाच तुमचा आहे असें समजा ह्मणजे झालें. मी तरी आतां आपल्या जाग्यावर जाईन हें कठिण दिसतें. पण मला परमेश्वरानें हें रत्न दिलें त्यामुळें मात्र माझे दुःखाचे दिवस आनंदांत जातात. अशा परस्पर भाषणें करीत कांहीं वेळ बसून पुन्हा दासीस हाल न करण्याविषयीं सांगून राणी जाऊं लागली. चंद्रप्रभेनेंही उठून तिला मान दिला आणि मनांत ह्मणाली, ज्यापक्षीं हिचे हृदयास द्रव आला त्यापक्षीं ही सत्वशील आहे. आतां कांहींशी परमेश्वरास माझी करुणा आलीसें वाटतें.

पुढें दासींनीं चंद्रप्रभेचे हाल नकारितां, पहिल्याहून त्यास चांगली व्यवस्था ठेविली. राणी एक दोन दिवशीं तिचे समाचारास येत असे. असे बरेच दिवस गेले. इतक्यांत एके दिवशीं राजानें दासींस बोलावून विचारिलें कीं, कसें काय? अद्यापि तुह्मी काम करीत नाहीं? त्यानीं उत्तर दिलें, महाराज, आमचा उपाय चालत नाहीं. आतां आपण जें करणें तें करावें. असें बोलून दासी निघून गेल्या. दुसरे दिवशीं राजा चंद्रप्रभेचे महालांत येऊन समोर उभा राहून ह्मणाला हे स्त्रिये, तुझी मी अनेक प्रकारें विनवणी केली. पण तूं माझें ऐकिलें नाहींस. ह्मणून दासीं करवीं तुझे हाल करविले. तरी तूं आपलाच हट्ट खरा करूं पाहतेस. पण तें माझे जवळ कांहीं चालावयाचें नाहीं. आतां मी आपलें ह्मणणें खरें केलें तर तूं काय करशील? यासाठीं विचार कर, नाहींतर मला तसें करणें भाग पडेल. मग मात्र तूं सर्व सुखास अंतरशील. हें राजाचें भाषण ऐकतांच चंद्रप्रभेस फारच राग येऊन तिचे नेत्र आरक्त झाले. आणि बोलली अरे, दुष्टराजा, तूं माझे समोर येऊन अशीं भाषणें करितोस या बद्दल शिक्षा करणार येथें कोणी नाहीं, पण परमेश्वर तुला पाहत आहे. त्याला खचित हें सहन होणार नाहीं. ह्मणून जर तुला कांहीं दिवस वांचावयाचें असेल, तर मला तोंड दाखवूं नको अरे, तूं अद्यापि मला ओळखिलें नाहींस. आज पर्यंत मीं माझ्या प्रारब्धावर हवाला ठेवून होतें. पण आता हे तुझे कठोर वाग्बाण माझ्या हृदयास सहन होत नाहींत. जसा तूं मला छळीत आहेस तसाच परमेश्वर तुला छळील. असें रागानें बोलून राजाकडे पाठकरून बसली. राजानें तें भाषण ऐकिल्यावर त्यास कांहींसें भय वाटलें. कारण ही स्त्री असून एकाएकीं अशीं भाषणें करिते, त्यापक्षीं आतां आपण हिचे वाटेस जाऊं नये, ही कोणी पतिव्रताच आहे यांत संशय नाहीं, असें ह्मणून निघून गेला.

कांहीं दिवस लोटल्यावर असें झालें कीं, सुवर्णपुरीचा राजा मदभंजन हा महा पराक्रमी होता. त्यानें कित्येक मांडलिक राजांस जर्जर केलें. जे कोणी युद्ध

करण्यास सिद्ध झाले त्यांचा पराभव करून त्यानें त्यांचीं सर्व राज्यें हरण केलीं. त्याचप्रमाणें त्या विजयपुरच्या जयवंत राजाचें ही राज्य आपल्या हस्तगत करून घ्यावें त्या हेतूनें त्यानें आपला एक वकील त्याकडे पाठवून कळविलें कीं, तुमच्या राज्याचा चतुर्थांश आह्मांस द्यावा, नाहींतर लढाईची तयारी करावी. तें ऐकून शत्रुबलाढ्य असल्यामुळें जयवंत राजास मोठी चिंता उत्पन्न झाली. दुसरे दिवशीं मुख्य मंत्री व सरदार इत्यादिकांस आणून त्यानें विचार केला कीं, चौथाई देण्याची चाल नवीन घालणें हें उपयोगी नाहीं. त्यापेक्षां युद्धच करावें. मग काय होईल तें होऊ. असा ठराव करून सर्व सेनेची तयारी करविली आणि शत्रूस कळविलें कीं, आह्मी युद्धास सिद्ध आहों. नंतर राजा अंतःपुरांत जाऊन बसला असतां राणी तेथें आली आणि भर्त्यास चिंतायुक्त पाहिल्यावरून तिनें विचारिलें कीं, आज आपण चिंताग्रस्त कां दिसतां? तेव्हां राजानें सर्व वर्तमान तिला कळविलें. त्यावरून राणी ह्मणाली, महाराज, मीं आपणांस पूर्वीच सांगितलें होतें कीं, आपण ही स्त्री आणून इजवर पापदृष्टि ठेवितां, परंतु येणें करून आपलें कल्याण होणार नाहीं. त्याचें प्रत्यक्ष प्रमाणच हें दिसतें. तर आतां मला असें वाटतें कीं, तिला सोडून देऊन नंतर युद्ध कराल तरच आपणांस यश मिळेल. नाहींतर विचार कठिण दिसतो. पण माझें ऐकतें कोण? बायकांची बुद्धि ह्मणजे कांहींच नाहीं. राजा ह्मणाला, हा प्रसंग तिजमुळें आला ह्मणतेस. पण मी अशा प्रसंगास भीत नाहीं. युद्ध करणें हा आपला धर्मच आहे. मग जें होईल तें होऊ. मी तिला कधीं सोडणार नाहीं. असा राजाचा दुराग्रह पाहून राणी फार चिंताग्रस्त झाली आणि मनांत ह्मणाली कीं, आतां मात्र अवस्था कठिण आहे. यांतून परमेश्वरच तारील तर बरें आहे; नाहींतर वेळ कठिण दिसते. ह्मणून पुन्हा राजास ह्मणाली, महाराज, माझी विनंती आपण ऐकत नाहीं, तर माझा निरुपाय आहे. आतां आपल्या मर्जीस येईल तसें करावें.

राजानें मदांधपणें तें कांहींच न ऐकून युद्धाची तयारी केली तोमदभंजन

राजाचे फौजेनें येऊन नगरास वेढा घातला. नानाप्रकारचे आवाज ही होऊं ला गले. बाहेर सेना किती आहे हें पाहण्या करितां आंतील कित्येक लोक तटाचे बुरूजावरून पाहण्यास चढले. त्यांनीं बाहेरील सेना थोडी दिसल्यावरून बाणांची वृष्टि केली, इतक्यांत शत्रूच्या सेनेनेंही त्यांजवर बाण टाकिले. याप्रमाणें कांहीं वेळ युद्ध झालें. उभयतांचे सेनेंतील लोक बरेच घायाळ झाले. इतक्यांत शत्रूं-कडे आणखी अपार सेना येऊन मिळाली व नींतील लोकांनीं आंत प्रवेश हो-ण्यापुरता तट पाडून एका एकीं ते लोक आंत आले त्यावेळीं उभयपक्षांची सैन्यें हात घाईवर येऊन रक्ताचे पूर वाहूं लागले. शेवटीं मदभंजन राजाचें सैन्य फार असल्यामुळें जयवंतराजाचा पराभव होऊन त्याचे सैन्याची दाणादाण झाली. नंतर शत्रूंचे लोकांनीं सर्व नगर लुटलें. त्यावेळीं नगरवासी लोकांत जो आकांत झाला तो काय सांगावा. जिकडे वाट सांपडेल तिकडे ते जीव वांचविण्या करितां पळूं लागले. शत्रूच्या सेनेनें राजवाड्यास वेढा देऊन खजिना लुटला आणि राजा, प्रधान, राणी इत्यादिकांस ते आपल्या नगरास घेऊन गेले. अशी त्या नगराची व राजाची दुर्दशा झाली. त्या संधींत चंद्रप्रभेस ही तेथून निघून जाण्यास संधी मिळाली. परंतु अगोदरच तिचा मुलगा राणीनें आपले महालीं नेला होता. राणी-स कैद करून नेली, तेव्हां तिजबरोबर तोही नेला. हें वर्तमान कळल्यावर पुत्राचे विरहामुळें तिला फारच दुःख झालें. पण काय करिते. १ आपण तरी या वेळीं बंधांतून मोकळें व्हावें असें मनांत आणून एक दासी बरोबर घेऊन युक्तीनें रात्रीं नगरा बाहेर निघून गेली. इकडे सर्व नगर शत्रूंनीं लुटून फस्त केलें आणि नि-घून गेले. नंतर मदभंजन राजानें आपल्या प्रधानाकडून त्या राज्याची व्यवस्था चां-गल्या प्रकारें ठेवविली.

चंद्रप्रभा आणि दासी प्रहर रात्रीचे सुमारास नगरा बाहेर आल्या आणि आतां कोणीकडे जावें असा विचार करूं लागल्या. परंतु अंधारामुळें मार्ग दिसे-ना. मग तशाच आपटत ठेंचत सुमारें एक कोश पर्यंत गेल्या. तों चंद्रोदय-

झाला त्यामुळें कांहींसें दिसूंलागलें. इतक्यांत त्याच मार्गानें चंद्रप्रभेचें पालन ज्या भिल्लानें केलें होतें तोही पळून जात होता. त्याची त्यांची गांठ पडून एकमेकांस ओळखल्यावर परस्परांस मोठा आनंद झाला. तेव्हां तेथें जवळच एक पिंपळाचा वृक्ष होता, त्याचे पारावर तिघेंजणें जाऊन बसलीं. नंतर चंद्रप्रभेनें नगरांत आल्यापासून घडलेलें सर्व वर्तमान त्या भिल्लास कळविलें. परंतु पुत्र राणीबरोबर शत्रूंनीं नेल्यामुळें ती फार दुःखित होऊन ह्मणाली, परमेश्वरानें माझा आणि बालकाचा वियोग केला, पण कोठेंतरी त्याला सुखी राखो ह्मणजे झालें. तें वर्तमान ऐकून भिल्लास फार वाईट वाटलें. त्या पारावरच बसून व निजून त्यांनीं सारी रात्र लोटिली. प्रातःकाळ होतांच भिल्ल ह्मणाला, आतां कोठें जाण्याचा विचार करितां? पुन्हा माझे घरीं चला. मीं तुह्मांस माहेरीं पोहोंचवितों. चंद्रप्रभा ह्मणाली, बाबारे, तुझें घर हेंच माझें माहेर आहे. आतां आणखी माहेरास जाऊन बापास काय तोंड दाखवावें? मीं कशीही असलें तरी जनापवाद तर चुकणार नाहींच. मी परत माहेरीं गेलें ह्मणजे मला अरण्यांत सोडल्याची हकीकत सांगावी लागणारच. त्यास दुसरी युक्ति नाहीं. आणि तें सांगितल्यावर सोडण्याचें कारण कांहीं तरी असेल असें सर्वांचे मनांत येऊन मजवर आरोप येणार, त्यापक्षीं मी मेल्याची बातमी त्यांस कळली असेल ह्मणून एकदां दुःख करून उगीच राहिलीं असतील. आतां परमेश्वर जिकडे मार्ग दाखवील तिकडे जावें. जें आपल्या प्रारब्धीं असेल तें होईल. अशीं त्यांचीं भाषणें होत आहेत इतक्यांत त्या मार्गानें एक गरीब वृद्ध अग्निहोत्री ब्राह्मण जात होता. त्याचे हातांत काठी, डोकीला तांबडी टोपी आणि पाठीवर तांदुळांची पिशवी होती. त्या ब्राह्मणानें हीं बसलेलीं पाहिलीं आणि तोही पहांटे पासून चालत असल्यामुळें विश्रांती करितां त्याच पिंपळाचे पारावर येऊन बसला. त्यास पाहून चंद्रप्रभेनें विचारिलें, महाराज, आपण कोठून आलां व जातां कोठें? तो ह्मणाला, मी गरीब अग्निहोत्री ब्राह्मण आहें. दोन दिवसां पूर्वी या जवळच्या

नगरांत दृष्टीचे भिक्षे करितां आलों होतों. इतक्यांत नगरास सैन्याचा वेढा पडल्यामुळें आंतील मनुष्यांस बाहेर येण्यास प्रतिबंध झाला आणि लढाई झाल्यामुळें माझे जे हाल झाले. ते सांगतां येत नाहींत. पण त्यांतूनच मी गरीब ह्मणून माझे वाटेस कोणी न जातां वांचलों. आतां हळू हळू आपले घरीं जातों. येथून सुमारें एक कोशावर माझा आश्रम आहे. चंद्रप्रभा ह्मणाली, महाराज, तुमचे गांवाचें नांव काय? आणि गांवांत घरें किती आहेत? ब्राह्मण ह्मणाला, आमचे गांवाचें नांव कशाचें आणि घरें कशाचीं. जसें माझें घर आहे, तसेंच माझे शेजारीं आणखी एका वैदिक ब्राह्मणाचें घर आहे. चंद्रप्रभा ह्मणाली, आपले कुटुंबांत कोणकोण मनुष्यें आहेत? ब्राह्मण ह्मणाला, माझा बंधु पुराणिक आहे, तो द्वारका नगरांत राहत असतो व त्याची स्त्री आमचेच आश्रमांत आहे. त्याला संतती नाहीं. मला मात्र एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्यें आहेत. आतां मी व माझी बायको दोघेंही वृद्ध झालों. त्यामुळें आणखी संतती होणें नाहींच. मुलगा बारा वर्षांचा आहे व मुलगी आठ वर्षांची आहे. मुलाची मुंज झाल्यास चार वर्षें झालीं. आतां मुलीचें लग्न मात्र करणें आहे. कोठें तरी एखादा विद्वान् मुलगा पाहून कन्या देऊं ह्मणजे झालें. चंद्रप्रभा ह्मणाली. आपला निर्वाह कशावर चालतो? ब्राह्मण ह्मणाला, अग्नीची सेवा करावी ह्मणजे परमेश्वर कोणाचे तरी मनीं उभाराहून आह्मांस भिक्षा देतो. एखादे वेळीं घरांत कांहीं नसलें तर नगरांत येऊन भिक्षा मागावी ह्मणजे कसें तरी चालतें. चंद्रप्रभा ह्मणाली, आपण अग्निहोत्री असून आपणांस ह्या राजाकडून कांहींच दक्षिणा मिळत नव्हती काय? ब्राह्मण ह्मणाला, त्या राजाचें नांव देखील नको. बरें झालें. परमेश्वरानें चांगली खोड मोडिली. ब्राह्मणांस कधीं त्याचे हातानें दक्षिणा मिळाली असेल असें मला वाटत नाहीं. नाच, तमाशे, वेश्यांचीं गाणीं ह्यांची मात्र त्यास फार हौस होती. एखादा हरिदास किंवा वैदिक ब्राह्मण कधीं आला तर त्यानें शहरांत फिरावें. पण सरकारांतून एक पैसाही मिळत

नव्हता. ह्मणूनच ह्याची अशी दशा झाली. जशी बुद्धि तशीं फळें. परमेश्वराचे घरीं न्याय आहे. पण बाई, तुह्मी कोठच्या कोण आणि एवढ्या सकाळींच कोणीकडे जातां? चंद्रप्रभा ह्मणाली, महाराज, मी कोण आणि कोठें जातें हें आपणांस सांगूंलागलें तर फारच लांब आहे. पण मी एका राजकुळांतली आहें. ह्याच नगरांत होतें आणि पळापळ झाली तेव्हां बाहेर पडून आलें. आतां कोणीकडे जावें असा विचार करीत आहें. इतक्यांत तुमची गांठ पडली, त्यावरून तुमचा आश्रम पहावा असें माझे मनांत आलें आहे. आपली आज्ञा असेल तर येतें. ब्राह्मण ह्मणाला, बाई, तुह्मी थोरलोक आमचे गरिबांचे घरीं कशाला याल? परंतु तुमची मर्जी असेल तर चला. तुमचे योगानें आमचें तरी कल्याण होईल. इतकें भाषण ऐकून चंद्रप्रभेनें भिल्लास सांगितलें कीं, हा ब्राह्मण अग्निहोत्री सात्विक आहे. ह्याचे घरीं मी जाऊन राहतें. तूं माझें पित्याप्रमाणें पाळण केलेंस, ते उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं. मी ह्या महाराजांकडे जातें. घरांतले सर्व मनुष्यांस माझें विचारणें सांगावें. असें बोलून त्या पारावरून तीं सर्व उतरून चालतीं झालीं. भिल्ल आपले घरीं जाऊं लागला. चंद्रप्रभा दासी सह ब्राह्मणाबरोबर निघाली. ती कांहीं वेळानें हळू हळू त्याचे घरीं पोहोंचली. तें घर शुचिर्भूत असल्यामुळें चंद्रप्रभेस आनंद झाला. इतक्यांत ब्राह्मणस्त्रीनें बाहेर येऊन तिचा आदर सत्कार करून आंत नेऊन बसविलें. तेव्हां चंद्रप्रभेनें आपले गळ्यांतील एक सुवर्ण मण्यांचा हार काढून त्या वृद्ध स्त्रीचे गळ्यांत घातला, त्यामुळें तिला फार आनंद झाला. नंतर तिची चंद्रप्रभेवर फारच मर्जी बसली. ब्राह्मणाचे घरचें शुचिर्भूत अन्न आणि सुसंगति ह्यांचा लाभ झाल्यामुळें चंद्रप्रभेस समाधान वाटलें. सायंकाळीं ब्राह्मण स्त्री म्हणाली, बाई, तुम्हास कांहीं अपत्य झालेलें असावें असें वाटतें. तें ऐकून चंद्रप्रभेस बाळकाची आठवण होऊन गहिंवर आला. नेत्रांतून अश्रुधारा चालल्या. तें पाहून ब्राह्मण स्त्री म्हणाली, काय झालें? चंद्रप्रभा म्हणाली, बाई, काय सांगूं! माझें पहिलेंच पुत्ररत्न आहे. पण त्याची अवस्था आतां काय झाली असेल

कोण जाणे. नगरांत पळापळ झाली त्यावेळीं त्याचा माझा वियोग झाला. माझा बाळक राणीनें आपल्या महालांत नेला होता, तितक्यांत तिला शत्रूंनीं धरून नेलें. आतां तिची गत तीच माझे बाळकाची गत. पहा लहानपणींच हें बाळावर संकट पडलें आहे. पण काय करावें? बाई, प्रारब्धापुढें उपाय नाहीं. ब्राह्मणस्त्री ह्मणाली, तुह्मी राजाचेच घराण्यांतल्या कीं काय? अथवा तुमची काय व्यवस्था असेल ती सर्व मला सांगा. असें ह्मणतांच चंद्रप्रभेनें आपला सर्व वृत्तांत त्या दोघांसही कळविला. परंतु इतकें मात्र सांगितलें कीं, मी जीवंत असल्याची गोष्ट कोणासही कळवूं नये असें माझे मनांत आहे. माझे प्रारब्धानें मी पती जवळ जाई तों पर्यंत काय संकटें येतील तीं येवोत. पण आपण होऊन जाणें हें मला बरें दिसत नाहीं. कोठें तरी तुह्मा सारख्यांचे संगतीनें राहून काळ घालवावा ह्मणजे झालें. अशीं परस्परांचीं भाषणें झालीं. चंद्रप्रभेस ब्राह्मणाचे घरीं राहिल्यामुळें दुःखांत सुख झालें. परंतु बाळकाची आठवण झाली ह्मणजे तिला चैन पडेनासें होई. चंद्रप्रभा वारंवार दुःख करिते असें त्या अग्निहोत्र्यानें पाहिल्यावर त्यासही फारच वाईट वाटलें आणि ह्मणाला बाई, उगाच कां दुःख करितेस? तुझा मुलगा सुखरूप आहे. तूं कांहीं चिंता करूं नको. तुजवर प्रारब्धानें संकट आलें आहे त्याचा परिहार ईश्वर करील. धीर धर. दुःख करून तरी काय उपयोग? मला असें वाटतें कीं, तुला संकट पडलें याहून मोठें संकट पूर्वी एका स्त्रीवर आलें होतें. त्या विषयीं इतिहास मी तुला सांगतों. तो ऐकिल्यावर तुझें संकट त्यापुढें कांहींच नाहींसें वाटेल. असें बोलून तो सांगूं लागला.

चिंतामणि ह्मणाला, रत्नाकरा, आज आपण फार वेळ गोष्टी सांगत बसलों. आतां रात्र झाली; ह्मणून तूं घरीं जा. उद्यां लौकरच ये ह्मणजे अग्निहोत्र्यानें सांगितलेली गोष्ट तुला सांगेन. तें ऐकून रत्नाकर घरीं गेला. दुसरे दिवशीं सायंकाळीं तो चिंतामणीचे घरीं नित्याप्रमाणें येऊन बसला. चिंतामणि बाहेर गेला होता, तो आल्यावर दोघेही एकांतीं जाऊन बसले. चिंतामणि ह्मणाला, रत्नाकरा, असें

पहा कीं, जी स्त्री पातिव्रत्य संरक्षून राहते तिजवर अनेक दुःखें आलीं तरी ती आपला निश्चय सोडीत नाहीं. ह्मणून शेवटीं परमेश्वर तिचें कल्याण करितो. आता ही सर्व गोष्ट एकल्यावर तुझे ध्यानात येईलच. असें बोलून तो पुढें सांगूं लागला.

पूर्वी मत्स्यपुर नगरांत चित्रभानु राजा राज्य करीत होता. त्यास भद्रकेतु नामक एक पुत्र होता. राजानें सर्व विद्या आणि कलाकौशल्य यांत त्यास निपुण केलें. तो सोळा वर्षांचा झाल्यावर त्रिचनापल्लीच्या राजाच्या गुणवती नामक कन्येशीं त्याचें लग्न केलें. भद्रकेतु राज्य चालविण्यास योग्य झाला,असें पाहून राजानें आपले प्रधानादिकांचे मतानें त्यास सुमुहूर्तावर गादीवर बसविलें आणि कांहीं दिवसांनीं आपण स्त्रीसह वर्तमान परमार्थ साधना करितां तीर्थी जाऊन राहिला.

भद्रकेतु बापाचे मागें राज्य चालवूं लागल्यावर आपल्या मतासारिखे नवीन प्रधान आणि सर्व मुत्सद्दी वगैरे ठेवून त्यांचे विचारानें वागूं लागला. तो सर्व काळ नाच, तमाशे इत्यादि पाहण्यांत घालवीत असे. आणि कोणाची रूपवान् स्त्री पाहिली ह्मणजे तिजवर पापदृष्टि ठेवून हरप्रयत्नानें अथवा जबरदस्तीनें तिला आणून भोगीत असे,अशी अनेक दुष्टकर्मे तो करूं लागला; त्यामुळें हा राजा नसावा असें सर्व प्रजेस वाटूं लागलें.

कांहीं काळानंतर भद्रकेतुराजास देशपर्यटन करावें असें वाटल्यावरून, त्यानें आपल्या सर्व प्रधानांचें मत घेऊन मुख्य प्रधानाचे स्वाधीन सर्व राज्यकारभार केला, आणि आपण निवडक सरदार व कांहीं लोक बरोबर घेऊन सुमुहूर्तावर देशपर्यटनाकरितां निघाला. त्याचे बापाचे कीर्तीमुळें देशोदेशच्या राजांनीं त्याला मान दिला. नंतर जागो जागचे चमत्कार पाहत पाहत अनेक देश फिरून तो परत येत असतां, कोंकणप्रांतांतील पद्मपुर नामक नगरांत येऊन पोहोंचला. तेथील राजानें त्याचा मान उत्तमप्रकारें ठेविला आणि चार

दिवस त्यास राहवून घेतलें.

एके दिवशीं दोघेही राजे स्वारी करितां थाटानें बाहेर निघाले, तेव्हां ती मौज पाहण्यास नागरिक लोकांची दुतर्फा दाटी झाली होती. कितीएक श्रीमान् लोक आपआपल्या घराचे ओटीवर आनंदानें मौज पाहण्यास बसले आहेत, तशाच स्त्रियाही कित्येक झरोक्यांतून, कित्येक जाळीच्या पडद्यांतून व कांहीं चिकाचे पडद्यांतून मौज पाहण्याकरितां बसल्या आहेत, राजांचे स्वारी बरोबर नाना प्रकारची वाद्यें वाजत आहेत कलावंतिणी जागोजाग नृत्य करीत उभ्या राहत राहत चालल्या आहेत, दोन्ही राजे हत्तीच्या अंबारींत बसून चालले आहेत, इतक्यांत असा वारा सुटला कीं, जिकडे तिकडे धुरोळा उडून आकाश भरून गेलें. सर्व लोकांचे आंगावरचीं वस्त्रें उडूं लागलीं. कितीएक घरांचे बाऱ्यांचे पडदे वाऱ्याचे झपाट्यानें तुटून रस्त्यावर पडूं लागले अशासमयांत त्या नगरांतील एका उंच बंगल्याकडे भद्रकेतु राजाची दृष्टि गेली. त्याबंगल्याचे तिसऱ्यामजल्यावर स्त्रिया पडद्यांतून मौज पाहण्यास बसल्या होत्या, तो पडदा वाऱ्याचे झपाट्यानें तुटून पडल्यामुळें त्यांची गडबड झाली. परंतु स्वारीचा थाट त्यांचे दारापुढें आलेला असल्यामुळें पडदा नसल्याचें कांहींच मनास न आणितां त्या स्त्रिया तशाच उभ्या राहून पाहूं लागल्या त्यांत एक स्त्री रूपानें अति सुंदर आणि सुकुमार अशी भद्रकेतुच्या दृष्टीस पडली, त्यामुळें त्यास असें वाटलें कीं, आजपर्यंत मीं बहुत स्त्रिया पाहिल्या आणि भोगिल्या, परंतु हिजसारिखी रूपवान् स्त्री कोठेंच पाहिली नाहीं. जन्मास येऊन अशी स्त्री भोगावी तरच सार्थक, नाहींतर जन्म वृथा आहे. असें त्याचे मनांत येऊन एकसारखा तिजकडेसच पाहत राहिला. तिच्याविषयीं अभिलाष उत्पन्न झाल्यामुळें त्यास दुसरें कांहींच सुचेनासें झालें. परंतु परकीय राज्यांत असल्यामुळें त्याचा उपाय चालण्यासारखा नव्हता म्हणून कांहीं न बोलतां तो उगाच राहिला. त्या बंगल्याचा अनुक्रमांक मात्र त्यानें ध्यानांत ठेविला. स्वारी नेमिल्या ठिकाणीं जाऊन त्याचमार्गानें परत फिरली तेव्हां आपणास पुन्हा त्या सुंदरस्त्रीचा मुखचंद्र दृष्टीस पडेल म्हणून

भद्रकेतूस आनंद झाला. परंतु त्या बंगल्या समोर आल्यावर पाहतो तों पडदा असल्यामुळें ती त्यास दिसली नाहीं, ह्मणून त्याला फार वाईट वाटलें आणि कांहींसुचेनासें झालें. स्वारी परत येऊन पोहोंचल्यावर दुसरे दिवशीं त्यानें तेथून निघून आपल्या देशीं जाण्याची तयारी केली आणि फारखरेनें पंधरावे दिवशीं आपल्या नगरांत सर्व लोकां सुद्धां येऊन पोहोंचला. परंतु त्या स्त्रीचें सुंदर रूप त्याचे मनांत भरल्यामुळें स्वस्त्रीचे मंदिरांतील विलाससुख अथवा कोणतेही उपभोग त्यास आवडतनासे झाले. एके दिवशीं आपला जिवलग मित्र द्यूतमणि यास बरोबर घेऊन राजा बागेंत हवा घेण्याकरितां गेला असतां त्या स्त्रीचें स्मरण त्यास झालें. ह्मणून दुःखानें उच्छ्वास टाकून, हरहर! हा जन्म व्यर्थ आहे, असें बोलला. तें ऐकून मित्र ह्मणाला.

**द्यूतमणि**— महाराज, आपण आनंदात असतां एकाएकीं दुःख झाल्या सारिखे शब्द बोललां. तर असें काय दुःख आहे तें मजला सांगावें.

**भद्रकेतु**— मित्रा, मी राजा असून मला जें दुःख झालें आहे, तें तुझ्यानें दूर होणार नाहीं. ज्याचे हातून दुःख दूर होईल, त्यालाच सांगितलें तर उपयोग.

**द्यूत०** - आपण ह्मणतां हें खरें आहे, परंतु सर्वांची बुद्धि सारखी नसते. आणि दुःखी मनुष्यास सुचत नाहींसें झाल्यामुळें त्याचे हातून तें कार्य होत नाहीं. याकरितां मला कळविलें असतां? मी उपाय करीन.

**भद्र०** - तूं असें ह्मणतोस तर सांगतों अरे, मी पद्मपुर नगरांत असतां, स्वारीचेवेळीं मोठ्या बाजारांतील एका बंगल्याचे तिसऱ्यामजल्यावर एक स्त्री माझे दृष्टीस पडली. तिच्या रूपाचें वर्णन माझ्यानें करवत नाहीं. फार काय सांगूं. स्वर्गांच्या इंद्राणीच्या रूपाचें वर्णन जें आह्मी ऐकिलें आहे, त्याहून ही तिचें रूप अधिक आहे. तिला पाहतांच मला कांहीं सुचेनासें झालें. ती मला केव्हां प्राप्त होईल असें झालें आहे. ती आपल्या राज्यांत असती तर मी आपले मनोरथ कधींच पूर्ण केले असते. परंतु तसें नसल्यामुळें मला कांहींच उपाय सुचत नाहीं. फार काय सांगूं. जर मला ती प्राप्त न होईल तर लवकरच मी

मरेन असें मला वाटतें.

**द्यूत०** – आतां ठीक झालें. मला सांगितल्यामुळें कांहीं तरी युक्ति करून तिची प्राप्ति आपणास करून देतां येईल. आपण कांहीं चिंता करूं नये. थोडे दिवस धीर धरावा ह्मणजे झालें.

**भद्र०** – अरे, असे धीर देणारे पुष्कळ आहेत. मीं अनेक युक्ति मनांत आणिल्या, परंतु एकही माझ्या उपयोगीं नाहीं. आतां तूं कोणत्या युक्तीनें तिची प्राप्ति करून देशील तें मला सांग. मग मी खरें ह्मणेन.

**द्यूत०** – राजा, मला एक युक्ति सुचली आहे ती अशी कीं, आपण दोघेही व्यापाऱ्यांचे वेशानें कांहीं जिनसा घेऊन त्या नगरांत जाऊं आणि जेथें ती स्त्री आहे तेथें जाऊन तिच्या नवऱ्याचा धंदा, नांव वगैरे सर्व माहिती काढून मग जसा वेळ दिसेल त्याप्रमाणें तजवीज करूं, तुह्मी कांहीं चिंता करूं नये.

**भद्र०** – मित्रा, युक्ति का दलीस ही मला देखील बरी दिसते. याकरितां आपण आतां लवकरच तिकडे जाण्याची तयारी करूं ह्मणजे झालें.

असें त्यांचें भाषण होऊन दोघेही बागेंतून परत आले. पुढें चार दिवस गेल्यावर भद्रकेतूनें सर्व राज्य कारभार प्रधानाचे स्वाधीन केला. नंतर कांहीं जवाहीर आणि कांहीं दुर्मिळ व मौल्यवान् वस्तु बरोबर घेऊन आपला मित्र द्यूतमणि आणि एक हुशार चाकर त्यांसह व्यापाऱ्याचे वेशानें निघाला. तो थोडक्याच दिवसांत पद्मपुरनगरांत येऊन पोहोंचला. नगरांत जातांच पहिल्यानें त्या रूपवान् स्त्रीचे बंगल्या समोर येऊन भद्रकेतूनें आपल्या मित्रास तो बंगला दाखविला आणि तेथून निघून जवळच एक देवालय होतें, त्यांत जाऊन ते उतरले, तों सूर्यास्त झाला. रात्रीं तेथेंच वस्तीस राहिले. दुसरे दिवशीं गांवांत कोठें रहावें या विचारांत होते, इतक्यांत एक ब्राह्मण तेथें देवपूजे करितां आला होता. त्यास एक रुपया दक्षिणा देऊन ह्मणाले कीं, महाराज, आह्मी फिरस्त व्यापारी आहों आह्मांस थोडे दिवस राहण्या करितां जागा पाहिजे, ती आपण

चांगलीशी मिळवून द्याल तर आह्मी आपले उपकार विसरणार नाहीं. त्या ब्राह्मणास दक्षिणा मिळाल्यामुळें हे कोणी चांगले मनुष्य आहेत असें वाटून तो ह्मणाला, महाराज, आपण सद्गृहस्थ आहां तरी आमचें लहानसें घर आहे त्याजाग्याचा अंगीकार केला असतां परमेश्वर आपलें कल्याण करील. हें ऐकून त्याचे घरीं जाण्याचा विचार करून ते त्या ब्राह्मणाबरोबर गेले. त्यानें आपले शक्तीप्रमाणें त्यांची सर्व व्यवस्था ठेविली. ह्मणून भद्रकेतूस फार आनंद झाला आणि त्यानें भटजीस एक मोहोर देऊन संतोषित केलें. त्यामुळें तो ब्राह्मण क्षणभर देखील त्यांस विसंबेनासा झाला. भोजनादिक झाल्यावर ते भटजीस ह्मणाले, महाराज, आपण या गांवचे राहणारे आहां त्यापक्षीं तुह्मास सर्व माहिती असेलच. ह्मणून आतां आह्मा बरोबर बाजारांत चला, ह्मणजे ठीक पडेल. हें ऐकतांच तो तयार झाला. नंतर भद्रकेतु मित्रास बरोबर घेऊन बाजारांत फिरत असतां, जागोजाग उभा राहून मोठमोठ्या घरांची माहिती विचारील विचारीत त्या स्त्रीचे बंगल्याजवळ आला. आणि त्या बंगल्याचे मालकाची सर्व हकीकत विचारिल्यावरून भटजींनीं सांगितली. ती अशी कीं, हा बंगला सुधर्मशेट नामक एकाव्यापाऱ्याचा आहे त्याचा व्यापार बाहेर मुलखांतही असून मुख्य पेढी येथें आहे. तो बहुत करून जवाहीर आणि सोन्याचे दागिने यांचा व्यापार करीत असतो. त्याचें वयास सुमारें साठ वर्षें झालीं आहेत. त्यास एक जयसिंग नामें पुत्र पंचवीस वर्षांचे वयाचा आहे, तोच हाल्लीं सर्व व्यापार पाहत असतो. त्यासहि एक पुत्र झाला आहे, तो महामहिन्यांचा आहे. त्याचे घरांतील सर्व मनुष्यांची रीती शेटजीच्याच रीती प्रमाणें आहे. त्याचे आज्ञे बाहेर कोणी वागत नाहींत. जयसिंगाची स्त्री रूपवती अति सुंदर असून महा पतिव्रता आहे. हे शेटजी आमचे यजमान आहेत, त्यामुळें त्यांची सर्व स्थिती आह्मांस पूर्णपणें माहीत आहे. सारांश, असा धनवान् आणि उदार व्यापारी या शहरांत कोणीच नाहीं. असें त्या भटजी-

चें भाषण ऐकून भद्रकेतु ह्मणाला, महाराज, आपण त्याचें इतकें वर्णन केलें त्यावरून तो चांगला असेल हें खरें आहे. पण आमची आणि त्याची गांठ कशी पडेल बरें? भटजी ह्मणाले, त्याची गांठ पडणें अवघड नाहीं. आतां पाहिजे तरी भेट करून देतों. भद्रकेतु ह्मणाला, आजतर नकोच, परंतु उद्यां प्रातःकाळींच आपण त्याचे भेटीस जाऊं. असें त्यांचें भाषण झाल्यावर आणखी कांहीं वेळ बाजारांत फिरून ते तिघेही परत आले.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं उठून भटजींची स्नान संध्यादिक आटोपल्यावर मित्रासह भटजीं बरोबर भद्रकेतु त्या सावकाराचे घरीं गेला. भटजींनीं त्यांस बांहेरील बैठकीवर बसवून आपण आंत जाऊन कळवितांच शेटजींचा पुत्र जयसिंग बाहेर आला, आणि त्यांस पाहून रामराम करून जवळ बसून बोलूं लागला.

**जयसिंग** — आपण कोण आणि कोठील राहणारे आहां?

**भद्रकेतु** — आह्मी मत्स्यपुरचे व्यापारी आहों. माझें नांव कृष्णदास आहे. या शहरांत कांहीं व्यापार करावा ह्मणून येथें आलों आहों आणि आपला नांवलौकिक ऐकिल्यावरून आपणास भेटावें असें आह्मांस वाटलें.

**जय०** — छे छे, आमचा लौकिक तो काय. आह्मांहून मोठमोठे लौकिकवान् लोक या शहरांत पुष्कळ आहेत. परंतु आपल्यासारख्या दूर देशच्या मूर्ती आमचे दृष्टीस पडणें हें आमचें भाग्यच होय आपण या शहरांत कधीं आलां आणि कोठें उतरलां आहां?

**भद्र०** — कालच आह्मीं आलों. आणि या भटजींचे घराचे पिछाडीस राहिलों आहों.

**जय०** — आपणांस प्रथमच शुचिर्भूत स्थान राहण्यास मिळालें, यांवरून हा उत्तम शकुन आहे असें समजलें पाहिजे. पण आतां आपण आमचे घरीं यावें अशी आमची इच्छा आहे.

भद्र० — आपण आमचा आदरसत्कार चांगला केल्यावरून आह्मांस मोठा आनंद झाला. सध्या महाराजांचे घरीं आहों ते आपल्याच घरीं आहों. को- ठें तरी राहिलों ह्मणजे झालें.

जय० — असें खरें, पण आपण येथें राहिल्यानें आह्मांस आनंद वाटेल यासाठीं आपण आमचा शब्द मोडूं नये.

भद्र० — आपली अशी मर्जी आहे तर आह्मांस तें ऐकिलेंच पाहिजे. बरें उद्यांपासून इकडेच येऊं.

जय० — आपण कांहीं खरेदी करितां आलां आहां किंवा विक्रीकरितां आलां आहां बरें ?

भद्र० — कांहीं माल विकण्यास आणिला आहे आणि कांहीं खरेदीही करावा असें मनांत आहे.

जय० — बरें, उद्यां आपला काय माल आहे तो पाहूं. आतां माझी दुकानांत जाण्याची वेळ झाली आहे.

भद्र० — बरें, आह्मीही आतां जातों.

असें त्यांचें भाषण होऊन भद्रकेतु आपल्या मित्रासह बिऱ्हाडीं आला दोन प्रहरीं भोजनादिक झाल्यावर कांहीं वेळ निद्रा घेऊन सायंकाळीं बाजारांत फिरण्याकरितां गेला आणि अस्तमानीं घरीं आला.

दुसरे दिवशीं प्रातःकाळींच जयसिंगशेट भद्रकेतूस आपल्या घरीं ने- ण्याकरितां आले तेव्हां त्यांचे बरोबर तो मित्रासह निघून गेला. जयसिंगशे- टींनीं आपल्या बंगल्यांतील दिवाणखान्याचे बाजूस एक मोठी खोली होती ती त्यांचे स्वाधीन करून त्यांस सांगितलें कीं, आपलें सर्व सामान यां खोलींत ठे- वावें. बाकी सर्व बंगला मोकळाच आहे. आपल्या स्वतांच्या घराप्रमाणें येथें वागण्यास कांहीं अडचण नाहीं. असें त्याचें भाषण ऐकून भद्रकेतूस फार आनंद झाला आणि तो मित्रासह तेथें सुखरूप राहिला. जयसिंगशेटीनें त्यां

चे भोजनाचा वगैरे बेत आपले घरांतच उत्तम प्रकारें ठेविला. त्यामुळें मनांत असलेला मतलब लवकरच सिद्ध होईल असें भद्रकेतूस वाटलें.

त्याठिकाणीं ते राहत असतां रूपवती केव्हां केव्हां भद्रकेतूचे दृष्टीस पडे. तिला पाहिल्याबरोबर तो अगदीं विगलित होत असे. परंतु त्यानें मन आवरून आपला मतलब कोणास कळूं दिला नाहीं. आपणा जवळच्या अनेक जिनसा त्यानें जयसिंग शेट यास विकत दिल्या आणि त्याजपासून आपणही कांहीं वस्तु खरेदी केल्या. शिवाय बाजारांत फिरून आणखी कांहीं नवीन वस्तु घ्या व्या द्याव्या, असा कांहीं दिवस त्यानें धंदा चालविला. भद्रकेतूस आपल्या जिनसाची किंमत कमी आली तरी त्याचें दुःख नव्हतें. कोणत्याही योगानें आपलें जयसिंगाशीं मित्रत्व व्हावें ह्याच त्याचा हेतु होता. ह्मणून त्यानें आपल्या जिनसा त्यास अगदीं हलक्या किमतीनें दिल्या.

एके दिवशीं भद्रकेतु आणि त्याचा मित्र हे दोघे बाजारांत फिरावयाचे निमित्तानें जाऊन एकांतीं मसलत करावयास बसले. भद्रकेतु ह्मणाला, मित्रा, आपल्या मनाप्रमाणें आपला प्रवेश तर तेथें झाला आहे. आणि स्नेहही बराच पडला आहे. परंतु आतां आपला बेत कसा सिद्धीस जाईल? मित्र ह्मणाला, आणखी कांहीं दिवस येथेंच राहूं व आमचे शहरांत अनेक वस्तु फारच कमी किमतीनें मिळतात असें जयसिंगशेट याचे मनांत भरून देऊं. व्यापाराचे निमित्तानें त्यास आपल्या नगरांत नेण्याची तजवीज केली असतां तो येण्यास निघेल. त्याची आणि स्त्रीची अत्यंत प्रीति असल्यामुळें तीही त्याचे बरोबर निघेल. आपले नगरांत ती आल्यावर मग पाहिजे तसा विचार करितां येईल. अशी मित्रानें युक्ति काढली, ती भद्रकेतूस पसंत पडली. ह्मणून त्यानें तसें करण्याचा बेत घातला. एके दिवशीं जयसिंग आणि हे दोघे असें एक ठिकाणीं बसले असतां भद्रकेतु ह्मणाला, शेटजी, आह्मांस येऊन बरेच दिवस झाले. आह्मा जवळचा मालही सर्व खपला. आतां उगाच येथें राहून

उपयोग नाहीं. याकरितां एक दोन दिवशीं आह्मीं गांवीं जाण्यास निघतों. तुमचा आमचा ऋणानुबंध होता तो घडला. आतां पुन्हा कधीं आलों तर ओळख ठेवावी.

**जय०** – इतक्यांतच तुह्मीं जातां हें बरें नाहीं. आणखीं कांहीं दिवस तुमची आमची संगत असती तर बरें झालें असतें. असो, तुह्मी आह्मींव्यापारी आहों, ह्मणून एखादे वेळीं आह्मी तिकडे आलों तर आपण ओळख विसरूं नये. एवढें आमचें मागणें आहे.

**भद्र०** – वाहवा ! हें काय बोलतां. आपण आमचें आगत स्वागत करून आपले घरीं जागा देऊन सर्वस्वी सांभाळ केला. हें आह्मी विसरूं काय? परंतु आमचे मनांत एक गोष्ट आली आहे. ऐकाल तर सांगतों.

**जय०** – आपण सांगाल तें नीटच सांगाल. मी ऐकण्यास तयार आहें.

**भद्र०** – मला असें वाटतें कीं, आपण या देशांत व्यापार करितां याहून जर आमचे देशांत येऊन तिकडचा माल खरेदी करून इकडे आणून विकाल तर तुह्मांस फार नफा होईल. त्याचा अनुभव आह्मीं ह्लीं येथें येऊन घेतला आहे. खरोखर ह्मणाल तर एकंदर व्यापारांत आह्मांस एक लक्ष रुपये नफा मिळाला.

**जय०** – माझेही मनांत तसेंच आलें आहे. परंतु वडिलांची आज्ञा झाली तर हें घडेल. बरें, मी आज गोष्ट काढून पाहतों.

**भद्र०** – जिकडे आपणांस नफा होईल तिकडे जावें हें व्यापाऱ्यांचें कामच आहे. ह्मणूनच आह्मींही तुमच्या मुलखांत आलों. नाहीं तर आह्मांस तरी एवढा फायदा कसा झाला असता ?

असें भाषण होऊन ते उठले. नंतर रात्रीं जयसिंगानें आपले बापाजवळ ती गोष्ट काढिली. तेव्हां त्यानें ही रुकार दिला. मग जयसिंगानें आपले स्त्रीचे मंदिरांत जाऊन तिला ही हें वर्तमान कळविलें. तेव्हां ती ह्मणाली, आपण

दूरदेशीं जातां, आणि मी येथें एकटें रहावें हें ठीक नाहीं. यासाठीं मीही आपल्या बरोबर येईन. येथें राहून मला तरी कसें चैन पडेल? याविषयीं आपणच विचार करा. असें तिचें भाषण ऐकून जयसिंग ह्मणाला, आह्मी व्यापारी गृहस्थ, एकाच गांवांत आमचें नेहमीं राहणें होणार नाहीं. जिकडे तिकडे फिरावें लागेल. ह्मणून तुला नेऊन उपयोगी नाहीं. रूपवती ह्मणाली. बरें तर आपली मर्जी. परंतु आपण गेल्यावर मला एकेक दिवस युगासारखा होईल.

रूपवतीचें भाषण ऐकून जयसिंगास जरासें कठीण वाटलें. दुसरे दिवशीं त्यानें रात्रींची सर्व हकीकत भद्रकेतूस सांगितली. भद्रकेतु ह्मणाला, अहो, स्त्रियांचा जीव ह्मणजे का...तो प्रति. त्यावांचून एक क्षण ही त्यांस चैन पडत नसतें. ह्मणून आपले ...वाचें बोलणें झालें तें ठीकच. पण तसेंच कां होईना. आमचे मुलुखांत कोणत्याही गोष्टीची कमताई नाहीं. आणि आह्मीं आपणाकडून होईल तितकी तुमची सर्व व्यवस्था ठेवूं. आमचे घरांत ही स्त्रिया आहेत, त्या तुमचे कुटुंबाचा आणि तान्ह्या मुलाचा सांभाळ उत्तम प्रकारें करितील. जयसिंग शेट ह्मणाला, आपण ह्मणतां हें खरें आहे. परंतु कुटुंबास बरोबर घेऊन दूरदेशीं प्रथमच जाणें हें जनरीतीस नीट नाहीं. याकरितां आपण तिकडे गेल्यावर पत्र पाठवून नेतां येईल. ह्मणून असेंच करूं ह्मणजे झालें.

असें जयसिंगाचें भाषण ऐकून भद्रकेतूस फार वाईट वाटलें. परंतु या गोष्टी विषयीं आपण आग्रह करून उपयोगी नाहीं. पुढें तिला तिकडे आणण्याविषयींचा विचार करितां येईल. असें मनांत आणून तो उगीच राहिला. नंतर रात्रीं जयसिंगानें आपल्या स्त्रीची समजूत, लवकरच तुला तिकडे नेईन, असें सांगून केली. पतीचें वचन मोडवत नाहीं ह्मणून तिनें घरीं राहणें कबूल केलें. प्रातःकाळीं जोशीबुवा यांस शेटजींनीं मुहूर्त पाहण्यास सांगितलें तेव्हां त्यांनीं चारदिवसांचे अवकाशाचा मुहूर्त सांगितल्यामुळें

तितके दिवस गेल्यावर पांचवे दिवशीं मुहूर्ताचे वेळीं सर्वांचा निरोप घेऊन जयसिंग त्या दोघां बरोबर आनंदानें व्यापारा करितां जावयास निघाला. बरोबर उंच्या उंच्या जिनसा विकरी करितां घेतल्या. आणि एक विश्वासु चाकर बरोबर घेऊन निघाले. ते मार्गानें अनेक चमत्कार पाहत पाहत पंधरावे दिवशीं मत्स्यपुरास येऊन पोहोंचले. भद्रकेतूनें जयसिंगाची बरदास्त चांगली ठेविली आणि आपण राज्यकारभार करूंलागला. जयसिंगास हें सर्व कृत्य चमत्कारिकसें वाटून तो विचारांत पडला. इतक्यांत सायंकाळीं राजा मोतीबागेंत फिरावयास जाऊं लागला. …ं त्यानें जयसिंगास आपले बरोबर नेलें. तेथें कांहीं वेळ फिरून ब… बंगल्यांत ते जाऊन बसले. तेव्हां जयसिंग ह्मणाला, महाराज, आप… व्यापारी ह्मणून आमचे देशीं आलां होतां आणि मला व्यापारा करितां इकडे आणिलें. असें असून जेथें पाहतों तों आपण गादीचे धनी आहां. तर याचें कारण काय तें सर्व सांगावें. राजा ह्मणाला, शेटजी, तुह्मीं समजलां नाहीं. मी देशपर्यटन करीत असतां, व्यापारी लोकांचें चातुर्य पहावें असें माझे मनांत आलें. ह्मणून मीं व्यापाऱ्याचा वेश धरून अनेक लोकांशीं व्यापारही केला. परंतु एकंदरींत तुह्मी माझे खात्रीस उतरलेत. ह्मणून तुमचें हित करावें या हेतूनें मी आपल्या नगरांत तुह्मांस आणिलें आहे. आतां थोडक्याच दिवसांत तुह्मांस कांहीं व्यापार सांगावा असें माझें मनांत आहे. कां तुह्मांस कसें वाटतें? जयसिंग ह्मणाला, फार चांगलें आहे. आपली कृपा आह्मांवर असली तर आह्मांस काय तोटा आहे? आपण सांगाल तो व्यापार करण्यास आह्मी तयार आहों. असें त्यांचें भाषण होऊन कांहींसे बसून तें वाड्यांत आले. नंतर कांहीं दिवस गेल्यावर राजानें आपल्या राज्यांतील कित्येक गांवचे वसूलाचे मक्ते थोडक्या ठरावानें जयसिंगास दिले त्यांत त्यास पद्मपुरांतील व्यापाराहून ज्यास्त नफा राहूं लागला. राजानें कांहीं मौल्यवान् जिनसा त्याजकडून खरेदी करवून आणवाव्या आणि आपण

त्यापासून त्या विकत घ्याव्या व कांहीं आपण त्यास स्वस्त किंमतीनें घेऊन द्याव्या, याप्रमाणें बरेच दिवस जयसिंगाचा व्यापार चांगला चालल्यामुळें त्याचें मन तेथें रमलें. इतक्या दिवसांत त्यानें आपल्या घरीं दोन पत्रें पाठवून आपला व्यापार येथें चांगला चालल्या विषयींचें कळविलें. त्यामुळें त्याचे पित्यास आणि रूपवतीस फार आनंद झाला. एकेदिवशीं राजा ह्मणाला, शेटजी तुह्मांस मी इकडे आणिल्यामुळें तुमचा तोटा तर झाला नाहींना? जयसिंग ह्मणाला, आपली कृपा असल्यावर काय कमी होणार आहे? सर्व आनंदच आहे. राजा ह्मणाला, आतां माझें एक सांगणें आहे तें असें कीं, तुह्मांस येथें येऊन बरेच दिवस झाले. याकरितां एक वेळ घरीं जाऊन आपल्या मनुष्यांस भेटून यावें अथवा त्यांस आपणाजवळ आणावें हें मला बरें दिसतें. जयसिंगास तें बरें वाटलें आणि ह्मणाला, होय, माझेही मनांत तसेंच आहे, परंतु आपण तिकडे गेलों तर चालत्या धंद्यांत नुकसान होईल. यासाठीं मनुष्येंच इकडे आणावीं हें बरें. आपणांस कसें वाटतें? राजा ह्मणाला, असें केलें तरी चिंता नाहीं. असें त्यांचें भाषण झाल्यावर जयसिंग शेटजींनीं आपल्या मनुष्यांस आणण्या करितां, आपल्या पदरच्या विश्वासु चाकरा बरोबर बापाचे नांवें पत्र देऊन त्यास रवाना केलें.

इकडे पतीस परमुलखीं जाऊन फार दिवस झाले, आपली भेट कधीं होईल अशा चिंतेंत रूपवती आहे तों तिकडून आलेला चाकर येऊन पोहोंचला. त्यास पाहतांच रूपवतीस आनंद झाला आणि तो काय बोलतो हें ऐकण्या करितां पडद्याचे आड उभी राहिली. इतक्यांत त्यानें शेटजींचे हातांत पत्र देऊन सुखरूपपणाचें वर्तमान सांगितलें. शेटजींनीं पत्र मोठ्यानें वाचलें त्यामुळें त्यांतील मजकूर ऐकून रूपवतीस फार आनंद झाला. शेटजींनीं जयसिंग तिकडे गेल्यापासून काय काय व्यवस्था झाली तें चाकरास विचारिल्यावरून त्यानें सर्व हकीकत सांगितली. आपला व्यापार चांगला चालला ह्मणून शेटजीस आनंद झाला. नंतर दुसरे दिवशीं त्यांनीं रूपवतीस मत्स्यपुरीं पाठविण्याची तयारी केली. तिला बसण्या करितां

चार भोयांची पालखी आणि एक विश्वासु ब्राह्मण यांसह सुमुहूर्तावर तिची रवानगी केली. ती लवकरच मत्स्यपुरास येऊन पोहोंचली. जयसिंगाची आणि तिची बहुत दिवसांनीं भेट झाली ह्मणून उभयतांसही अति आनंद झाला. रूपवती आल्याचें वर्तमान राजास कळतांच त्यानें तिच्या सेवे करितां चार दासी ठेविल्या आणि कोणत्याही गोष्टी विषयीं तिला कमी पडूं नये, ह्मणून सर्वप्रकारें बंदोबस्त ठेविला. तेणें करून जयसिंगास फार आनंद झाला.

जयसिंगाचा राहण्याचा वाडा राजवाड्या जवळच होता, ह्मणून रूपवती आणि राणी यांची बरीच प्रीति जडली. असें कांहीं दिवस गेल्यावर भद्रकेतूनें आपला मनोरथ सिद्धीस नेण्याचा विचार करून जयसिंगास आणखी एका गांवचा मक्ता देऊन वसूल करण्यास पाठविलें. जयसिंग नफ्याचे आशेनें रूपवतीचा विचार घेऊन आपल्या विश्वासु चाकरा सह त्या गांवीं गेला. राजानें त्या गांवाचे अधिकाऱ्यास आज्ञापत्र लिहिलें कीं, जयसिंग तिकडे आला ह्मणजे बरोबरच्या मनुष्या सुद्धां त्यास कैद करून ठेवावें. त्या प्रमाणें तो तेथें जातांच तेथील अधिकाऱ्यानें त्यांस एकाएकीं धरून बंदींत ठेविलें.

जयसिंगास बरेच दिवस जाऊन झाले, अद्यापि तो परत येत नाहीं, ह्मणून रूपवतीस फार चिंता लागली. तिला अन्न पाणी गोड लागेनासें झालें. एकेदिवशीं करमणुके करितां राणी तिजकडे येऊन बसली. तेव्हां रूपवतीचें मुख म्लान झालेलें पाहून राणी बोलली.

**राणी** — बाई, आज तुह्मी चिंताग्रस्त कां दिसतां?

**रूपवती**—काय सांगूं, आज सुमारें एक महिना होत आला, बाहेर गांवीं गेले आहेत ते अद्यापि येत नाहींत.

**राणी**— कामाकरितां गेलेले मनुष्य नेमिल्यावेळीं परत येत नसतात. काम झालें ह्मणजे येतील. ह्मणून एवढी चिंता कशाला पाहिजे?

रूप० - केवढें काम असलें तरी ते फार दिवस तिकडे राहणार नाहींत असें असून अद्यापि येत नाहींत. आणि खुशालीचें पत्र देखील पाठविलें नाहीं ह्मणून मला फार चिंता वाटते.

राणी - तुह्मी कांहीं चिंता करूं नका. मी उद्यां तिकडचा समाचार आणवून तुह्मांस कळवीन. तुह्मी स्वस्थ रहा.

अशीं त्यांचीं भाषणें होऊन आणखी कांहीं वेळ करमणुकेच्या गोष्टी झाल्यावर राणी आपल्या महालांत निघून गेली. राजा रात्रीं महालांत आल्यावर राणीस रूपवतीचें स्मरण झालें. ह्मणून ती राजास ह्मणाली, महाराज, आपण जयसिंगशेटीस कोठें पाठविलें आहे.? ते अद्यापि येत नाहींत ह्मणून ती बिचारी चिंता करीत बसली आहे. राजा ह्मणाला. तुला या गोष्टीची काय गरज आहे.? तो कोठें कां असेना? राणी ह्मणाली, मला गरज नाहीं खरी, पण ती बिचारी दुःखी आहे ह्मणून मीं आपणांस विचारिलें. यांत माझा अपराध तर नाहींना? राजा ह्मणाला, जयसिंगाची गोष्ट तूं विचारितेस ह्मणून सांगतों, ऐक. येथून त्या गांवीं गेल्यावर आठवे दिवशीं त्यास सर्प दंश होऊन तो मरण पावला. ही बातमी मला तेव्हांच कळली. परंतु सांगण्यास फार कठीण वाटतें, ह्मणून उगीच राहिलों होतों. राणी ह्मणाली, फार वाईट गोष्ट झाली. बिचारा नफ्याचे आशेनें इकडे आला ह्मणून त्यास देश पारखा झाला. तो एकटाच कोणीकडे जाऊन पडला. त्याची काय अवस्था झाली असेल ! हर हर! परमेश्वरा ! असा प्रसंग वैऱ्यावर ही आणूं नको. आतां ती रूपवती बिचारी काय करील कोण जाणे. राणीस त्या विषयीं अतिदुःख वाटलें ह्मणून राजा ह्मणाला. जें जें प्रारब्धी असतें तें तें घडतें येथें कोणाचा उपाय नाहीं. असें राजाचें भाषण ऐकून राणी उगीच राहिली.

दुसरे दिवशीं रूपवती राणीचे महालांत येऊन शोध केल्याविषयींचें विचारूं लागली. तेव्हां राणीच्यानें उत्तर देववेना, परंतु ती विचार करून

ह्मणाली, बाई, अद्यापि शोध लागला नाहीं. लागला ह्मणजे मी तिकडे येऊन तुला कळवीन. तूं कांहीं चिंता करूं नको. हें राणीचें भाषण ऐकून ती घरीं गेली. दुःखाची गोष्ट सांगण्यास कठीण ह्मणून तो दिवस राणीनें घालविला. दुसरे दिवशीं राणी रूपवतीचे घरीं गेली, तेव्हां तिचें मुख म्लान झालेलें पाहून रूपवती ह्मणाली, बाई, आपण आज चिंताग्रस्त कां दिसतां? राणी कांहींच बोलली नाहीं. त्यामुळें रूपवतीस जरासा संशय आला आणि ह्मणाली, आजतरी कांहीं शोध लागला का? इतक्यांत राणीचे नेत्रांतून पाणी येऊं लागलें आणि दुःखानें उच्छ्वास टाकून ह्मणाली, हर हर, परमेश्वरा, कायप्रसंग हा! एकून स्त्रियांचा जन्म व्यर्थ आहे. आतां हिनें काय करावें? देवा, असा प्रसंग कोणावरही न यावा. रूपवती ह्मणाली, बाई, झालें तरी काय? राणी ह्मणाली, काय सांगूं बाई, सांगण्यास माझें तोंड उघडत नाहीं. तुझे यजमानास तिकडे सर्प दंश होऊन ते कैलासवासी झाले. आज पंधरा दिवस झाले. काय करावें? परमेश्वरानें तुजवर दुर्घट प्रसंग आणिला.

इतकें ऐकतांच रूपवती एकाएकीं भूमीवर पडली. ती कांहीं केल्यानेंसावध होईना. नंतर दासींनीं तिला सांवरून बसविलें, तथापि तिच्यानें बसवेना. ऐकिल्याबरोबर तिला देहभान नाहींसें झालें. नंतर कांहीं वेळानें सावध होऊन दुःखोच्छ्वास टाकून मोठ्यानें हंबरडा फोडून ह्मणाली, परमेश्वरा, या वेळीं माझे पंचप्राण त्यांचे जवळ ने. मला एकीकडे ठेवूं नको. मी त्यांचा काय अपराध केला होता ह्मणून मला येथें ठेवून आपण तुजकडे गेले! जळो जळो हा माझा देह. मी जन्मास येऊन वैरीण झालें. असा नाना प्रकारें शोक करून कपाळ बडवून हात आपटून आपल्या पतीचे गुण आठवून तिनें आक्रोश केला. नंतर अगदीं व्याकुळ पडली ह्मणून राणी म्हणाली, बाई, जें तुझ्या प्राख्धीं होतें तें घडलें. पहा त्यांजला आपला देश सोडून इकडे येण्याची बुद्धि परमेश्वरानें कशी दिली. तशांत येथूनही परगांवीं गेले असतां त्या सर्परूपी

काळानें आपलें वैर साधिलें. हरहर परमेश्वरा, असाप्रसंग कोणासही नसावा. पण काय करावें? मनुष्याचे स्वाधीन नाहीं. आपण पूर्वजन्मीं जें केलें तें आतां भोगावें लागतें. परमेश्वरास तरी काय शब्द लावावा? पण बाई, आतां शोक करून उपयोगी नाहीं. मनास वाटेल तेव्हां प्राण जावा हें स्त्रियांचे हातीं देवानें ठेविलें असतें तर फार बरें झालें असतें. पण तें असणार कोठून? मागें राहून दुःख भोगणें नशिबीं असलें तर तें काय चुकणार आहे? परंतु आल्यादिवसास पाठ दिली पाहिजे. परमेश्वरानें तुह्मांस एक पुत्र रत्न दिलें आहे. त्याकडे पाहून आतां उगीच रहा. तुमच्या सारखे प्रसंग आजपर्यंत बहुत स्त्रियांस आले आहेत. त्यांनीं तरी काय करावें? असें राणीचें भाषण ऐकून रूपवती म्हणाली, बाई, तुम्हीं सांगतां खरें. परंतु माझ्यानें कसें उगीच राहवेल? माझा सर्वस्वी घात झाला. मजवर एकाएकीं आभाळ कोसळलें. राणी ह्मणाली, सर्व गोष्टी खऱ्या, परंतु शोक करून झालेली गोष्ट येत नाहीं. आतां बाळकावर दृष्टि ठेवून रहा. असा राणीनें नानाप्रकारें बोध केला, परंतु तिच्यानें उगीच राहवेना. जवळ घराहून आणिलेल्या ब्राह्मणावांचून घरचें कोणी मनुष्य नव्हतें. अशी ती अनाथा सारखी व्याकुळ पडली. नंतर राणी कांहीं वेळानें उठून गेली.

त्यादिवशीं रूपवती अगदीं शोकसमुद्रांत बुडून गेली. तिला आपल्या देहाची देखील शुद्धि नव्हती, मग बाळकाची तर कोठून? आणि अन्न पाणी तर कांहींच तिनें खाल्लें नाहीं. दासीनें मुलास आपल्या स्तनांचा पान्हा देऊन त्याचा त्या दिवशीं सांभाळ केला. तो दिवस आणि ती काळा सारखी रात्र निघून गेली. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं तिला मुलाचें स्मरण झालें ह्मणून त्यास उचलून घेतलें तों पुन्हा गहिंवर येऊन त्याजकडे पाहून तिनें आकांत केला. इतक्यांत राणी तेथें आली, तिला पाहून रूपवती ह्मणाली, बाई, आतां पुढें काय करावयाचें हें मला कांहीं कळत नाहीं. राणी ह्मणाली,

तुह्मी त्याची काळजी करूं नका. त्याविषयीं सर्व तजवीज मी करवितें. तुमचे घरीं काल ह्या मजकुराचें पत्र गेलेंच आहे, असें मला कळलें. आतां उत्तरकार्य करणें तें तिकडे होईल. आणखी करावयाचें काय? आला प्रसंग कसाही पार पाडिला पाहिजे. तुह्मांला येथें कांहीं करावयास नको असें भटजींनीं सांगितलेलें मी ऐकिलें आहे. हें राणीचें भाषण ऐकून रूपवती उगीच राहिली. ते संकटाचे दिवस तिला युगां सारिखे वाटूं लागले.

राणी नित्य दोन वेळां येऊन तिच्या खाण्या पिण्याची चौकशी करीत असे. असे दहा दिवस लोटले. नंतर रूपवती राणीस ह्मणाली, बाई, माझे प्रारब्धीं होतें तें घडलें. परंतु आयुष्याचे दिवस आतां लोटले पाहिजेत ह्मणून मजला घरीं पोहोंचवावें. राणी ह्मणाली, बरें आहे. मी आज विचारून तजवीज करितें.

असें बोलून राणी निघून गेली. त्यारात्रीं राजा महालांत आल्यावर राणी ह्मणाली, महाराज, जयसिंगास मरून बरेच दिवस झाले आणि रूपवतीस कळल्यास आज अक्रावा दिवस आहे. तिनें हे दिवस संकटानें काढिले, तसेच तिला पुढेंही काढिले पाहिजेत. परंतु ती घरीं जाण्याची इच्छा करीत आहे, याकरितां तिला पोहोंचविण्याची तजवीज केल्यास नीट होईल. तिला येथें चैन पडणार नाहीं. असें तिचें भाषण ऐकून राजानें तिला आठचार दिवशीं पोहोंचवीन असें सांगितलें. दुसरे दिवशीं राणीनें रूपवतीस तसेंच कळविलें.

राजानें विचार केला कीं, आतां हिला घरीं पोहोंचवितों असें सांगून सर्व तयारी करून दुसरे बंगल्यांत नेऊन ठेवावी, ह्मणजे राणीसही कळणार नाहीं. मग आपले मनोरथ सिद्धीस जातील. असें ह्मणून त्यानें आपल्या मित्राचा (द्यूतमणीचा) विचार घेऊन नगराचे पश्चिमच्या दरवाज्याचे बाहेरचे बाजूस लाल बागेंत एक रमणीय बंगला होता, तेथें तिला ठेवण्याचा बेत केला.

नंतर पोहोंचविण्याचा दिवस नेमून राणी करवीं तिला कळविलें. ती आणि भटजी दोघेंही सादिवशीं तयारी करून राहिलीं. रूपवतीनें नवऱ्याचें द्रव्यही आपले बरोबर घेतलें. राजानें पालखी, चार घोडेस्वार आणि द्यूतमणि यांस बरोबर देण्याचें नेमिलें. त्याप्रमाणें नेमिल्यादिवशीं सर्व तयारीनें रूपवतीचे बंगल्यांत ते आले. इतक्यांत तिला पोहोंचविण्या करितां राणीही आली. रूपवतीह्मणाली, बाई, आतां मी येतें. इतके शब्द बोलतां बोलतां तिला गहिंवर आला. राणीनें तिचें शांतवन केलें आणि तिला पोहोंचवीत बंगल्याचे ओसरी पर्यंत आली. रूपवती आपल्या बाळकास घेऊन पालखींत बसली. तिला पाहून राणीस ही गहिंवर आला. तिनें डोळे पुशीत पुशीत तिला निरोप दिला. रूपवती पालखींत बसून जातांना दिसत नाहींशी होईपर्यंत राणी तिकडे पाहत राहिली. नंतर आपल्या महालांत गेली.

रूपवतीची पालखी लालबागे जवळ आली. इतक्यांत संकेतानें ठेविलेला एक मनुष्य तेथें धांवत येऊन ह्मणाला, पोहोंचविण्या करितां सरकारची स्वारी येत आहे, ह्मणून पालखी बागेंतील बंगल्यांत उतरण्याची आज्ञा आहे. तें भाषण ऐकून द्यूतमणीनें रूपवतीला कळवून पालखी बागेंतल्या बंगल्यांत नेऊन उतरली आणि उगाच वाट पाहत बसल्यासारखें दाखविलें. अद्यापि सरकार स्वारी कां येत नाहीं, ह्मणून शोधा करितां त्यानें स्वार परत पाठविला. त्यास राजानें असें कळविलें कीं, पद्मपुरा पर्यंत तिला पोहोंचविण्या करितां स्वतः जावें असें मनांत आलें, ह्मणून मी आतांच तयारीनें निघालों. इतक्यांत कांहीं मोठा अपशकुन झाला म्हणून मी आज जाण्याचा बेत रहित केला. आणखी आठ दहा दिवशीं निघणार आहें. याकरितां तों पर्यंत रूपवतीस लालबागेंतील बंगल्यातच ठेवावें. अशी राजाची आज्ञा ऐकून स्वार बागेंत परत आला आणि राजानें सांगितल्या प्रमाणें तिचे देखत सर्व द्यूतमणीस त्यानें सांगितलें. तें ऐकून रूपवती ह्मणाली, आतां येथें

राहून काय करावें? परत मूळच्या ठिकाणीं जावें हें बरें. द्यूतमणि म्हणाला, असें तर खरेंच. पण त्यांचा विचार काय आहे तो कोण जाणे. आम्ही हुकुमाचे चाकर आहों. ते सांगतील तें ऐकिलें पाहिजे. असें ऐकून रूपवती उगीच राहिली. इतक्यांत तिच्या सेवे करितां चिमणी आणि सखी अशा नव्या दोन दासी राजानें पाठविल्या. त्यावरून तिला बरें वाटलें आणि तेथेंच राहिली. द्यूतमणि तेथें पहारा ठेवून आपण परत आला. तो केव्हां केव्हां जाऊन तिचा समाचार मात्र घेत असे. असे चार दिवस लोटले.

रूपवती लालबागेंत असल्याचें राणीस कांहींच कळलें नाहीं. कारण जे मनुष्य पहाऱ्यावर ठेविले होते ते शिकवून ठेविलेले. तशाच नव्या दासी पाठविल्या त्याही राजानें शिकवून पाठविल्या होत्या. त्यामुळें त्याचें तें कपट दुसऱ्या कोणासही कळलें नव्हतें आणि रूपवतीसही कळलें नाहीं. असे दहा दिवस गेले. ते दिवस रूपवतीनें कसेही घालविले. नंतर जाण्याची गोष्ट अजून कांहींच निघत नाहीं, म्हणून चिमणीस म्हणाली, अगे, राजानें दहा दिवशीं निघण्याचें कळविलें होतें त्यास आज बारा दिवस झाले. अद्यापि कांहींच कळत नाहीं. हें काय बरें असावें?

**चिमणी**– कोण जाणे बाई, आम्हांस तुमची चाकरी करावी एवढेंच कळतें, दुसरें कांहींच कळत नाहीं.

**रूपवती**– तूं राणीकडे जाऊन तिकडचा काय बेत झाला आहे त्याची माहिती काढून येशील तर बरें होईल.

**चिम०** – मी आपली चाकरी करण्याचें काम टाकून तिकडे गेलें तर मला रागें भरतील. परंतु तुम्हांकरितां पाहिजे तर जातें.

**रूप०** – माझे चाकरी करितां तुला ठेविलें आहे तर मी सांगितलेलें काम तुला केलेंच पाहिजे. यासाठीं ते रागें भरणार नाहींत.

चिमणी तिच्या सांगण्यावरून जाऊन राजास एकीकडे भेटली. राजा

ह्मणाला, मी तिला गांवीं पोहोंचविण्याचे निमित्तानें येथून काढून लाल बागेंत ठेविली आहे त्याचें कारण निराळेंच आहे. परंतु त्यास तुमची मदत असली पाहिजे. काय ह्मणशील तर ऐक. तिचा नवरा तर मरून गेला. आतां ती गांवीं जाऊन एकटी राहणार त्यापेक्षां येथें सुखांत राहिली तर काय वाईट आहे? मी तिचें सर्वस्वी चालवीन. परंतु एकदां ही गोष्ट तिच्या मनास येई पर्यंत कायतें कठीण आहे. याकरितां तुह्मी त्याविषयीं युक्तीनें तिला बोध करीत जा. जर ती मला वश झाली तर मी तुमचें दारिद्र्य घालवीन; आणि जें मागाल तें देईन. परंतु ही गोष्ट कोणास ही कळवूं नये. कळली तर मात्र तुह्मांस शिक्षा होईल, हें ध्यानांत ठेवा. दासी ह्मणाली, महाराज, आह्मी हुकुमाच्या चाकर. आपण आधार दिल्यावर आह्मांस काय कमी आहे? आपण स्वस्थ असावें. आह्मी हळूहळू युक्तीनें गोष्ट काढून तिचें मन आपणाकडे वळवूं.

असें बोलून चिमणी लाल बागेंत परत आली. तिला पाहून रूपवतीनें कसें काय झालें ह्मणून विचारितांच ती ह्मणाली, सरकारची स्वारी आणखी आठ दिवस निघत नाहीं. असें बाईसाहेबांचे बोलण्यांत आलें या करितां आणखी तितके दिवस तुह्मांस येथेंच राहिलें पाहिजे.

**रूपवती**– माझी रवानगी केली त्यावेळीं राजाचे मनांत यावयाचें नसून त्यानें मागाहून निरोप पाठविला आणि इतके दिवस घालविले. तसेंच आणखी आठ दिवस घालविणार. मग तरी निघतातसे कशावरून? मला मात्र धड इकडे ना तिकडे असें ठेविलें आहे. याचें कारण काय असेल कोण जाणे.

**चिमणी**– कारण काय असणार? राजे लोकांचें परगांवीं जाणें ह्मटलें ह्मणजे स्वाधीन नसतें. तशांत मर्जीवर ही आहे. सत्ते पुढें शहाणपण नाहीं.

**रूप०** – असो, त्यांस काय बोल लावावा. माझें प्रारब्धच फिरलें आहे.

**चिमणी** – असें तर खरेंच. पण आतां घरीं लवकर जाऊन तरी काय करावयाचें आहे? कोठें तरी दिवस लोटावयाचेना? मग येथेंच राहिलींत तर काय होतें? येथें तुमचें कांहीं वाईट होणार नाहीं.

**रूपवती** – आतां मला चांगलें काय आणि वाईट काय. मी जीवंत असून आतां मेल्यासारखी आहें. पण ह्या माझ्या बाळकाचे हाल होतील यासाठीं मात्र मला कायती काळजी आहे.

**चिम०** – आमचे मतें येथें बाळाचे हाल तर होत नाहींत. तुमच्या घरच्यांपेक्षां आमचे सरकार कांहीं तरी तुमची बरदास्त चांगलीच ठेवितील यांत संशय नाहीं. तुह्मांसही आजपर्यंत अनुभव आलाच असेल.

**रूप०** – आजपर्यंत माझें त्यांनीं कांहीं वाईट केलें नाहीं, परंतु दुसऱ्याचे घरीं ओशाळें राहण्यापेक्षां लवकर आपले घरीं गेलें तर फार चांगलें. दुसऱ्याचे पक्वान्नाहून आपले घरची डाकरोटी चांगली. कां खरें कीं नाहीं?

**चिम०** – असें तर खरेंच. पण जेथें परकीपणा नसतो तेथें आपल्या घरासारखेंच समजावें.

**रूप०** – असल्या गोष्टींत कांहीं हांशील नाहीं. आपण आपल्या घरीं गेलें ह्मणजे झालें.

**चिम०** – तुह्मी असें ह्मणतां पण सरकारच्या मनांत तुह्मांस घरीं पोहोंचविण्याचें येईल तेव्हांना?

**रूप०** – वाहवा, तूं वेडीच दिसतेस. सरकारांनींच मला पोहोंचविण्याची तयारी करून माझी रवानगी केली. परंतु पोहोंचविण्यास स्वतः यावें असें त्यांचे मनांत आलें ह्मणून इतके दिवस गेले.

**चिम०** – त्यांचें मन आतां फिरलें नसेल ह्मणून कशावरून? माझे ऐकण्यांत असें आलें कीं, सरकारांनीं तुमची रवानगी केल्यानंतर त्यांस

असें वाटलें कीं, तुह्मांस घरीं पोहोंचवूं नये. कारण तुमचे यजमान नाहींत यामुळें तुम्हांस घरीं चैन पडणार नाहीं. आणि सासु, सासरा, नणंदा इत्यादिकांचें बोलून घ्यावें लागेल. तुह्मी तेथें गरिबा सारखीं केवळ अन्नासाठीं रहाल तें ठीक नाहीं. त्यापेक्षां आपणाजवळ परकीपणा न ठेवितां तुह्मीं रहावें. असें आमच्या दयाळु सरकारच्या मनांत आलें. ह्मणून तुह्मांस येथेंच ठेविलें असावें.

**रूप०** - छे छे, तूं भलभलत्याच कल्पना काढतेस. असें कदापि व्हावयाचें नाहीं. कदाचित् असा त्यांचा आग्रह असला तरी मी राहणार नाहीं.

**चिम०** - काय असेल तें असो. पण तुमचें येथून घरीं जाणें होणें मला कठिण दिसतें.

**रूप०** - हें ग काय? तूं तर मला भयच घालतेस.

**चिम०** - मी कशाला भय घालूं. जें असेल तें थोडक्याच दिवसांत तुह्मास समजेल. मग तर माझें बोलणें खरें ह्मणाल ना?

अशीं त्यांचीं भाषणें झालीं. नंतर दासीचे बोलण्या वरून रूपवतीचे चित्तास स्वस्थता नाहींशी झाली. तसेच आणखी दहा दिवस लोटले तरीं पोहोंचविण्याची गोष्ट देखील कांहीं कळली नाहीं, ह्मणून रूपवतीस फार चिंता पडली आणि ती दासीस ह्मणाली.

**रूप०** - अगे चिमणे, तूं आठ दिवस बोललीस त्यास आज दहा दिवस झाले. अद्यापि राजा कांहींच तजवीज करीत नाहीं.?

**चिम०** - मी तुह्मांस सांगितलें आहे तेंच बहुत करून खरें आहे. तुह्मी मात्र त्या वेळीं मला वेडी ह्मटलें.

**रूप०** - अगे, तूं आतांच राणीकडे जा आणि कसा काय बेत आहे तो विचारून ये.

**चिम०** - छे बाई, मला राणीसाहेबांकडे जाण्याविषयीं सरकारांनी अ-

गर्दी मनाई केली आहे. त्यामुळें मला जातां येत नाहीं. गेलें तर माझें डोकें मारतील

**रूप०** – अगे, असें तूं ह्मणतेस यावरून कांहीं तरी कपट आहे खरें यांत संशय नाहीं. आतां मीच राणी जवळ जातें ह्मणजे काय तें कळेल पण एक्लीं जाऊन उपयोगी नाहीं. आपण आज रात्रीं दोघीही तिकडे जाऊं.

**चिम०** – बरें आहे, पण पहारेकरी जाऊं देईल तर तुमचें जाणें होईल.

**रूप०** – मला पहारेकरी कां जाऊं देणार नाहीं? मी सरकारचा कांहीं अन्याय केला नाहीं.

**चिम०** – अन्यायच कशाला पाहिजे. सरकारचा हुकुम असेल तसें तो करील.

**रूप०** – बरें तर हवालदारास वर बोलावून आण. मी विचारितें.

हें ऐकून दासीनें हवालदारास वर बोलाविलें, पण तो ह्मणाला, मला आपली जागा सोडून आण्यास सरकारची परवानगी नाहीं. दुसरा पहारेकरी बदलीवर आला ह्मणजे मी वर येईन.

दासीनें रूपवतीस पहारेकऱ्याचें बोलणें कळविलें. तें ऐकून ती आपणाच खालीं येऊन दरवाज्याचे आड उभी राहून ह्मणाली, हवालदार, मला रात्रीं राणीस भेटण्याकरितां जावयाचें आहे. तुह्मांस मला जाऊं देण्यास परवानगी आहे कीं नाहीं? हवालदार ह्मणाला, दासीवांचून कोणास परवानगी नाहीं. तुह्मांस आणि भटजीस बाहेर पडूं देऊं नये असा हुकूम आहे. तुह्मांस जाणें असेल तर सरकारांतून परवानगी आणावी, ह्मणजे आह्मी जाऊं देऊं. असें हवालदाराचें भाषण ऐकून रूपवतीस फार भय वाटलें आणि ह्मणाली, अगे चिमणे, तूं ह्मणत होतीस तें आतां माझे प्रत्यास आलें. पण मी असा राजाचा अन्याय तरी काय केला आहे?

चिम० — धन्याचा धनी कोण आहे? त्याचे मनांत येईल तें खरें. अन्यायच कशाला पाहिजे. असें करण्यास दुसरींही कारणें असतात.

रूप० — चिमणे, तुला कांहीं तरी माहीत आहे असें मला वाटतें. मी तर अगदीं भिऊन गेलें आहें. आतां काय होतें कोण जाणे.

चिम० — भिण्यासारखें कांहीं नाहीं. तुमच्या हिताचेंच कांहीं तरी असेलसें वाटतें.

सखी — दुसरें काय असणार, आमच्या सरकारचा स्वभावच असा आहे. एखादी चांगली बायको असली ह्मणजे तिजवर त्यांचा डोळा असतो तशांत तुह्मी आतां निराधारी असून त्यांचे ताब्यांत आहां. मग ते काय उगीच बसणार आहेत?

रूप० — हर हर! अशी दुष्ट बुद्धि राजास झाली काय! दुष्ट कर्मी मनुष्यास दंड करावा हें राजाचें काम असून तोच जर स्वतः तशी बुद्धि धरील तर त्याचा नाश होण्यास उशीर लागणार नाहीं. परमेश्वर त्याचा न्याय करीत असतो.

चिम० — हें तर खरेंच, पण सत्ते पुढें शहाणपण नाहीं, हें मी पूर्वीच तुह्मांस सांगितलें आहे. तेंच शेवटीं खरें होईल.

सखी — बाई, मी तुह्मांस असें विचारितें कीं, सरकारचा जर असा मनोरथ असेल तर यांत तुमचें तरी काय वाईट झालें? घरीं जाऊन हाल भोगावे त्यापेक्षां येथें सरकारचा आश्रय मिळाला तर काय वाईट? आज तुमचें प्रारब्ध उदयास आलें असें मला वाटतें.

रूप० — मी येथें सर्वस्वी तुमचे स्वाधीन झालें आहें. ह्मणून माझा नाइलाज आहे. जेंजें तुह्मी बोलाल तें तें ऐकून घेणें भाग आहे.

चिम० — यांत आमचा तरी काय अपराध आहे?

रूप० — तुमचा तर अपराध नाहींच, पण ह्या राजास अशी दुष्ट बुद्धि

झाली, यावरून मुळापासून ह्या करितांच याचा सर्व मतलब असे-लसें मला वाटतें. व्यापाराचे निमित्तानें मुद्दाम आमच्या घरीं राहून युक्तीनें मला इकडे आणून माझ्या नवऱ्यास मारून आपला मतलब साधण्याचा बेत मांडिला आहे. परमेश्वरास माझी करुणा असेलच. तो माझें संरक्षण करील, परंतु चिमणे, राजास असें जाऊन सांग कीं, तूं कितीही उपाय केलेस तरी मी तुला प्राप्त होणार नाहीं. यासाठीं मला माझे घरीं जाऊं दे.

**चिम॰** — पाहिजे तर जाऊन सांगतें. पण ते आपलें खरें केल्यावांचून कधीं राहणार नाहींत. ह्मणून मग हाल भोगून वश होण्यापेक्षां आतांच व्हाल तर त्यांत तुह्मांस फार सुख होईल.

**रूप॰** — आग लागो त्या सुखास. मागल्या जन्मीं काय पातकें केलीं असतील तीं आतां भोगीत आहे. आणि आतांही पाप केलें तर परमेश्वर काय शासन करील बरें ?

**सखी** — बाई, तुह्मी अज्ञान आहां असें मला वाटतें. मागल्या जन्मीं तुह्मीं कांहीं पुण्य केलें, ह्मणून आतां तुह्मांस राज्य सुख भोगण्यास मिळणार आहे. असें असून तुह्मी जसें दरिद्र्याचे घरीं कामधेनु आली असतां त्यानें हांकून लावावी तसें करीत आहां. हें मला बरें दिसत नाहीं. आज तुमच्या सारख्या भाग्यवान् कोणीच नाहींत. असें मला वाटतें.

**रूप॰** — अगे, ज्याला जें आवडलें तें जरी पुढें भोगावें लागणार तरी तें मनांत न आणितां करितें. तसेंच तुह्मांस ह्या सुखाचा आनंद वाटतो. परंतु माझे आंगास आग लागल्या सारखी झाली आहे. पण काय करूं ? प्राण द्यावा तर आत्म हत्या होते ह्मणून निरुपाय आहे.

**चिम॰** — बरें बाई, तुमचे कपाळीं हालच करून घ्यावयाचे असलेतर

तुह्मी तरी काय कराल. मी आतां सरकाराकडे जातें.

असें बोलून चिमणी राजाकडे गेली. इतक्यांत राजा दरबारांतून वाड्यांत आला होता. त्यानें तिला पाहिलें आणि कसें काय झालें म्हणून विचारिलें. चिमणी म्हणाली, मी युक्तीनें ही गोष्ट तिला कळविली, परंतु तिच्यामनास आली नाहीं. ती ह्मणाली, जर राजा अशी इच्छा करीत असेल तर मी प्राण देईन. त्यास कधींही वश होणार नाहीं. या करितां मला घरीं पोहोंचवावें. हें चिमणीचें भाषण ऐकून राजा ह्मणाला, अगे,आपण होऊन स्त्रियांस विचारिलें ह्मणजे त्या अशीच उडवाउडव करीत असतात. परंतु तें त्यांचें बोलणें खरें नसतें. कदाचित् हें राणीस कळेल आणि ती मत्सर करील असें तिचे मनांत आलें असेल. यासाठीं तूं तिला आणखी कांहीं गोष्टी सांगून वश करून घे. ह्मणजे तुला मी चांगलें बक्षीस देईन. चिमणी ह्मणाली, बरें महाराज, मी सांगून पाहतें. मग काय होईल तें होऊ. असें बोलून चिमणी परत आली. तिला पाहून रूपवती ह्मणाली.

**रूप०** - (रागानें) कायग, राजा मला पोहोंचवितो कीं नाहीं?

**चिम०** - बाई, आतां उगीच घरीं जाण्याच्या गोष्टी कशाला करितां? आपले मनोरथ सिद्धीस नेल्याशिवाय तो सोडणार नाहीं.

**रूप०** - चिमणे, तुला या कामाबद्दल त्यानें कांहीं बक्षीस देऊं केलें असेल असें वाटतें. ह्मणूनच तूं अगदीं राजाच्या तर्फेनें बोलतेस.

**चिम०** - होय हें तर खरेंच. पण तुह्मी त्यास वश व्हाल तर आह्मांस तें मिळणार आहे. नाहींतर कशाचें मिळतें.

**रूप०** - अगे, तुह्मी कितीही उपाय केलेत आणि मला जरी राजानें ठार मारिलें तरी मी असली गोष्ट कबूल करणार नाहीं. हें खचित समजा. तुह्मांस या कामाबद्दल राजाकडून कांहीं बक्षीस मिळेल ही आशा मुळींच नको.

चिम० - तुह्मी ह्मणतां हें सर्व खरें आहे, पण जर राजानें तुह्मावर बलात्कार केला तर तुमचा काय उपाय चालणार आहे.?

रूप० - अगे, राजा कसाही असला तरी बलात्कार करण्याची बुद्धि त्यास एकाएकीं होणार नाहीं. इतकेंही असून तसेंच तो करूं लागला तर माझें संरक्षण करणार परमेश्वर आहे. सारांश, तुह्मांस बक्षीस मिळणें हें मात्र घडत नाहीं.

चिम० - बाई, आतां उगाच कां ओढून आणितां? असें राज्यसुख मिळत असतां कोणी टाकणार नाहीं हें खचित आहे. यावरून तुह्मांस ही तें आवडलेंच आहे. आतां उगाच आमच्या अन्नाचे आड येऊं नका. एकदां होय ह्मणा ह्मणजे झालें.

रूप० - चिमणे, द्रव्य सर्वांस प्रिय आहे. द्रव्यावांचून कांहीं चालत नाहीं. द्रव्यानें सर्व कामें होतात. द्रव्याकरितां मनुष्यें दुसऱ्याची सेवा करितात. आणि धन्याची प्रीति संपादितात. मग तो धनी राजा असो अथवा सावकार असो किंवा कोणीही असो. चाकराचें लक्ष्य द्रव्याकडे असतें. तसेंच तुह्मांस राजानें द्रव्य देऊं केलें आहे ह्मणून तूं सांगितलेंस आणि त्या करितां तूं खटपट करितेस हें नीटच आहे. पण राजानें जें देऊं केलें असेल त्याहून ज्यास्त तुला मिळालें तर तूं राजाचें काम टाकून दुसऱ्याचें काम करशील. कारण आपणांस द्रव्याकरितां काम करावयाचें, ह्मणून तसें करणें योग्य आहे. परंतु अधर्माचे कामांत पुष्कळ द्रव्य मिळाल्यापेक्षां चांगल्या कामांत कमी मिळालें तरी तें बरें. असेंही असून चांगल्या कामांत जर ज्यास्त मिळत असेल तर तें करणें हें सर्वांस योग्य आहे. कां तुला कसें वाटतें?

चिम० - होय असें तर खरेंच; आह्मांस राजा काय आणि कोणी काय, आमचा मतलब द्रव्या पुरताच आहे, ह्मणून तुह्मांस सांगत आहे. परंतु

तुह्मी ऐकत नाहीं

रूप० - तूं जर द्रव्याचे आशेनेंच हें काम करितेस, तर मी तुला एक युक्ति सांगतें. पण वचन दिलें पाहिजे.

चिम० - आह्मांस जर द्रव्य ज्यास्त मिळेल तर तें ऐकूं, परंतु भलतेंच सांगाल तर मात्र आमच्यानें होणार नाहीं.

रूप० - भलतें कांहीं नाहीं. तुह्मांस द्रव्य मिळून आणखी परमेश्वराची ही तुह्मांवर कृपा होईल. असा दोहोंकडून तुमचा फायदा असला तर ऐकशील कीं; नाहीं ?

चिम० - होय, असें असेल तर आह्मांस कबूल आहे. आणि मी वचनही देतें. ( हातावर हात मारून ) हें घ्या वचन, आतां कायतें सांगा पाहूं.

रूप० - अगे, मी पातिव्रत्य रक्षून आजपर्यंत राहिलें आणि आतां राजा मला दुष्ट कर्म करावयास सांगतो, तें मी कसें ऐकूं बरें ? तुमचे तोंडांतून तीं अक्षरें ऐकिल्याबरोबर मला मरणाहून ज्यास्त झालें आहे. याकरितां राजानें जें तुला देऊं केलें आहे त्याहून ज्यास्त देण्यास मी कबूल आहें. आणि मजजवळ माझ्या नवऱ्याचें द्रव्यही आहे आतां कसेंही करून माझी या दुष्टाचे हातून जर सुटका करशील तर मजवर फार उपकार होतील. तुजवांचून मला येथें कोणी नाहीं.

चिम० - तुह्मी ह्मणतां हें नीट आहे. परंतु हें काम माझे हातून कसें होईल.

रूप० - अगे, तूं चतुर आहेस आणि खचित करशील अशी माझी खात्री आहे. ह्मणून तुला सांगितलें आहे. आतां तुझ्या मर्जीस येईल तसें कर.

चिम० - बरें तर, मी वचन दिलें त्यापक्षीं आतां कसें ही करून तुमची सुटका मला केलीच पाहिजे.

असें तिचें भाषण ऐकून सखी जवळ नाहीं असें पाहून रूपवतीनें आपली पेटी उघडली आणि सुमारें दोन हजार रुपये किमतीचा एक दागिना काढून चिमणीचे स्वाधीन केला. तो तिनें गुप्त ठेविला. नंतर त्या दिवसापासून तिचें चित्त रूपवतीकडे ओढलें. ती वर वर मात्र सखीचे देखत तिला वकून बोलत असे. परंतु आंतून आतां कसें करावें, राजास काय सांगावें, अशा चिंतेंत होती. एकेदिवशीं द्यूतमणीस राजानें पाठविलें, तो तेथें येऊन ह्मणाला, कां आतां उगाच ओढून आणिलें आहे? तुह्माकरितां आह्मी व्यापारी बनलों आणि तुमचे नवऱ्यास इकडे आणिलें. परमेश्वरेच्छेनें त्यास देवाज्ञा झाली, हेंही आपल्या बऱ्याचेंच घडलें. आतां तुह्मांस कोणाचेंही भय नाहीं. असें असून सरकारचें मत अमान्य करितां हें ठीक नाहीं. असें केल्यानें तुह्मांस फार दुःख होईल आणि शेवटीं कबूल करावें लागेल. यासाठीं मीही सांगतों कीं, तुह्मी आतां कबूल करावें. असें त्याचें दुष्ट भाषण ऐकून रूपवती त्याजकडे न पाहतां उगीच राहिली. कांहीं वेळानें द्यूतमणि ह्मणाला, देव देतो आणि नशीब नेतें. ज्याचे कपाळीं दुःखच भोगावयाचें त्यास कोण काय करील? कितीहि सांगितलें तरी व्यर्थच आहे. असो आतां समजून येईल.

असें बोलून तो निघून गेला. त्यानें राजास तें कळविलें. राजानें चिमणीस बोलाविण्याकरितां स्वार पाठविला तो येऊन पोहोंचतांच चिमणी राजाकडे जाण्यास निघाली. रूपवती ह्मणाली, चिमणे, आतां माझा सर्व भरंवसा तुजवर आहे. मी तुला दिलें तें कांहींच नाहीं. पुढें आशा ठेवून काय करशील तें कर. चिमणी ह्मणाली, बाईसाहेब, मी आतां आपलीच आहें. जितकें माझ्यानें होईल तितकें मी तुमचें बरें करीन. तुह्मीं अगदीं भिऊंनका. असें बोलून चिमणी निघाली, ती राजाकडे येऊन पोंचली. तिला पाहून राजा ह्मणाला, कसें काय? आज तरी काम फत्ते आ-

हे कां नाहीं? चिमणी ह्मणाली, काय सांगूं सरकार, ती आमच्या भन्नाचे आड येते असें वाटतें. आह्मी पुष्कळ उपाय केले, तिला नाना प्रकारें भय घातलें, तरी ती आमचें ऐकत नाहीं. अगदीं प्राणावर उदार झाली आहे. यावरून ती खचित अशा कर्मांतली स्त्री नव्हे. आमचा तिच्या पुढें ना इलाज आहे. आतां सरकारचे मनास येईल तसें करावें. राजा ह्मणाला, असें तर कधींच होणार नाहीं. ती उगाच ओढून आणीत असेल. आतां तिला असें सांग कीं, आजपासून चार दिवसांचे आंत जर तूं कबूल केलें नाहींस, तर पांचवे दिवशीं प्रहर रात्रीं मी खुद्द आपले मनोरथ सिद्धीस नेण्याकरितां येणार आहें. खरोखर पहा कीं, मी जर असें केलें, तर ती काय करील? चिमणी ह्मणाली, ती काय करणार? तिला आह्मी पुष्कळ बोध केला, पण ती ऐकत नाहीं. आतां हें शेवटचें सांगणें सांगून पाहतें. असें बोलून ती परत गेली. तिला पाहून रूपवती ह्मणाली.

**रूप०** — कां आतां तरी राजा मला पोहोंचवितो कीं नाहीं.?

**चिम०** — पोहोंचविण्याची गोष्ट तर विसराच; पण त्यांनीं तुह्मांस असें सांगितलें आहे कीं, चार दिवसांत जर कबूल झाली नाहीं, तर पांचवे दिवशीं प्रहर रात्रीं मी स्वतः येऊन आपले मनोरथ सिद्धीस नेईन. याकरितां आतां उगाच ओढून आणूं नका. एकदां हूं ह्मणा ह्मणजे राजा तुमचा अगदीं दास आहे असें समजा.

**रूप०** — (कांहीं वेळानें सखी जवळ नाहीं असें पाहून) चिमणे, आतां सांगितलेंस हें खरेंच कीं काय?

**चिम०** — तें तर खरेंच आहे. पण आतां बुद्धि देणार परमेश्वर आहे. प्रसंगीं काय होईल ते होवो.

**रूप०** — अगे, चार दिवसांनीं राजा इकडे येणार; तों पर्यंत पळून जाण्यास कांहीं युक्ति असली तर सांग.

**चिम०** — इतक्यांत तर कांहीं युक्ति चालावयाची नाहीं. पहारेकरी यांस काल सक्त आज्ञा झालेली आहे. त्यामुळें ते फार हुशारीनें असतील. परंतु तुह्मी भिऊं नका. राजा येईल त्यावेळीं मी तुह्मांस युक्ति सांगेन तशी करा ह्मणजे झालें.

असें त्यांचें भाषण झाल्यानंतर चार दिवस लोटले. पांचवे दिवशीं मी रात्रीं येणार ह्मणून राजानें निरोप पाठविला. त्या प्रमाणें प्रहर रात्रीचे सुमारास तो येणार इतक्यांत चिमणीनें रूपवतीस एकांतीं नेऊन युक्ति शिकविली. त्याप्रमाणें करण्यास रूपवती सिद्ध झाली. चिमणीनें राजा करितां रत्नखचित पलंगावर मऊ बिछाना आणि सुगंधी पुष्पांचे हार तसेच अत्तर गुलाब इत्यादिक पदार्थ तयार करून ठेविले होते. बंगल्यांत जिकडे तिकडे दिव्यांचा चकचकाट केला. अशा समयांत राजा एका एकीं येऊन पोहोंचला आणि पलंगावर बसून मनांत आश्चर्य करून ह्मणाला, ह्या काय चमत्कार आहे! आजपर्यंत हिला बोध करविला तो हिनें ऐकिला नाहीं, परंतु आज मीच येथें आलों ह्मणून ही भिऊन वश झाली असावी. स्त्रियांचें मन असेंच असतें. पण आतां काय होतें तें पाहूं या, ह्मणून उगाच पलंगावर बसला. इतक्यांत रूपवती पुढें येऊन हात जोडून उभी राहिली आणि ह्मणाली.

**रूप०** — महाराज, काय आज्ञा आहे?

**राजा०** — नायकांचें मन वेडें आहे ह्मणतात तें खरें आहे. या समयीं दुसरी आज्ञा काय असावयाची? आज कोणी बुद्धि दिली कोण जाणे. मी तर निराळ्याच विचारानें आज येथें आलों होतों, परंतु परमेश्वरानें तसें घडवून आणिलें नाहीं, हें फार चांगलें झालें. आजपर्यंत इतके दिवस फुकट घालविले हें मात्र नीट झालें नाहीं. कित्येक स्त्रिया अशाच अंत पाहत असतात. कां कसें काय? या इकडे बसा. दूर दूर कां?

रूप० — इकडे काय आणि तिकडे काय.

राजा — असें कां ह्मणतां ?

रूप० — असें ह्मटलेंच पाहिजे.

राजा — कां बरें ?

रूप० — कां बरें, माझे यजमानास देवाज्ञा झाली, ह्मणून मजवर पर्वत कोसळल्या सारखें होऊन मी अनाथ गाई सारिखी झालें. परदेशांत एकटी असून सासू, सासरा आणि बाप दूर देशांत राहिले. येथें माझें कोणी नाहीं. असें असतां आपण माझे यजमानाचे स्नेही असून एक दिवस देखील माझा समाचार घेतला नाहीं. शहरांत होतें तेव्हां राणीसाहेब तरी समाचारास येत असत. तुह्मी मला शहराबाहेर ठेविल्यापासून त्याही मला अंतरल्या. असो, जें नशिबीं होतें तें झालें; येथें कोणाचा उपाय नाहीं. आपण राजे आहां, आपणांस काय दोष लावावयाचा आहे ? (असें बोलून अति दुःखित होऊन स्तब्ध उभी राहिली.)

राजा — (आपणही दुःखकरून) जें झालें तें झालें. आतां शोक करून काय उपयोग ? होणारापुढें कोणाचा उपाय नाहीं. पण आतां मी आहेंना. तुह्मांस मी कांहीं कमी पडूं देणार नाहीं. तुह्मांस घरीं पोहोंचविण्याकरितां मीं तुमची रवानगी केली, परंतु तिकडे तुमचे हाल होतील, सासुसासऱ्याचे जाचांत तुह्मांस रहावें लागेल. तें न लागावें असें माझ्या मनांत आलें, ह्मणून मी तुह्मास येथेंच ठेवून घेतलें आहे. आतां तुह्मी आह्मी आनंदानें वागूं ह्मणजे झालें.

रूप० — मला असलें बोलणें कांहीं समजत नाहीं. मला आपले घरीं मीठ भाकर मिळाली आणि कितीही माझे हाल झाले तरी ते मला

हालसे वाटणार नाहींत. माझा मुलगा मोठा झाला ह्मणजे मला कोणाचे जाचांत रहावें लागणार नाहीं आणि सासूसासराही जाच करण्या सारखीं नाहींत. असें असून मी येथें रहावें हें मला कसें बरें वाटेल ?

राजा — ओशाळें अन्न खावें त्यापेक्षां स्वतंत्र रहावें हें बरें आहे. येथें तुह्मांस काय कमी आहे ?

रूप० — आपण माझे यजमानाचे स्नेही आहां त्यापक्षीं येथें मला दुःख होईल असें नाहीं. परंतु मी माझे घरीं रहावें यांत लौकिक असून ईश्वराकडेही रुजू आहे.

राजा — उभें राहून पाय दुखूं लागले असतील. आतां येथें बसा. मग बोलूं.

रूप० — उभी काय आणि बसलें काय, भ्रताराचांचून असलेली स्त्री मेल्यासारखी आहे. परंतु आपली मर्जी आहे तर बसतें. (असें बोलून जेथें उभी होती तेथेंच जमीनीवर बसली.)

राजा० — वाहवा! मी एवढा वेळ बोललों तें फुकटच. शेवटीं तुह्मी आपलेंच खरें केलें.

रूप० — मी खरें काय केलें? कोठें तरी बसलें ह्मणजे झालें. आपण राजे आहां ह्मणून मला मर्यादेनें बसलें पाहिजे.

राजा — मी राजा खरा, परंतु येथें एकांतांत तुला मर्यादा नको. माझे जवळ बसलीस तरच मला बरें वाटेल.

रूप० — तुह्मांस बरें वाटेल खरें, परंतु तसें मला सध्याच करितां येत नाहीं.

राजा — कां बरें आतां काय अडचण आहे ?

रूप० — अडचण दुसरी कांहीं नाहीं. पण माझें मनच मला खातें.

आणि परमेश्वरही पाहत आहे. जें कांहीं करणें तें विचारानें केलें पाहिजे. घाईकरून उपयोगी नाहीं.

राजा — आतां विचार तो काय करावयाचा? तुमचें आणि आमचें मन मिळालें ह्मणजे झालें.

रूप० — आपण राजे आहां, जें ह्मणाल तें कराल. आपण मला येथें सुखानें रहावयास सांगतां तर मी राहण्यास कबूल आहें. परंतु माझी एक विनंती आहे. ती जर ऐकाल तर मला येथें सुखांत ठेविलें असें वाटेल.

राजा — तुमचें काय ह्मणणें आहे तें बोला पाहूं?

रूप० — माझ्या यजमानास देवाज्ञा झाल्या पासून आपण माझा समाचारही न घेतां मला शहरा बाहेर ठेविलें ह्मणून मला दुःख झाल्यामुळें मी आपणांस रागानें बोललें त्याची क्षमा असावी, आतां आपल्या मनांतला हेतु मला कळला आणि त्याप्रमाणें मी ऐकण्यास तयार आहें. परंतु हल्लीं मी दुःखांत आहें ह्मणून सर्व भोग मला विषा सारखे वाटत आहेत. जरी आपली प्रसन्न मर्जी झाली तरी मज पासून आपणांस कांहीं आनंद होणार नाहीं. याकरितां माझी एक विनंती आहे. आपण ऐकाल तर सांगतें.

राजा — ऐकाल तर सांगतें असें कां ह्मणतां? तुह्मी जें सांगाल तें मी ऐकण्यास सिद्ध आहें. जेणें करून तुह्मांस सुख होईल तेंच मी करीन.

रूप० — बरें तर मी सांगतें. माझ्या नवऱ्यास मरून एक वर्ष पुरें होई पर्यंत मी व्रतस्थ राहणार आहें. कां ह्मणाल तर आमचे धर्मांत असें आहे कीं, एक वर्ष झाल्यावांचून दुसरें लग्न करूं नये. हें मला पक्कें माहीत आहे. या करितां मी तसें करणार. वर्ष होऊन

गेल्यावर माझें चित्त स्वस्थ होईल. लोकापवादही चुकेल आणि तुमच्या संगतीनें निष्काळजी राहण्यास मला सुख वाटेल. या करितां ही माझी विनंती आपण ऐकावी. उतावीळ होऊं नये. मी बोललें यांत तिळप्राय फिरणार नाहीं. अधर्मानें वागण्यापेक्षां प्राण गेला तरी मला त्याचें दुःख वाटत नाहीं. आतां जसें तुह्मांस बरें वाटेल तसें करा.

**राजा** — अगे, तूं फार लांबीवर वेविलेंस मला तुजवांचून आतां क्षणभर देखील चैन पडणार नाहीं आणि एक वर्ष कसें घालवूं?

**रूप०** — महाराज, तुह्मी विचारी आणि न्यायी आहां, ह्मणूनच परमेश्वरानें तुह्मांस पृथ्वीपति केलें. मनुष्यास हा दुष्टकाम आवरणें कठिण आहे, परंतु विचारवंत पुरुषापुढें त्याचें कांहीं चालत नाहीं. आतां कसेंही करून एवढें वर्ष घालवावें ह्मणजे उभयतांस सर्वकाळ सुख प्राप्त होईल.

असें तिचें भाषण ऐकून राजास फार वाईट वाटलें. परंतु तूं सांगशील तें ऐकेन, असें वचन गेलें होतें आणि अधर्मानें वागण्यापेक्षां प्राण गेला तरी बरा असें तिचें भाषण ऐकिल्यावरून आपण फार आग्रह धरिला तर ही प्राण देईल असें त्यास वाटलें आणि त्यानें विचार केला कीं आजच उतावीळ होण्यांत अर्थ नाहीं. इतके दिवस गेले तसे आणखी घालवावे. तिकडे जयसिंगाविषयीं पक्का बंदोबस्त केला ह्मणजे ही आपलीच होईल. असें मनांत आणून ह्मणाला, हे स्त्रिये, मी तुजकरितां तुझें बोलणें मान्य केलें आहे. आतां तूं स्वस्थ रहा. मी कोणत्याही गोष्टीविषयीं तुला कमी पडूं देणार नाहीं. आतां मी जातों.

असें बोलून राजा निघून गेला. नंतर चिमणीच्या युक्तीनें वेळ निभावली ह्मणून रूपवतीनें तिची वाहवा करून तिला शाबासकी दिली.

आणि ह्मणाली, चिमणे, आतां अशीच येथून माझी लवकर सुटका कर ह्मणजे झालें. चिमणी ह्मणाली, बाईसाहेब, आपण आतां स्वस्थ असावें. पण मला देऊं केलें त्याची मात्र आठवण ठेवावी. रूपवती ह्मणाली, चिमणे, मी कबूल करून फिरणार नाहीं तुझें जन्माचें दरिद्र घालवीन. अशीं त्यांचीं एकांतीं भाषणें झालीं.

रूपवतीचे समाचारास राजा केव्हां केव्हां येत असे. त्या वेळीं ती दुःखित असल्या सारखें दाखवी. राजानें कांहीं विचारिलें तर एखादा शब्द बोलावा आणि दुःखानें उच्छ्वास टाकावे असें करीत असे. ह्मणून एके दिवशीं राजानें चिमणीस तिच्याविषयीं विचारिलें. ती ह्मणाली, महाराज, तिच्या नवऱ्याची तिला वारंवार आठवण येते, ह्मणून ती असें करिते. पण आणखी कांहीं दिवशीं विसर पडला ह्मणजे ती तसें करणार नाहीं. केव्हां केव्हां हें वर्ष कधीं जाईल कोण जाणे, आपण एकल्यानें किती दिवस काढावे, असें ही ह्मणते. अद्यापि तिचें मन स्वस्थ झालें नाहीं. हें ऐकून राजा उगीच राहिला.

रूपवतीस तेथें राहून सुमारें चार महिने झाले. चिमणी तिला तेथून मुक्त करण्याविषयीं अनेक विचार करी, परंतु पहारेकऱ्यामुळें ते तिचे विचार व्यर्थ होत असत.

एके दिवशीं रूपवती ह्मणाली, चिमणे, आतां किती दिवस येथें रहावें? कांहीं तरी लवकर युक्ति काढ. चिमणी ह्मणाली, बाईसाहेब, मी त्याच विचारांत आहें. परंतु पहारेकरी हुशार असल्यामुळें बाहेर पडून जातां येणार नाहीं, ह्मणूनच काय तें कठीण आहे. परंतु त्याला ही फसविण्याची कांहीं युक्ति काढितें. पण बाई, तुह्मांस घोड्यावर बसतां येतें काय? रूपवती ह्मणाली, होय, मी माहेरीं असतां बापानें मला घोड्यावर बसण्यास चांगलें शिकविलें आहे. अलिकडे फार दिवस बसलें

नाहीं. परंतु गरीब घोडा असलातर मी त्याजवर बसेन. पण चिमणे, घोडयावर बसून कोठें जावयाचें? चिमणी ह्मणाली, येथून तुह्मी आणि भटजी यांनी घोडयांवर बसून रात्रीं निघावें, ह्मणजे राजास बातमी कळेपर्यंत बरीच दूर जाल. मग त्यानें शोध केला तरी तुह्मी त्यास सांपडणार नाहीं. रूपवती ह्मणाली, होय गडे, बरीच युक्ति काढिलीस, अशीच आतां पहाऱ्यांतून जाण्याची युक्ति काढ ह्मणजे झालें. चिमणी ह्मणाली, तीही युक्ति मी काढिली आहे, परंतु त्यास थोडासा अवकाश लागेल. रूपवती ह्मणाली, कायबरें ती युक्ति? चिमणी ह्मणाली, ती सांगण्यास लज्जा वाटते, पणसांगतें. रात्रीच्या पहारेकऱ्यास विषयाचा नाद लाविला पाहिजे. ह्मणजे पहाऱ्यावरून कोणास न कळतां तो एकांतीं येईल. मग तुह्मांस मार्ग मोकळा होईल. हीच युक्ति आतां करितें, दुसरा उपाय नाहीं. रूपवती ह्मणाली, तुला पाहिजे तशी युक्ति कर, पण माझी लवकर सुटकाकर. एकदां मी आपल्या गांवीं गेलें ह्मणजे मला राजाचें भय नाहीं.

दुसरे दिवसापासून चिमणीनें रात्रीं खालीं येऊन पहारेकऱ्याशीं गोष्टी बोलत बसावें आणि त्याची कांहीं थट्टा करावी असें चालविलें. त्यामुळें तो शिपाई तिच्या नादास लागला. परंतु तिनें त्याला आज उद्यां असें करून कांहीं दिवस घालविले नंतर घोड्याची तयारी करण्यासाठीं चिमणीनें रूपवतीची आज्ञा घेतली आणि ती आपल्या एका मित्राकडे गेली. त्यास सर्व हकीकत सांगून दोन भाड्याचे घोडे ठरविण्यास सांगितलें. तो घोडयाचे अड्ड्यावर जाऊन पाहतोतों दोनच घोडे होते. भाडेकऱ्यांनीं त्यास कोठें जावयाचें ह्मणून विचारिलें. त्यानें सांगितलें कीं, येथून एक कोसावर रायगांव आहे तेथून माणसें निघावयाचीं. तीं सुमारें पंचवीस कोसांवर सडक संपते तेथपर्यंत जावयाचीं आहेत. तुह्मी

काय भाडें घ्याल तें सांगा. भाडेकरी ह्मणाले आह्मी दहा दहा रुपये घेऊं. नंतर मित्रानें त्यांशीं आठ आठ रुपये प्रमाणें ठराव केला. त्यांनीं केव्हां निघावयाचें ह्मणून विचारितांच त्यांस फार लवकर जाणें आहे, ह्मणून उद्यां अवशींचे प्रहर रात्रीं तुह्मी तेथील मारुतीचे देवळांत तयार असावें. असें सांगून त्यानें त्यांस दोन रुपये बयाणा दिला. दुसरे दिवशीं ते त्यावेळीं तेथें जाऊन तयार राहिले.

इकडे मित्रानें घोडे तयार केल्याचें वर्तमान चिमणीनें रूपवतीस सांगितलें आणि ह्मणाली, बाईसाहेब, आपलें काम झालें. आतां माझी देणगी द्यावी. तें ऐकून रूपवतीनें आपलें सर्व द्रव्य तिला दाखविलें आणि ह्मणाली, चिमणे, यांतून तुला पाहिजे तितकें घे. चिमणीनें त्यांतील सुमारें अडीच हजार रुपयांचे सोन्याचे दागिने उचलून घेतले. रूपवतीनें आपलें सर्व सामान न घेतां फक्त द्रव्य आणि वाटेच्या निर्वाहापुरतीं भांडीं व दोन तीन वस्त्रें इतकें मात्र बरोबर घेऊन गांठोडें बांधून तयार केलें. चिमणीनें आपणांस मिळालेले दागिने शहरांत आपल्या एका विश्वासु मित्राकडे ठेविले. नंतर पहारेकऱ्यास भेटून ह्मणाली कीं, आज आपला एकांत बंगल्याचे मागच्या खोलींत होईल. मी सुमारें प्रहर दहा घटिका रात्रीं येथें येऊन सूचना करीन. त्यावेळीं तुह्मी त्या खोलींत यावें. त्याप्रमाणें तो तितकी रात्र केव्हां होते ह्मणून वाट पाहत राहिला. सुमारें दहा घटिका रात्र झाल्यावर सर्वांस चांगली झोंप लागली आहे, असें पाहून बालकासह रूपवती आणि भटजी आपलें गांठोडें बरोबर घेऊन निघण्यास तयार झालीं. इतक्यांत चिमणीनें मागले दारचे खोलींत येण्याविषयींची पहारेकऱ्यास सूचना केली. ह्मणून तो कोणास न कळवितां तिकडे गेला. चिमणीही संकेताप्रमाणें तेथें गेली.

रूपवती आणि भटजी तेथून निघून सडकेच्या मार्गानें एक कोस

पर्यंत जेथें भाडेकरी होते तेथें येऊन पोहोंचलीं. तों मध्यरात्र झाली. भाडेकऱ्यांस झोंप लागली होती, ह्मणून त्यांस जागे करून घोड्यावरसामान घालवून वर बसलीं. मुलास भटजींनीं आपल्या जवळ घेतलें. अशी तीं जातांजातां दुसरे दिवशीं सायंकाळीं, भाडेकऱ्याजवळ केलेल्या ठरावा प्रमाणें सडकेच्या शेवटीं येऊन पोहोंचलीं. तेथें एक लहानसें खेडें होतें, तेथील देवळांत उतरलीं. नंतर भटजींनीं स्वयंपाक केला. भोजनें झाल्यावर भाडेकऱ्याचे बाकी राहिलेले पैसे देऊन त्यांस चालते केले. आपण कोठें जात आहों हें भाडेकऱ्यास कळवावयाचें नव्हतें. ह्मणून त्यांनीं त्यांजपाशीं पुढील गोष्ट कांहींच विचारिली नव्हती. प्रातःकाळीं उठून पुढें जाण्याचा विचार करूं लागलीं, तों त्या गांवांत भाड्याचें घोडें किंवा डोली कांहींच मिळत नाहीं असें कळलें, त्यामुळें तीं हळूहळू पायींचालत पुढें गेलीं. तों त्या रस्त्यास तीन फांटे फुटलेले होते ह्मणून कोणी मनुष्य भेटण्याची वाट बराचवेळ त्यांनीं पाहिली. परंतु कोणीच भेटेना. शेवटीं त्यांतील मोठा रस्ता पाहून पुढें चालूं लागलीं. तीं सुमारें एक कोसपर्यंत गेलीं. तों तेथें एक ह्मातारा कुणबी त्यांचे दृष्टीस पडला त्यास त्यांनीं कोकणांत जाण्याचा रस्ता विचारला. तो वेडा असल्यामुळें त्यानें भलताच रस्ता सांगितला. परंतु त्यांस तें खरें वाटून त्या मार्गानें तीं जाऊं लागलीं. तों पुढें मोठें अरण्य लागलें. जिकडे तिकडे भयंकर पशूंचे शब्द होत होते ह्मणून त्यांस फार भय वाटलें. परंतु मुकाट्यानें पुढें चालतीं झालीं. इतक्यांत एक व्याघ्र मार्गांत येऊन उभा राहिला. आणि गर्जना करून इकडे तिकडे पायांनीं रस्त्यांतील खडे उडवूं लागला. त्यास पाहून रूपवती तर अगदींच भिऊन गेली. तिचें आंग थरथरां कांपूं लागलें. ती आपल्या मुलास पोटाशीं धरून उगीच उभी राहिली. भटजीही तसेच उभे राहिले. इतक्यांत कांहीं भक्ष्य त्या व्याघ्रा

चे दृष्टीस पडल्यामुळें तो तेथून निघून गेला. असें पाहून रूपवतीस फार आनंद झाला. नंतर पुढें तशींच हळू हळू जाऊं लागलीं. त्यादिवशीं त्यांस कांहींच खावयास मिळालें नाहीं. कोठें गांव दिसेना आणि कोणी मनुष्यही भेटेना. सूर्यास्त होण्याचा समय झाला. आतां काय करावें अशा विचारांत पडलीं. इतक्यांत एक ब्राह्मण त्यांचे मागून येत आहे असें त्यांनीं पाहिलें त्यामुळें त्यांस फार आनंद झाला. तो जवळ येतांच त्यानें तुह्मी कोठें जातां ह्मणून विचारिलें. तें ऐकून रूपवती ह्मणाली, आह्मीं कोकणांत जातों. ब्राह्मण ह्मणाला मीही कोकणांत जातों. माझें नांव शुकंभट. तुमची आमची सोबत बरी जमली. रूपवतीस ही सोबत मिळाल्यामुळें बरें वाटलें. नंतर पुढें गेल्यावर एक लहानसा गांव त्यांचे दृष्टीस पडला. तेथें जाऊन मारुतीचे देवालयांत तीं उतरलीं आणि स्वयंपाक करून त्यांनीं भोजन केलें. रात्रीं झोंप लागेपर्यंत इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत असतां भद्रकेतुराजाचे स्वभावाची गोष्ट शुकंभटजींनीं काढिली.

**शुकंभटजी**— आजपर्यंत मी बहुत राजधान्या आणि राजे पाहिले, परंतु भद्रकेतु सारखा दुष्ट राजा कोणीच मला आढळला नाहीं. परमेश्वर त्यास काय शासन करील कोणजाणे.

**रूपवती**— कां बरें, त्यानें असें काय दुष्ट कर्म केलें?

**शुकं०** — त्यानें एका व्यापाऱ्याची स्त्री वश करून घेण्याकरितां त्यास दुसऱ्या गांवांत व्यापारा करितां पाठवून बंदींत ठेविलें आणि आपण तिच्याशीं व्यभिचारकर्म करीत असतो.

**रूप०** — महाराज, ही गोष्ट ऐकून मला आश्चर्य वाटतें. कारण राजानें जरी असें करण्याचें योजिलें; तरी ती त्यास कशी वश झाली?

**शुक०** — ती बिचारी काय करिते? जबरदस्तीपुढें कोणाचा उपाय

नाहीं. आजपर्यंत त्या राजानें अशा किती एक स्त्रिया बलात्कारानें देखील भोगिल्या आहेत.

रूप० — बरें हें तुह्मी कोठें ऐकिलें?

शुकं० — अहो, जिकडे तिकडे लोक बोलतात. असली गोष्ट छपून राहत नसते.

रूप० — त्या राजानें व्यापाऱ्यास बंदींत कोठें ठेविलें आहे?

शुकं० — मत्स्यपुराचे पश्चिमेस कुंडवें ह्मणून एक लहानसें गांव आहे तेथें चार रस्ते एके ठिकाणीं मिळालेले आहेत, या करितां राजानें आपली सेना तेथें ठेविली आहे आणि कैदी लोकांचा बंदीखाना ही तेथेंच आहे.

रूप० — आह्मीं असें ऐकिलें कीं, त्यास सर्प चावून तो व्यापारी मेला.

शुकं० — छे छे, अशी बातमी राजानें उठविली आहे, परंतु ती सर्व खोटी आहे. तो बंदीखान्यांत अद्यापि जिवंत आहे. त्याजकडून काम काज करवीत नाहींत, परंतु त्याला एकटाच निराळा ठेविला आहे.

रूप० — आतां पुढें त्यास किती दिवस बंदींत ठेवितील बरें?

शुकं० — आतां तो कशाचा सुटतो, मरे पर्यंत त्यास कारागृहच भोगावें लागेल.

हें त्यांचें भाषण ऐकून रूपवतीस दुःख वाटलें, परंतु आपला पति जिवंत असल्याचें समजल्यामुळें फार आनंद झाला आणि पुन्हा शुकंभटजीस ह्मणाली.

रूप० — महाराज, ती स्त्री राजास वश झाली ह्मणून आपण सांगितलें हें खरेंच काय?

शुकं० — तें कोण पाहतो, परंतु राजा आपले मनोरथ सिद्धीस नेल्यावांचून राहणार नाहीं. तीजर पतिव्रता असती तर तिनें प्राण दिला

असता. परंतु प्राण दिल्याचें आह्मीं ऐकिलें नाहीं. मी परवां-चे दिवशींच त्या नगरांतून आलों, त्यावेळीं ज्या बंगल्यांत तिला ठेविलें आहे. तो बंगला मला एकानें दाखविला. त्याचे दरवाज्या-वर हत्यारबंद शिपायांचा पहारा आहे.

रूप० – महाराज, जरती राजास वश झाली असती, तर दर-वाज्यावर हत्यार बंद पहारा नसता. उगाच कोणी शिपाई रक्ष-क मात्र असता. यावरून ती खचित वश झाली नाहीं असें मला वाटतें.

शुकं० – असें असेल तर तिची धन्य आहे. पण तिचें राजापुढें कांहीं चालावयाचें नाहीं. शेवटीं तो आपलेंसें करील?

रूप० – मला वाटतें कीं, तिनें इतक्यांतच कांहीं तरी युक्ति करून पळून जावें.

शुकं० – छे छे, राजाचे बंदोबस्तांतली स्त्री, तिला कोणी मदतही करणार नाहीं. आणि पहाऱ्यांतून तिला जातां येणार नाहीं.

रूप० – तिचे प्रारब्धींच तसें असलें तर ती काय करील? अ-सो, त्या राजास परमेश्वर शासन करील.

असें बोलत असतां शुकंभटजींस झोंप येऊं लागली, ह्मणून ते ह्मणाले, आतां फार रात्र झाली आहे, आपण निजावें तें बरें. स-काळीं पुन्हा वाट चालावयाची आहे. तें ऐकून रूपवती ही बोलत ना-हींशी झाली.

नंतर प्रातःकाळीं उठून तीं पुढें चालतीं झालीं. रूपवतीच्यानें अ-गदीं चालवेना, परंतु काय करिते. घोडें किंवा डोली कांहींच तेथें मिळे-ना, ह्मणून तशीच हळू हळू चालत होती. त्या दिवशीं दोनप्रहरपर्यंत सुमारें दोन कोश गेलीं. शुकंभटजींस फारच त्वरेनें जावयाचें होतें,

ह्मणून ती सोबत त्यांच्या उपयोगीं पडली नाहीं. दोनप्रहरीं एका बागांत उतरून भोजन झाल्यावर शुकंभटजीनीं त्यांस आपलें लवकर जाण्याचें कारण सांगितलें आणि ते पुढें चालते झाले. रूपवती आणि भटजी सायंकाळीं प्रहर दिवसाचे सुमारास हळू हळू निघालीं तीं दोन घटिका रात्रीं एका गांवांत येऊन पोहोंचलीं. तेथील देवळांत राहण्यासारखी जागा नव्हती, ह्मणून एका कुणब्याचे ओसरीवर जागा मागून घेऊन तेथें वस्तीस राहिलीं. त्यांस रात्रीं खाणें पिणें तर कांहींच मिळालें नाहीं. परंतु रूपवतीस आपला पति जिवंत असल्याचें कळलें होतें; त्यामुळें तें दुःख कांहींच वाटलें नाहीं. तिला केव्हां मी आपले घरीं जाईन असें झालें होतें.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं उठून तीं पुढें चालूं लागलीं. सुमारें एक कोश गेल्यावर रस्त्यांत एक नदी दृष्टीस पडली. जवळ जाऊन पाहतात तों ती खाऱ्यापाण्याची नदी (खाडी) आहे. तिच्यापलीकडे समोरच पुढें जाण्याचा रस्ता आहे असें दिसलें, परंतु तेथें कोणी मनुष्य येईल आणि त्यास माहिती विचारूं ह्मणून त्यांनीं बराच वेळ वाट पाहिली, तरी कोणीच भेटलें नाहीं. ह्मणून भटजींनीं मुलास रूपवती जवळ दिलें आणि आपण पाण्याचा सुमार पाहण्याकरितां नदीचे पलीकडे जाऊन आले. पाणी थोडें होतें, ह्मणून रूपवतीस ह्मणाले, चला जाऊं, मी तुमचा हात धरितों. तुह्मी भिऊं नका. पाणी अगदीं थोडें आहे. तें ऐकून रूपवतीनें मुलास भटजी जवळ दिलें आणि त्यांचा हात धरून नदींतून जाऊं लागली. उतरणाचे खालचे बाजूस पाणी ज्यास्त होतें हें भटजींस कळलें नव्हतें. ह्मणून तीं नदीच्या मध्यभागीं आलीं तों एकाएकीं रूपवतीचा पाय खाड्यांत जाऊन भटजींचा हात सुटला आणि ती पाण्यांत आडवी पडली.

भटजीस चांगलें पोंहतां येत होतें, परंतु पाठीवर गांठोडें आणि कडेवर मुलगा होता, त्यामुळें त्यांचा उपाय कांहीं चालेना. इतक्यांत धांवा धांवा ह्मणून त्यांनीं ओरड केली. परंतु तेथें जवळपास कोणी मनुष्य नव्हतें. ह्मणून भटजींनीं त्वरा करून मुलगा व गांठोडें नदीच्या पलीकडच्या किनाऱ्यावर नेऊन ठेविलें. आणि रूपवतीस काढण्याकरितां ते परत आले, तों पाण्यास आह्मेटाचा जोर असल्यामुळें ती वाहत वाहत गटकळ्या खात बरीच लांब गेली. भटजींनीं फार जलदीनें जाऊन तिला धरिलें. आणि आंगाचे जोरानें पोंहून पोंहून तिला किनाऱ्यावर आणूं लागले. परंतु पाण्याच्या जोरामुळें त्यांस पाहिजे तिकडे जातां येईना. शेवटीं पराकाष्टेनें मध्येंच एक खडकाचा उचंवटा उघडा होता तेथपर्यंत तिला आणिलें आणि त्या खडकावर बसविलें. पुन्हा भरती येई पर्यंत ती वाहून जाणार नाहीं. असें पाहून गांठोडें आणि मुलगा जेथें होता तेथें जावें ह्मणून ते पोंहत पोंहत वर येऊं लागले तरी त्यांच्यानें त्या ठिकाणीं येववेना. नंतर खालचे बाजूस किनाऱ्यावर एक उंसाचें शेत असून सभोंवतीं कुपण घातलेली त्यांचे दृष्टीस पडली. तेथें चिखला वांचून जाण्यासारखी जागा दिसली, ह्मणून ते तेथें गेले आणि त्या कुपणांतून थोडीशी वाट करून उंसाच्या फडांत जाऊन मार्गावर येणार इतक्यांत उंसाचे मालकानें पाहून चोर चोर ह्मणून धांवत येऊन त्यांस धरिलें. भटजींनीं आपली खरी हकीकत त्यास सांगितली. परंतु ती न ऐकतां तेथें दुसरे गडी काम करीत होते. त्यांनीं येऊन त्यांस बांधून आपल्या कुळपति नामक राजाकडे नेलें.

इकडे गांठोडें आणि मुलगा मार्गावर बराच वेळ होता, इतक्यांत त्यावाटेनें एक चोर येत होता त्यानें तें पाहिलें आणि इकडे तिकडे कोणी मनुष्य नाहींसें पाहून गांठोडें व मुलगा उचलून झाडींत एके

बाजूस नेऊन मुलाचे अंगावरचे लहान सहान सर्व दागिने त्यानें काढून घेतले आणि मुलास हळूच मार्गावर आणून ठेविलें. कांहींवेळानें एक व्यापारी गृहस्थ त्या मार्गानें जात होता, त्यानें तो मुलगा पाहिला. नंतर तेथें कांहीं वेळ उभा राहून कोणीच या मुलाचे शोधास येत नाहीं. असें पाहून हा कोणीचोरानें येथें टाकिला आहे असें समजून त्यानें त्यास उचलून घेतलें. आणि विचार केला कीं, हा मुलगा आपले घरीं न्यावा तर एखादें लचांड आंगीं येईल. यासाठीं हा आपल्या राजास नेऊन द्यावा. मग त्याचे नशिबीं असेल तसें होईल. असें मनांत आणून त्यानें तो मुलगा धर्मपाळ राजास नेऊन दिला. मुलगा सर्व लक्षणांनीं युक्त होता, ह्मणून राजास फार आनंद झाला. आणि त्यानें त्याचें पालन केलें.

इकडे रूपवती नदींत खडकावर बसून राहिली होती. भटजी उंसाचे फडांतून वर चढून गेले, इतकें मात्र तिचे दृष्टीस पडलें. मुलगा आणि गांठोडें ज्या ठिकाणीं होतें तें ठिकाण नदीच्या वांकणामुळें तिला दिसत नव्हतें. बराचवेळ झाल्यावर, अद्यापि भटजी परत येत नाहींत, ह्मणून ती चिंता करीत होती. इतक्यांत भरती लागल्यामुळें नदीचें पाणी वाढत चाललें असें पाहून ती अगदीं घाबरून गेली. कोणी मनुष्यही दृष्टीस पडेना ह्मणून आपल्या प्राणाविषयीं निराश होऊन परमेश्वराची प्रार्थना करूं लागली कीं, हे परमेश्वरा, मला अशा दुर्घट संकटांत कां पाडिलें आहेस? माझा पति जिवंत असल्याचें ऐकिल्यामुळें मला आनंद झाला होता, पुढें त्यास बंदीतून सोडविण्याचा प्रयत्न करावा असें मी मनांत चिंतीत होतें, तों एका एकीं माझा आणि बाळाचा वियोग करण्याचा प्रसंग आणिलास. देवा, मी ह्या पाण्यांत वाहून गेलें तरी चिंता नाहीं. परंतु बालकाची तुला करुणा येऊंदे. माझा बाळ सहा महिन्यांचा झाल्यापा-

सून तो आमचे बरोबर दुःखांत पडला आहे. परमेश्वरा, आतां आमचें संरक्षण करणार तुजवांचून कोणी नाहीं. भटजींचा आधार होता तेही कोठें गेले कोण जाणें. परमेश्वरा, माझ्या गांठोड्यांतील द्रव्याचे अपहाराविषयीं त्यांची बुद्धि होऊन ते मला येथें टाकून गेले काय? द्रव्य गेलें तरी जावो, परंतु माझ्या बाळाचा तरी ते नाश न करोत. एवढें तुजपाशीं मागणें आहे.

असें नाना प्रकारें दुःख करीत आहे, इतक्यांत भरतीचें पाणी तिच्या पायांस येऊन लागलें. हां हां ह्मणतां तो सगळा खडक दिसेनासा झाला. आतां आपल्या प्राणाची आशा नाहीं. असें जाणून तिनें मुलाची आठवण काढून परमेश्वराची प्रार्थना केली; आणि उगीच राहिली. त्यादिवशीं अष्टमी तिथि असल्यामुळें त्या खडकावर ज्यास्त पाणी आलें नाहीं. भरतीची सवारी होऊन राहिली. इतक्यांत नदींतून एक गलबत येत आहे असें तिचे दृष्टीस पडलें, ह्मणून तिला आनंद झाला. वाऱ्याचे झपाट्यानें तें गलबत त्या खडकाजवळ आलें, इतक्यांत रूपवतीनें अहो मला काढा, मी बुडत आहें. अशा दोन तीन वेळां हाका मारिल्या. तें ऐकून त्यांतील लोकांची नजर तिकडे गेली. त्या गलबतांत व्यापारी मालकही होता त्यानें तिला पाहिलें आणि खलाशांकरवीं होडी तिकडे पाठवून रूपवतीस तींत बसवून गलबतावर घेतलें. तिनें आपल्या मुलाचें वर्तमान त्यांस सांगितलें, परंतु त्यांनीं तें मनास आणिलें नाहीं. आतां गलबत उलटें वर जावयाचें नाहीं. असें सांगून तिला धमकावून त्यांनीं गलबत चालू केलें.

त्याचा धनी मलबार प्रांतातील तालिचरी नगरचा राहणारा होता. त्याचें नांव सुंदरशेट असें होतें. रूपवतीचें रूपसौंदर्य पाहून त्याचे मनांत तिजविषयीं कामेच्छा उत्पन्न झाली. ह्मणून त्यानें तिचें कांहींच न ऐकतां गलबत वाऱ्याचे झपाट्यावर सोडून समुद्रांत आणविलें. रूपवतीनें नानाप्रकारें आ-

पत्या मुळा करितां त्यांची प्रार्थना केली, परंतु ती त्यानीं ऐकिली नाहीं. शेवटीं रूपवती निराश होऊन उगीच राहिली. आणि मनांत ह्मणाली, आतां काय प्रारब्धीं येतें कोण जाणें! एकांतून निघावें तों दुसरें पुढें तयारच आहे. मी असा परमेश्वराचा अन्याय काय केला आहे? असो आतां काय होईल तें होवो.

तें गलबत उतरण वारा चांगला लागल्यामुळें तिसरे दिवशीं ताळचरीनगरांत जाण्याचे खाडीच्या बाऱ्यावर जाऊन पोहोंचलें. तेथें कांहीं माल उतरावयाचा होता, तो उतरून दुसरे दिवशीं तें गलबत बंदरांत नेलें. व्यापाऱ्यानें रूपवतीस सांगितलें कीं, प्रथम आमचे घरीं चलावें, मग तुझी सर्व हकीकत ऐकून तुझ्या मना प्रमाणें मी करीन. असें त्याचें भाषण ऐकून रूपवती त्याजबरोबर त्याचे घरीं गेली. तिची चांगल्या प्रकारें त्यानें बरदास्त ठेविली. सुंदरशेटीची स्त्री, नुकतीच मेली होती, त्यास संततीही कांहीं नव्हती. घरांत त्याची बहीण आणि वृद्ध झालेली अंधळीं अशी त्याची आई, ह्या होत्या. त्याणीं ही कोणाची स्त्री आहे ह्मणून त्यास विचारिलें. त्यानें सर्व खरी हकीकत सांगितली. तशीच रूपवतीनेंही त्यांस सांगितली. नंतर रूपवती आपणांस पद्मपुरीं पोहोंचविण्या करितां नित्य त्याची प्रार्थना करीत असे. परंतु तो आज उद्यां करून दिवस घालवी.

एके दिवशीं त्याची बहीण बाहेर गेली असतां तो रूपवतीस ह्मणाला, हे स्त्रिये, तूं समुद्रांत बुडून मरत असतां मी तुला वांचविलें. मी तुला गलबतावर न घेतों तर तूं खचित मरणार होतीस, याचा विचार कर आणि मी सांगतो एवढें ऐक. तुला परमेश्वरानें सुंदर रूप दिलें आहे आणि ही तुझी तारुण्यदशा आहे. अशा समयांत जर तूं मजकडे राहून विषयसुखाचा उपभोग घेशील तर मी तुला जन्मभर पोशीन. माझी स्त्री मरून

थोडेच दिवस झाले आहेत, आतां मला दुसरें लग्न कर्तव्य नाहीं. यासाठीं तूं सुखानें येथें रहा. असें त्याचें दुष्ट भाषण ऐकून रूपवती ह्मणाली, शेटजी, परमेश्वरानें मला रूपयौवन दिलें आहे याचा उपयोग जसा करावयाचा तसा केला पाहिजे. आपण मनुष्य आहों केवळ पशूसारिखा अविचार करावा, हें मनुष्यास योग्य नाहीं. असें असून तुह्मी बोलतां हें मीं कसें ऐकावें? तुह्मीं दुसरें लग्न करावें हेंच तुह्मांस योग्य आहे. सुंदरशेट ह्मणाला, मला असलीं शास्त्रें तूं सांगूनको. एकदां होय किंवा नाहीं तें लवकर सांग. रूपवती ह्मणाली, शेटजी, मी होय कसें ह्मणावें. आजपर्यंत जी गोष्ट मी केली नाहीं, ती आतां माझ्यानें कशी करवेल? तुह्मी उगाच माझ्या नादीं लागूं नका. असल्या कर्मापासून आजपर्यंत बहुतांचा नाश झाला. हें तुह्मी जाणत असून अज्ञाना सारखीं भाषणें करितां तुह्मास लाज तरी कशी वाटत नाहीं. असें तिचें रागाचें भाषण ऐकून सुंदरशेटीस ही राग आला. आणि ह्मणाला, बरें कांहीं चिंता नाहीं; आतां हाच तुझा हट्ट किती दिवस चालतो तें पाहतों. असें बोलून तो रागानें उठून गेला. इतक्यात त्याची बहीण घरांत आली, तिनें रूपवतीची मुद्रा निराळीच पाहिल्यावरून विचारिलें कीं, बाई, आज तुह्मी अशा कां दिसतां? रूपवती ह्मणाली, कांहीं नाहीं. मला माझे मुलाची आठवण आली. परमेश्वर त्याची माझी भेट कधीं करील कोण जाणे. एक एक मजवर संकटेंच येत चाललीं आहेत. बहीण ह्मणाली, बाई, तुला येथें कशाचें संकट आहे? रूपवती ह्मणाली, संकट दुसरें काय असावयाचें ज्या कर्मास भ्यावें तेंच मागें लागतें. परमेश्वरानें मला अगदीं कुरूप केलें असतें तर बरें होतें.

त्याची बहीण दयाळु आणि पतिव्रता होती, तिचा नवरा व्यापारा करितां दूरदेशीं गेला होता. ह्मणून ती त्याचे आज्ञेनें आपले भावाचे घरीं राहिली होती. रूपवतीचे बोलण्यावरून आपल्या भावानें हिला कांहीं दुष्ट

भाषण केलें आहे. असें जाणून तिला ह्मणाली, बाई, तुझ्याबोलण्याचा अर्थ मी समजलें. पुरुषाचें मन चमत्कारिक असतें. एकदां कांहीं गोष्ट त्यांचे मनांत आली ह्मणजे मगते पापपुण्याचा विचार करीत नाहींत. परंतु मला कळलें ह्मणून बरें झालें. आतां तूं स्वस्थ रहा, मी त्याचा बंदोबस्त करीन. असें तिचें भाषण ऐकून रूपवतीस जरासा धीर आला. परंतु सुंदरशेटीचे मनांत राग असल्यामुळें घरांत आल्यावर तो तिला कांहीं तरी निमित्तानें उगाच छळीत असे. असे कांहीं दिवस लोटले.

एके दिवशीं सुंदरशेटीचे बहिणीनें आपल्या बरोबर देवदर्शनास तिला नेलें होतें, तेथें पुराण चाललें होतें. तें ऐकण्यास बहुत स्त्रिया बसल्या होत्या. त्यांत ह्या दोघीही जाऊन बसल्या. पुराणांत हरिश्चंद्रराजाचा छळ विश्वामित्रानें केल्याची कथा चालली होती. ती ऐकत असतां, रूपवतीस आपल्या पतिचें आणि मुलाचें स्मरण होऊन. गहिंवर आला. तो कांहीं केल्या आवरेना. पुराण सरे पर्यंत ती तशीच रडत राहिली, ह्मणून जवळच्या सर्व स्त्रियांनीं तिला विचारिलें कीं, बाई, तूं एका एकीं कां रडूं लागलीस? रूपवती ह्मणाली, कायसांगू बाई, जसा हरिश्चंद्रराजावर प्रसंग आला तसाच सध्या माझे पतीवर आलेला आहे. त्याची गति काय झाली असेल कोण जाणे. स्त्रिया ह्मणाल्या, बाई, तुह्मी कोणच्या कोण आणि येथें कां आलांत बरें? हें ऐकून रूपवतीनें आपलें सर्व वर्तमान त्यांस सांगितलें त्या स्त्रियांत त्या नगरच्या राजाचे उपाध्यायाची स्त्री होती. तिनें तें सर्व ऐकिलें आणि रूपवतीस ह्मणाली, बाई, तुह्मांस तुमचे मुलाचा शोध लावणें असेल तर ह्या नगरचा राजा धार्मिक आणि दयाळु आहे त्याजला तुह्मीं आपलें वर्तमान कळवाल तर तो शोध लावून तुमचा मुलगा तुह्मांस भेटवील. रूपवती ह्मणाली, राजाची माझी कशी गांठ पडेल? उपाध्यायाची स्त्री ह्मणाली, तुह्मा करितां मी राणी जवळ गोष्ट काढीन, ह्मणजे

ती तुह्मास बोलावूं पाठवील. पण तुह्मी कोणाकडे उतरलां आहां? रूपवती ह्मणाली, मी सुंदरशेटीचे घरींच आहे.

अशीं त्यांचीं भाषणें होऊन सर्व स्त्रिया आप आपल्या घरीं गेल्या. रूपवती आणि सुंदरशेटीची बहीण ह्या दोघीही घरीं आल्या. सुंदर शेटीस हें वर्तमान त्यानीं कळविलें नाहीं. दुसरे दिवशीं उपाध्यायाची स्त्री राणी जवळ जाऊन गोष्टी बोलत बसली असतां तिला रूपवतीचें स्मरण होऊन तिची सर्व हकीकत तिनें राणीस सांगितली. राणीही फार दयाळू होती ह्मणून तिनें लागलीच दासीस पाठवून तिला बोलावून आणिलें आणि सर्व वृत्तांत विचारून घेतला. तो ऐकून राणीस फार वाईट वाटलें ह्मणून तिनें रूपवतीस आपले जवळच ठेवून घेतलें. रात्रीं राजा महालांत आल्यावर राणीनें तिची सर्व हकीकत राजास कळविली. राजा ह्मणाला, मी तिच्या मुलाचा शोध करवितों, परंतु तिच्या नवऱ्यास सोडविणें फार कठिण आहे. कारण मत्स्यपुरचा राजा बलवान आहे. त्याचे पुढें आमचें कांहीं चालावयाचें नाहीं. राणी ह्मणाली, तुह्मी दयाळु ह्मणवितां त्यापक्षीं तुह्मास कोणत्याही युक्तीनें हें काम केलेंच पाहिजे. राजा ह्मणाला, हें तर खरेंच आहे, परंतु त्याचे बरोबर लढाई करण्यास आह्मी टिकणार नाहीं. पद्मपुरच्या राजास जर हें वर्तमान कळेल तर तो आणि आह्मी मिळून त्याजपाशीं लढाई करूं. राणी ह्मणाली, अगोदर तिच्या मुलाचा शोध लावावा, नंतर मुला सुद्धां तिला पुष्पपुरास पोहोंचती करा. ह्मणजे ती राजास आपली सर्व हकीकत सांगेल मगतो तुमच्या मदतीनें युद्धाची तयारी करील. तुह्मीही त्याजला पत्र पाठवा. कोणी कडून तिची आणि मुलाची गांठ पडून नवऱ्याची भेट होईल असें करा ह्मणजे झालें.

असें त्यांचें भाषण झाल्यावर राजानें मुलगा कोणत्या गांवीं राहिला ह्मणून रूपवतीस विचारिलें ती ह्मणाली, मला त्या गांवाचें नांव माहीत नाहीं.

परंतु सुंदरशेटीनीं मला तेथून आणिलें, ह्मणून त्यांस माहीत असेल. असें ऐकून राजानें दुसरे दिवशीं सुंदरशेटीस बोलावणें पाठविलें. तेव्हां तो अगदीं घाबरून गेला. कारण त्यानें रूपवतीच्या अभिलाषाची बुद्धि धरिली होती, तें त्याच्या मनांत येऊं लागलें. तो कांपत कांपत राजाचे पुढें येऊन उभा राहिला. राजानें विचारिलें, शेटजी, जी स्त्री तुह्मी जहाजांतून आणिली आहे ती तुह्मांस कोणत्या गांवीं सांपडली? सुंदरशेट ह्मणाला. मी चंबलापुराहून गलबत हांकारून येत असतां नदींतील खडकावर ही होती. हिनें आह्मांस हाका मारिल्यावरून आह्मी गलबत थांबवून हिला वर घेतलें. हिनें आपल्या मुलाविषयीं आह्मास कळविलें, परंतु ओहोट फिरल्यामुळें गलबत अथवा होडी देखील वर जाईना आह्मी बहुत प्रयत्न करीत होतों. परंतु वाऱ्याचे झपाट्यामुळें एकाएकीं गलबत अनावर झालें. ह्मणून आह्मी हिला मात्र घरीं आणिली. ती आतां आपणाकडे आली आहे. हिच्या मुलाचा शोध चंबलापुरच्या राजाकडून करविला असतां लागेल.

असें शेटजीचें भाषण ऐकून राजानें चंबलापुरचे राजास मुलाचे शोधाविषयीं पत्र पाठविलें तें वाचून त्यानें आपणाकडे मुलगा सुखरूप असल्याचें उत्तर लिहिलें. त्यामुळें राजास आनंद झाला. आणि रूपवतीसही वाचून दाखविलें त्यामुळें तिला जो आनंद झाला तो हृदयांत मावेना. रूपवती राजास ह्मणाली, महाराज, आपण दयाळु ह्मणून मुलाचा शोध लाविला. आतां त्याची आणि माझी भेट होईल असें करा. तें ऐकून राजानें पुन्हा चंबलापुरचे राजास पत्र पाठवून मुलास आणविलें आणि रूपवतीचे स्वाधीन केलें. त्यावेळीं तिनें त्यास पोटाशीं धरिलें आणि ह्मणाली, माझ्या बाळा, तूं शतायुषी आहेस ह्मणून अशा प्रसंगातून वांचलास आतां माझें दुःख फिटणार असें वाटतें. असें बोलून तिनें त्याचें वारंवार चुंबन घेतलें आणि राणीस ह्मणाली; बाई, तुह्मीं मला हें बालक दिलें आहे. माझ्यानें तुमचे उपकार फेडवणार

नाहींत. तुह्मीं प्रजेचें पालन करीं आहां. ह्मणून तुह्मास माझी करुणा आली, आतां माझें सर्वस्वी बरें करण्याचें यश तुह्मी घ्यावें. तें ऐकून राणी ह्मणाली, बाई, तुह्मांस आह्मी आतां तुमचे घरीं पोहोंचवितो. तुह्मी पद्मपुरच्या राजास सर्व वर्तमान कळवावें. ह्मणजे तुमचे नवऱ्यास सोडविण्याची तजवीज होईल. असें बोलून तिचें समाधान केलें. पुढें चार दिवस गेल्यावर राजानें आपला एक सरदार आणि कांहीं स्वार बरोबर देऊन पालखींत बसवून मुला सुद्धा तिला पद्मपुरास पोहोंचती केली.

सुधर्मशेटीस फार दिवस जयसिंगाचा समाचार कळला नव्हता ह्मणून तो चिंतेत होता. इतक्यांत मुलासह रूपवती तेथें जाऊन पोहोंचली. तेथून गेल्यापासून घडलेलें सर्व वर्तमान तिनें त्यास कळविलें तें ऐकून सुधर्मशेटीस फार दुःख झालें.

दुसरे दिवशीं पद्मपुरचा राजा सभेस बसला असतां तेथें जाऊन आपला मुलगा सोडवून आणविण्याविषयीं सुधर्मशेटीनें विनंती केली ती ऐकून राजा त्याविषयीं विचार करीत आहे. इतक्यांत तालिचरिच्या राजाकडून त्यास पत्र आलें तें वाचून पाहून मत्स्यपुरचे राजाशीं लढाई करण्याचा विचार त्यानें चालविला. यासंबधानें त्यांचा परस्पर पत्र व्यवहार होऊन आणखी चंबलापुरचे राजाकडेही त्यानीं आपला वकील पाठवून त्याचें मत घेतलें. मत्स्यपुरचा राजा भद्रकेतु हा दुष्ट स्वभावाचा असल्यामुळें बहुत दिवस सर्व मांडलिक राजांचे मनांत त्याजविषयीं राग होताच आतां योग्य कारण झाल्यामुळें तिन्ही राजानीं एक मतें असें ठरविलें कीं, भद्रकेतु बरोबर लढाई करून त्याचें सर्व राज्य तिघानीं वाटून घ्यावें नंतर मत्स्यपुराचे नजीक दहा कोसावर एक मैदान आहे, तेथें एके दिवशींच तिघांचें लष्करानें मिळावें असा बेत करून त्याप्रमाणें ते तयार झाले. आणि तेथून त्यानीं भद्रकेतूकडे एक वकील पाठवून असें कळविलें कीं, जयसिंगशेटीस तुह्मीबंदींत

ठेविलें आहे, त्यास मुक्त करून आमचे स्वाधीन करावें आणि दंडा बद्दल पन्नास लक्ष रुपये द्यावे. असें न होईल तर लढाईस तयार असावें. असें वकिलाचें भाषण ऐकून राजानें उत्तर दिलें कीं, आम्हीं जयसिंगास सोडीत नाहीं. लढाईस सिद्ध आहों. हें त्याचें उत्तर ऐकून वकील परत आला. नंतर तिन्ही राजांनीं एकदम येऊन नगरास वेढा दिला. भद्रकेतू च्या लोकांनीं तटाचे बुरुजावरून मार चालविला. असें पाहून शत्रूचे लोक एका एकीं पूर्वकडील दरवाजा फोडून आंत शिरले. इतक्यांत भद्रकेतूचें दुसरें लष्कर बाहेरून आलें त्यांची यांची बराचवेळ लढाई झाली, भद्रकेतूचे लोक त्यावेळीं कमी असल्यामुळें त्याचा पराभव झाला. शत्रूंनीं जामदारखाना लुटून भद्रकेतु राजास कैद केलें आणि प्रजेच्या संरक्षणा करितां चांगला बंदोबस्त ठेविला. नंतर जयसिंग जेथें बंदींत होता, तेथें जाऊन सर्व कैदीलोकांस मुक्त केलें आणि जयसिंगासही मुक्त करून पद्मपुरास पोहोंचतें केलें. भद्रकेतूस त्याच्या सर्व कुटुंबा सुद्धां नजर कैदेंत ठेविलें. नंतर तें राज्य तिघांनीं वांटून घेतलें. जयसिंग घरीं आल्यावरून पवनीस जो आनंद झाला तो हृदयांत मावेना. तिनें झालेलें वर्तमान त्यास सांगितलें तें ऐकून आपल्या स्त्रीच्या पातिव्रत्याचे पुण्यानें मी सुटलों असें त्यानें जाणिलें. तो बाहेर कोठेंही नजातां आपला पूर्वीचा व्यापार चालवून स्त्री पुत्रांसह आनंदांत राहिला.

अग्निहोत्री ह्मणाला, चंद्रप्रभे, पहा त्या रूपवतीवर अनेक प्रसंग आले, परंतु तिच्या पातिव्रत्यामुळें ते सर्व दूर होऊन ती पुन्हा सुखानें नांदूं लागली. तसाच सध्या तुजवर जरी प्रसंग आहे तरी तुझें पातिव्रत्य सुफळ होईल. तूं अगदीं दुःख करूं नको. तुझा पुत्रही तुला मिळेल. तुझे नवऱ्याचीही तुजवर प्रीति होईल, हा माझा पूर्ण आशीर्वाद आहे. असें त्याचें भाषण ऐकून चंद्रप्रभेस आनंद झाला. तिनें त्यास आपले बापा सारिखें मानिलें होतें. त्याचे समाग-

मामुळें तिला नित्य पुराणश्रवण होत असे. असें कांहीं तिचे दिवस आनंदांत लोटले.

चिंतामणि ह्मणाला, रत्नाकरा, असें पहा कीं, ज्या स्त्रिया पातिव्रत्यानें वागतात त्या सर्वकाळ सुखपावतात. कदाचित् प्रारब्धयोगानें त्यांजवर प्रसंग आला तरी त्या आपलें व्रत न सोडितां त्यापासून मुक्त होऊन पुन्हा सुख भोगितात. तसेच जे पुरुष स्वस्त्रीच्या ठिकाणींच विषय भोगून आनंद मानितात, त्यांचें मन परस्त्रियांकडे जात नाहीं, ते इहलोकीं आणि परलोकींही सुखास पात्र होतात. ह्मणून परस्त्रीचा नाद सोड. तुझी स्त्री पतिव्रता आहे आणि रूपानेंही उत्तम आहे. सध्या तुझ्यासारखा दैववान् कोणीच नसेल, असें मला वाटतें. प्रपंचांत स्त्रीच कायती मुख्य आहे. ज्यास स्त्री नाहीं त्याचा प्रपंच नव्हे. परंतु जरती दुर्गुणी असली तर त्यासारखें दुःख दुसरें नाहीं. ह्मणून तूं दैववान् आहेस असें ह्मणतों. कां तुला कसें वाटतें? रत्नाकर ह्मणाला, मित्रा, तूं ह्मणतोस हें खरें, पण एकच वस्तु सर्वकाळ भोगिली ह्मणजे मन कंटाळून दुसरे वस्तूची इच्छा होते, असें, तूं पूर्वी बोलिलास त्याप्रमाणें माझे मनास होत आहे. आणि तूं गोष्टी सांगून दिवस घालवितोस. आतां सत्यभामेची आणि माझी भेट कधीं होणार? चिंतामणि ह्मणाला, रत्नाकरा, मी काल तिकडे गेलों होतों, तेव्हां तिची चौकशी केली. ती आजारी पडली आहे. रत्नाकर ह्मणाला, ती आजारी पडली असेल यांत संशय नाहीं. कारण मी जसा तिजकरितां कृश झालों तशीच ती झाली असेल, आणि तिला कामरोगाची व्यथा होऊन आतां ती मजकरितां मरणार असें वाटतें. चिंतामणि ह्मणाला, अरे, तूं वेडा आहेस. तुझ्या मनाला ती आवडली ह्मणून तुझा जीव तिकडे ओढतो. परंतु ती केवळ तुजवरच अवलंबून असेलसें नाहीं. व्यभिचारिणी स्त्रियांचे मनांत काम संचार झाला ह्मणजे त्या अनेक उपाय करून कामशांति करितात. लोकापवादास देखील

भीत नाहींत. यावरून ती तुझीच वाट पाहत राहिली आहे असें नाहीं. तूं मात्र वेडया माणसा नादीं लागला आहेस. रत्नाकर ह्मणाला एकून तूं मला मूर्ख ठरविलेंस. चिंतामणि ह्मणाला, अरे, मी तुला मूर्ख ह्मणत नाहीं. ज्याचे मनांत काम संचारला, त्याची स्थिति अशीच होत असते. तुला आजपर्यंत अनेक गोष्टी सांगितल्या, त्यावरून कोण कोणाची कशी स्थिति झाली हें तुझ्या लक्ष्यांतआहेच. असो, आतां तूं घरीं जा आणि उद्यां लवकर ये ह्मणजे तुला राहिलेली गोष्ट सांगेन.

असें चिंतामणीचें भाषण ऐकून रत्नाकर घरीं गेला. दुसरे दिवशीं नित्याप्रमाणें तो येऊन बसला असतां चिंतामणि पुढें गोष्ट सांगूं लागला.

चंद्रप्रभा बहुत दिवस अग्निहोत्र्याचे घरीं राहिली. परंतु तिला वारंवार मुलाचें स्मरण होत असे. त्यामुळें तिला चैन पडेना. एके दिवशीं ती अग्निहोत्र्यास ह्मणाली, महाराज, मी बहुत दिवस आपले घरीं राहिलें. येथें मला सुख आहे, परंतु असेंच राहून काळ घालविणें हें मला बरें दिसत नाहीं. माझ्या नवऱ्यानें मला अरण्यांत सोडिलें त्यादिवसापासून मी मरण पावलें असें समजून तो स्वस्थ राहिला असेल. दैवयोगानें मी जिवंत राहिलें आहें ह्मणून पुन्हा मी त्याजपाशीं जावें हें योग्य आहे. परंतु तिकडे गेलें असतां तो माझा अंगीकार करील किंवा नाहीं याची मला शंका आहे. याकरितां तसेंही एकाएकीं करितां येत नाहीं. आतां काय उपाय करावा हें मला सांगा. अग्निहोत्री ह्मणाला, तूं ह्मणतेस हें खरें आहे. परंतु ज्यापक्षीं तूं इतक्या संकटांतून वांचलीस आणि आपलें व्रत सोडिलें नाहींस, त्यापक्षीं तुजवर खचित त्याची प्रीति होऊन तूं सर्व सुखास पात्र होशील. परंतु तुझा मुलगा राणीबरोबर कैदेंत आहे तो मिळण्याचा उपाय प्रथम केला पाहिजे. मला असें वाटतें कीं, ज्या राजानें येथील राजास कैदेंत ठेविलें आहे तो राजा नीतिमान्, पराक्रमी आणि दयाळु असून वृद्धही आहे, असें मी

ऐकिलें आहे. त्यास तुझें हें वर्तमान कळलें तर तुझा मुलगा तो तुझे स्वाधीन करील. कां तुला कसें वाटतें ? चंद्रप्रभा ह्मणाली, महाराज, आपण युक्ति काढिली ही चांगली आहे, परंतु तो राजा सुस्वभावाचा आणि दयाळु आहे हें तरी खचित कळलें पाहिजे. अग्निहोत्री ह्मणाला, थोडक्याच दिवसांत मी त्याचा शोध करितों. तूं स्वस्थ रहा.

असें त्यांचें भाषण होऊन कांहीं दिवस गेल्यावर अग्निहोत्री भिक्षेकरितां विजयपुरास गेले. तेथें मदभंजन राजानें आपले प्रधाना कडून राज्यव्यवस्था नीट चालविली होती, ती सर्व ध्यानांत आणिली आणि आपल्या ओळखीचे लोकांसही विचारिलें. त्यावरून त्यांनी सांगितलें कीं, सुवर्णपुरचा राजा मदभंजन यानें हें राज्य घेतलें आहे. तो राजा दयाळु आणि धार्मिक असल्यामुळें सर्व प्रजेस सुख आहे. असें त्यांचें भाषण ऐकून अग्निहोत्री परत घरीं आले आणि चंद्रप्रभेस त्यांनीं तें वर्तमान कळविलें. दुसरे दिवशीं ते ह्मणाले, आतां मी सुवर्णपुरीस जाऊन राजाचे स्वभावाची परीक्षा करून येतों. चंद्रप्रभा ह्मणाली, महाराज, आपणांस मजकरितां फार श्रम पडत आहेत. आपण दयाळु आणि माझे पित्यासारखे आहां, ह्मणून मला कन्या मानून माझें पालन केलेंत, आणि पुढेंही माझे कल्याणाविषयीं श्रम घेत आहां. असो, आपले आशीर्वादानें माझे मनोरथ पूर्ण होवोत. अग्निहोत्री ह्मणाला, यांत मला श्रम नाहींत. मी सुवर्णपुरीस त्या दयाळु राजाकडे गेलों तर मला भिक्षाही चांगली मिळेल आणि तुझें कार्यही होईल. मजकरितां तूं खंती होऊं नको. असें बोलून आपले स्त्रीस अग्नीचें रक्षण करण्यास सांगून प्रातःकाळींच निघाले ते पायीं चालत चालत दुसरे दिवशीं सायंकाळीं सुवर्णपुरीस येऊन पोहोंचले आणि तेथील अग्निहोत्र्याकडे उतरले. त्यानें त्यांचा सन्मान केला आणि येण्याचें कारण विचारिलें. त्यावरून त्यांनीं सांगितलें कीं, मदभंजन राजा

दयाळु आणि उदार आहे असें ऐकिलें ह्मणून त्याची भेट घेण्याकरितां आलों आहें. तेथील अग्निहोत्री ह्मणाला, महाराज, राजा दयाळु ह्मणून ऐकिलें तें खरेंच आहे. त्याजकडे कोणी ब्राह्मण आला असतां त्याची इच्छा असेल ती तो पूर्ण करितो. त्यास याचकाचा कंटाळाच नाहीं. सर्व प्रजेस आपआपल्या धर्मानें वागवीत आहे. त्याची कीर्ति दिगंतरीं पसरली आहे. ह्मणून अनेक देशींचे ब्राह्मण त्याजकडे येऊन तृप्त होतात. आह्मास ही सर्वस्वी त्याचाच आधार आहे. तुह्मी त्याजकडे गेले असतां तुमची जी इच्छा असेल ती तो पूर्ण करील. असें त्याचें भाषण ऐकून दुसरे दिवशीं प्रातःकाळीं तो अग्निहोत्री उठून आपलें नित्यकर्म आटोपून राजास भेटण्याकरितां गेला. तों राजा स्नान करून गोप्रदान करीत होता. इतक्यांत तो तेथें पोहोंचला. त्याला पाहून राजानें सत्कार करून बसविलें आणि गोप्रदान झाल्यावर त्यांस ह्मणाला.

**राजा** — महाराज, आपण कोठें राहतां?

**अग्निहोत्री**- विजयपुरापासून एक कोसावर माझा आश्रम आहे.

**राजा** — घरीं आपलीं कोण कोण मनुष्यें आहेत.?

**अग्नि०** — माझी स्त्री आणि दोन मुलें अशीं तिघें आहेत. परंतु आणखी एक अनाथ स्त्री आमचे आश्रमांत येऊन राहिली आहे.

**राजा** - तुमचा निर्वाह कसा चालतो?

**अग्नि०** - मी अग्नि होत्री आहें. अग्निनारायण आमचें चालवितो.

**राजा** — आपण इकडे आलां, त्यापक्षीं कांहीं तरी इच्छा असेल.

**अग्नि०** - राजा, तुझी कीर्ति दिगंतरीं आहे ती ऐकून भेटीकरितां आलों आहें. माझी इच्छा आहे, परंतु देशील तर मागतों.

**राजा** - महाराज, मी ब्राह्मणांचा दास आहें. आपली काय इच्छा असेल ती पुरविण्यास मी तयार आहें.

**अग्नि०** – जी अनाथ स्त्री आमचे घरीं आहे ह्मणून मी सांगितलें, तिचा मुलगा तुह्मांकडे आहे तो तिला द्यावा. हें माझें मागणें आहे.

**राजा** – तिची काय व्यवस्था आहे.? आणि तिचा मुलगा आमचे राज्यांत कोणीकडे आहे हें सर्व मला सांगावें.

**अग्नि०** – राजा, तिनें आपली सर्व कथा मला सांगितली आहे तीच तुलासांगतों ऐक. ती इंद्रपुरच्या वीरसेन नामक राजाची कन्या असून विचित्रनगरीचे दुंदुभि राजाचापुत्र जो कमलाक्ष त्याची स्त्री आहे. लग्न झाल्यावर ती गर्भिणी असतां आपले पित्याचे घरीं कांहीं दिवस होती. तिला दुःस्वप्न पडलें ह्मणून बापानें तिला सासरीं पोहोंचविण्याकरितां मार्गस्थ केलें इतक्यांत तिचा नवरा कमलाक्ष मार्गांत भेटला. त्यानें शिकारीचे निमित्तानें तिला आपले बरोबर अरण्यांत नेऊन सोडिलें. त्याचें कारण तिला कांहींच माहीत नाहीं. ती तेथें न मरतां एका भिल्लाचे घरीं राहिली आणि तेथेंच प्रसूत झाली. तिला पुत्र झाला त्याचें नांव वनजात असें तिनें ठेविलें आहे. तोच तुह्मांकडे आहे. पुढें ती भिल्लाचे घरीं असतां विजयपुरचा जयवंत राजा यानें तिला आणून तिजवर पापदृष्टि ठेविली. जरी त्यानें तिचे अनेक प्रकारें हाल केले तरी ती पतिव्रता असल्यामुळें त्यास वश झाली नाहीं. इतक्यांत तुह्मास बुद्धि होऊन त्याचें राज्य तुह्मीं घेतलें. जेव्हां तुमचें लष्कर नगरांत शिरलें तेव्हां रयतेची पळापळ झाली. त्या संधींत ती एका दासीस बरोबर घेऊन रात्रीची गांवा बाहेर आली. मी ही त्या धांदलींत सांपडलेला भिभावून घरीं जात असतां पिंपळाचे पारावर तिची माझी गांठ पडली. तेव्हांपासून ती माझ्या आश्रमांत येऊन राहिली आहे. तिचामुलगा विजयपुरच्या राणीनें आपले महालांत नेलेला असतां तुमच्या सरदारांनीं राणीस धरून आणिलें तेव्हां तिचाच मुलगा असें समजून त्यांनीं तो इकडे आणिला आहे. चंद्रप्रभा रात्रंदिवसत्या

मुलाचे वियोगामुळें व्याकुळ होत असते, ह्मणून मी तुह्माकडे आलों. आतां तिचा मुलगा तिला देऊन सुखी करावें. एवढेंच माझें मागणें आहे.

**राजा** — बरें, महाराज, आपण ह्मणतां तसें करितों. परंतु तिलाच इकडे पाठवाल तर बरें होईल. कारण ती राजकन्या आहे आणि वीरसेन जो तिचा पिता तो आमचा मित्र आहे. माझे पोटीं संतती नाहीं, याकरितां मी तिला कन्या मानून तिचें पालन करीन.

**अग्नि॰** — असें केल्यास फार चांगलें आहे. राजा, तुझी कीर्ति जशी ऐकिली तशीच आहे. त्या तुझ्या सत्कृत्यापासून ईश्वर तुला प्रसन्न होईल. आतां मी घरीं जातों.

असें त्याचें भाषण ऐकून राजानें त्यास एक हजार रुपये देऊन सांगितलें, महाराज, ही दक्षिणा अग्नीला मी आर्पण केली आहे. हिचा अंगीकार करावा. असें ह्मणतांच त्यानें ते घेतले आणि तेथून निघून विह्माडीं आला. तेथेंही राजाची स्तुति केली. नंतर दुसरे दिवशीं तो निघाला. राजानें त्याचे बरोबरच चंद्रप्रभेला आणण्या करितां पालखी आणि स्वार रवाना केले. ते दुसरे दिवशीं आश्रमांत येऊन पोहोंचले. अग्निहोत्र्यानें झालेलें सर्व वर्तमान चंद्रप्रभेस सांगितलें. राजा धार्मिक व दयाळु असून तो आपणांस कन्या मानून आपलें पालन करणार आहे आणि आपला पुत्र खुशाल आहे, हें ऐकून तिला फारच आनंद झाला. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं तिच्या रवानगीची तयारी केली. अग्निहोत्र्याचे स्त्रीनें तिला न्हाऊं घातलें. नंतर षड्रस पक्वान्नांचें भोजन सर्वत्रांनीं केलें. चंद्रप्रभेची ओंटी भरिली. चंद्रप्रभेनें आपल्या हातांतील सोन्याचें कंकण अग्निहोत्र्याचे स्त्रीचे हातीं घातलें आणि ह्मणाली, बाई, तुह्मीं माते सारिखा माझा प्रतिपाळ केला. मजवर तुमचे फारच उपकार झाले आहेत. पुढें तुमच्या

आशीर्वादानें मी आपल्या ठिकाणीं जाऊन सुखरूप नांदावें हेंच मागणें आहे. आतां मला आज्ञा असावी. असें ऐकतांच तिनें अष्टपुत्रासौभाग्यवती हो ह्मणून आशीर्वाद दिला. तसाच अग्निहोत्री यांनींही आशीर्वाद देऊन तिला पालखींत बसविलें आणि बरोबरचे दासीस ह्मणाले कीं, आतां तूं हिला संभाळ ही तुझें कल्याण करील. असें बोलून आश्रमाचे बाहेरील तळ्यापर्यंत तीं उभयतां पोहोंचवीत आलीं. नंतर तीं दिसत नाहीशीं होईपर्यंत तेथें उभीं राहून परत गेलीं.

चंद्रप्रभा सर्व मंडळीसुद्धां दुसरे दिवशीं सुवर्णपुरास येऊन पोहोंचली. राजानें तिचें वर्तमान अगोदरच राणीस कळविलें होतें, ह्मणून ती वाट पाहत होती. इतक्यांत चंद्रप्रभा आल्याचें वर्तमान राणीस दासींनीं कळविलें. राणीनें बाहेर येऊन तिला हातीं धरून घरांत नेलें आणि तिची सर्व प्रकारें व्यवस्था ठेविली. तें वर्तमान मदभंजन राजास कळतांच त्यानें तिच्या पुत्रास आणून तिचे स्वाधीन केलें. बालकास पाहून तिला प्रेमाश्रु आले आणि उचलून तिनें त्याचें चुंबन घेऊन पोटाशीं धरिलें. बहुत दिवस अंतरलेला मुलगा प्राप्त झाल्यामुळें तिला फारच आनंद झाला. त्याचें लालन पालन चांगल्याप्रकारें होऊं लागलें. चंद्रप्रभेस त्यांनीं आपली कन्या असें मानिलें त्यामुळें तिला पतिवियोगावांचून दुसरें कोणतेंच दुःख राहिलें नाहीं. तिचे दिवस आनंदांत जाऊं लागले. तिनें नित्य प्रातःकाळीं उठून तुळशीचें पूजन करावें आणि पिंपळास प्रदक्षिणा घालाव्या, दोनप्रहरीं भोजन झाल्यावर पुराण श्रवण करावें, असा पाठ घातला. राजानें तिचें आचरण उत्तम पाहिलें ह्मणून त्यासही फार आनंद झाला.

चंद्रप्रभेस तेथें राहून चार वर्षें झालीं. इतका काळ तिनें वनजानाचे लालन पालनांत घालविला. त्याचे तोबडे बोल ऐकून मदभंजन

राजासही फार आनंद होत असे. त्यानें वारंवार येऊन त्याचें चुंबन घ्यावें. त्याचे बोबडे शब्द ऐकण्याकरितां त्याच्याशीं भाषण करावें असा तो मुलगा सर्वांस आवडता झाला.

एके दिवशीं वनजात सायंकाळीं राजवाड्याचे पुढील मंडपांत मुलांशीं खेळत असतां त्यास प्रधानाचे मुलानें ढकलून दिलें. ह्मणून तो ह्मणाला, माझा बाबा कचेरींत आहे, तो आल्यावर मी त्यास सांगून तुला शिक्षा करवीन. प्रधानपुत्र ह्मणाला, तो तुझा बाप नव्हे; तुझा बाप कोठें आहे कोण जाणें. वनजात ह्मणाला, असें कां ह्मणतोस? प्रधानपुत्र ह्मणाला, तूं आपलें आईस विचारून पहा ह्मणजे खरें किंवा खोटें हें कळेल. असें त्याचें भाषण ऐकून त्यास फार वाईट वाटलें ह्मणून तो तेथें न राहतां लागलाच आईजवळ जाऊन रडूं लागला.

**चंद्रप्रभा** – कां बाळा, तुला कोणीं मारिलें ?

**वनजात** – मला प्रधानाचे मुलानें ढकलून दिलें, ह्मणून मी कचेरींतून बाबा आला ह्मणजे त्यास सांगेन असें बोललों, तेव्हां तो ह्मणाला, तो तुझा बाप नव्हे. तर तो मला असें कां बोलला बरें ?

**चंद्र०** – बाळा, तुला तो बोलला तें खरेंच आहे. कचेरींत गेला आहे तो माझा बाबा आहे.

**वन०** – तर मग माझा बाबा कोठें आहे बरें ?

**चंद्र०** – त्यांचें राज्य येथून फार दूर आहे, तिकडे ते आहेत. मी आपल्या बापाचे घरीं आलें आहें.

**वन०** – बरें तर, माझ्या बापाचें नांव काय बरें ?

**चंद्र०** – तें तुला ही दासी सांगेल.

**वन०** – आई, तूं कांबरें सांगत नाहींस ?

**चंद्र०** – मी, नांव सांगूं नये असें शास्त्र आहे.

**वन०** — बरें तर, मी दासीस विचारितों (दासीकडे पाहून) यमुने, माझ्या बापाचें नांव कायग?

**यमुना** — बाळा, तुझ्या बापाचें नांव कमलाक्ष आहे.

**वन०** — बरें आई, आतां आपणांस बाबाकडे केव्हां जावयाचें?

**चंद्र०** — आतां थोडक्याच दिवसांनीं जाऊं.

असें ऐकून वनजात उगीच राहिला आणि पुन्हा खेळावयास गेला. इतक्यांत एक व्यापारी कांहीं जवाहिराचे दागिने घेऊन त्या वाड्याचे दरवाज्यावरून चालला असतां राणीस कांहीं जवाहिर घ्यावयाचें होतें ह्मणून दासीनें त्यास वर बोलाविलें. राणी त्याचे जवळचे सर्व दागिने पाहत आहे. तों चंद्रप्रभाही तेथें आली आणि पाहूं लागली तों त्यांत एक आंगठी तिच्या दृष्टीस पडली ह्मणून पाहण्याकरितां ती त्या व्यापाऱ्या जवळून तिनें आपले हातांत घेतली. निरखून पाहते तों ही आपली हरवलेली आंगठी आहे, असें तिला खचित वाटलें. ह्मणून त्यास तिनें विचारिलें कीं, ही आंगठी तुला कोठें मिळाली? व्यापारी ह्मणाला, मी दुसऱ्या एका व्यापाऱ्या पासून विकत घेतली आहे. चंद्रप्रभा ह्मणाली, ही आंगठी माझी आहे. ही हरवल्यास सुमारें पांच वर्षें झालीं. ही तुमच्या हातीं कशी आली असेल ती असो, परंतु आतां मला ही विकत घ्यावयाची आहे. व्यापारी ह्मणाला, बरें आहे. मी पांचशें रुपयांस घेतली आहे. ही तुमची ह्मणतां ह्मणून मी तेवढ्याच किंमतीस तुह्मास देतों. असें त्याचें भाषण ऐकून चंद्रप्रभेनें राणी करवीं ती आंगठी विकत घेवून आपले हातांत घातली. कांहीं दागिने राणीचे मनास आले ते तिनें घेतले आणि व्यापारी निघून गेला.

ती आंगठी चंद्रप्रभेचे हातांत येतांच तिला आनंद झाला आणि मनांत ह्मणाली कीं, ही हरवल्यापासून मजवर सर्व संकटें येऊन पडलीं. आतां माझे हातीं आली आहे, यावरून माझे सुखाचे दिवस जवळ आले असें वाटतें. भग-

वदिच्छा काय असेल ती असो, असे मनांत आणून उगीच राहिली.

कांहीं दिवस गेल्यावर चंद्रप्रभेच्या भाग्योदयाचा समय जवळ आला. तो असा कीं, विचित्रनगरीचा दुंदुभि राजा ( चंद्रप्रभेचा सासरा ) हाही दानधर्म करीत असे आणि आपल्या प्रजेस स्वधर्मानें व नीतीनें वागवीत असे. त्यास असा अभिमान होता कीं, मजसारिखा राजा कोणीच नसेल. असें असतां एके दिवशीं एक विद्वान् ब्राह्मण राजाचे सभेंत येऊन उभा राहिला. राजानें त्यास विचारिलें कीं, महाराज, काय इच्छा आहे? ब्राह्मण ह्मणाला. राजा, तुझी कीर्ति ऐकून मी येथें आलों असतां तुझ्या द्वारपाळांनीं माझा अपमान केला. आतां तूं कितीही दिलेंस तरी तें घेऊन मला आनंद होणार नाहीं. धन्य त्या सुवर्णपुरीच्या मदभंजन राजाची. त्याचे द्वारीं कोणाचाही अपमान नाहीं. आणि जीजी इच्छा असेल तीती तो पुरवितो. राजा, आतां मी जातों. मला तुझें कांहीं नको. असें बोलून तो ब्राह्मण रागानें जाऊं लागला, ह्मणून राजानें सिंहासनावरून उतरून त्याचे पाय धरिले आणि क्षमा मागितली; त्यामुळें ब्राह्मण शांत झाला. राजानें त्यास दोन हजार मोहरा देऊन पोहोंचतें केलें. आणि त्या दिवसापासून ब्राह्मणाचा अपमान न होण्याविषयीं बंदोबस्त ठेविला. परंतु तो राजा अभिमानी असल्यामुळें ब्राह्मणानें मदभंजन राजाची स्तुति केली ती त्यास सहन झाली नाहीं. तो आपले प्रधानास ह्मणाला कीं, मदभंजन राजा आपल्याहून कीर्तिमान् झाला आहे, याकरितां त्याचें राज्य घेण्याची तजवीज करावी. प्रधानही राजासारखाच अभिमानी होता. ह्मणून त्याचेंही मत तसेंच पडलें. नंतर राजानें आपल्या पुत्राचें ही ( कमलाक्षाचें ) मत घेऊन सुवर्णपुरीवर युद्धास जावयाची तयारी करविली आणि पुढें वकील पाठविला.

इकडे मदभंजन राजा सभेंत बसला असतां तो वकील तेथें येऊन पोहोंचला. राजानें त्यास विचारिलें कीं, आपण कोण आणि कां आलां?

तो ह्मणाला मी विचित्रपुरीच्या दुंदुभि राजाचा वकील आहें. आमच्या राजाचें असें ह्मणणें आहे कीं, तुह्मी प्रति वर्षी दहा लक्ष मोहोरा आह्मास खंडणी बद्दल द्याव्या. असें तुमच्यानें न होईल तर युद्धास सिद्ध व्हावें. तें ऐकून राजा ह्मणाला, बरें आहे. आपण दोन दिवस येथेंच रहावें आह्मीं विचार करून उत्तर देतों. नंतर तो वकील तेथें राहिला. राजानें त्याची बरदास्त उत्तम प्रकारें ठेविली. नंतर आपले प्रधानास विचारिलें कीं, आतां कसें करावयाचें? प्रधान ह्मणाला, तो राजा पराक्रमी आहे. त्याचे जवळ सेना बहुत आहे. आजपर्यंत त्यानें कित्येक राजांपासून खंडण्याही घेतल्या आहेत. ज्यांनीं न दिल्या त्यांशीं त्यानें लढाई करून त्यांचीं राज्यें हिरून घेऊन त्यास बंदीत ठेविलें आहे. असें असतां आपण त्याशीं युद्धास टिकूं असें मला वाटत नाहीं. ह्मणून कांहींतरी खंडणी देण्याचें कबूल करणें भाग आहे. असें प्रधानाचें मत ऐकून राजा महालांत आला. तो चिंताक्रांत दिसल्यामुळें राणीनें त्यास विचारिलें कीं, महाराज, आज आपण चिंताक्रांत कां दिसतां? राजा ह्मणाला, चंद्रप्रभेस आपण येथें ठेविलें आहे त्यामुळेंच एक विघ्न आलें आहे असें वाटतें. राणी ह्मणाली तें काय बरें? राजा ह्मणाला, हिच्या सासऱ्यानें खंडणी मागण्यास वकील पाठविला आहे. खंडणी न दिली तर युद्धास सिद्ध असावें असें त्याचें ह्मणणें आहे. आतां जर खंडणी द्यावी तर प्रतिवर्षी अशीच द्यावी लागेल. युद्धास सिद्ध व्हावें तर आह्मांजवळ त्यास जिंकण्यासारखी सेना नाहीं. त्याकरितां चिंतेंत पडलों आहें. राणी ह्मणाली, धर्मकरितां कर्म पाठीस लागतें असें ह्मणणें आहे तें खरें आहे. जर चंद्रप्रभे करितांच त्यांनीं असें केलें असेल तर तिला त्यांचे स्वाधीन करावें हें बरें, पण आपण अगोदर ती काय ह्मणते तें पाहूं. असें बोलून तिनें चंद्रप्रभेस तेथें बोलाविलें आणि झालेली सर्व हकीकत तिला कळविली. चंद्रप्रभा ह्मणाली, मला पतीनें अरण्यांत सोडिलें, त्यादिवसापासून मी मरण

पावेनें असें ते समजून राहिले असतील. आजपर्यंत तुह्मा वांचून मी कोणास-
ही आपली गोष्ट कळविली नाहीं. असें असतां मी तुमचे राज्यांत आहें हें
त्यांस कसें कळेल? कदाचित् कळलें असेल तर, तुह्मी मला धर्मकन्या ह्म-
णून पाळिली आहे हेंही त्यांस कळलेंच असेल. माझे मतें मजकरितां त्या-
नीं वकील पाठविलेला नसावा. आतां जशी आपली मर्जी असेल तसें करा-
वें. राजा ह्मणाला, आमच्यानें खंडणी देववत नाहीं आणि युद्धही करवत
नाहीं. याकरितां त्यावकिलाचे मनें तुलाच तिकडे पाठविण्याचा विचार क-
रितों. चंद्रप्रभा ह्मणाली, बापा, आपण असें केलें तर तेथें माझा उपाय
नाहीं. पुन्हा दुःख भोगणें माझे कपाळीं येईल. याकरितां आपण असें
करूं नये. तुमच्यानें खंडणी देववत नसेल तर युद्धाची तयारी करावी. क्ष-
त्रियांस युद्ध करणें हा मुख्य धर्म आहे. जय आणि पराजय हे केवळ सैन्या-
चे संख्येवर नाहींत. तूं धार्मिक आणि दानशूर आहेस. याकरितां तुलाच
जय प्राप्त होईल यांत संशय नाहीं. राणी ह्मणाली, युद्धही अक्षरें तोंडानें
मात्र लवकर येतात, परंतु तेथें गेल्यावर कायस्थिति होत असेल ती ल-
ढणारासच माहीत. बरें, इतकेंही करून जय मिळाला तर बरें. नाहीं तर आ-
ह्मांस सर्वस्वी दुःख भोगावें लागेल. यासाठीं तूं तिकडे जावें हेंच मला बरें
दिसतें.

असें उभयतांचें भाषण ऐकून चंद्रप्रभेस फार वाईट वाटलें. आणि
ह्मणाली, बापा, मी आपल्या मतें निरपराधी आहें. परंतु पतीचे मनांत म-
जविषयीं कांहीं तरी शंका येऊन मजला त्यांनीं अरण्यांत सोडिलें. जर मी ति-
कडे गेलें तर ते माझा अंगीकार न करितां मला दुःख समुद्रांत टाकितील.
असा विचार करून मी तुला बाप मानून तुझा आश्रय धरिला असें अस-
तां तूं मला तिकडे पाठविणार त्यापेक्षां मला येथेंच विष देशील तर, बरें आ-
हे. माझा पुत्र तुझ्या स्वाधीन आहे, त्याचें तूं पाहिजे तसें कर.

असें चंद्रप्रभेचें भाषण ऐकून राजास दया आली, आणि ह्मणाला, खंड-णी देण्याचें कबूल करितों ह्मणजे झालें. चंद्रप्रभा ह्मणाली, माझे मतें आपण खंडणी देऊं नये, युद्धच करावें. राजा ह्मणाला, युद्ध करण्या सारखी फौज आ-ह्मा जवळ नाहीं. शत्रूजवळ अपार सेना आहे. त्यामुळें आह्मांस तो जिंकील यांत संशय नाहीं. उगाच सेनेंतील कित्येक लोकांचे प्राण जाऊन शेवटीं आपणांस शत्रूचे बंदींत रहावें लागेल. यासाठीं युद्ध करावें हें नीट नाहीं. चंद्रप्रभा ह्मणाली, मी तुह्मांस निश्चयानें सांगतें कीं, ह्या युद्धांत तुमचाच जय होईल. राजा ह्मणाला, हें तुला तरी काय माहीत आहे? जय आणि पराजय हे स्वाधीन नाहींत. तूं आतां स्वस्थ रहा. मला पाहिजे तसें मी क-रीन. स्त्रियांची बुद्धि राजकीय कामांत उपयोगी नाहीं. चंद्रप्रभा ह्मणाली, स्त्रियांची बुद्धि उपयोगी नाहीं, खरी परंतु एखादे वेळीं त्यांचे बुद्धीचाही उ-पयोग होत असतो. याकरितां तुह्मी युद्धच करावें. युद्धास भिऊन खंडणी देणें हें शूर पुरुषांचें काम नव्हे. सद्गुरूच्या कृपेनें माझे सारखी स्त्री ही यु-द्ध करून जय मिळवील. तुह्मानें युद्ध करवत नसेल तर मला आज्ञा कर मी जाऊन त्याचा पराभव करून त्यास धरून आणितें. राजा ह्मणाला, ह्या गोष्टी घरांतच सांगावयाच्या. मोठमोठे शूर पुरुष युद्धांत कंपायमान होत असतात. आतां तुझ्या गोष्टी पुरेत. असें बोलून राजा उठून जाऊं लागला. चंद्रप्रभेनें धांवत जाऊन त्याचे पाय धरिले आणि ह्मणाली, बाबा, माझी एक गोष्ट ऐकावी मग आपल्या मनास येईल तसें करावें. असें ह्मणतां-च राजा उभा राहिला. चंद्रप्रभा ह्मणाली, मी ह्या युद्धांत जय होईल अ-सें ह्मणतें याचें कारण असें कीं, मी लहान असतां माझे पित्यानें मला एका सिद्ध पुरुषाचे दर्शनास नेलें होतें तेव्हां त्या सिद्धानें मला एक मंत्र शिकवून सांगितलें कीं, तूं नित्य ह्याचा जप करीत जा. ह्मणजे मोठेपणीं तु-जवर एक युद्ध प्रसंग येणार आहे. त्या समयीं तुझ्या मनांत येईल तें शस्त्र

अथवा अस्त्र निर्माण होऊन शत्रूचा पराभव होईल. त्या मंत्राचा जप गुरूच्या आज्ञे प्रमाणे मी केलेला आहे. याकरितां सर्वकाळ माझा जयच होईल. आतां तुह्मी युद्धाची तयारी करावी. मी प्रथमच युद्धास जावें हें नीट नाहीं या करितां तुह्मी प्रथम युद्ध करावें. इतक्यांत मी येऊन शत्रूस एका एकीं धरून आणीन. हें तिचें भाषण ऐकून राजास आश्चर्य वाटलें आणि ह्मणाला. चंद्रप्रभे, तूं मला सांगितलेंस हें मी कशावरून खरें मानावें ? चंद्रप्रभा ह्मणाली. खरेपणाविषयीं मी आपणांस आतांच प्रतीती दाखवितें. असें बोलून चमत्कार दाखविण्याकरितां गुरूचें स्मरण केलें, आणि मंत्राचा जप केला. इतक्यांत चार पुरुष हातांत तरवारी घेऊन तेथें उत्पन्न झाले. आणि ह्मणाले काय आज्ञा आहे? चंद्रप्रभा ह्मणाली, ह्यावेळीं कांहीं आज्ञा नाहीं. यास प्रतीती दाखविण्या करितां तुह्मांस मी बोलाविलें परंतु आतां क्षमा करून पुन्हा स्मरण करीन त्यावेळीं यावें. असें बोलून पुन्हा मंत्राचा जप केला. तों ते पुरुष नाहींसे झाले. हा अद्भुत चमत्कार राजानें पाहिल्या बरोबर त्यास तिचें सांगणें खरें वाटून शत्रूशीं युद्ध करण्याचें धैर्य आलें.

दुसरे दिवशीं राजानें वकिलास सभेंत बोलावून सांगितलें कीं, आह्मी आज पर्यंत खंडणी दिली नसतां आह्मांपासून तुमचा राजा खंडणी घेण्याची इच्छा करितो याचें कारण काय? हें तुह्मी त्यास विचारून त्याचें उत्तर आह्मांस कळवावें. तसें नसेल तर आह्मी युद्धास सिद्ध आहों, परंतु खंडणी देणार नाहीं. असें राजाचें भाषण ऐकून वकील परत निघून गेला. आणि मदभंजनराजानें केलेल्या प्रश्नाचें उत्तर आपले राजास विचारूं लागला. तेव्हां त्यानें सांगितलें कीं, आतां त्यास उत्तर पाठविण्याचें कारण नाहीं. आह्मी युद्धाची तयारी करितों. असें बोलून आपले सेनापतीस सेना तयार करण्याविषयीं आज्ञा केली. त्यानें चार दिवसांचे आंत सर्व तयारी केली. नंतर राजानें कमलाक्षास युद्धास जाण्याविषयीं आज्ञा केली. तो शूर असल्यामुळें -

आज्ञेची वाट पाहत होता. ह्मणून लागलाच तयार झाला. नंतर तें सर्व लष्कर तिसरे दिवशीं सुवर्णपुरीच्या आलीकडे एक कोसावर एक मोठें मेदान होतें, तेथें येऊन पोहोंचलें त्याची संख्या एक लक्ष होती.

इकडे मदभंजन राजाचे सेनापतीनें आपली सेना फारच थोडी (पन्नास हजार) ह्मणून चातुर्यानें तिची योजना केली. ती अशी कीं, दहाहजार फौज नगरापासून दोन कोशांवर लांब ठेविली. आणि वीस हजार फौज तटाचे बाहेरचे मैदानांत ठेविली. बाकी राहिलेली वीस हजार तटाचे आंत चार दिशांचे चार हीदरवाज्यांवर निरनिराळ्या टोळ्या करून ठेविली. आणि आपल्या सरदारांस असें सांगितलें कीं, फार चातुर्यानें युद्ध केलें पाहिजे. कारण शत्रूची सेना ज्यास्ती आहे आणि आपली कमी आहे. याकरितां आपले लोकांनीं जिवावर उदार होऊन लढावें. तें ऐकून सर्व सरदार तसेच हुशारीनें राहिले. इतक्यांत कमलाक्षानें आपली सर्व सेना एका एकीं नगराच्या तटाजवळचे मैदानापर्यंत आणिली. तेथें त्यांचें यांचें परस्पर युद्ध होऊं लागलें. मदभंजनाचे सेनेनें असा पराक्रम केला कीं, दोन घटिका पर्यंत त्यांस पुढें येऊं दिलें नाहीं. शेवटीं शत्रूच्या लोकांनीं त्याजवर तोफांचा भडिमार चालविला ह्मणून त्यांचा कांहींच उपाय चालेनासा झाला. नंतर ते प्राणावर उदार होऊन एकदम शत्रूच्या सेनेंत शिरले. आणि विचार न करितां तोंडील तोंडीत त्यांनीं सुमारें तीस हजार फौज मारिली. त्या लढाईंत मदभंजनाचे वीस हजारां पैकीं सुमारें पंचवीस शिपाई मात्र जिवंत राहिले. ते तसेच पुढें जाऊन जिकडे दोन कोशांवर दहा हजार सेना होती तिकडे मिळाले आणि त्या फौजेंतील सरदारांसतें वर्तमान कळविलें तेव्हां त्यांनींहीं तिकडून शत्रूवर चाल केली.

इकडे कमलाक्षानें विचार केला कीं, मैदानांतील शत्रूची सेना तर सर्व पडली. आतां आपण तटाचे आंत जाण्याचा उपाय करावा. असें मनांत आणून तटाचे दरवाज्या जवळ आपलें सैन्य आणिलें इतक्यांत आंतील लोकांनीं

बुरुजावरून तोफांचा भडिमार चालविला त्यामुळें कमलाक्षाचे लोकांनीं त्याद-रवाज्याजवळ जाण्याचें सोडून दुसरे बाजूच्या दरवाज्याकडे जाण्यास मो-रचा फिरविला. आणि तेथें जाऊन एका एकीं तोफांचा भडिमार तटावर चा-लविला. आंतील लोकांनींही तोफा सुरू केल्या. परंतु बाहेरील लोक अ-गदीं तटाचे जवळच असल्यामुळें आंतील लोकांचे गोळे लांब अंतरावर पडूं लागले. इतक्यांत मदभंजन राजाची दहाहजार सेना बाहेर होती, ती तेथें येऊन पोहोंचली. त्यांतील सरदारानें शत्रूची सेना तटाचे नजी-क असून आंत जाण्यास उपाय करीत आहे. असें पाहिलें ह्मणून त्या-नें पश्चिमेच्या दरवाज्यानें आपली सेना आंत नेली, आणि जिकडे तट पाडण्यास शत्रु प्रयत्न करीत होते त्या दरवाज्याजवळ आंतल्या वाटेनें येऊन तो मिळाला. इतक्यांत कमलाक्षानें त्या नगरा सभोंवती आप-ल्या सेनेचा वेढा दिला. बाहेरील लोकांनीं तट पाडण्यास आरंभ केला. ह्मणून आंतील सरदार घाबरून गेले. त्यानीं राजास कळविलें. राजानें चंद्रप्रभेस कळवितांच तिनें पुरुषाचा पोषाख करून कांच्या भिडवून आंगांत चिलखत घातलें आणि डोकीस पेंचदार मंदील बांधून हातांत तरवार घेऊन गुरूचें स्मरण केलें आणि घोड्यावर बसली. तिनें राजा-स आपल्या बरोबर घेऊन ज्या दरवाज्यावर बाहेरचे बाजूस कमलाक्ष होता. तो दरवाजा उघडून तीसहजार सेनेसह एका एकीं बाहेर पडली. इत-क्यांत बाहेरील सेना त्यासेनेशीं लढूं लागली. परंतु ती चारी दरवाज्योवर वांट लेली होती ह्मणून तेथें थोडी असल्यामुळें आंतील सेनेनें ती सर्व मारून टाकिली. इतक्यांत चंद्रप्रभेनें मंत्राचा जप करून कमलाक्षावर नागपाश टा-किला. त्यामुळें तो बांधला गेला. मग तसाच धरून फार त्वरेनें आपल्या सर्व फौजे सुद्धां पुनः त्याच दरवाज्यानें आंत येऊन दरवाजा बंद करून. बुरुजा-वर बावटा लाविला. तो पाहून बाहेरचे लोक तट पाडण्याचें सोडून आपला

धर्नी शत्रूंनीं धरून नेला. ह्मणून परत नगरास गेले.

इकडे मदभंजनराजा आणि चंद्रप्रभा यांनीं कमलाक्षास आणून एका सुंदर मंदिरांत ठेविलें त्या मंदिरांतील जमीन नीळवर्ण पाषाणांची असून फार घोटींव असल्यामुळें केवळ नीळ रत्नांनींच मढविलेली आहे कीं काय असें भासे. सर्व भिंती संगमरवरी पाषाणाच्या असून त्याही घोटींव होत्या ह्मणून केवळ स्फटिकाच्याच आहेत कीं काय असें दिसत असे. तक्तपोशीस छत लालमखमाली असून त्याचे खालीं हिरव्या, पिंवळ्या व पांढऱ्या रंगांचीं झुंबरें, हंड्या आणि नानारंगी कांचेचे गोळे तसेंच शिंपल्याच्या कांतींव मोत्यांचे घोंस लटकत होते. सर्व खिडक्यांस रंगी बेरंगी कांचेचीं झडपें अत्यंत शोभायमान होतीं. मध्यभागचे खांब रंगी बेरंगी दगडाचे असून त्याजवर नानाप्रकारचे कोरींव पुतळे होते. त्यांचें एकमेकांवर प्रतिबिंब पडल्यामुळें ते केवळ जिवंतच जडले आहेत असें भासे. जमिनीची प्रभा छतावर आणि छताची जमिनीवर पडल्यामुळें तीं कोणकोणत्या रंगाचीं आहेत हें लवकर ध्यानांत येत नसे. अशा बंगल्यांत पर्यंकादि सुखोपभोगाचें साहित्य जिकडे जसें जसें असावें तसें तसें सर्व व्यवस्थेनें होतें. कमलाक्षाचे सेवेकरितां चाकर इत्यादि सर्व योग्यतेनुरूप ठेविले होते. कोणत्याही गोष्टीविषयीं त्यास न्यूनता पडूं नये अशी त्याची सर्व व्यवस्था ठेविली. त्यांत इतकेंच कमी होतें कीं, तेथें स्त्री मात्र त्याजपाशीं नव्हती बाकी सर्व सुखोपभोग स्वगृहापेक्षां अधिक राखिले होते. अशा उत्तम स्थितीत त्यास तेथें ठेविलें. इतक्यांत रात्र झाली ह्मणून पुरुषवेशधारी चंद्रप्रभा आदिकरून सर्व लोक आपआपल्या ठिकाणीं गेले. राजाही आपले वाड्यांत गेला. नंतर त्यानें चंद्रप्रभेस बोलाविलें आणि ह्मणाला, शाबास! तूं स्त्री असून आज मोठा पराक्रम केलास. आमचे प्राण, कीर्ति व राज्य यांचें संरक्षण तूंच केलेंस. यावरून त्या जगांत तूं धन्य आहेस. मी आज पर्यंत तुझें पालन के-

त्याचें सार्थक आज झालें. आतां इतकेंच माझें ह्मणणें आहे कीं, तूं आप त्या पतीस आतांच ओळख देऊं नको. तो येथें बहुत दिवस राहिला नरी त्यास आह्मी दुःख देणार नाहीं. त्याजपाशीं तूं नित्य पुरुषवेशानें भेटत असावें. त्यास रणसिंह असें आपलें नांव सांगून त्याच्याशीं चातुर्याचीं भाषणें करावीं. जेणें करून त्याचे हृदयांत तुझें स्मरण, करुणा आणि पश्चात्ताप उत्पन्न होईल. तेव्हां आपलें खरें रूप त्यास दाखीव ह्मणजे तुला सर्वकाळ आनंद प्राप्त होईल. कदाचित् तसें न झालें तरी सर्वकाळ तुझें पालन करून ह्या तुझे पुत्रास मी आपले राज्याचा अधिकारी करीन. आणि येथेंच तुला आनंदांत ठेवीन. तूं कांहीं चिंता करूं नको. पति सुख आणि पुत्रसुख यांत फारच अंतर आहे. तथापि तुजसारख्या पतिव्रता स्त्रिया विवेकानें वागून प्राक्तनीं असलेल्या सुखास उपभोगून राहतात. असें राजाचें प्रेमपूर्वक भाषण ऐकून चंद्रप्रभा ह्मणाली, बापा, मीही आपल्या मनांत असाच निश्चय केला आहे. जसें माझें मत तसेंच आपलें असल्यामुळें मला फार आनंद झाला.

असें त्यांचें भाषण होऊन चंद्रप्रभा महालांत गेली. इतक्यांत वनजात जवळ आला. त्यास तिनें उचलून घेतलें. आणि त्याचें चुंबन घेऊन त्यास ह्मणाली, बाळा, तूं गुणाचा असून माझे पोटीं येऊन दुःखांत पडला आहेस. मी असें काय तरी पाप केलें होतें कीं, ह्या जन्मीं दुःखच भोगीत आहें. तूंही कांहीं पाप केलें होतेंस, ह्मणून माझे पोटीं जन्म घेऊन दुःख भोगीत आहेस. परंतु तुझ्या प्रारब्धानें आतां मात्र कांहीं सुख प्राप्त होण्याचा समय दिसत आहे. असें बोलून डोळ्यांत अश्रु आणून वरपाहून हे परमेश्वरा, माझें पातिव्रत्य जर खरें आहे तर माझ्या पतीस चांगली बुद्धि होऊन आह्मी संसार सुख भोगावें, अशी दया कर, मला सुख होण्याचा समय जवळ आला आहे असें मी ह्मणतें. परंतु कोण जाणे

माझे प्रारब्धीं काय आहे तें. हे देवा, तूं सर्वांतर्यामी आहेस. ह्मणून माझा निश्चय जाणून अशी कृपा कर कीं, जेणें करून पति प्रेमपूर्वक माझा अंगीकार करील आणि मी सुखानें राहीन. अशी परमेश्वराची प्रार्थना करून उगीच राहिली. नंतर भोजनादि आटोपल्यावर वनजातास जवळ घेऊन बिछान्यावर पडली, परंतु आपल्या पतीचें आणि आपलें प्रेम केव्हां जडेल आणि त्यास मी केव्हां आलिंगन देईन अशा उत्सुकतेमुळें तिला चैन पडेना. आणि निद्राही येईना. पुनः पुनः मनांत विचार करिते कीं, जर आपण अधीर होऊन पतीला भेटावें तर कोण जाणें काय होईल. ह्मणून असें करूनये. धीर धरावा हेंच बरें आहे. हे मना, तूं आतां स्वस्थ रहा. उतावीळ होऊं नको. असें बोलून स्वस्थ राहिली. तरी निद्रा लागेना. ह्मणून पुन्हा विचार करिते कीं, मला निद्रा येत नाहीं हें बरोबर आहे. कारण निद्रा असें ह्मणत असेल कीं, जेव्हां तुला पतिवियोग होता तेव्हां विश्रांति देण्याकरितां मी तुजशीं मैत्री करून तुला स्वस्थ ठेविलें. आतां जन्माचा मित्र जो पति तो ईश्वर कृपेनें तुला येऊन भेटला आहे. ह्मणून आतां माझा तुला विशेष उपयोग नाहीं. या करितां तूं माझी स्मृतिही करूं नको. जेव्हां तूं पतिसुख भोगून तृप्त होशील त्या वेळीं तुझे इच्छे प्रमाणें मी येईन. असें मनांत आणून निद्रा मजपासून दूर राहिली काय? असें नाना प्रकारें विचार करितां करितां रात्रीचे तीन प्रहर गेले. चवथ्या प्रहरीं थोडी निद्रा येऊं लागली. तेव्हां पुनः तिनें विचार केला कीं, आतां निद्रेस माझी करुणा आली असेल. कां तर पतिसुख अद्यापि प्राप्त झालें नाहीं आणि मीही जवळ नाहीं. तर हिनें कसें रहावें, असें मानून निद्रा आतां येत आहे. असा विचार करीत आहे, तों एकाएकीं झोंप लागली.

इकडे कमलाक्ष भोजन करून पर्यंकावर निजला. परंतु केदेस अन्यमुळें त्यास झोंप येईना. त्याचे मनांत नानाप्रकारचे विकल्प येऊं लाग-

रे ते असे कीं, आपली सेना एक लक्ष असून एकाएकीं शत्रूनें मला धरून आणिलें. असें होईल हें माझे स्वप्नांतही नव्हतें. त्याप्रसंगीं आमचाच जय व्हावयाचा परंतु नाग पाश टाकून शत्रूनें मला फसविलें. ह्मणून मी त्यांचे स्वाधीन झालों. त्या राजा जवळ मंत्र सामर्थ्य आहे असें मला माहीत असतें नर त्याजपाशीं युद्ध करण्याचा विचार मी केला नसता. याचे जवळ सेना थोडी असून आमच्याशीं युद्ध करण्यास सिद्ध झाला. याचें कारण मंत्र सामर्थ्यच होय. यानीं आपल्या पराक्रमानें मला धरिलें असें नाहीं. याकरितां आतां आपण पश्चात्ताप करूनये. जें प्रारब्धीं असेल तें कोणास चुकत नाहीं. असें मनांत आणून तो स्वस्थ राहिला. परंतु झोंप येईना. त्याच्या मनांत असा तरंग आलाकीं, मजवर नागपाश ज्यानें टाकिला तो पुरुष उत्तम स्वरूपवान् आहे. त्याचे तोंडाकडे पाहिलें त्यावेळीं पौर्णिमेचा चंद्रच आहे कीं काय? असें मला वाटलें. पुरुषाचें असें रूप मी कधींच पाहिलें नाहीं. आणि स्त्रियांत देखील जी अत्यंत रूपवान् असते तिचें मुख असें दिसतें. यावरून हा कोण असावा याचा निश्चय होत नाहीं. कदाचित् मनुष्यरूप धारण करून नागपाश घेऊन राजाचे साह्यास कोणी देव आला असावा. जर देवच असेल तर पुन्हा तो दृष्टीस पडणार नाहीं. आतां उद्यां काय तें समजेल. असें मनांत आणून स्वस्थ राहिला. तरीही झोंप येईना. इतक्यांत दुसरा तरंग मनांत उठला कीं, मी शत्रु असून त्यानीं मला मनोहर मंदिरांत ठेवून सर्व प्रकारें माझी व्यवस्था नीट ठेविली आहे. याचें कारण काय असावें? पुन्हा ह्मणतो कीं, नीतिमान् राजांची अशीच व्यवस्था असते कीं, शत्रु हातीं सांपडल्यावर त्यास ते दुःख देत नाहींत. परंतु जरी त्यांनीं मला येथें सुखांत ठेविलें तरी असेंच जन्मभर कैदेंत ठेवणार. पराधीनते सारखें दुसरें दुःख नाहीं. मग येथें राहून सुख कशाचें त्यापेक्षां मरणही बरें आहे. असें मनांत येऊन त्याचे नेत्रांत अश्रु आले

पुनः मनांत ह्मणतोकीं, विपत्ति हा पापाचा परिणाम आहे. मी काय बरें पाप केलें आहे? इतक्यांत त्यास चंद्रप्रभेचें स्मरण झालें कीं, तिचा जो मी अपराध मनांत आणिला तो खरा नसून मला मात्र सत्य वाटून निरपराधी स्त्रीस मी अरण्यांत सोडिलें काय? बहुत करून असेंच असेल ह्मणून त्या पापानें माझी अशी अवस्था झाली. हर हर! मी केवढा अनर्थ केला. मी येथें जरी सुखांत आहें आणि शत्रू जरी माझा प्राणघात करणार नाहीं; तरी मी पराधीन झाल्यामुळें मला मरण बरें असें वाटत आहे. आणि मी तर प्रत्यक्ष आपल्या स्त्रीस अरण्यांत सोडिलें. तेव्हां तिला तेथें काय काय दुःख झालें असेल? कारण वन हें भयंकर स्थान आहे. तेथें व्याघ्रादि क्रूर पशु वागत असतात. अशा ठिकाणीं तिची काय दशा झाली असेल? ती बहुत करून त्या भयानें मरण पावली असेल. अथवा प्रारब्ध योगानें जिवंत राहून कोठें फिरत असेल आणि तिचे काय काय हाल होत असतील, कारण पुनः मी तिला भेटून सुख प्राप्त होईल हें तिच्या स्वप्नांतही येणार नाहीं. परमेश्वरा, मी फार वाईट कृत्य केलें ह्मणून त्यावेळीं मुद्दाम तिची स्मृति देऊन मला त्याच पापाचें फळ तूं भोगतोस असें दाखविलें काय? आजपर्यंत स्वप्नांत सुद्धां मला तिची स्मृति झाली नव्हती. असें असून एकाएकीं ती होण्याचें कारण हेंच असेल. असें मनांत येऊन त्यास गहिंवर आला. कांहीं वेळानें, आतां आपण दुःख करून उपयोगीं नाहीं. जें जें प्रारब्धीं असेल तें तें भोगिलेंच पाहिजे. असा विचार करून स्वस्थ राहिला. त्यास जी स्मृति झाली ती त्याचे मनांतून कांहीं केल्या जाईना आणि निद्रा येईना. ह्मणून ह्मणतो हे निद्रादेवी, तूं सर्व प्राणिमात्रांचे श्रमाची शांति करणारी साक्षात् देवी आहेस ह्मणून असला घातकी पापी जो मी, त्या मला स्पर्श देखील करूं नये असें मनांत आणून तूं मला सोडिलेंस काय? हे देवी

मी तुझी प्रार्थना करितों कीं, आतां रात्र थोडी गहिली ह्मणून क्षणभर तरी मला विश्रांति दे. असें ह्मणत आहे इतक्यांत पह्नांटेच्या समर्यां खिडक्यांतून थंड वारा येऊन त्यास एका एकीं निद्रा लागली.

कांहीं वेळानें सूर्योदय झाला आणि सूर्य सुमारें दोन घटिकांवर येऊन त्या मंदिराच्या पूर्वेकडील खिडकींतून त्याचे किरण कमलाक्षाचे आंगावर पडून तो जागृत होतांच त्यानें सूर्यास नमस्कार केला आणि ह्मणाला, हे सूर्यनारायणा, निद्रा देवीनें माझा घातकीपणा मनांत आणून माझा त्याग केला होता परंतु तिनें दयाळु होऊन मला विश्रांति दिली. त्यास अजून दोन घटिकाही झाल्या नाहींत. इतक्यांत तूं आपले उष्ण किरणांनीं मला जागृत केलेंस. यावरून असें वाटतें कीं, निद्रादेवीनें पाप्याला विश्रांति न द्यावी असें असून तिनें दिली. याकरितां तिजवर क्रोध करून 'ती घालवून मला तिजपासून झालेल्या विश्रांतीचें सुख देखील होऊंनये ह्मणून तूं किरणांनीं ताप देतोस काय? असो, असें बोलून बिछान्यावरून उठला आणि शौचविधि, मुखमार्जन इत्यादि नित्य कर्मास प्रवृत्त झाला.

इकडे चंद्रप्रभा प्रातःकाळीं उठून स्नानादि नित्य कर्म करून पुरुष वेश धरून कमलाक्षाचे बंगल्यांत येऊन बसली. इतक्यांत कमलाक्षही आपलें नित्यकर्म आटोपून येऊन बसला. नंतर दुसरे कित्येक मानकरी, सभासद इत्यादि आले. त्यांस कमलाक्षानें यथायोग्य सन्मान देऊन बसविलें. इतक्यांत अत्यंत रूपवान् आणि नृत्य गायनांत कुशल अशी कलावंतीण आपल्या साजिंद्यांसह तेथें मुजरा करण्यास आली. नंतर मृदंगादि सूर मिळवून भैरवी रागाचा आलाप करण्या बरोबर कलावंतिणीनें गायन सुरू केलें. प्रथम भैरव रागांत एक धृपद गाऊन नंतर भैरवी रागिणींत एक चीज बोलली. त्या चिजेंत तानपलटे मूर्छना इत्यादिकांनीं आणि आपल्या कोकिळे साररव्या स्वरांनीं तिनें चातुर्य दाखविलें, तेणें करून

सर्वांचें हृदय द्रवून गेलें. त्यांत भैरवी रागिणी विरहाची व्यथा उत्पन्न करणारी असून त्या चिजेंतील अर्थ असा होताकीं, निरपराधी स्त्रीचा जो तिरस्कार करितो तो महत्पश्चात्तापास पात्र होतो. ह्मणून रागिणीचे प्रभावानें आणि अर्थाचे प्रभावानें कमलाक्षास चंद्रप्रभेचें स्मरण होऊन त्याचे नेत्रांतून अश्रु येऊं लागले तें चंद्रप्रभेचे दृष्टीस पडतांच ती विचार करूं लागली कीं, ह्याचे नेत्रांतून पाणी कां आलें असावें.? रागिणीच्या प्रभावामुळें किंवा चिजेंतील अर्थामुळें ह्यास माझें स्मरण झालें काय? परंतु असेंही नसेल. कारण मजविषयीं यास पश्चात्ताप उत्पन्न व्हावा आणि त्याचे योगानें नेत्रांतून अश्रु यावे असें माझें भाग्य कोठें आहे. कलावंतिणीनें त्याचे मुखाकडे पाहून असा तर्क केला कीं, माझे गायनाचे प्रभावानें त्याचें हृदय सद्गदित होऊन नेत्रांतून पाणी आलें असावें. दुसरे सभासदांस वाटलेंकीं, कमलाक्षास पराधीनतेच्या दुःखाचें स्मरण होऊन त्याचे नेत्रांतून पाणी आलें असावें. असे त्या ठिकाणीं नाना प्रकारचे तर्क झाले. नंतर गायन समाप्त झालें. कलावंतीण रीतीप्रमाणें मुजरा करून निघून गेली. नंतर रणसिंह (चंद्रप्रभा) कमलाक्षास बोलला कीं, हे पृथ्वीपते, जसा तुमचा तीर्थरूप धर्मशील आहे त्यापेक्षांही आमचा मदभंजनराजा अधिक धर्मनिष्ठावंत आहे. अशा धर्मी राजाचा कांहीं अन्याय नसून त्याचा नाश करावयाचा प्रयत्न केला असतां तो आपल्याच विपत्तीस कारण होतो. जर मजपाशीं मंत्र सामर्थ्य नसतें तर ह्या राजाचा नाश होऊन दुर्दशा झाली असती. आतां तुह्मीं या राजाचे पूर्ण शत्रु असून त्यानें तुमच्याविषयीं शत्रुभाव मनांत न ठेवितां जशी प्रयमित्राची व्यवस्था ठेवावी तशीच तुमची व्यवस्था ठेवण्याविषयीं आह्मांस आज्ञा केली आहे. तर तुह्मी पराधीनतें विषयीं तिळप्राय दुःख मानूं नये. पुढें आमचा राजा आणि तुमचे तीर्थरूप यांचा सल्ला होऊन लवकरच

तुम्हांस सर्व सुख मिळेल. असें चंद्रप्रभा बोलली. परंतु कमलाक्षाचें चित्त तिच्या बोलण्याकडे राहिलें नाहीं. तो तिच्या मुखाकडेच पाहत राहिला होता त्यावरून चंद्रप्रभे सारखेंच त्या पुरुषाचें मुख आणि भाषण आहे असें त्याचे मनांत आलें त्यामुळें तिची आठवण होऊन त्याचे हृदयांत अधिक करुणा भरून नेत्रांतून अश्रु वाहूं लागले आणि रणसिंहाकडे टकलावून पाहूं लागला. त्यावेळीं मला लोक हंसतील कीं काय? हें देखील त्यास भान राहिलें नाहीं. पुन्हा त्याचे मनांत असा तरंग आला कीं, आपण यास देव ह्मणावें तर हा आजही येथें आला आहे यावरून देव नव्हे. हा कोणी तरी अलौकिक पुरुष आहे. ब्रह्मदेवानें सर्व सृष्टींतील मनुष्याकृति निर्माण केल्या त्या केवळ, ही आकृति निर्माण करण्याकरितां हात वळविण्यासाठींच केल्या असाव्या किंवा त्यास उत्पन्न करून परमेश्वरानें आपल्या अघटित घटनापटीयसी ह्याविशेषणास सत्य करून दाखविलें असावें. ह्याचे मुखास उपमान चंद्रमाही होऊं शकणार नाहीं. मग कमलादिकांची काय कथा आहे. हा पुरुष असून ह्याची आकृति स्त्री सारखी आहे, हें मात्र नवल आहे. माझ्या स्त्रीचें रूप आणि वाणी केवळ ह्याच्याच साम्यतेची असून आकृति ही अशीच होती. तिची मात्र ह्यास उपमा साजेल. परंतु काय करावें. मला दुष्ट बुद्धि होऊन त्या स्त्रीरत्नाचा मी अरण्यांत त्याग केला. असें मनांत आणून स्वस्थ राहिला. तों पुन्हा दुसरा तरंग उत्पन्न झाला कीं, हा माझा पूर्ण शत्रु असून याची मुखाकृति पाहतांच मला द्वेषबुद्धि न होतां प्रेमच कां उत्पन्न होतें कोण जाणें. असो आतां तर्क करून उपयोगी नाहीं. सध्या पराधीनतेचें दुःख कपाळीं आलें आहे. जरी हा राजा नीतिमान् असल्यामुळें मला येथें तिळमात्र दुःख देणार नाहीं. तरी पराधीन राहण्यापेक्षां मरणही बरें. अशांत रणसिंहास पाहून माझे स्त्रीचें मला स्मरण होऊन अधीक

तूप घातल्या सारखें अधिक दुःखास कारण झालें. असो, आतां जेंजें प्रारब्धीं असेल तेंतें भोगिलेंच पाहिजे. असें समजून तो उगाच राहिला. चंद्रप्रभेनें त्याचे नेत्रांतून फार वेळ अश्रु येताहेत आणि त्याची मुखमुद्राही फिरली आहे असें पाहून मनांत आणिलें कीं, माझी आकृति आणि शब्द यांचे योगानें त्यास खचित माझीच स्मृति झाली असावी. बरें, आपण विचारून पाहूं ह्मणजे काय तें कळेल. असें मनांत आणून त्यास ह्मणाली, तुह्मी येथें राहिल्यापासून तुह्मांस फार चिंता उत्पन्न झाली आहे, असें तुमच्या मुखचर्येवरून मला वाटतें. तर राजानीं अत्यंत शोक करणें योग्य नाहीं. जय आणि पराजय हे देवाधीन आहेत.सर्वकाळ एकच स्थिति राहत नाहीं. तुह्मांस लवकरच पहिली स्थिति प्राप्त होईल. आतां तुह्मीं आनंदांत रहावें हें फार चांगलें आहे. असें रणसिंहाचें भाषण ऐकून कमलाक्ष ह्मणाला. तुह्मी ज्या दुःखाची मजविषयीं कल्पना केली तेंच दुःख मला आहे इतकेंच नाहीं. एक दुःख प्राप्त झालें ह्मणजे त्यासमयीं मागील सर्व कृत्यांचें स्मरण होत असतें. तसेंच माझे मागील एका कृतीचें मला स्मरण झालें आहे. आणि तीपासून मला हें दुःख प्राप्त झालें असावें असें वाटतें.

असें कमलाक्षाचें भाषण ऐकून चंद्रप्रभा मनांत ह्मणाली. खचित याला माझेंच स्मरण झालें असावें. परंतु आपण आतां उतावळी करून उपयोगी नाहीं. सहवासानें उघडकीस येईल तें बरें. असें ह्मणून उगीच राहिली. नंतर सर्व सभा उठून आप आपल्या स्थानीं गेली.

दोनप्रहरीं सर्वत्रांचीं भोजनें झाल्यावर सायंकाळीं पुन्हा सभा जमली, त्यावेळीं चंद्रप्रभा कमलाक्षाचें मन उदास पाहिल्यामुळें ह्मणाली. कीं, आपण आज विनोदबागेंत जाऊं. नंतर तें सर्वांस मान्य होऊन ते बागेंत निघून गेले. त्या बागेंत रस्त्याचे दोन्ही बाजूंस नानाप्रकारचे सुगंधी पुष्पांचीं झाडें

असून त्यांचीं पुष्पें विकसित होऊन राहिलीं आहेत. त्यांत जाई, जुई, चमेली, मोगरा, गुलाब, गुलछबु, चंपक, मालती इत्यादि नानाप्रकारच्या पुष्पांचा सुगंध वायूचे योगानें सर्व बागेंत पसरला आहे. अशा ठिकाणीं येतांच तो मंजुळ सुगंध वायु कमलाक्षाचे आंगास लागल्यामुळें त्यास कांहींसा दुःखाचा विसर पडला. आणि त्या बागेच्या रचनेकडे त्याचें लक्ष्य गेलें. जिकडे तिकडे पुष्पांवर भ्रमर गुंजारव करीत आहेत. मोठमोठ्या वृक्षांवरून नानाप्रकारचे पक्षी किलकिल शब्द करीत आहेत. जागोजाग पाण्याचे हौद असून त्यांत नाना तऱ्हेचीं कारंजीं उडत आहेत त्यांचे सभोंवती नानाप्रकारच्या वेली वृक्षांस वेष्टिल्या आहेत. जसें काय स्त्री पुरुषांची भेट आणि प्रीतीनें आलिंगनच दारवितात. अशी त्या बागेंत शोभा पाहत पाहत ते सर्व जिकडे तिकडे फिरत असतां त्यावेळीं कमलाक्षाचें चित्त जरी तें पाहण्याकडे होतें, तरी तो रणसिंहा बरोबर फिरून वारंवार त्याच्या मुखाकडे पाहत असे. त्यावरून त्यास मजविषयींच पश्चात्ताप झाला, अशी चंद्रप्रभेची खात्री झाली. कमलाक्षास खरोखर तिचें स्मरण होऊन त्याचे नेत्रांतून अश्रु येत असत. असें झाल्यामुळें चंद्रप्रभेसही आपल्या पतीचें कधीं आलिंगन होईल असें होऊन तिच्याही नेत्रांतून अश्रु येऊं लागले. तें पाहून कमलाक्षास आश्चर्य वाटलें, परंतु त्या समयीं एकमेकांस कांहींच न बोलतां कांहींवेळ बागेंत फिरून सूर्यास्त झाल्यावर तीं आप आपले ठिकाणीं गेलीं तसेच बाकीचे लोकही गेले.

दुसरे दिवशीं सूर्योदय होतांच कमलाक्षाचे बंगल्यांत सभा जमली. आणि नित्याप्रमाणें सर्व मुजरा करून आप आपले ठिकाणीं गेले. इतक्यांत कमलाक्ष रणसिंहास (चंद्रप्रभेस) ह्मणाला, तुह्माजवळ कांहीं बोलावयाचें आहे. याकारितां क्षणभर येथेंच बसावें. तें ऐकून त्याचें भाषण चंद्रप्रभेनें मान्य केलें आणि बसली. कमलाक्ष तिचे जवळ येऊन

बसला आणि ह्मणाला हे वीरा, माझा अपजय होण्यास कारण तूं झा-
लास. मंत्रविद्येचें सामर्थ्य जर तुजपाशीं नसतें तर माझाच जय
झाला असता. यावरून तूं यावेळीं माझा पूर्ण शत्रु झालास. ह्मणू-
न तुजविशीं द्वेषबुद्धि उत्पन्न व्हावी ती न होऊन स्नेहबुद्धीच होते या-
चें कारण काय बरें? रणसिंह जरा हास्य करून ह्मणाला. हे भूपती स-
र्वांचे अंतःकरणाचा साक्षी एकच आहे तो तुमच्या अंतःकरणांत मज-
विषयीं द्वेषबुद्धि उत्पन्न होऊं देणार नाहीं. कारण माझे मनांत तुह्मांविषयीं द्वे-
षबुद्धि नाहीं. कमलाक्ष ह्मणाला, मजविषयीं तुमचे मनांत द्वेषबुद्धि न-
सण्याचें कारण काय? ती ह्मणाली, सज्जन संगति. जो दुसऱ्याचे अपराधा-
ची क्षमा करून आपण कोणाचाही अपराध करीत नाहीं तो सज्जन ह्म-
णावा. तसा आमचा राजा सज्जनांत शिरोमणि आहे. त्याच्या सहवासामु-
ळें त्याचे आश्रितांसही वाईट बुद्धि होणार नाहीं. जो दुसऱ्याचें वाईट इ-
च्छीत नाहीं त्याचा जगांत कोण वैरी असणार आहे? आमचा राजा
आपल्या वैऱ्यावर देखील प्रीतिभाव ठेवितो याविषयीं प्रत्यक्ष प्रमाण
तुह्मीं आपल्यावरून पहावें. कमलाक्ष ह्मणाला, बरें तुह्मी सज्जन ह्म-
णवितां तर मजवर नागपाश टाकून मला कां फसविलें? रणसिंह ह्म-
णाला, तुह्मी ह्मणतां हें सत्य आहे तथापि त्या नगरीचा राजा नीतिमान् सज्जन
आणि प्रामाणिक आहे. त्याचें अन्न आह्मीं खातों. ह्मणून त्याचे रक्षणासा-
ठीं आह्मांस असें करणें अवश्य आहे यांत सज्जनतेस कमीपणा आला
असें नाहीं. जर तुह्मांस धरून दुर्घट शासन केलें असतें तर आम-
चे स्वभावास लांछन झालें असतें. आतां येथें तुमची यथास्थित
व्यवस्था आहे, परंतु स्त्री मात्र -

इतकें बोलतांच तिचा कंठ भरून आला आणि नेत्रांतून अ-
श्रु येऊं लागले. असें पाहून कमलाक्ष ह्मणाला. स्त्रीमात्र- इतकें बो-

लून तुमचे नेत्रांतून अश्रु कां आले बरें? रणसिंह ह्मणाला जगांत स्त्री आणि पुरुष यांसारखी मित्रता नाहीं. त्यांच्या वियोगामुळें दुःखास कारण होतें. तशी माझी अवस्था झाली आहे. ती स्मृति होऊन माझे डोळ्यांस पाणी आलें. असें त्याचें भाषण ऐकून कमलाक्ष अत्यंत आश्चर्य पावला, आणि त्याच्या मुखाकडे पाहून आणि बोलण्यावरून त्यानें असा विचार केला कीं, त्याची सर्व आकृती माझे स्त्री सारखीच आहे. माझी रूपवान् स्त्री माझे हातून मी घालविली, हें मी फार वाईट केलें. असें मनांत येऊन त्याचेही नेत्रांतून पाणी आलें, तरी चंद्रप्रभेकडे टकलावून पाहूं लागला. त्यावरून चंद्रप्रभा त्याचे मनांतला भाव समजली. त्यावेळीं आतांच आलिंगन द्यावें असें तिला वाटलें, परंतु विवेककरून ह्मणाली, तुमच्या नेत्रांतून कां अश्रु आले? कमलाक्ष ह्मणाला, माझे प्रिय पत्नीचा मला वियोग झाला आहे. आणि तो घातकी रीतीनें झालेला आहे. ह्मणून मला ती स्मृति होऊन पश्चात्ताप होत आहे, इतकेंच नाहीं. त्याजमुळें ही विपत्ति मला आली आहे असें वाटतें. चंद्रप्रभा ह्मणाली, तुमच्या स्त्रीची कशी काय व्यवस्था झाली बरें? कमलाक्षानें तिची झालेली सर्व हकीकत त्यास सांगितली. ती सांगून होईपर्यंत त्याचे नेत्रांतून अश्रु वाहत होते, त्यावरून चंद्रप्रभेनें जाणिलें कीं, त्यास खरोखर पश्चात्ताप झाला आहे. नंतर ती कमलाक्षास ह्मणाली, त्याच वेळीं तुह्मास स्त्रीची स्मृति होण्याचें कारण काय? कमलाक्ष ह्मणाला, मला येथें पडण्याचें दुःखही तुमच्यापासूनच झालें आणि स्त्रीचें स्मरण होण्यास कारणही तुह्मीच झालां. परमेश्वरानें तुमची आकृति अशी केली आहे कीं, तुह्मी पुरुष असून स्त्रीचें सौंदर्य तुह्माहून अधिक नाहीं. सर्व प्रकारें माझे स्त्रीचे आकृतीची तुलनाच आहे त्यामुळें तुह्मीं वैरी असून माझे मनां-

त तुह्मांविषयीं प्रीतिभाव उत्पन्न झाला आहे. परमेश्वरानें मला स्त्री विषयीं पश्चात्ताप देण्यास तुमची आकृति केली कीं काय कोण जाणे तुह्मी मज समोर सर्वकाळ बसलां तर मी सर्व दुःख विसरून राहीन आणि तिजविषयीं ईश्वरा पाशीं क्षमा मागेन कीं, ती जर जिवंत असली तर सुखरूप राहो आणि कोणत्याही प्रकारें मला येऊन भेटो आणि मेली असली तर ज्या योनींत असेल त्या योनींत सुखरूप असो. असें त्याचें भाषण ऐकून चंद्रप्रभा त्याचे मनांतील भाव पूर्णपणें समजली. तेव्हांही तिला आलिंगना विषयीं इच्छा झाली, परंतु पुनः धैर्य धरून त्याचे मनाचें समाधान करूं लागली कीं, जें होणार तें चुकत नाहीं. परंतु विचारावांचून जो कांहीं कृत्य करितो तो शेवटीं पश्चात्ताप पावतो. याविषयीं तुह्मास प्रत्यक्ष अनुभव आहे. असो, आतां भोजनाची वेळ झाली, मी जातों. असें बोलून रणसिंह (चंद्रप्रभा) निघून गेला. जातां जातां पतीविषयीं तिचे मनांत फारच प्रेम भरलें. आपणाविषयीं यास पश्चात्ताप झाला आहे. यावरून माझें दुःख दूर होण्याचा समय आला असें वाटलें. आतां लवकरच आपण ओळख दिली पाहिजे. असा विचार करीत करीत घरीं गेली. तेथें पुत्र जवळ आला. त्यास उचलून चुंबन घेतलें. तो ह्मणाला, आई मी केवढ्यावेळ तुझी वाट पाहत होतों, तूं कोठें गेली होतीस.? चंद्रप्रभा ह्मणाली, बाळा, आतां आपले सुखाचे दिवस जवळ आले आहेत. पुत्र ह्मणाला, आतां आपले घरीं जावयाचें काय? चंद्रप्रभा ह्मणाली, होय, लवकरच जाऊं असें वाटतें. अशीं त्यांचीं भाषणें होऊन त्यांनीं भोजन केलें. कांहीं वेळ आराम घेऊन सायंकाळीं चंद्रप्रभा आपले दासाचे स्वाधीन पुत्रास करून पुन्हा पुरुषाचा वेश घेऊन कमलाक्षाचे बंगल्यांत गेली. तेथें दुसरेही लोक आले होते. ह्मणून कांहींवेळ

बसून त्यांसह बागेंत फिरावयास गेली. कमलाक्ष तिचे बरोबर फिरे आणि दुसरे सर्व जिकडे तिकडे फिरत होते त्यांस त्या रणसिंहाची कांहींच माहिती नसल्यामुळें त्यांनीं प्रधानास विचारिलें कीं, हा पुरुष कोण आहे बरें? प्रधान ह्मणाला, हा आपल्या राजाचे एका स्नेही राजाचा पुत्र आहे. जसे पूर्वी अर्जुनादिक युद्धकलेंत प्रवीण होते तसाच हाही प्रवीण आहे. ह्मणून राजानें त्यास साह्या करितां बोलाविलें. त्यानें येऊन कमलाक्षास धरून जय मिळविला. ह्मणून राजानें त्यास आपलें अवळच ठेविलें आहे. तें ऐकून ते उगीच राहिले. परंतु त्याची सुंदर आकृति असल्यामुळें तेही त्याची प्रीति करीत असत. सर्व बागेंत फिरत आहेत इतक्यांत त्या दिवशीं पौर्णिमा असल्यामुळें सूर्यास्त होतांच पूर्वेकडे चंद्राचा उदय झाला. जसें काय उभयतांचे विरहाचा तापरूप सूर्य समुद्रांत बुडून संयोग रूप चंद्राचा उदयच झाला. दोन घटिका गेल्यावर पूर्ण चांदणें पडलें. त्या प्रकाशाचें वर्णन सर्व करूं लागले. इतक्यांत रणसिंह ह्मणाला, कीं, ही चंद्रप्रभा ( चंद्राचीप्रभा ) प्रियकराचे संयोगसमयीं सुखकर आहे, परंतु वियोगसमयीं महा दुःखदायक होते. असें ऐकतांच कमलाक्ष ह्मणाला, हे रणसिंहा, पुन्हा त्या वाक्याचा उच्चार करा. कारण कीं, ज्यापासून माझे स्त्रीची मला स्मृति होऊन तिचें रसिक नाम कर्णद्वारें मी श्रवण करीन. असें ऐकून चंद्रप्रभेची खात्री झाली कीं, आपणांविषयीं यास पूर्ण पश्चात्ताप झाला आहे. आतां आमचा भाग्योदय झालासा वाटतो. ह्मणून आतां याची विरहव्यथा दूर केली पाहिजे. असा निश्चय करून कमलाक्षास ह्मणाली, तुमची स्त्री निरपराधी असून तुह्मी तिला अरण्यांत सोडिलें. तिचें नांव चंद्रप्रभा आहे काय? कमलाक्ष ह्मणाला, होय, मला तिची स्मृति झाली यामुळें हा प्राण ठेवणें व्यर्थ आहे असें मला वाटतें,

जसें तिचें नांव तसेच गुणही होते. तिचा अपराध प्रत्यक्ष न पाहतां मी तिचा घात केला. ह्मणून ईश्वर मला शिक्षा करीलच. कदाचित् न केली तर मीच होऊन माझा प्राण ईश्वरास दंडा बद्दल द्यावा असें मला वाटतें. येथें माझी हार होऊन मी दुःखांत पडलों. या विषयीं तिळप्राय मला दुःख नाहीं. परंतु तुह्मास पाहून त्या स्त्रीची मूर्ति माझे मनांतून जात नाहीं. तुह्मी मजसमोर नसलां ह्मणजे मला चैन पडत नाहीं. हें त्याचें भाषण ऐकून चंद्रप्रभेच्या नेत्रांतून अश्रु आले आणि आतांच आलिंगन द्यावें असें वाटलें. परंतु पुन्हा धैर्य धरून ह्मणाली, हे राजा, अतिशय शोक करणें उपयोगी नाहीं. जें जें घडणार तें अवश्य घडेल. याकरितां आतां विवेक करावा. आपला भोजनाचा समय झाला आहे. ह्मणून आपल्या ठिकाणीं जाऊं. नंतर भोजन झाल्यावर पुन्हा आह्मी इकडे येऊं ह्मणजे जशी तुह्मीं आपली हकीकत सांगितली, तशी मीही आपली सांगेन. तेणें करून तुह्मास दुःखाचा विसर पडेल. असें बोलून सर्व आप आपल्या स्थानीं गेलीं. भोजन झाल्यावर चंद्रप्रभेनें आपले प्रिय दासीस सांगितलें कीं, राजाच्या विनोदबागेंत वनजातास बरोबर घेऊन आणखी दोन घटिकांनीं तूं ये. वनजातासही सांगितलें कीं, बाळा, आज बागेंत कांहीं मौज आहे, याकरितां दासी बरोबर तूं ये. वनजात ह्मणाला, आई, तूं तेथें असशील काय? ती ह्मणाली, मीही मग तेथें येईन. असें त्यास सांगून आपले धर्म पित्या जवळ जाऊन झालेलें सर्व वर्तमान तिनें कळविलें आणि ह्मणाली, बापा, आतां माझें मन आवरलें जात नाहीं. याकरितां आपल्या विनोदबागेंत आज मी त्यास ओळख देतें. राजा ह्मणाला, ठीक आहे. इतक्यांत मीही मागून येतों. असें बोलतांच चंद्रप्रभा कमलाक्षाचे बंगल्यांत गेली. तेथून दोघेही बागेंत जाऊन तेथील एका हौदाजवळ मखमाली आस

नावर बसलीं. कमलाक्ष ह्मणाला, तुमच्या दुःखाची काय हकीकत आहेती सांगा ह्मणजे माझें मन शांत होईल. चंद्रप्रभा ह्मणाली, आतां दुःखाचें वर्णन करण्यास माझें तोंड उघडत नाहीं. पुढें आपोआप उघडकीस येईल तेव्हां कळेल.

असें बोलणें चाललें होतें इतक्यांत राजा येत आहे असें पाहून दोघेंही उभीं राहिलीं आणि सत्कार करून त्यांनीं त्यास बसविलें. नंतर राजा कमलाक्षास ह्मणाला, आज तुमचें समाधान करण्यास मी आलों आहें. तुह्मी कांहीं चिंता करूं नये. येथें स्त्रीवांचून सर्व सुख तुह्मांस आहे. हा रणसिंह तुमच्या समाधाना करितां ठेविला आहे. हा फार सज्जन आहे ह्मणून तुमच्या चित्ताचें सर्वकाळ समाधान करील. असें बोलत आहे, इतक्यांत मागले बाजूचे कारंज्याजवळ वनजाताचा शब्द ऐकूं आला. राजा ह्मणाला, यासमयीं निर्मळ चंद्रप्रभा, नवपल्लव वृक्ष आणि नानाप्रकारच्या सुगंधी पुष्पांवरील मंदमंद पवनहीं शरीर सुखास उत्कृष्ट साधनें आहेत. अशांत बालकाचा मधुर स्वर केवळ कोकिळाच बोलते काय असें वाटतें. असो, आतां आपण फिरूं या. असें ह्मणून तिघेंही फिरूं लागलीं. आणि एका मोगऱ्याचे झाडाजवळ उभीं राहिलीं तों त्याचे पलीकडे वनजातास दासी खेळवीत बसली होती ती त्यास निरनिराळ्या जातीचीं फुलें दाखवून ह्मणते, मुला, पहा हें जाईचें फूल आहे, हें जुईचें फूल आहे, हें कमळ, असें ह्मणत आहे इतक्यांत तिला शिंक आली, त्यामुळें कमलाक्ष असा शब्द उत्पन्न झाला. तें ऐकून वनजात हंसला. ह्मणून दासीनें त्यास विचारिलें कीं, तूं कां हंसलास? वनजात ह्मणाला, मी तुला सांगणार नाहीं. मी आपल्या आईस सांगेन. दासी ह्मणाली, मला सांगितलेंस तर मी हें फूल तुला देईन. वनजात ह्मणाला, मी तुला सांगेन, पण मघाशीं कमल ह्मणून जसें केलेंस तसें करशील तर सांगेन. दासी ह्मणाली, शिंक वारंवार येत नाहीं. पण यापासून तुला काय आश्चर्य

वाटलें बरें? वनजात ह्मणाला, तें मी तुला सांगणार नाहीं. असें त्यांचें भाषण होत असतां तें ऐकून राजा आणि चंद्रप्रभा हीं समजलीं, पण कमलाक्ष समजला नाहीं. नंतर तिघें ही वनजाता जवळ गेलीं. राजानें वनजातास उचलून घेतलें आणि विचारिलें कीं; मघाशीं कमल बोलतांच दासीस शिंक आली,त्यावरून तूं कां हंसलास बरें? वनजात ह्मणाला, मी तुह्मांला सांगणार नाहीं. मी आईला सांगेन. त्या मुलास पाहून आणि त्याचे शब्द ऐकून कमलाक्षास असें झालें कीं, मी ह्यास कडेवर केव्हां घेईन. जशी काय त्या मुलाचे मनाची आकर्षण शक्ति ओढिते कीं काय असें त्यास झालें.राजानें कमलाक्षाचा अभिप्राय जाणून त्यास त्याचे कडेवर दिलें. त्या बाळाचा स्पर्श होतांच त्यास अति आनंद झाला. इतक्यांत वनजातानें चंद्रप्रभेस पाहिलें. ह्मणून तिनें कमलाक्षापासून त्यास घेतलें आणि चुंबन घेऊन विचारिलें कीं, दासीस शिंक आली त्यावेळीं तुला काय आश्चर्य वाटलें? वनजात ह्मणाला, मी कशाला सांगूं? चंद्रप्रभा ह्मणाली, तर जा दासी जवळ. मी तुला घेतनाहीं. असें बोलून दासीस हाक मारिली आणि त्यास तिचे स्वाधीन केलें त्यामुळें तो रडूं लागला. दासीनें नानाप्रकारचे वृक्ष इत्यादि त्यास दाखविले तरी तो उगीच राहीना ह्मणून पुनः ह्मणाली, पहाहीं चंद्रप्रभा कशी दिसत आहे? वनजात ह्मणाला. ही काय चांगली दिसते? मला तर वाईट दिसते. दासी ह्मणाली कां बरें? वनजात ह्मणाला, पुरुषाचा वेश धरिला आहे ह्मणून वाईट दिसत आहे. हें त्याचें भाषण ऐकून राजा आणि चंद्रप्रभा हंसूं लागलीं आणि कमलाक्षासही आश्चर्य वाटलें. ह्मणून त्यानें चंद्रप्रभेस विचारिलें, हा पुत्र कोणाचा आहे? चंद्रप्रभा ह्मणाली, हा राजाचे मुलीचा पुत्र आहे. तें ऐकून वनजात ह्मणाला, तूं मला टाकिलेंस. आतां मी तुझा पुत्रही नव्हे आणि तूं माझी आईपण नव्हेस. तें ऐकून कमलाक्षास फारच संशय आला. तेव्हां यामुलाच्याबापाचें नांव काय ह्मणून त्या-

नें चंद्रप्रभेस विचारिलें. इतक्यांत चंद्रप्रभेचे नेत्रांतून पाणी आलें आणि खालीं पाहून ह्मणाली, वनजातास विचारा ह्मणजे तोच सांगेल. कमलाक्षानें त्यास उचलून त्याचें चुंबन घेतलें आणि चंद्रप्रभेकडेही पाहिलें, तों त्यामुलाचे स्पर्शानें आपल्या स्त्रीच्या विरहाची विस्मृति होत आहे असें त्यास वाटलें. इतक्यांत त्या उभयतांची ओळख होण्याचा समय पाहून राजा निघून गेला. नंतर कमलाक्ष वनजातास ह्मणाला, कमळ ह्मणून दासीस शिंक आली त्यांत तुला काय वाटलें बरें? वनजात ह्मणाला, मी तें सांगणार नाहीं. मी ह्या आईस देखील सांगणार नाहीं. तें ऐकून ही याची आई खचित आहे, असें त्यास वाटलें. नंतर मनांत आलें कीं, हीच माझी चंद्रप्रभा असावी. पुन्हा ह्मणाला, मुला तुझे बापाचें नांव काय बरें? वनजात ह्मणाला, मी बोलणार नाहीं. कमलाक्ष ह्मणाला, तूं बोललास तर मी तुला कांहीं तरी खेळ देईन. वनजात ह्मणाला, असें ह्मणतां तर ही तुमची टोपी मला द्या, ह्मणजे मी बोलेन. तें त्यानें कबूल केलें आणि त्यास टोपी दिली. नंतर ह्मणाला, आतां सांग बरें तुला काय वाटलें तें? वनजात ह्मणाला, कमळ ह्मणून दासीस शिंक आली तेव्हां माझे बापाचें नांव आलें ह्मणून मी हंसलों. माझे बापाचें नांव कमलाक्ष आहे. तें ऐकून कमलाक्ष आश्चर्य पावला. नंतर पुनः ह्मणाला, मुला तुझी आई कोणती? वनजात (चंद्रप्रभेकडे बोट दाखवून) ह्मणाला, हीच माझी आई. परंतु मी आतां तिला आई ह्मणणार नाहीं. हें ऐकून कमलाक्ष स्तब्ध राहिला आणि विचार करितो कीं, मी हें स्वप्नांत तर पाहत नाहींना. स्वप्न ह्मणावें तर मी निजलों नाहीं. असा कांहीं वेळ विचारांत पडून नंतर चंद्रप्रभेकडे पाहूं लागला. परंतु ती लज्जित होऊन खालीं पाहत आहे आणि तिचे नेत्रांतून पाणी वाहत आहे असें पाहून त्यास आश्चर्य वाटलें. इतक्यांत वनजात ह्मणाला, आई, तूं कां रडतेस?

मला घे. असें ह्मणतांच ती बोलली, बाळा, इतके दिवस मी तुज करितां जिवंत राहिलें. आतां तूं आपले बापा जवळ सुखानें रहा. माझे पातिव्रत्यानें आणि ईश्वर कृपेनें माझ्या प्रियकराची मला भेट झाली. आज मी धन्य झालें आणि परमेश्वराचे फार उपकार मानिले. परंतु कोण जाणे पुढें अशीच विपत्ति होईल कीं काय? असें बोलून, कमलाक्ष स्तब्ध असतां एकदम तिनें त्याचे गळ्यास मिठी मारिली. तेव्हां त्यानें तिला ओळखिलें. तेथें दोघांस जो आनंद झाला तो वर्णन करवत नाहीं.

कांहीं वेळानें तीं उभयतां मुलासह बंगल्यांत आलीं, ती अवघी रात्र त्यांस क्षणासमान भासली. प्रातःकाळीं सर्व सभासदांसह राजा त्या बंगल्यांत आला आणि सर्वां देखत त्यानें कमलाक्षास सांगितलें कीं, पहा, तुह्मी आमचे स्वाधीन झालां, यांत तुह्मांस केवढा लाभ झाला बरें? त्यावेळीं तुह्मीं स्त्रीचा त्याग केला त्यावेळीं विचार केला नाहीं, ह्मणून आजपर्यंत उभयतास हाल भोगावे लागले. यासाठीं आतां पुढें विचारपूर्वक वर्तणूक करीत जा. असें राजाचें भाषण ऐकून कमलाक्ष लज्जित होऊन उगाच राहिला. इतक्यांत कमलाक्षाचा पिता सर्व सैन्यासह आपल्या पुत्रास सोडविण्या करितां येत आहे असें वर्तमान आलें. कांहीं वेळानें त्याचें लष्कर ही येऊन पोहोंचलें. ह्मणून राजानें सख्याचा बावटा चढविला. तो पाहून सर्वत्रांस आश्चर्य वाटलें. नंतर राजानें आपला वकील पाठवून त्यास सर्व वर्तमान कळविलें तें ऐकून कमलाक्षाचे पित्यास फार आनंद झाला. त्यास राजानें आपले नगरांत आणून चार दिवस राहवून घेतलें आणि कमलाक्ष व चंद्रप्रभा यांस मुलासुद्धां त्याचे स्वाधीन केलें. नंतर तो दुंदुभि राजा सर्व सैन्यासह वर्तमान आनंदानें आपले नगरास परत गेला. पुढें कमलाक्ष आणि चंद्रप्रभा यांची प्रीति अधिक वाढून उभयतांस सर्व सुखाचा लाभ झाला.

रत्नाकरा, असें पहा कीं, कमलाक्षानें स्त्रियांचे दुष्कर्माची गोष्ट ऐकिली तितक्यानेंच त्यास स्वस्त्रीविषयीं संशय येऊन त्यानें तिचा त्याग केला. तसेंच तुला दासीनें तुझ्या स्त्रीच्या वाईट आचरणाची गोष्ट कळविली त्यावरून तूं विचार न करितां तिला मारण्यास सिद्ध झाला होतास. पण आतां कसें काय? ती कशी आहे बरें? रत्नाकर ह्मणाला, दासीनें मला ती गोष्ट सांगितल्यापासून आजपर्यंत मी जपणीस लागलों आहें, परंतु अद्यापि मला तिचें वाईट आचरण कांहींच दिसलें नाहीं. चिंतामणि ह्मणाला, अरे, खरोखर पातिव्रत्यानें वागते तिचा अन्याय कोठून दिसणार? पण कमलाक्षासारखे आणि तुझ्यासारखे अविचारी यांशीं गांठ पडली ह्मणजे मात्र त्यांचें हाल होण्यास उशीर नको. पण पुढें त्या आपल्या पातिव्रत्याचे पुण्यानें निर्दोष उघड होतात. असो, आतां तुझी तर खात्री झालीना? आतां दासीनें ही गोष्ट तुझ्या मनांत कां बरें भरून दिली असावी? रत्नाकर ह्मणाला, तें मला समजत नाहीं. तूंच सांग कीं, असें करून तिला काय फायदा होता? चिंतामणि ह्मणाला, अद्यापि तुला समजत नाहीं काय? अरे, ज्या स्त्रिया व्यभिचारिणी असतात त्या कोणतेंही दुष्टकर्म करण्यास मागें सरत नाहींत. तूं आपल्या स्त्रीचा त्याग करावास असें सत्यभामेचे मनांत आलें ह्मणून तिनेंच दासी करवीं हें तुझे मनांत भरून दिलें आहे यावरून आतां तुजवर तिची कितीं प्रीति आहे त्याचा विचार तूंच कर. अरे, अगोदर तुझ्या संसाराचा नाश करून मग ती तुला मास होणार आणि कांहीं दिवसांनीं दुसरा पुरुष पाहिला ह्मणजे तुझा हा त्याग करणार. तिच्या नादास तूं लागल्यावर तुझी सर्व लोकांत अपकीर्ति होऊन शेवटीं ती देखील तुला नाहींशी झाली ह्मणजे मग फजीतीस कांहीं कमी नाहीं, मगत्या खंतीनेंच तुझ्या प्राणाचा नाश होईल.

अशीं व्यभिचारिणी स्त्रियांचे लंपटतेमुळें पुरुषांचे नाशास अनेक क
रणें आहेत. कां तुला आतां कसें वाटतें ? मी तुला नको ह्मणत ना
हीं. पाहिजे तर तिची तुझी उद्यां गांठ घालितों. रत्नाकर ह्मणाला, मित्र
तिचें रूप माझे मनांत आलें ह्मणजे मी वेड्यासारखा होऊन जातें
पण ह्या तूं सांगितलेल्या सर्व गोष्टी ध्यानांत आणिल्यामुळें आतां ती मल
भयंकर दिसत आहे.

भाग पहिला समाप्त.

# सूचना

ह्या पुस्तकाचा दुसरा भाग लवकरच छापण्यास सुरू होईल. त्यां
रत्नाकराचें मन सत्यभामेची इच्छा सोडून सन्मार्गाकडे लागेल. तसेंच पु
सत्यभामेस यमुना बोध करील त्यांतील चमत्कारिक आणि बोधपर गो
वरून तिचेंही मन रत्नाकराची इच्छा सोडून आपल्या पतीच्या सेवेकडे
केल. त्यामुळें तिला सर्व सुखाची प्राप्ति होईल. तो दुसरा भाग पहिल्या
पाहून फारच सुरस आहे. आगाऊ आश्रय दात्यांची नांवें दुसऱ्या भाग
चे शेवटीं छापिलीं जातील. कळावें हे विनंती.

पुस्तकाचे मालक.

